


# समाजस्वास्थ्य

वर्ष १] एप्रिल १९२८ [अंक १०

संपादक–र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.

| विषय. | | पृ. |
|---|---|---|
| १. | वेश्यासंबंधीं कायदे-५ | १ |
| २. | बालहत्या | ५ |
| ३. | संततिनियमनावरील कादंबरी | ६ |
| ४. | जर्मनींतील बातम्या | १५ |
| ५. | पत्रांचा सारांश | १७ |
| ६. | वेश्यांची उचलबांगडी | २१ |
| ७. | अधिकाराचा दुरुपयोग | २२ |
| ८. | गर्मीचा संसर्ग | २३ |
| ९. | ताजी व शिळी बातमी | २४ |

## संततिनियमनाकरितां

# 'मॅटोरी' वड्या वापरा

## डझनाचे नळीस दीड रुपया.

सोल एजंटः—राइट एजन्सी,

२० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.

# जेलोटयूब

यानें गुप्त रोग बरे होत नाहींत, हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्या-करतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर मोबतु यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळा वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेटयांस रु. २

# वेश्यांसंबंधीं कायदे—५

हे कायदे सन १८०२ पासुन फ्रान्समध्यें प्रथम सुरू होऊन तेथून ते यूरोपांतील सर्व देशांत हळूहळू पसरले, व १८६९ मधें फ्लॉरेन्स येथें भरलेल्या बैठकीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेंत सर्व सुधारलेल्या देशांत या संबंधीं सारखीच व्यवस्था करावी असा ठराव पास झाला.

परंतु याच सुमारास इंग्लंडमधें याविरुद्ध चळवळ सुरू झाली, व दोन वर्षांत पार्लमेंटकडे ८,१९० अर्ज गेले, व त्यांवर एकंदर १९,६८,३७९ सह्या होत्या. या लोकांनीं एक संस्था स्थापन करून त्याच्या शाखा हल्लीं जगभर पसरल्या आहेत. यांच्या चळवळीमुळें १८८६ मध्यें इंग्लंडांत व १८८८ मध्यें हिंदुस्थानांत गुप्त रोगांचे दृष्टीनें केलेले वेश्यांसंबंधीं कायदे रद्द झाले. तरीही १८८८ मधें फ्रान्समधील 'अॅकॅडमी' नें पुनः कायद्यांस दुजोरा दिला. तेव्हांपासून प्रत्येक परिषदेंत यासंबंधांत कडाक्याचीं भांडणें होत असतात.

या नवीन पक्षाचें म्हणणें असें आहे कीं:—

१. शरीराचे बाबतींत प्रत्येक मनुष्य स्वतंत्र आहे.

२. नीतीचे नांवाखालीं कायद्यानें कोणाचेही बाबतींत अपवाद करतां कामा नये.

३. वेश्यांसंबंधी सक्तीनें तपासणीचे कायदे करून पुरुषांस अनीतीचे मार्ग सुरक्षित करूं गेल्यास ते बेजबाबदार होतात व नीतीचा पायाच ढांसळून पडतो.

४. स्त्रीपुरुषांनीं जोडीनें केलेल्या कृत्यांचे परिणाम कायद्यानें केवळ स्त्रियांवरच लादणें म्हणजे पुरुषांची नीति वेगळी व स्त्रियांची वेगळी, असें म्हणणें आहे.

५. वेश्याकर्म ही खाजगी गोष्ट असल्यामुळें ती अनीति असली तरी

गुन्हा नाहीं, म्हणुन त्यांत कायद्यास हात घालणें झाल्यास खालील मुद्द्यांपुरताच घातल्यास चालेल:—

६. अज्ञान स्त्रीस किंवा पुरुषास वाईट मार्गास लावण्याचा प्रयत्न कोणीही केल्यास त्यास सारखीच शिक्षा दिली पाहिजे. या बाबतींत ‘ अज्ञान ’ शब्दाची व्याख्या कायद्यानें दिली पाहिजे

७. फसवून किंवा जबरदस्तीनें कोणीही कोणावर अश्लील तऱ्हेनें हल्ला केल्यास किंवा करण्याचा प्रयत्न केल्यास शिक्षा झाली पाहिजे.

८. सार्वजनिक ठिकाणीं कोणताही अश्लील प्रकार करणारास शिक्षा झाली पाहिजे.

९ फूस लावण्याच्या उघड प्रयत्नास व कुटणगिरीस शिक्षा केली पाहिजे, परंतु याकरतां वेगळे पोलीस असूं नये, व ( पोलिसाचे ) जुलमास वाव मिळतां कामा नये

१०. या संबंधाचे सर्व नियम पुरुषांस व स्त्रियांस सारखेच लागू केले पाहिजेत.

११. कुटणांस शिक्षा झाल्यास त्यांचे आश्रयदात्यांसही त्यांचे साथीदार समजले पाहिजे.

१२. या संस्थेचें असें मत आहे कीं नीतीच्या मिषानें कोणत्याही स्त्रीवर सक्तीची तपासणी लादूं नये, व वेश्यांसच लागू होणारे कोणतेही विशेष कायदे असतां कामा नयेत.

यांत कितपत तथ्य आहे हें क्रमानें पाहूं.

१, २. हीं सामान्य तत्त्वें कोणीही कबूल करील.

३. अनीतिचे मार्गांत शिरल्यास त्याबद्दल रोगाचे रूपानें शिक्षा होते, व ती तशी झालीच पाहिजे; ती टाळण्याची सवड देणें व त्याकरतां सक्तीची तपासणी ठेवणें म्हणजे अनीतीस उत्तेजन देणें आहे, असें या लोकांचें म्हणणें दिसतें. हा अज्ञानाचा परिणाम आहे. चुकीबद्दल शिक्षा झालीच पाहिजे, हें म्हणणेंच रानटी आहे, मग वेश्यांकडे जाणें हें पाप आहे कीं काय, हा प्रश्न

वेगळा. शिक्षा झालीच पाहिजे असें असेल तर रोगांवर उपचारही करतां कामा नये. कारण त्यानें शिक्षा कमी होते. शिवाय, ही शिक्षा निरपराधी माणसांसही होते, उदाहरणार्थ आईबापांचे मुळें मुलांस जन्मतःच गर्मी असूं शकते. [ याचें सविस्तर विवेचन आमच्या ' गुप्त रोगांपासून बचाव ' या पुस्तकांत केलें आहे ]. हे रोग इतके भयंकर आहेत कीं यासंबंधीं विचार करून जरूर असल्यास कायदे करणें हे समाजाचें अत्यंत महत्त्वाचें कर्तव्य आहे.

४. हें खोटें आहे. वेश्याकर्म हा गुन्हा समजलेला नाहीं, व त्याचे परिणाम स्त्रियांवर लादलेलेही नाहींत. या स्वातंत्र्यवादी लोकांनीं मात्र वेश्यांस उडाण टप्पूंचे सदरांत घालण्याचा प्रयत्न केलेला आहे, व हे त्यांच्याच तत्त्वाचे विरुद्ध आहे. सक्तीची तपासणी वेश्यांवर लादण्याचें कारण इतकेंच आहे कीं पुरुषांस वेश्यांचा धंदा शक्य नसतो. एक पुरुष एका रात्रींत संसर्गाचा प्रसार फारसा करूं शकतच नाहीं. परंतु वेश्येनें एका रात्रींत ४५ पुरुषांस रोग दिल्याचीं उदाहरणें आहेत, व कायदा फक्त धंदा करणाऱ्या स्त्रियांपुरताच असतो.

५ वेश्यावृत्ति हाच गुन्हा समजण्याचा प्रयत्न फक्त जर्मनींतच झालेला आहे, व तोही केवळ शाब्दिकच आहे. परंतु कायदे फक्त गुन्हेगारांपुरतेच नसतात. पूर्ण स्वातंत्र्याच्या आड येणारे पुष्कळ कायदे सर्व देशांत असतात. सर्वमान्य धंद्यांसंबंधींही जर विशिष्ट प्रकारचे कायदे करतां येतात, तर वेश्यांसच अधिक स्वातंत्र्य दिलें पाहिजे, हा कोठला न्याय ? दुसऱ्यास त्रास होऊं लागला, म्हणजे तेथें स्वातंत्र्याची मर्यादा संपली, व वेश्या या नियमास अपवाद नाहींत.

६, ७, ८, ९, १० यांबद्दल मतभेद नाहीं. कोणावरही जुलूम होतां कामा नये, हें कोणीही कबूल करील.

११. यांत वेश्यागृहांचे मालकांस शिक्षा व्हावी असा उद्देश आहे, परंतु पॅरिसमध्यें पाहिजे तितक्या स्त्रिया आपण होऊन या गृहांत रहावयास येतात व कुंटणांची जरूर पडत नाहीं असें काहीं लेखक म्हणतात.

१२. याबद्दल मात्र तीव्र मतभेद आहे. रोगी वेश्येस रोग बरा होईपर्यंत किंवा निदान संसर्गाचा संभव नाहीसा होईपर्यंत इस्पितळांत सक्तीनें ठेवण्यापासून रोगांचा प्रसार कमी होत नाहीं असें म्हणणं म्हणजे डोळे मिटून आंधळ्यांत शिरण्यासारखें आहे. तपासणी बरवर केल्यामुळें सर्व रोगी स्त्रिया ओळखत नाहींत, हे खरें आहे. परंतु याकरतां तपासणी चांगली केली पाहिजे, इतकेंच. बरवर तपासणींतही सर्वांत अधिक रोगी स्त्रियाच सांपडणार, तेव्हां अशा तपासणीपासूनही निःसंशय फायदा आहे.

इतर पुष्कळ धंद्यांसंबंधीं अशाच प्रकारचे कायदे केलेले आहेत व त्यांस कोणीही नांवें ठेवीत नाहीं. उदाहरणार्थ वकिलांनीं नांव नोंदवून सनद घेतली तरच त्यांस कोर्टांत काम चालवितां येतें. वकिलांचा धंदा सर्वमान्य आहे,-तरीही त्यांच्या स्वातंत्र्याच्या आड येणारे विशिष्ट कायदे आहेत, मग वेश्यांसंबंधीं कां असूं नयेत? हे कायदे वेश्यांचे धंद्यास उद्देशून केलेले असतात, ते त्या स्त्रिया म्हणून नव्हेत.

नोंदलेल्या वेश्यांस कायद्यानें धंदा करण्याचा हक्क मिळतो, हें म्हणणेंही खोटें आहे. वेश्यावृत्ति हा ज्याअर्थीं गुन्हा नाहीं, त्याअर्थीं हा धंदा करण्याचा हक्क सर्वच देशांत कोणासही आहे; त्यास कायद्याची जरूर नाहीं. कायद्यानें या धंद्यासंबंधीं नोंदणीची अट घातल्यानें धंद्यास थोडाबहुत अडथळाच होतो, उत्तेजन मिळत नाहीं.

या लोकांचा नोंदणीच्या पद्धतीसंबंधीं आणखी एक आरोप आहे तो असा कीं नोंदलेल्या वेश्या नेहमीं वेश्याच राहणार, त्यांस धंदा सोडणें शक्य नाहीं. हे म्हणणें खरें नाहीं. पॅरिस येथें नोंदलेल्या वेश्यांस धंदा बदलणें असेल तर त्यांस सर्व प्रकारची सवलत दिली जाते व याचा फायदा घेऊन पुष्कळ वेश्या नोकरी किंवा लग्न करण्याकरतां धंदा सोडून जातातही. त्यांनीं खरोखर धंदा सोडला कीं नाहीं हें पाहण्याकरतां कांहीं दिवस त्यांवर पोलीसची नजर असते इतकेंच, परंतु त्यांस कोणत्याही प्रकारचा अडथळा होत नाहीं.

## वेश्यांसंबंधीं कायदे

वेश्यांचे बाबतींत नीतिकल्पनांपेक्षां रोगांचें महत्त्व जास्त आहे, हें इंग्लंडांतील या पक्षाचे पुरस्कर्ते साफ विसरून जातात. हा मूर्खपणा आहे. इतर कांहीं देशांत पुरुष व स्त्री रोग्यांस सक्तीनें उपचार करण्याकरतां कायदे केलेले आहेत, परंतु जोंपर्यंत गुप्त रोग लज्जास्पद आहेत ही कल्पना नाहींशी झाली नाहीं, तोंपर्यंत या कायद्यामुळें लोक डॉक्टरांकडे न जातां वैदूंकडे जातात व यामुळें रोग बरे होण्याचा संभव कमी होतो. शिवाय अशा कायद्यांमुळें शारीरिक स्वातंत्र्य नाहींसें होऊन वर दिलेल्या तत्त्वांपैकीं पहिल्याच तत्त्वास बाध येतो. तेव्हां या लोकांचीं वरील तत्त्वें मान्य केल्यास वेश्यांसंबंधींचे सर्व कायदे रद्द करून स्वस्थ बसलें पाहिजे. अशा प्रकारच्या व्यवस्थेचे परिणाम पाहणें असल्यास तीनच ठिकाणीं पहावयास मिळतील. ( १ ) इंग्लंड ( २ ) कोल्मार ( ३ ) बेल्जिअम्.

( अपूर्ण )

---

## बालहत्त्या.

गेल्या डिसेंबरमध्यें जुन्नर तालुक्यांत एका विहिरींत एक तान्हें मूल ओरडत असलेलें सांपडलें, व तें कांहीं दिवसांनीं मेलें. सुंदराबाई कुळकर्णी नांवाची एक विधवा गरोदर असल्याबद्दल पोलीसाकडे दोन निनांवीं पत्रें गेलीं होतीं, त्यावरून तिला पकडली. १५ डिसेंबरला आपणांस मूल झालें, परंतु त्यावेळीं शुद्धीवर नसल्यामुळें मुलाचें पुढें काय झालें हें माहीत नाहीं, असें तिनें सांगितलें. मुलाच्या छातीवर, डोक्यावर व पायावर जखमा होत्या.

---

येथील पिंजरापोळ गल्लींत एका लांकडाच्या वखारींत एका तान्ह्या मुलीचें प्रेत उंदरांनीं खाल्लेलें सांपडलें. मूल गळा दाबून मारलें गेलें असा ज्यूरीनें निकाल दिला. आईचा पत्ता लागला नाहीं. निनांवीं पत्रें लिहिणारे कोणी सद्गृहस्थ आसपास नव्हते असें दिसतें.

---

# संततिनियमनावरील कादंबरी.

——:०:——

प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार व्हिक्तर मार्गरीत् यांनीं या विषयावर लिहिलेल्या कादंबरीचा मागें उल्लेख केलाच आहे. एकंदर कथानक तीन कादंबऱ्या मिळून पुरें व्हावयाचें आहे, त्यांपैकीं पहिली आमचेकडे आली आहे. तिचा सारांश येथें देण्याचें योजिलें आहे. या कादंबरीचें नांव ' तुझ्या शरीराची मालकीण तूं ' अशा अर्थाचें आहे.

प्रस्तावनेंत ग्रंथकार म्हणतोः—ही कादंबरी खऱ्या घडलेल्या गोष्टींच्या आधारानें लिहिली आहे. संतति जेव्हां स्त्रियांच्या मर्जीवर अवलंबून राहील तेव्हांच मनुष्य जातीवर आलेल्या सर्व संकटांशीं, रोगांशीं, दारिद्र्याशीं लढून त्यांचा पाडाव करण्याची ताकत त्यांचे अंगीं येईल, हें दाखवण्याचा यांत प्रयत्न केला आहे. हल्लींच्या काळीं कोणत्याही देशाला एकलकोंडेपणानें वेगळें राहता येणार नाहीं. जें सर्वांचें हित, तेंच प्रत्येकाचें हित अशी जाणीव उत्पन्न झाल्याशिवाय कोणासही सुख मिळणार नाहीं. परंतु याची पहिली पायरी म्हणजे संततिनियमनानें लोकसंख्येचा व अन्नाचा मेळ घालणें. तें होईपर्यंत लढाइचें कारण मिटणार नाहीं.

तीन्ही कादंबऱ्या प्रसिद्ध होईपर्यंत आमच्या नायिकेवर शेरा मारण्याची टीकाकारांनीं घाई करूं नये, इतकीच त्यांस विनंति आहे.

## भाग पहिला.

शार्लॉत ॲरेली व तिची १४ वर्षांची बहिण स्पिरिता या गोठ्यांत काम करीत आहेत.

शा:—काय उकडतं आहे !

स्पि:—मग वरचा खमीस काढून टाक ! मी पहा !

शा:—मूर्ख कुठली !

स्पि:—त्यांत काय झालं ? मी फ्रॉक सुद्धां काढीन !

शा:–काढ तर खरी, मग पहा !

स्पि:–( गाईस ) काय झालं कपडे काढले म्हणून ? तुमची खरी चैन आहे. कपडे काढले तरी अंगावर ओरडायला बहीण नाहीं, आई नाहीं.

इतक्यांत शार्लॉत बाहेर गेली असें पाहून स्पिरिता फ्रॉक काढून टाकून मोकळी झाली. [ युरोपांतील १४ वर्षांचे मुलीची शारीरिक वाढ झालेली असतेच असें नाहीं—सं. ] इतक्यांत तिची वहिण परत आली, व तिला नग्न पाहून—

शा:–आई, बघ ग, स्पी पुनः नागवी झाली !

स्पि:–चहाडखोर ! ( आईची हांक ऐकून ) आई, माझ्या कपड्यांत टोळ शिरला होता, ग !

असें म्हणून तिनें मोठ्या बहिणीला खालीं पाडून चोप देण्यास सुरवात केली.

स्पि:–थांब आतां, मी सगळं सांगतें आईला.

शा:–सांग जा, मी कांहीं नागवी नाहीं नाचत तुझ्या सारखी.

स्पि:–इतका सरळपणा आहे कुठं तुला ? पण रेस्सी आला म्हणजे काय काय चालतं तें सांगेन मी.

शा:--बरं बरं, तुला काय करायचं आहे ? मी हवं तें करीन ! एवढीशी चौदा वर्षांची पोरटी बोलते आहे पहा कशी चुरू चुरू. मी मोठी आहे...

स्पि:—असशील !

शा:—गप्प बैस. कपडे घाल !

स्पि:—घालीन मला वाटलं तर !

शार्लॉतनें एक मुसकटांत दिली, व दोघींची पुनः मारामारी सुरू झाली. स्पिरीता चपळ असल्यामुळें शारलॉतलाच मार खावा लागला.

शा:—आई, स्पी मला मारते !

आई:—थांब, मी आलें.

हें ऐकतांच स्पिरिता आपले कपडे गोळा करून, कांहीं उंचीवर खिडकी-वजा एक भोंक होतें त्यांत चढून बसली. तें पाहून संतापानें आईच्या तोंडांतून शब्द निघेना.

स्पि:—नमस्कार, मी आतां कपडे घालतें आणि जातें मामाकडे.

आई:—स्पिरिता, जायचं नाहीं !

पण ती कोठें ऐकते आहे ! ती गाणें म्हणत चालती झाली.

आई:—या सेबॅस्तिआनेंच तिला बिघडवून टाकली आहे. मस्तवाल कारटी !

जॅन् ॲरेली ( स्पिरिताची आई ) चा मोठा भाउ सेबॅस्तिआं पॅकोची व स्पिरिताची मोठी दोस्ती होती. त्याला मनाजोगी बायको न सांपडल्यामुळें त्यानें लग्नच केलें नव्हतें व स्पिरिताला तो पोटच्या पोरीप्रमाणें वागवीत असे. तिचें सर्व शिक्षण त्याच्याच मदतीनें झालें होतें. तो स्वत: बराच प्रवास करून घेऊन चाळिशीच्या सुमारास त्या खेड्यांत एक लहानशी सरकारी नोकरी करून राहिला होता, परंतु त्याचे एकंदर विचार खेडवळ राहिले नव्हते. ॲरेलीच्या सर्व कुटुंबांत इतर सर्व माणसें हलकट किंवा कुचकामाचीं होतीं, हें तो जाणून होता. परंतु स्पिरिता हुशार व चौकस असुन तिची किंमत त्याच्या मतें इतर सर्वांच्यावर होती, व तिला स्वत:च्या मताप्रमाणें तो शिक्षण देत असे. तिचा बाप मॅत्तिओ तरुणपणीं कुशल कारागीर असे, परंतु आतां तो मजूर झाला होता. घरीं बायकोपुढें त्याचें शहाणपण चालत नाहींसें झालें व तो हळूहळू दारूचे व जुगाराचे नादीं लागला होता. पुढें तो लढाईवर गेल्यावर त्याचे बायकोनें दारूचे व्यापारावर पैसा मिळवून कंजुषपणानें राहून डबोलें जमवलें व धर्मोपदेश-कांस दोन पैसे देऊन स्वत:पुरती तिनें आपले समजुतीनें स्वर्गांत जागेची व्यवस्था केली.

कोळयाचा मुलगा फ्रांस्वा व सुताराचा पुतण्या कॉंस्तांतँ या दोन समव-यस्क मुलांशीं स्पिरिताची मैत्री होती. पैकीं दुसरा नेहमीं तिच्या अध्यां वचनांत असे. यामुळें ती त्याला मुळींच विचारीत नसे. तिचें सर्व लक्ष फ्रांस्वाकडे असे, पण तो तिला बिलकूल महत्त्व देत नसे. परंतु खेळांत ती त्या दोघांसही हरवीत असे.

रोझा व मेलॅनी नांवाच्या तिच्या मैत्रिणी एकदां समुद्रांत पोहत असतां ती तेथें गेली. त्यांनीं तिला पोहावयास बोलावलें, परंतु तिच्याजवळ पोहण्याचे कपडे नव्हते, म्हणून रोझानें तिला आपल्यापैकीं एक फ्रॉक दिला. तो घालून ती पाण्यांत शिरली, परंतु रोझा तिच्यापेक्षां मोठी असल्यामुळें तिला तो सैल होऊन पाण्यावर तरंगूं लागला, व तिला कांहीं केल्या अंग झाकतां येईना. इतक्यांत फ्रांस्वा तेथें येऊन तिची चेष्टा करूं लागला. ती लांब जाण्याकरतां पोहूं लागली तों पाण्यांतून सर्वांग दिसूं लागलें. सर्वांच्या हंशामुळें चिडून तिनें तो निरुपयोगी कपडा रोझाच्या अंगावर फेंकून दिला व आपण तशीच जोरानें पोहत लांब गेली, व जातां जातां तिला म्हणाली:—हंसायला काय झालं? पाहायला कुणीं सांगितलं इकडे? परंतु पोहून दमल्यावर तिला तसेंच सर्वांच्या देखत पळत पळत जाऊन आपले कपडे घालावे लागले.

× × ×

स्पिरिताला आठ दिवसांनीं १५ वर्षं पुरीं होणार, तों एके दिवशीं तिला बरें वाटत नसल्यामुळें ती मामाकडे जाउन म्हणाली:—आज मला बरें नाहीं वाटत.

मामा:—तूं फिकट दिसतेस खरी. काय होतं आहे तुला?

स्पि:—सगळं आंग दुखतं आहे.

मामा:—सरदी झाली असेल, झालं.

स्पि:—नाहीं रे, [ पोटास व जघनास हात लावून ] इथें दुखतं आहे.

मामा:—अस्सं! मी समजलों काय तें. त्यांत कांहीं भिण्यासारखं नाहीं.

स्पि:—आतां माझं लहानपण संपलं, असंच ना?

मामा:—दुसरं काय? स्त्रियांच्या कष्टांना ऋतुप्राप्तीपासुन सुरवात होते.

स्पि:—ती कशी?

त्यानें तिला यासंबंधीं संपूर्ण माहिती आधींच दिलेली होती, परंतु आतां पुनः एकदां पहिल्या पासुन म्हातारपणीं ऋतु बंद होईपर्यंत काय काय शारीरिक फरक होतात याची उजळणी केली. निरनिराळ्या प्राण्यांमध्यें

व मनुष्यांतही प्रजोत्पत्ति किशी होते, याची इत्थंभूत माहिती तिला काम-वासना उत्पन्न होण्यापूर्वीच मिळाल्यामुळे या विषयाकडे तिचें कधींही फाजील लक्ष लागलें नव्हतें, व अहितकारी जिज्ञासाही नव्हती. तिला कोणत्याही प्रकारची शंका आल्यास ती मामास विचारीत असे, व तो तिला समंजस उत्तरें देत असे.

स्पि:--या मुली आपापसांत फार चावटपणा करीत असतात. चांगलं कारे हें?

मामा:-हा शुद्ध मूर्खपणा आहे.

स्पि: -रोझाला मीं परवां सांगितलं, मला नाहीं असलं खपायच.

मामा:-छान केलंस. तिची प्रकृति खराब झाली तर तो तिचा प्रश्न आहे. तूं तिच्या नादीं लागलीस तर हे गुलाबी गाल, ही उल्लसित वृत्ति, काम करण्याची हुरूप, कांहीं शिल्लक राहणार नाहीं.

स्पि:-मी तिला म्हटलं, 'तूं घाणेरडी आहेस.' ती म्हणाली, 'बरं, बरं, मी तुझ्यासारखी नागवी नाहीं नाचत लोकांच्या समोर! त्या दिवशीं माझ्या जवळ पोहण्याचे कपडे नव्हते, म्हणून मी पाण्यांतून तशीच पळत कपड्यापर्यंत गेलं, त्यांत काय झालं ग!

ममा:-आपल्या शरीरांत लज्जास्पद असें कांहींच नाहीं. रोझा ज्या गोष्टी तुला करायला सांगत होती [ समसंभोग—सं. ] त्यामात्र लज्जास्पद आहेत. जुने लोक नग्न शरीरासच सुंदर समजत असत. तूं असेच व्यायामाचे खेळ खेळत जा. शरीर सुदृढ करून त्याचा योग्य जोपासना करीत जा. शारीरिक स्वच्छतेची मानसिक उन्नतीला मदत होते. वस्त्राचा उपयोग केवळ थंडीवाऱ्या-पासुन संरक्षण करणें हाच आहे. नीति वस्त्रांवर अवलंबून नसते. शरीर झांकणें किंवा न झांकणें हा रूढीचा प्रश्न आहे, परंतु मनुष्य नग्न असेल तरीही कुत्र्या प्रमाणें वागण्याचें कांहींच कारण नाहीं. तुझ्या शरीराची तूं मालकीण आहेस, व म्हणूनच त्याची अत्यंत काळजी घेतली पाहिजे. आपल्याला मरेपर्यंत शरीराचा उपयोग असतो, तें चांगल्या स्थितींत असेल तरच आपली धडगत आहे.

× × ×

स्पिरिता आज कोठारांत गवतावर पडली होती. उष्णतेमुळें तिच्यानें जास्त काम होईना. वर सांगितलेल्या दिवसापासुन ती आजारीच होती, परंतु आज तिला जास्तच अस्वस्थ वाटत होतें. मामाचे शब्द तिच्या लक्षांत होते. ती मनात म्हणाली, 'हां त्याचींच पूर्वचिन्हें असावीं. आणि दर महिन्याला जर माझी, अशीच स्थिति होणार असेल तर कठिण काम आहे.' मध्येंच तिला झोंप लागून, स्वप्नांत तिला पाण्यांत पडल्याचा भास होऊन ती जागी झाली. तीन दिवसांनीं मॅदम् ओब्ल्युककडे नाच आहे, तेथें आपण फ्रांस्वा बरोबर नाचूं, असें मनोराज्य करीत ती कांहीं वेळ पडून राहिली. फ्रांस्वा बरोबर नाचतांना ती देहभान विसरत असे.

जास्त वेदना झाल्यामुळें ती शरीराला आळेपिळे देऊं लागली, तों तिला एकदम कांहीं चमत्कारिक वाटल्यामुळें उठून पाहते तों खालील गवतावर रक्त दिसलें. आतां तिला एकदम समाधान वाटलें. आपण मुलींच्या सदरांतून एकदम स्त्रियांच्या सदरांत गेलों, याबद्दलच तें समाधान होतें. याची तिला पूर्वीपासून माहिती मिळाली असल्यामुळें तिला भीति वाटली नाहीं. गर्भावस्था व बाळंतपणांत होणाऱ्या यातनांची अजून तिला कल्पना नव्हती.

* * *

स्पिरिताला आतां १७ वर्षे पुरीं झालीं होतीं. तिला अजून खऱ्या प्रेमाची ओळख नव्हती, तरी पण कॉन्स्तांत व फ्रांस्वा या तिच्या दोन खेळगड्यांपैकीं तिला फ्रांस्वाबरोबरच दर रविवारीं नाचायला अधिक आवडत असे, व रविवार केव्हां येतो असें तिला होत असे. तिच्या वहिणीचें लग्न झाल्यामुळें तिच्यावरचा कामाचा बोजा वाढला होता, व ती आईची नावडती असल्यामुळें तिला मामाचा जास्तच ओढा लागला होता. 'तूं प्रकृति नीट ठेव, बाकी पुढची सर्व व्यवस्था मी करीन' असें तो तिला नेहमीं सांगत असे.

एके दिवशीं नित्याप्रमाणें ती बागेंतील फळें वहिणीचे नवऱ्याचे दुकानांत पोंचवण्यास गेली असतां वहिणीला म्हणाली:—माझीन आईचीं नेहमीं भांडणं

होतात, मी कांहीं आतां घरीं राहणार नाहीं, मी मॅदम् ओव्‌न्युक्कडे कामाला राहाणार.

शार्‌लॉत:—मग आमच्याच दुकानावर कां नाहीं रहात? आम्ही तुला पगार देऊं, नाहींरे रेस्सी? (रेस्सी हें तिच्या नवऱ्याचें नांव. फ्रान्समधें नवऱ्यासकट सर्व नात्याच्या माणसांना एकेरी संबोधतात.—सं.)

रेस्सीनें मानेनें होय म्हटलें.

स्पि:—किती देशील?

वहिणीनें सांगितलेली रकम ऐकून स्पिरिता चालूं लागली.

शा:—कां? कमी झाला वाटतं?

स्पि:—हो.

शा:—मॅदम् ओव्‌न्युक असं काय देणार आहे?

स्पि:—चारशें फ्रँक. [ अजमासें रु. ४५ ]

शा:—तिला पैशाची किंमतच नाहीं; बरं तिकडेच जा, आम्हालाही त्याचा अर्थ समजतो.

स्पि:—कसला अर्थ?

शा:—तिच्याकडे काय काय प्रकार चालतात, सगळ्या जगाला माहीत आहे न् काय!

आदल्याच वर्षी तिच्याकडची एक दासी बापाकडे बाळंतपणाला गेली हें स्पिरिताला माहीत होतें, व मुलाचा बाप कोण याचा पत्ता नव्हता. परंतु तिनें असा विचार केला कीं ती दासी बावळट होती म्हणून असें झालें. आपल्याला तर सर्व माहीत आहे, आपल्या मनाविरुद्ध कोणी कांहीं करूं शकणार नाहीं.

तिनें मामाला आपला बेत सांगितला, पण त्याचें मत अनुकूल पडलें नाहीं. तिच्या बापानेंही तिला तसेंच सांगितलें. परंतु तिला हा उपदेश फारसा रुचला नाहीं. बाप म्हातारा झाला होता व बायको म्हणेल तें मुकाट्यानें ऐकून घेत असे. परंतु तिचें तरुण वय होतें. ती ऐकून घेण्यास तयार नव्हती.

एकदां रानांतून परत येत असतां तिला फ्रांस्वा भेटला. त्याला पाहिल्याबरोबर तिला अत्यानंद होत असे. ती ‘ पीच ’ फळांचा पांटी घेऊन जात होती.

फ्रांस्वा:—काय आहे पांटींत ? ( फळें पाहून )

अहाहा, रतीचे स्तनच जणूं काय ! तरी मला आपले हेच बरे वाटतात.

असें म्हणून तिच्या छातीला हात लावणार तों तिनें चपळाईनें बाजूला होऊन त्यांतील एक फळ बरोबर त्याच्या कपाळावर मारलें. त्यानें संतापून त्यांतीलच एक फळ घेऊन तिच्या डोळयांच्या मधोमध मारलें, व तात्पुरती आंधळी झालेली पाहून तिला एकदम आंवळून धरून जोरानें तिचें चुंबन घेतलें ! नंतर मात्र तिची सर्व शक्ति गळल्यासारखी झाली. इतक्यांत एका गाडीचा आवाज ऐकून–स्पि:––जा आतां येथून. मला एकटी इथें राहूं दे.

इतक्यांत तिचा मेहुणा गाडी हांकीत तेथें पोंचला, व दोघांस पाहून त्यांच्या घाबरलेल्या मुद्रेवरून या दोघांचा गुप्त प्रेमसंबंध असावा अशी त्याची कल्पना झाली, व एकदम नीतीचें वारें अंगांत शिरून तो म्हणाला:–फार उत्तम ! आणि रस्त्यावर ! लाज नाहीं वाटत तुम्हांला ? व्हा चालते येथून ! आणि याद राखा, माझ्याशीं गाठ आहे !

फ्रांस्वा:––कां रे बुवा, फारसा रागावलास ? बोलायला कोणाची चोरी आहे, होय ? आमचं कांहीं लग्न नाहीं झालं, म्हटलं. तूं बायकोला नकळत कोठें जातोस तें मी येतों का पहायला ?

असें म्हणून तो चालता झाला. कामवासना कशी असते हें स्पिरिताला आजपर्यंत नुसतें ऐकून माहीत होत, परंतु आतां तिला प्रत्यक्ष अनुभव आला. फ्रांस्वाचे आलिंगनानें तिचे अंगांत अग्नि पेटल्यासारखें झालें, स्पिरिता घरीं पोंचण्याचे अगोदरच ही सर्व हकीकत तिच्या आईला कळली होती. आईनें व भावानें तिची चांगली खरड काढली. आमचें नांव बुडण्यापेक्षां मेलीस कां नाहींस, वगैरे ठराविक शब्दांचा भडिमार ऐकून—

स्पि:—अजून कांहीं नांव बुडवलं नाहीं, बुडवीन तेव्हां बोल !

लुई ( तिचा भाऊ ):—गप्प बस.

स्पि:—मला वाटलं तर बसेन.

· आई:—घालवून देईन घरांतुन !

स्पि:—मीच जाते.—परंतु आईनें व भावानें तिला पकडली व आईनें एक चपराक दिली. स्पिरिता एकदम दरवाजाबाहेर उडी मारून नाहींशी झाली.

आई:—पोरगी काय करील कुणाला ठाऊक !

लुई:—जाऊंदे ग. आपण जेऊन घेऊं या. दमली म्हणजे येईल परत. उद्यां तिला चांगला चोप दे म्हणजे झाल.

स्पिरिता मामाकडे गेली, पण घर बंद. नंतर समुद्राचे किनाऱ्यावर एक होडी पाहून एकटीच कांहीं वेळ तिन ती समुद्रात वल्हवून दमल्यावर परत येते तों वाटेंत तिला मॅदम् ओब्ऱ्युक भेटली. तिनें तिची हकीकत ऐकून तिला आपल्याकडे नोकरीस ठेवण्याचें कबूल करून सध्यां घरीं जाण्याचा उपदेश केला. त्याप्रमाणें घरीं येऊन, दार बंद असल्यामुळें बाहेरच निजून ती सकाळीं नेहमींप्रमाणें कामाला लागली. आई थोडीशी घाबरलीच होती, तीही कांहीं बोलली नाहीं.

( अपूर्ण )

---

अलाहाबाद येथें नुकताच बॅकमन् नांवाच्या एका मिशनऱ्यावर आत्महत्येचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून खटला झाला. त्याचा व हॅझल्डीन् नांवाच्या एका फिरत्या मिशनऱ्याच्या बायकोचा बरेच दिवस प्रेमसंबंध होता हें दोघा-नींही कोर्टात कबूल केलें ' ही गोष्ट मिशनमधील सर्व लोकांस माहीत असु-नही त्यांनीं त्यास फारसें महत्त्व न देतां तिकडे दुर्लक्ष करावें, हें आश्चर्य आहे व मिशनास मोठेंसें भूषणावह नाहीं' असें मॅजिस्ट्रेट मि. हार्डी उद्गारले. बॅकमन याच्या तरुण वयाकडे लक्ष देऊन त्यांनीं त्यास चांगल्या वर्तणुकीबद्दल ५० रु. चे दोन जामीन घेऊन सोडून दिलें. बहुतेक आत्महत्यांच्या मुळाशीं एखादी प्रेमकहाणी असते.

× × ×

# जर्मनींतील बातम्या

## ( लिहून आलेला मजकूर )

केम्निट्झ ( जर्मनी ) येथें लग्न न होतां एकत्र राहाणाऱ्या एका प्रौढ जोडप्यास पोलीसकडून पुढील नोटीस मिळाली. " लग्न झालेल्या जोडप्याप्रमाणें राहून लोकांना त्रास होत असल्यामुळें ही नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत तुम्हीं राहातें घर सोडून गेलें पाहिजे " ! जणूं काय लग्न झाल्यानंतर मग लोकांना त्रास देण्याचा हक्कच त्या जोडप्याला मिळतो ! ज्या नियमान्वयें ही नोटीस बजावली गेली तो सन १८३५ त ८० वर्षांच्या एका वृद्ध राजानें केला होता व सॅक्सनीच्या समाजसत्तावादी राज्यकर्त्यांना तो पसंत आहे असें दिसतें !

—:०:—

बर्लिनमध्यें संध्याकाळीं रस्त्यांतून जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांनीं एका पोलिस शिपायास एका दरवाजांत अंधारांत चाललेला कांहीं प्रकार दाखविला, व तेथें वसून प्रेमलीला करणाऱ्या दोन व्यक्तींना अटक करण्यास सांगितलें. शिपायालाही अशा प्रकारचा कांहीं संशय आलाच होता, तरी प्रथम त्यानें त्या प्रकाराकडे दुर्लक्षच केलं होतें पण रस्त्यांतील लोकांनीं तक्रार केल्यावर त्याचा नाइलाज झाला. चौकशी अंतीं असें दिसून आलें कीं प्रेमचेष्टा करणाऱ्या व्यक्ति दुसऱ्या कोणी नसून विवाहानें बद्ध झालेलें मध्यम वयाचें एक जोडपें होतें. गरीबीनें गांजल्यामुळें सरकारी अनाथगृहांचा आश्रय या नवराबायकोला घ्यावा लागला व स्त्री पुरुषांचीं अनाथगृहें वेगवेगळीं असल्यामुळें त्या दोघांना एकत्र येणें अशक्य होऊं लागलें. अखेरीस नाइलाज होऊन सुट्टीच्या दिवशीं आपली इच्छा अशा प्रकारें अंधारांत, सार्वजनिक बागांतून वगैरे तृप्त करून घेण्याखेरीज त्यांना मार्गच राहिला नाहीं.

—०—

डॉ. माग्नुस हिर्षफेल्ड यांनीं पुढील गोष्ट " Socialistic Union of Doctors " मध्यें स्वतः सांगितली.

" बर्लिनमधील एका प्राथमिक शाळेंतल्या एका दहा वर्षांच्या एका मुलीला शाळेंत मूर्च्छा आल्यावरून तेथील शिक्षकाला संशय आला व त्यानें त्या मुलीची डॉक्टरकडून तपासणी करवली. त्यानंतर शाळेच्या अधिकाऱ्यांकडून नुकत्याच विधवा झालेल्या त्या मुलीच्या आईला बोलावणें आलें व ती तेथें गेल्या-नंतर आपली दहा वर्षांची मुलगी गरोदर आहे हें ऐकून तिला काय वाटलें असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. अर्थातच या प्रकारानंतर मुलीचें शाळेंत जाणें बंद झालें व आपल्याला काय झालें आहे हें तिला धडसें कळत नसूनही तिच्या-पासून प्रत्येक माणूस दूरदूर राहूं लागलें. जर्मनींतल्या पीनल कोडाच्या २१८ व्या कलमाप्रमाणें गर्भपात करणें हा भयंकर गुन्हा असल्यामुळें तिच्या आईनें कितीही प्रयत्न केले तरी त्या मुलीचा गर्भपात करण्याला कोणताच डॉक्टर तयार होईना, अर्थात् तिच्याजवळ पैशाची ऊब असती तर तिची इच्छा तृप्त करण्यास कोणीही डॉक्टर तयार झाला असता.

चौकशी अंतीं असेंही कळून आलें कीं हें कृत्य करणारा पुरुष म्हणजे त्या मुलीचा बापच असून तिला चॉकोलेट वगैरे देऊन खूष करून नंतर त्यानें तिच्या अज्ञानाचा फायदा घेतला होता! त्या मुलीनें या सर्व प्रकारामुळें जी हाय खल्ली तीच अखेरीस तिच्या आत्महत्येला कारण झाली. आईचीं वर्तमानपत्रें वाटण्याचें काम करण्याकरतां ती एका घरांत गेली असतां तेथील तिसऱ्या मज-ल्यावरून खालील फरशीवर उडी मारून तिनें जीव दिला!"

वर दिलेलें २१८ वें कलम कोणताही अपवाद ओळखीत नसल्यामुळेंच केवळ हा एक गरीब जीव हकनाक बळी पडला असें म्हणावें लागतें. आपल्या इकडे देखील, एकाद्या बाईवर बलात्कार झाला तरी तिला गर्भपात करून घेतां येत नाहीं असा कायदा आहे."

---

# पत्रांचा सारांश.

## १

सा. न. वि. वि. ऋतुकालीं एखादें औषध दिल्यानें गर्भधारणा बंद होणें शक्य असल्यास त्याची किंमत कळवावी. एकदां औषध घेतल्यानें जन्मभर गर्भधारणा बंद होत असल्यास त्याहूनही उत्तम. कळावें.

[ अशा प्रकारचीं औषधें अजून सांपडलेलीं नाहींत. सं. ]

## २

कृ. सा. न. वि. वि. आपलें संततिनियमन हें पुस्तक मी नुकतेंच वाचलें. ...डच् पेसरीचा तपास ×× आणि कंपनीकडे केला होता, परंतु पेसरी चांगल्या स्थितींत मिळेल अशी त्यांनीं खात्री दिली नाहीं. दुसरा उपाय करून पाहिला परंतु उपयोग झाला नाहीं. लागोपाठ चार मुलें दीड दोन वर्षांचे अंतरानें झाल्यामुळें पत्नीची प्रकृति अतिशय अशक्त झाली आहे व मुलांच्याही प्रकृति असाव्या तशा निरोगी नाहींत यामुळें आम्ही दोघेंही फार जिकीरीस आलों आहों. आपलें पुस्तक वाचल्यानें आपण खात्रीचा उपाय सुचवावा व त्याप्रमाणें आपणाकडे रासायनिक पिल्स व पेसरी मिळत असल्यास मेहेरबानी करून व्ही. पी. नें माझेकडे पाठवून देण्याची कृपा करावी. आपणाकडे मिळत नसल्यास कोणाकडे मिळतील तें कळविल्यास मी मागवून घेईन. त्यांचा उपयोग कशा रीतीनें करावा हेंही कळविण्याची कृपा करावी. त्याप्रमाणें यासंबंधानें आणखी कांहीं माहितीचीं पुस्तकें असल्यास व गुप्तरोगांपासून बचावाचीं साधनें व पुस्तक यांच्या किंमतीची यादी पाठवून देण्याची मेहेरबानी व्हावी. हल्लीं संततीच्या त्रासामुळें जवळ जवळ संभोग बंद ठेविला आहे, परंतु त्यामुळेंही दोघांस फार त्रास होतो. लहान मुलांच्या संगोपनाच्या त्रासामुळें पत्नीही त्रासून गेली आहे. तरी मेहेरबानी करून वरील माहिती व साधनें पुरविल्यास फार कृपा होईल. तसदीची माफी असावी. कळावें......

ता. क. उत्तराकरितां एक आण्याचें तिकीट पाठविलें आहे.

[ १. राइट एजन्सी, २० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई, या पत्त्यावर लिहिलें असतां संपूर्ण माहिती व कॅटलाग मिळेल, व योग्य साधनें व्ही. पी. नें पाठविण्याची तजवीज होईल. २. संभोग जवळ जवळ बंद ठेवण्याचा तिळमात्र उपयोग नाहीं, इतकेंच नव्हे तर या युक्तीनें गर्भधारणेचा संभव वाढतो. धार्मिक लोकांस महिन्यांतून पुष्कळ दिवस संभोग वर्ज्य असतो, व ही सर्वांत अधिक संतति उत्पन्न करण्याची धार्मिक युक्ति आहे. संभोग अजीबात बंद ठेवला तरच गर्भधारणा होणार नाहीं. ३. संपादकांस इतर लोकांप्रमाणेंच पोट भरण्याची जरूर असते, यामुळें केवळ उपजीविकेकरतां बराच वेळ खर्च होतो, व म्हणून एक आण्याचें तिकीट पाठवणाऱ्या सर्व जिज्ञासूंस सविस्तर उत्तरें देणें अशक्य होतें. संततिनियमन व गुप्तरोगांपासून बचाव, यांसंबंधीं माहिती व साधनांचा कॅटलाग फुकट पाठवतों, परंतु यावर किंवा तदनुषंगिक इतर विषयांवर खुलासेवार माहिती ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं पत्राबरोबर रु.५ पाठवण्याची मेहेरबानी करावी. सर्व साधारण महत्त्वाच्या प्रश्नांस मासिकाचे द्वारें उत्तरें मिळतील, परंतु ही सवलत फक्त वर्गणीदारांपुरतीच आहे. ४. या मासिकापासून संपादकास पैची प्राप्ति नाहीं, दर महिना पदरचे पैसे खर्च करून मासिक चालवावें लागत आहे. वाचकांजवळ पैशाची मदत मागण्याची संपादकाची इच्छा नाहीं. पैशाचे मदतीपेक्षां अधिक वर्गणीदार मिळवून देण्याचा उपयोग जास्त आहे, तरीही कोणी पैशाची मदत केल्यास तिचा साभार स्वीकार होईल. एक दोन मित्रांनीं याप्रमाणें मदत करण्याचें कबूल केलें आहे, त्यांचे येथेंच आभार मानणें जरूर आहे. सं. ]

× × ×

२

सा. न. वि. वि. 'समाजस्वास्थ्य' मासिक काढून आपण समाजाला ऋणी केलें आहे. माझे मतें प्रत्येक कौटुंबिकानें वर्गणीदार होऊन स्वतःची उन्नति करून घेतली पाहिजे व आपणास मासिकांत सुधारणा करण्यास मदत केली पाहिजे.

मासिकांत मला खालील सुधारणा इष्ट वाटतात, व लोकाश्रय पुरेसा मस-

त्यास आपण त्या कराल अशी आशा वाटते. आपले वर्गणीदार किती आहेत हें माहीत नाहीं, परंतु आतांपर्यंत ५००० वर्गणीदार झाले असले पाहिजेत.

आपल्या मासिकांत इतरांच्या जाहिराती दिसत नाहींत, हें कसें? लोक जाहिराती देण्यास तयार नाहींत, कीं मासिकाबद्दल लोकांस फारशी माहिती नाहीं? जाहिरातींनी आपणास मासिक सुधारण्यास पुष्कळ मदत होईल असें वाटतें.

माझे मतें धंदेवाल्या लोकांच्या जाहिराती न मिळाल्यास, 'वर पाहिजे,' 'वधू पाहिजे,' 'पुनर्विवाहास तयार' वगैरे प्रकारच्या छोट्या जाहिराती माफक दरानें घेण्यास सुरवात करावी. शिवाय पुष्कळ स्त्रीपुरुषांस कांहीं कारणांमुळें लग्न कर्तव्य नसतें, परंतु त्यांस ब्रह्मचर्यानें राहणेंही शक्य नसतें, म्हणून त्यांस कोणाची तरी आजन्म मैत्री पाहिजे असते. संततिनियमनाची माहिती नसल्यामुळें विधवांस पुष्कळ वेळां आत्मघात करून घेण्याची वेळ येते हें आपणास माहीतच आहे, तेव्हां अशा स्त्रीपुरुषांस गुप्तपणें जाहिराती देण्याची सोय आपणास करतां येण्यासारखी आहे, व त्यामुळें कित्येक स्त्रीपुरुषांची आजन्म मैत्री जडण्याचा संभव आहे.

कोणासही वेश्यांकडे जाण्यास सांगावें असें मला वाटत नाहीं, कारण हल्लीं चांगली स्त्री सांपडणें शक्य नसतें, व गुप्त रोगांचा प्रतिबंध नेहमींच करणें शक्य होणार नाहीं, व एकदां मनुष्यास रोग झाला म्हणजे तो बरा होत नाहीं.

आपल्या फेब्रुआरीचे अंकांत पान १३ वर आपण लोकांस वेश्यांकडे जाण्याचा उपदेश करतां! मी याचे विरुद्ध आहें, कारण त्याला रोगप्रतिबंधाची माहिती नसेल, व एकदां तो रोगांत सांपडला कीं त्याची स्थिति हल्लींहूनही वाईट होईल. त्याऐवजीं त्यानें 'जन्माची मैत्रीण पाहिजे' अशी जाहिरात द्यावी, म्हणजे त्याची प्रकृतिही सुधारेल व ती त्याची नेहमीं काळजी घेईल. आतां आपण म्हणतां त्याप्रमाणें कदाचित् तो तिला संतुष्ट करूं शकणार नाहीं, ही शंका राहिली. परंतु अशा जाहिरातीला उत्तर देणारी स्त्रीही भुकेलीच असणार, तेव्हां ती मिळेल तेवढाच तुकडा घेऊन त्यांतच समाधान मानील, व ती त्याच्या प्रकृतीची अधिकच काळजी घेईल,

कारण त्यांत तिचाच झाला तर फायदा होण्याचा संभव. माझे मतें वेश्येकडे जाण्यापेक्षां हें बरें.

आपण अशा रीतीचे लेख लिहून लोकांचे डोळे उघडावे अशी माझी विनंति आहे, व मेहेरबानी करून वेश्यांकडे जाण्याचा उपदेश करूं नये. माझे कित्येक मित्र वेश्यांचे पायीं धुळीस मिळाले आहे.

**माझें म्हणणें आपणास कबूल असल्यास पुढील अंकांत लिहावें. तसदीची माफी असावी.**

[ १. जाहिराती घ्यावयाच्या नाहींत असा आमचा नियम नाहीं, परंतु त्या मिळण्यासंबंधीं आम्ही विशेष खटपट केलेली नाहीं, हें खरें. २. कोणती जाहिरात घ्यायची व कोणती न घ्यायची, हें जाहिरातींतील मजकूर पाहून ठरवावें लागेल. जाहिरात आमचे मतें फसवणुकीची नसल्यास व कायद्याची अडचण नसल्यास आमची घेण्याची तयारी आहे. ३. ' आजन्म मैत्री ' व लग्न यांत आम्हांस नैतिक दृष्टया फरक दिसत नाहीं. ४. रोगांचा प्रतिबंध करणें सोपें आहे, वेश्यांकडे जाण्यास एवढीच अडचण असल्यास ती आतां दूर झालेली आहे. ५. फेब्रुआरीचे अंकांत पान १३ वर डा. रॉबिनसन यांचें मत दिलें आहे, व अशा वेळीं वेश्येकडे जाणें हाच मार्ग आम्हांस श्रेयस्कर वाटतो. नपुंसकानें लग्न करणें म्हणजे स्त्रीला फसवणें आहे म्हणजे अनीति आहे परंतु वेश्येकडे गेल्यास सर्व कारभार सरळ प्रामाणिकपणानें होतो. रोगांसंबंधीं काळजी घेतल्यास कोणाचेंही नुकसान होत नाहीं. ६. जाहिरातीस उत्तर देणाऱ्या स्त्रीस तरी अशा रीतीनें काय म्हणून फसवावें, हें आम्हांस समजत नाहीं. ७. कुलीन विधवेला किंवा कुमारिकेला खड्ड्यांत टाकण्यापेक्षां वेश्यांकडे जाणें शतपट बरें. अर्थात् स्वैर संभोगास समाजाची आडकाठी नाहींशी झाल्यावर वेश्यांची जरूर राहणार नाहीं इतकेंच नव्हे, तर धंदा न चालल्यामुळें त्या आपोआपच नाहींशा होतील. ८. वेश्यांचे पायीं लोक धुळीस मिळत असतील, पण ते मूर्ख लोक. त्यांचा पैसा वेश्यांनीं नाहीं लुबाडला, तर दुसरा कोणी तरी

लुबाडणार. नाटक ज्या प्रमाणें खोटें असें माहीत असूनही आपण पहावयास जातों, तशीच वृत्ति वेश्यांकडे जाणारांनीं ठेविली पाहिजे. वेश्यांचें खरें प्रेम असणें शक्य नसतें असें नाहीं, परंतु पैसे देणाऱ्यावर तें असणार नाहीं. गिऱ्हाइकाशीं नाटकच करावयाचें असतें, व तें त्यांनींही ओळखलें पाहिजे.

---

# वेश्यांची उचलबांगडी.

दिल्ली येथील चौरी बाजारांतुन वेश्यांस काढून टाकण्याकरतां लाला मदनमोहन लाल यांनीं १५ फेब्रुवारीला तेथील म्युनिसिपालिटींत आणलेल्या ठरावास पोलिसांकडून व इतरांकडून बराच दुजोरा मिळाला.

म्युनिसिपल सेक्रेटरींनीं, लालाजींचा उद्देश स्तुत्य आहे तरी पण मार्गांत बऱ्याच अडचणी आहेत, असें सांगितलें. म्युनिसिपल् ॲक्टाचे १५७ कलमाप्रमाणें कोणत्याही मनुष्याला म्युनिसिपल हद्दीबाहेर काढून टाकतां येत नाहीं; अमुक भागांत त्यांनीं राहूं नये असें पाहिजे तर म्हणतां येईल, परंतु त्यांस कोठेंतरी राहूं दिलें पाहिजे ( दिल्ली येथें कोणी झाबवाला नाहीं असें दिसतें ! ) हल्लीं त्यांस कांहीं विशिष्ट ठिकाणींच राहण्याची परवानगी आहे, व तेथेंच त्या राहतात. तेथें त्या नको असतील तर त्यांस दुसरीकडे सोय करून दिली पाहिजे, व त्यांस पुरेशी नोटिस दिली पाहिजे.

दिवाण श्रीराम हे लालाजींस दुजोरा देऊन म्हणाले कीं चौरी बाजारांत कोकेनचीं दुकानें झालीं असुन त्यांचें बहुतेक उत्पन्न वेश्यांचे गिऱ्हाइकांवर अवलंबून असतें, तेव्हां वेश्यांसच तेथून काढून टाकल्यास दोन कामें होतील. शिवाय बदमाष लोक गाणें ऐकण्याचे निमित्तानें तेथें येऊन आसपास चोऱ्या करतात. वेश्यांकडे जाणारे लोक कधीं कधीं रस्त्यांत सभ्य स्त्रियांस त्रास देतात, व बदनामीचे भयानें अशा तक्रारी पोलीसापर्यंत पोंचतही नाहींत. चौरी बाजारांत सुखवस्तु हिंदूंची वस्ती आहे व मोठा बाजारही आहे, तेव्हां वेश्यांस दुसरीकडे नेऊन टाकल्यास बरें. पोलीस सुपरिंटेंडेंटचेंही असेंच मत आहे. इतर लोकांचेंही तसेंच मत पडलें.

# अधिकाराचा दुरुपयोग.

येथें शिशुसप्ताहाचें बंड प्रथम सुरू झालें तेव्हां 'संततिनियमनाशिवाय शिशुसप्ताहाचा बिलकूल उपयोग नाहीं' असें मत आम्ही प्रदर्शित केलें होतें, व त्यामुळे आमच्यावर शिशुसप्ताहवाल्यांचा बराच घुस्साही झाला होता. सुदैवानें हे लोक आतां जागे झाल्यासारखे दिसतात. यंदां सप्ताहाचे वेळीं दाखवण्याकरतां कमिटीतर्फे एक चलच्चित्रपट तयार करण्यांत आला आहे, ह्यांत अतोनात मुलें झाल्यामुळे कुटुंबाची कशी दुर्दशा होते हें दाखवलें आहे. परंतु कोणताही चित्रपट दाखवण्यास येथील 'सिनेमा सेन्सर्स बोर्ड' ची परवानगी लागते. संततिनियममनाची आवश्यकता दाखवणाऱ्या चित्रपटामुळें लोकांचीं मनें दुखावतील अशा सबबीवर त्यांनीं परवानगी देण्याचें नाकारलें. याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं या बोर्डाचे सभासदांस संततिनियमन पसंत नाहीं, व विरुद्ध पक्षाचा पाडाव करण्याकरतां त्यांनीं आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला. ख्रिस्ताचे गोडवे गाणारा चित्रपट चालतो, व त्यानें इतरधर्मीयांचीं मनें दुखतील अशी शंकाही बोर्डास कधीं येत नाहीं, कारण बोर्डावर युरोपिअन सभासद असतात. परंतु येथें युरोपिअन सभासदच विरुद्ध असल्यामुळें ही दडपशाही साधेल अशी बोर्डाची कल्पना झाली. तरीपण त्यांचे दुर्दैवानें शिशुसप्ताहाच्या अध्यक्ष लेडी विल्सन आहेत, व बोर्डाचा निकाल रद्द करण्याचा अधिकार सरकारास असल्यामुळें बोर्डाची फजिती होऊन चित्रपट दाखवण्यास सरकारी परवानगी मिळाली !

या मागसलेल्या व उन्मत्त अधिकाऱ्यांचीं नावें:— मि. केली ( पोलीस कमिशनर ), अध्यक्ष; सर बैरामजी जीजीभाई; मि. ग्रीन ( कस्टम खातें ); रा. मंडलीक ( शेरिफ ) व प्रिन्सिपल हॅमिल्.

हें सर्व लोक कोणत्याही अधिकाराचे जागेस लायक नाहींत हें वरील हकीकतीवरून स्पष्ट होतें. या लोकांस स्वतःच्या मताची कांहीं किंमत असेल तर त्यांनीं बोर्डावरील जागेचे राजीनामे दिले पाहिजे होते. परंतु असे राजीनामे देणारे लोक हिंदुस्थानांत फारसे नसतात.

या चित्रपटास सरकारचा पाठिंबा मिळाल्यानंतर संततिनियमनाचे विरुद्ध बोलणाऱ्या कांहीं शिशुसप्ताहवाल्यांचीं मतें बदलल्यासारखीं दिसतात. तीं कायमचीं बदललीं आहेत, कीं पुढें एखादी मागसलेली गव्हर्नरीण आल्यास तीं पुनः बदलतील हें समजणें कठिण आहे.

# गर्मीचा संसर्ग *

—–—०—–—

पॅरिस येथील सेंट लुई हॉस्पिटलांतील दवाखान्यांत १९२२–२६ या पांच वर्षांत गर्मीच्या प्रथमावस्थेतील व द्वितीयावस्थेतील एकंदर १८९४ रोग्यां-संबंधीं बारीक चौकशी करून खालील माहिती मिळवलेली आहे.

या बाबतींत उघड वेश्यांचा वर्ग मोठा आहे, परंतु त्यांपैकीं बहुतेक या दवाखान्यांत येत नसल्यामुळें येथें येणाऱ्या स्त्रियांपैकीं शकडा १० च वेश्या असतात. परंतु इतर धंदे करून भरीला वेश्याकर्म करणाऱ्या स्त्रिया, म्हणजे मुख्यतः शिवणकाम करणाऱ्या व घरीं किंवा दुकानांत नोकरी करणाऱ्या स्त्रिया शेकडा १४ सांपडल्या. पुरुषांचे बाबतींतही घरच नोकर, गाडीवाले व पान-गृहांतील नोकर यांचें प्रमाण शेकडा ९ होतें.

कोणत्या वयांत गर्मी होते ? यासंबंधीं आमचे आंकडे प्रसिद्ध लेखक फुर्निअे यांचे आंकड्यांशीं जुळतात. शेकडा ५८ रोगी विशी आणि तिशीच्या दरम्यान होते, ३० व ४० चे मधें १८, ४० व ५० चे मधें ७, व ५० चे पुढें ३ होते. विशीचे आंत शेकडा १४ होते. विशीचे आंत स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां पुष्कळ कमी सांपडते.

गर्मीचा संसर्ग कसा झाला, ही माहिती मिळणें बरेंच कठिण असतें. पुष्कळ वेळां रोगी खोटें बोलतो किंवा त्यास माहीतच नसतें. तेव्हां जेथें रोगी खरें बोलतो अशी आमची खात्री झाली अशाच रोग्यांची हकीकत आम्ही जमेंत धरली आहे. असे एकंदर ३६१ पुरुष व ३२४ स्त्रिया होत्या.

या ३२४ स्त्रियांपैकीं १९३ अविवाहित व १३१ विवाहित होत्या. अवि-वाहित स्त्रियांपैकीं बहुतेक वेश्या किंवा निदान वाईट चालीच्या स्त्रिया होत्या, परंतु कित्येक स्त्रिया लग्नाच्या आशेनें फसलेल्या होत्या. विवाहित स्त्रियांपैकीं शेकडा ७५ स नवऱ्यापासुन गर्मी लागली असें निश्चित ठरवतां आलें.

पुरुषांपैकीं ११९ विवाहित व २४२ अविवाहित होते. विवाहितांपैकीं

* पॅरिस येथील दोन डॉक्टरांनीं लिहिलेल्या लेखावरून.

२७ रोग्यांस स्वतःचे बायको पासून गर्मी लागली व इतर सर्व रोग्यांस इतर स्त्रियांपासून लागली. या इतर स्त्रियांपैकीं शेंकडा २० घरकाम करणाऱ्या होत्या. अशा स्त्रियांस रिकामा वेळ असा मुळींच नसल्यामुळें त्यांस उपचार करणें अशक्य होतें. नाइलाज झाला म्हणजे त्या इस्पितळांत जातात, परंतु नंतर उपचार शेवटपर्यंत न केल्यामुळें त्या कधींच चांगल्या बऱ्या होत नाहींत. शेंकडा ३२ स्त्रिया रस्त्यांत गिऱ्हाईक शोधणाऱ्या वेश्या होत्या व शेंकडा १० नोंदलेल्या वेश्यागृहांतील वेश्या होत्या. समसंभोगाचें प्रमाण पॅरिसमधें इतर देशांपेक्षां कमी आहे, तरीही यांपैकीं शेंकडा २ पुरुषांस या मार्गानें संसर्ग झाला होता.

वेश्यांपैकीं नोंदलेल्या वेश्यागृहांतील वेश्यांत रोगांचें प्रमाण सर्वांत कमी, नोंदलेल्या स्वतंत्र वेश्यांत त्याहून अधिक, व न नोंदलेल्या वेश्यांत सर्वांत अधिक सांपडतें.

---

येथील कायदे कौन्सिलाच्या मार्च १५ च्या बैठकींत मि. रहिमतुल्ला यांचे प्रश्नास उत्तर देतांना मि. हॉटसन् यांनीं सांगितलें कीं येथें वेश्यांचीं नोंद नसल्यामुळें नक्की माहिती सांगतां येत नाहीं, तरीपण मुंबई शहरांत ६८० वेश्यागृहें आहेत, व त्यांत १३१० हिंदु वेश्या, २५६ मुसलमान, ६४ हिंदी ख्रिस्ती, १७ जपानी, १४ आंग्लोइंडियन, १३ अरबी, ११ ज्यू, ११ रशियन, ७ पारशी, ६ मॉरिशिअन् ४ ग्रीक, ५ फ्रेंच, ३ रूमॅनिअन्, २ इंग्लिश, २ इटॅलिअन, १ पोलिश्, १ हंगेरिअन्, १ अमेरिकन, व १ पॅलेस्टाइन मधील, अशा वेश्या आहेत !

मि. मर्झबानः—कांहीं वेश्या पारशी नसतांही स्वतःस पारशी म्हणवतात, हें आपणास माहीत आहे काय ? ( हंशा )

मि. हॉटसन्ः—तें मला माहीत नाहीं. त्या स्वतः म्हणतात त्या वरूनच ही माहिती दिलेली आहे.

मि. बोलेः—हॉटसन् साहेब मर्झबान् यांना त्या वेश्यांचे पत्ते देतील तर त्यांची शंका दूर होईल. ( मोठा हंशा. )

मि. हॉटसनः—मला त्यांचे पत्ते माहीत नाहींत. ( हंशा ) परंतु एकाद्या मेंबरास पाहिजे असल्यास ते मिळवतां येतील. ( मोठा हंशा )

# समाजस्वास्थ्य




वर्ष १ ] ऑगस्ट १९२७ [ अंक २

संपादक--र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १. मिश्र विवाह व असहिष्णुता. ... ... | १ |
| २. स्वयंपाकांत स्वच्छतेचें महत्त्व. ... ... | ३ |
| ३. चंदावरकरांचा वेश्यांवर हल्ला. ... ... | ४ |
| ४. पाणी किती प्यावें ? ... ... ... | ६ |
| ५. वेश्या कोणास म्हणावें ? ... ... ... | ७ |
| ६. रानटी लोकांच्या चाली रीति. ... ... | ९ |
| ७. मिस् डिकिनसन यांचें वेश्यांवर व्याख्यान. ... | ११ |
| ८. नवीन लेखांतील निवडक विचार. ... ... | १४ |
| ९. ताजी व शिळी बातमी. ... ... ... | १८ |
| १०. कॉलरा कसा टाळावा ? ... ... ... | २२ |

# मिश्र विवाह व असहिष्णुता.

मिश्र विवाह कितीही इष्ट किंवा अनिष्ट असोत, एक गोष्ट मात्र खरी कीं आज इतके दिवस गाजून राहिलेल्या पाणंदीकर–खान विवाहामुळें पत्रकारांवर अत्यंत उपकार झाले आहेत. अलीकडील सुशिक्षित वर्गाच्या लोकांत अस्सल धर्मनिष्ठा औषधाला सुद्धां सांपडण्याची मुष्किल असते. नव्या जुन्या समजुतींचें मिश्रणच सर्वत्र सांपडतें. रा. पांगारकरांसारखे ह. भ. प. सुद्धां ब्राह्मणेतरांकडील जेवणावर यथेच्छ ताव मारतात. मग तें बाहेर फुटून बभ्रा झालाच तर सक्षौर प्रायश्चित्त घेऊन मोकळें होतां येतेंच आहे ! ही जेथें ह. भ. पं. ची स्थिति, तेथें आधुनिक पत्रकारांची धर्मासक्ति किती असेल हें दिसतेंच आहे ! परंतु कौन्सिलांत जाण्याकरितां ह्मणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा, ज्यांना लोकप्रियता पाहिजे आहे, त्यांना ही खरी स्थिति बहुजनसमाजाच्या लक्षांत येणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी लागते. अशा पत्रकारांना मधून मधून आपल्या ओढून ताणून आणलेल्या धर्मनिष्ठेची टिमकी वाजवावी लागते. या विवाहामुळें या लोकांची आयतीच सोय झाली. ज्यांना कोणाला तरी कशावरून तरी नेहमीं शिव्याच द्यायच्या असतात त्यांनाही आयताच विषय मिळाला. हो, पत्रांतील अमुक इतकी जागा शिव्यांनीं भरलीच पाहिजे हा नियम एरवीं चालावा कसा ? हिंदु मुसलमानांमधील दुही वाढवण्यांत आपलें हित आहे असें ज्यांना वाटतें त्यांनाही अशी संधि फुकट घालवतां येत नाहीं. एकूण या विवाहासंबंधीं जे चवताळलेले लेख प्रसिद्ध झाले आहेत, त्यांच्या मुळाशीं खरा संताप नाहीं, संपादकीय डावपेंच आहेत. आजपर्यंत पुष्कळ लोक हिंदूंचे मुसलमान झाले आहेत व अजूनही होतात. मालिनीबाई मुसलमानही झाल्या नाहींत, किंवा मुसलमानाबरोबर पळूनही गेल्या नाहींत त्यांनीं राजरोसपणें मुसलमानाशीं विवाह केला आहे, यांत विशेष चवताळण्यासारखें कांहींएक झालेलें नाहीं.

खऱ्या धर्मनिष्ठ लोकांस आमचें असें सांगणें आहे कीं अशा तऱ्हेचे मिश्र विवाह क्वचितच होतात व क्वचितच व्हावयाचे. ही गोष्ट उदाहरणानें पसरण्यासारखी नाहीं, व वधूवरांची परस्पर विशेष ओळख झाल्याशिवाय असे विवाह होणें शक्य नाहीं. आतां पुनर्विवाह करावयाचा असे ठरवून विधवा वधू पाहण्यास निघणारे लोक कधीं कधीं भेटतात. परंतु आतां आपण मुसलमानाशीं लग्न करूं असा मनाशीं ठराव करून मुसलमान वर किंवा वधू पाहण्यास कोणीही निघणें शक्य नाहीं. असे विवाह अपवाद असतात व ते अपवादच राहणार. मात्र एक मुसलमान व एक हिंदु अशा स्त्रीपुरुषांची विशेष ओळख होऊन जर त्यांचें खरें प्रेम जमलें, तर ते समाजाच्या छळाला मुळींच भीक घालणार नाहींत, आणि न घातली तरच तें खरें प्रेम. विसाव्या शतकांत समाजाची छळ करण्याची शक्तिच तितकी राहिली नाहीं, निदान थोड्याबहुत सुधारलेल्या राष्ट्रांत व त्यांतून शहरांत राहणाऱ्या लोकांस तरी भिण्याचें विशेष कारण नाहीं. तेव्हां याबद्दल आरडा ओरडा केल्याचा परिणाम कंठशोषापलीकडे विशेष कांहीं होणार नाहीं.

सहिष्णुता हेंच सुधारणेचें लक्षण आहे. आपल्यापेक्षां भिन्न मताच्या लोकांशीं लढाई करणें, जाळपोळ करणें, तें शक्य नसल्यास त्यांचा शक्य तितका सामाजिक छळ करणें हे प्रकार धर्माच्या रानटी स्थितींतील होत. जोंपर्यंत त्यापासून त्रास होत नाहीं तोंपर्यंत असहिष्णु लोकांची मनःस्थिति मोठी मौजेची वाटते. आपले स्वतःचे विचार म्हणजेच नीति, त्यापेक्षां भिन्न विचार म्हणजे अनीति. अर्थात अनीतिमान लोकांना विचार-स्वातंत्र्य उपयोग नाहीं, मग कृतिस्वातंत्र्य लांबच राहिलें. इतकेंच नाहीं तर नीति याचा अर्थ इतरांनीं पाळण्याकरतां आपण घालून दिलेले नियम, इतकाच कधीं कधीं होतो, व असहिष्णु लोक त्या नियमां प्रमाणें वागतातच असें नाहीं.

परंतु ही असहिष्णुता हळू हळू कमी होत जाऊन स्वातंत्र्याच्या दिशेनें जगाची उत्क्रांति होत आहे. राजांची सत्ता नाहींशी होऊन लोकांची सत्ता प्रस्थापित होत आहे, म्हणजे एकाच्या मताप्रमाणें सर्वांनीं वागावयाचें हा प्रकार आतां बंद होऊन लोकांस स्वातंत्र्य म्हणजे काय हें समजूं लागत आहे.

अर्थात समाजांत राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं, परंतु जोंपर्यंत दुसऱ्या कोणाचें नुकसान होत नाहीं, तोंपर्यंत प्रत्येकास पाहिजे तसें वागण्याची मुभा असली पाहिजे. विवाहासारख्या बाबींत वधूवरांचेंच हिताहित विशेष महत्त्वाचें असतें. इतर लोकांस बरें वाटेल कीं वाईट वाटेल हा प्रश्न गौण असतो. अशा ठिकाणीं इतरांनीं आपलेंच घोडें पुढें ढकलण्याचा प्रयत्न करण्यांत तात्पर्य नाहीं. समाजाकडून त्रास होणार ही गोष्ट मालिनीबाईस कळली नसेल असें नाहीं. असें असूनही ज्याअर्थीं त्यांनीं हा विवाह केला आहे त्याअर्थी तो आपल्या हिताहिताचा पूर्ण विचार करूनच केला असला पाहिजे, व तसाच केला आहे असें त्या म्हणतात. यानंतर सुशिक्षित म्हणवणाऱ्या लोकांनीं त्यांच्यावर व्यर्थ टीका करीत बसणें म्हणजे स्वतःच्या मनाचा अनुदारपणा व्यक्त करणें होय.

---

## स्वयंपाकांत स्वच्छतेचें महत्व.

१९१३ सालीं यूरोपांत एका मेजवानीस हजर असलेल्या लोकांपैकीं ३८ लोक आजारी पडले व त्यांपैकीं १० मेले. यांच्या प्रेतामध्यें पॅराटायफॉइड तापाचे जंतु सांपडले, व हेच जंतु मेजवानीस केलेल्या एका पक्वान्नांत व स्वयंपाकिणीच्या मलामध्यें सांपडले. यावरून ते लोक कसे आजारी पडले याची संगति सहज लागते. साबणानें हात धुण्याची व्यवस्था संडासांत असणें जरूर आहे. व केव्हांही हात धुण्यास साबण वापरणें बरें. जेव्हां पुष्कळ माणसांस एकच साबण वापरावा लागतो, तेथें साबणाचे वडीऐवजीं पातळ साबणाची बाटली ठेवावी. बाटलींतून ओतून घेतांना साबणास स्पर्श होत नाहीं.

---

**संततिनियमनाची व गुप्तरोगापासून बचावाची सर्व माहिती व साधनें** आमच्याकडे मिळतील. कॅटलागाकरतां एक आण्याचें तिकीट पाठवा.

**राइट एजन्सी,** २० भटवाडी रस्ता,
गिरगांव, मुंबई.

# चंदावरकरांचा वेश्यांवर हल्ला.

येथील म्युनिसिपालिटीच्या ४ जुलैच्या बैठकींत ' **श्री. चंदावरकर** यांनीं पुढील ठराव पुढें आणिला:—' वेश्यांस भाड्यानें जागा देणें हा गुन्हा होईल अशा रीतीनें हल्लींचा वेश्यांसंबंधीं कायदा बदलण्याची सरकारास सूचना करावी. '

याच्या समर्थनार्थ भाषणांत ते म्हणाले:—'गिरगांवांतील बहुतेक सगळ्या सभ्य वस्तीच्या जागा हल्लीं वेश्यांनीं व्यापल्या आहेत, याचें कारण त्या इतरांपेक्षां, २० ते ६० टक्के अधिक भाडें देऊं शकतात. '

यावर **हॅमन्ड** साहेब म्हणाले; ' कुंटणाखान्याचे मालक व वेश्यांस जागा देणारे घरवाले एकाच सदरांत येतात, कारण दोहोंसही वेश्यांपासून फायदा होतो. मला असें एक घर माहीत आहे कीं ज्याची वास्तविक किंमत अगदीं कमी असून वेश्या त्याचें रु. ६०० भाडें देतात.

**सर वसन्तराव दाभोळकर:** ' तें कोणचें घर ' ?

**श्री. हॅमण्ड:** ' नंबर ६, ग्रँटरोड. ( हंशा )

**सर वसन्तराव:** शहरांत मुळीं वेश्याच असूं नयेत असें चंदावरकरांचें म्हणणें आहे कीं काय ? ( हंशा ). तसें झाल्यास गर्ती स्त्रियांस बरेंच धोक्याचें होईल. शिवाय, घरवाल्यांवरच विशेष कटाक्ष कां ? वकील, डॉक्टर, व्यापारी, गिरणीवाले वगैरेही त्यांच सदरांत कां आणूं नये ?

' आपण वेश्यांच्याच मतांनीं निवडून आलां नाहीं काय ? ' अशी त्यांनीं चंदावरकरांस पृच्छा केली. चंदावरकर म्हणाले ' बिलकुल नाहीं. '

**सर वसन्तराव:** ' मी तुम्हांला मदत करीत होतों. आणि वेश्यांनीं तुम्हांला मतें दिलेलीं मीं पाहिलीं. चंदावरकरांस वेश्यांचा जर इतका तिटकारा आहे, तर त्यांनीं डी वॉर्डातर्फे उभें रहावयास नको होतें ( हंशा )

**चंदावरकर:** मी घरवाल्यांतर्फे आलों आहे. '

**सर वसन्तराव**: त्यांची तुम्हांला फारच काळजी !

श्री. मर्झबान् म्हणाले: ‘ वेश्याव्यापार बंद झाल्यास अनीति वाढेल, व शहरांत वेश्यांची जरूर असते असें एका तज्ज्ञाचें मत आहे. ’

श्री. बोमन–बेहराम म्हणाले: ‘ कायद्यानें वेश्यांकडून भाडें वसूल करण्याकरतां फिर्याद चालत नाहीं, यापेक्षां घरवाल्यांविरुद्ध अधिक कांहीं करण्याचें कारण दिसत नाहीं. घरवाले वेश्याव्यापारास उत्तेजन देतात हें म्हणणें बेजबाबदारीचें आहे. हा प्रश्न कायदेकमिटीकडे विचाराकरतां पाठवावा अशी माझी सूचना आहे. ’

ही सूचना बहुमतानें पास झाली.

\+ \+ \+ \+

घरवाले वेश्यांकडून जुलमानें फाजील भाडें उकळतात म्हणून वेश्यांची दया येऊन चंदावरकरांनीं हा ठराव आणला असेल असें सकृद्दर्शनीं कोणास वाटण्याचा संभव आहे. परंतु त्यांनींच म्हटल्याप्रमाणें ते घरवाल्यांच्या तर्फे निवडून आल्यामुळें वेश्यांचे तर्फे ते घरवाल्यांशीं भांडतील हें संभवतच नाहीं. शिवाय यांत वेश्यांस भाड्यानें जागा देणें हाच गुन्हा व्हावयाचा असल्यामुळें वेश्यांस मुळीं जागाच मिळूं नये असा यांत स्पष्ट हेतु दिसतो. वेश्यांस फुकट जागा देणें हा तरी निदान गुन्हा नाहीं ही एक सोयच आहे. यामुळें चंदावरकरांच्या सूचनेप्रमाणें कायदा बदलल्यास वेश्यांस फुकट जागा देण्याचें मिष करून त्यांजकडून पाहिजे तितकें भाडें वसूल करण्यास घरवाले कधीं चुकणार नाहींत !

पण वेश्यांवर असा आडून हल्ला कां ? वेश्यांचा नायनाट व्हावा एतदर्थ त्यांना कोणी जागाच देऊं नये असा कायदा करण्याचा आडमार्ग कां ? वेश्यावृत्ति म्हणजे अनीति आहे या सबबीवर, वेश्यांस थारा देणें हा जर गुन्हा म्हणावयाचा, तर वेश्यावृत्ति हाच गुन्हा कां नाहीं समजावयाचा ?

आणि वेश्यांनीं चंदावरकरांचें असें काय घोडें मारलें आहे कीं त्यांनीं

त्यांना हद्दपार करूं पहावें ? सर्व धंद्यामध्यें कोणत्याना कोणत्या तरी प्रकारची शारीरिक किंवा मानसिक शक्ति भाड्यानें द्यावी लागते, तेव्हां त्याबद्दल पैसा किंवा इतर मोबदला मिळत असतो. या सामान्य नियमांतच वेश्यांचा धंदाही येतो. वकील आपली अकल खऱ्याचें खोटें करण्याकरतां भाड्यानें देतात, व त्यांची उच्च दर्जाच्या लोकांत गणना होते, मग वेश्यांवरच धाड कां ? मनुष्याचा सर्वांत श्रेष्ठ गुण म्हणजे अकल, ती जर भाड्यानें दिलेली चालते, तर त्यापेक्षां शरीराचें महत्व अधिक कधींपासून झालें ? वेश्यांस आपला धंदा उघडपणें करूं देण्यास आम्हांस कोणत्याही प्रकारची हरकत दिसत नाहीं, व त्यांस कायद्यानें कोठेंही हरकत केलेली नाहीं. फक्त त्यांनीं रस्त्यांत उघडपणें गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न करूं नये अशा प्रकारचे कायदे आहेत. या विषयाचा सविस्तर विचार आम्हांस पुढें करावयाचा आहे. सध्यां इतकेंच पुरे.

---

## पाणी किती प्यावें ?

मोठ्या मनुष्यानें दिवसांतून ६ पासून ८ ग्लास पाणी प्यावें. [ ग्लास म्हणजे अजमासें ६ औंस किंवा १५ तोळे ]. जेवणाबरोबर अगदीं थोडें पिऊन नंतर एक तासपर्यंत आणखी पिऊं नये. अर्थात हिंवाळ्यापेक्षां उन्हाळ्यांत जास्त पाणी प्यावें लागतें. लहान मुलांस कमी पाणी लागेल, परंतु लहान मुलांस तहान लागेल तेव्हां पाणी दिल्यास तीं बहुधा जरुर तितकेंच पाणी पितात.

---



प्रत्येक स्त्रीनें ही भोंवऱ्याची पिचकारी स्वच्छतेकरितां वापरणें इष्ट आहे. यांतून पाणी जोरानें भोंवऱ्यासारखें फिरत बाहेर येऊन योनिमार्ग साफ धुवून निघतो. किंमत रु. ५

# वेश्या कोणास म्हणावें ?

वेश्यांसंबधीं कायदे करण्याचा प्रसंग ज्यांच्यावर येतो, त्यांस प्रथम या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागतें, व तें देणें वाटतें तितकें सोपें नाहीं.

येईल त्याला आवडी निवडीशिवाय देहविक्रय करणारी, ती वेश्या असें रोमन लोक समजत असत. एखाद्या स्त्रीनें अनेक वेळां देहविक्रय केला असें कायदेशीर रीतीनें पोलिसाशिवाय इतर साक्षीपुराव्यानिशीं सिद्ध झाल्यास तिला वेश्या समजावें, असें फ्रान्समध्यें १७९६ सालीं नेपोलिअन बोनापार्टनें ठरवलें. आणखी एका फ्रेंच लेखकानें वेश्या याची व्याख्या बरीच अधिक आकुंचित केली आहे. त्यांचे मतें एखादी स्त्री नित्य, पैसे घेऊन, आवड निवड न ठेवतां कोणाशींही शरीरसंबंध करणारी असली तरी तेवढ्यानेंही ती वेश्या होत नाहीं; तिला दुसरें कांहीं उपजीविकेचें साधन नसेल तरच ती वेश्या समजावी, असें ते म्हणतात.

इतर लेखकांनीं बऱ्याच विस्तृत व्याख्या केल्या आहेत. पतीशिवाय किंवा पतिसमान मानलेल्या एका पुरुषाशिवाय इतरांशीं संबंध ठेवणाऱ्या सर्व स्त्रिया वेश्या समजाव्या, असें एक विद्वान म्हणतात; मग त्यांत पैशाचा कांही संबंध असो वा नसो !

फ्रेक्सनर नामक आणखी एका लेखकानें अशी एक व्याख्या दिली आहे:—नेहमीं किंवा कधीं कधीं पैसे किंवा इतर मोबदला घेऊन जी स्त्री अनेक पुरुषांशीं प्रेमरहित शरीर संबंध करील, ती वेश्या समजावी.

या व्याख्येंतील ‘ अनेक पुरुषांशीं ’ हे शब्द विशेष महत्त्वाचे समजले पाहिजेत, कारण बाकीची सर्व व्याख्या पुष्कळ पतिव्रता स्त्रियांसही लागू पडेल ! प्रेमरहित विवाह पुष्कळ असतात, व बहुतेक सर्व जगभर विवाह हेंच स्त्रियांच्या उपजीविकेचें साधन असल्यामुळें पैसे किंवा इतर मोबदला त्यांस मिळत असतोच ! तेव्हां वरील दोन शब्दांनींच त्यांची अब्रू बचावली. नाहीं तर एका फ्रेंच ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें वेश्या व पतिव्रता यांमध्यें किरकोळ व घाऊक विक्री, इतकाच काय तो फरक रहावयाचा !

फ्रान्समध्यें पोलिसाकडे वेश्यांचे एक रजिस्टर असतें, त्यांत कोणाही प्रौढ स्त्रीस आपण होऊन नांव दाखल करतां येतें, व त्यांत नांव नसुन एखादी स्त्री वेश्यावृत्तीनें राहतांना आढळल्यास पोलिस तिचें नांव त्या रजिस्टरांत घाल-तात. [गुप्त रोगांसाठीं तपासणी करतां या रजिस्टरचा उपयोग असतो. ] कोणी स्त्री एकदांच वेश्यावृत्तींत सांपडल्यास तिला वेश्या समजण्याचा अधिकार पोलि-सास नाहीं; ती पुष्कळ वेळां सांपडली पाहिजे. तिला दुसरें उपजीविकेचें साधन नसेल तरच ती वेश्या असें पूर्वी समजत असत, परंतु हल्लीं अशी अट नाहीं. यामुळें ज्या स्त्रियांस इतर धंद्यांत पुरेसे पैसे मिळत नसल्यामुळें वेश्यावृत्तीची मदत घ्यावी लागते, त्यांसही हल्लीं वेश्याच समजतात. [ एकाच कामाकरितां पुरुषांस पगार अधिक व स्त्रियांस कमी, अशी स्थिति यूरोप, अमेरिकेंतही अजून आहे, व वेश्यांची संख्या अशा तऱ्हेनें वाढते. अशा स्त्रियांच्या वेश्यावृत्तीचा दोष समाजाकडेच येतो. ) एकंदरींत वेश्या म्हणजे 'केवळ व्यापारी दृष्टीनें समागम सोसणारी स्त्री ' हाच अर्थ सर्वमान्य व योग्य दिसतो.

---

# पुढील अंकीं

संततिनियमनाची एक दिशा.

वेश्या व गुप्त रोग.

सॉव्हिएट राज्यांतील विवाहाचा कायदा.

# रानटी लोकांच्या चालीरीति.

इ. स. १७६६-६९ मध्यें कांहीं फ्रेंच लोकांनीं एका गलबतांतून पृथ्वी प्रदक्षिणा केली, त्यांपैकीं एकानें 'राहिटी' बेटांतील मूळ रहिवाशांचें वर्णन दिलें आहे, तें बरेंच मनोरंजक आहे.

'आम्ही कांहीं वेळ फिरून त्या गृहस्थाचे घरीं परत गेलों तों तेथें त्याची बायको व त्याची १२—१३ वर्षांची मुलगी होती. त्यांच्या आग्रहावरून आम्हीं कांहीं नारळ, केळीं वगैरे खालीं. नंतर त्या लोकांपैकीं प्रत्येकानें एक एक झाडाची डाहाळी घेऊन ते आमच्या सभोंवतीं उभे राहिले व ती मुलगी आमचे शेजारीं एका चटईवर बसली. ते सर्व लोक आम्हांस खुणा करूं लागले व त्यांपैकीं एक अळगूज वाजवूं लागला, परंतु आमच्या सुधारलेल्या कल्पनांमुळें आम्हांस त्यांचा कांहींच अर्थ कळेना. शेवटीं आमच्या लक्षांत येऊन आमच्यापैकीं एक जण तिच्या जवळ जाऊन बसला. तिच्या अंगावर फारसे कपडे नव्हतेच, परंतु आतां तिनें तेही साफ काढून टाकले. त्या सर्व लोकांच्या हावभावांवरून आम्हांस इतकें कळून चुकलें कीं उघडपणें समागम करण्यांत त्यांस कांहींच वावगें दिसत नसे व पाहुणचार करण्याची त्यांची ही रीत असे. तरीही सुधारलेल्या कल्पनांचें उल्लंघन करण्याची आमच्यापैकीं कोणाचीही छाती होईना. याचें त्यांस मोठें आश्चर्य वाटलें व वाईटही वाटलें व नंतर आमच्यापैकीं पुष्कळांनीं खाजगी रीतीनें त्यांचें समाधानही केलें.

त्यांच्यांत एका पुरुषास पुष्कळ बायका असूं शकतात, व त्यांचा विवाह वर सांगितल्याप्रमाणें सर्व लोकांसमक्ष होतो. यावरून त्यांच्यांत नीतीच्या कल्पनाच नाहींत असें मात्र समजतां कामा नये. विवाहित स्त्रिया पतिव्रता असतात, व त्या नवऱ्याचे परवानगीशिवाय आमचे समोर साफ नग्न होत नसत. नवरे कधीं कधीं आम्हांस स्पर्श करण्याचीही परवानगी देत असत, व कधीं कधीं तर त्यांस आमचेकडे पाठवीतही असत. परंतु नवऱ्याचे परवानगीशिवाय जर त्यांचे वाटेस कोणी पुरुष गेला तर त्यास मात्र देहांत शासन देण्याची त्यांची वहिवाट होती असें दिसतें. आमचे बरोबरच्या एका गृहस्थांनीं एकदां एका राजपत्नीस

स्पर्श केला तेव्हां त्या राजानें आम्हांस हें स्पष्ट दर्शविलें. कुमारिकांस व विध-वांस मात्र या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असे व त्या खुशाल आमचेकडे येत जात असत.'

अशा रीतीनें त्यांची चैन चालली होती व ते रानटी लोक त्यांच्याशीं इतक्या सलोख्यानें वागत होते, तरीही शेवटीं भांडण उपस्थित झालें. याचें कारण त्यांच्या गलबतावरील कांहीं खलाशी क्षुब्ध लालसेनें बेफाम होऊन त्यांनीं त्या गरीब बिचाऱ्या लोकांवर जुलूम करण्यास सुरवात केली व कांहींनीं तर त्यांचेवर गोळ्याही झाडल्या. हें पाहून ते लोक अशा घातकी लोकांस सोडून दूर पळून गेले. शेवटीं फ्रेंच लोकांपैकीं प्रमुखांनीं त्या लोकांस कांहीं बक्षिसें देऊन व आपल्या खलाशांस शिक्षा करून तेथून आपला तळ हालवला. यांत रानटी कोण ?

---

## गुह्यरोगांपासून बचाव

आकृतीसह संपूर्ण माहिती.

लेखकः—प्रो. र. धों. कर्वे.

छापत आहे.

---

**हिद्रालीन**:— या फ्रेंच औषधाची एक पुड ४ पाइंट पाण्यांत टाकली असतां सुगंधी जंतुनाशक पाणी तयार होतें. साध्या पाण्यापेक्षां हें पाणी पिचकारीबरोबर वापरणें बरें. तितक्याच पाण्यांत दोन पुड्या टाकून दिवसांत दोन तीन वेळां धुतल्यास धुपणीसारखे रोग बरे होतात. २० पुड्यांचे पेटीस रु. १ आ. ४.

**राइट एजन्सी**, २० भटवाडी रस्ता,

**गिरगांव, मुंबई.**

# मिस् डिकिनसन यांचें वेश्यांवर व्याख्यान.

---

व्हिजिलन्स् असोसिएशन ( जागरूक संस्था ) या नांवाची येथें एक संस्था आहे हें पुष्कळांस माहीत असेल. वेश्यांस उपदेश करून चांगल्या मार्गाला लावणें व अशा रीतीनें वेश्या हळूहळू नाहींशा करणें हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. उद्देश स्तुत्य आहे असें कोणीही म्हणेल, परंतु या उपायांनीं तो सफल होण्याचा फारच संभव दिसत नाहीं. या लोकांची अशी कल्पना आहे कीं कोणत्याही वेश्येनें आपल्या धंद्यांत कितीही वर्षे घालविलीं असलीं तरी यांच्या उपदेशामृतानें तिचा पुनर्जन्म होऊन ती चांगल्या मार्गाला लागणार. चांगल्या मार्गाला लागण्यास अशा वेश्येचा खरोखर पुनर्जन्मच झाला पाहिजे. एरवीं अंगीं खिळलेल्या सवयी जाव्या कशा ? ज्यांचा धंदा चांगला चालतो अशा वेश्यांस ऐशआरामांत राहण्याची संवय लागते. धंद्यापुरती काय थोडीशी गैरसोय सोसावी लागेल तितकीच. ज्यांचा धंदा तितका बरा चालत नाहीं त्यांसही अंग मोडून मेहनत करण्याची संवय नसते. यांपैकीं कोणत्याही वेश्येनें धंदा सोडल्यास तिची पुढें वाट काय ? एखादी वेश्या अप्रतिम सुंदर असल्यास तिच्याशीं विवाह करणाराही एखादा वेडापीर भेटेल. एरवीं त्यांना काम करूनच पोट भरलें पाहिजे, व हें त्यांचे हातून फार दिवस होणें कठिण. एखादी स्त्री फसून नुकतीच वेश्या झाली असेल, तर ती मात्र या संस्थेमुळें मार्गाला लागण्याचा संभव आहे, पण तिचेही सामाजिक दृष्टीनें हालच होणार,

मिस् डिकिनसन या वरील संस्थेच्या उपदेशिका आहेत. यांच्या व्याख्यानाची जाहिरात वाचून आमची अशी साहजिक कल्पना झाली कीं बाई स्वःतच्या कामासंबंधाची कांहीं माहिती सांगणार आहेत. परंतु तसें कांहीं न करतां त्यांनीं वेश्यावृत्तीच्या मुळाशीं काय कारणें आहेत याचेंच विवेचन केलें. अर्थात् त्यांत नवीन कांहींच नव्हतें. संस्थेच्या उद्योगानें फारशा वेश्या वळणार नाहींत असें भाकीत आम्ही संस्था स्थापन झाली त्याच वेळीं तिचे अध्यक्ष सर चुनीलाल मेहता यांचे समक्ष केलें होतें. परंतु संस्थेच्या दोन तीन वर्षांच्या अस्तित्वांत एकही वेश्या वळली नाहीं, हें त्यांच्याच उपदेशिकेनें स्वतःच्या तोंडानें कसें

सांगावें ? या बाई उगाच पगार खातात असें आमचें म्हणणें नाहीं. त्या वेश्यांच्या घरीं जाऊन त्यांची थोडी बहुत विचारपूस करून दोन शिळोप्याच्या गप्पा मारून परत येतात हें आम्हांस माहीत आहे, व अशा रीतीनें त्यांच्याशीं नुसत्या गप्पा मारण्याचा सुद्धां उपयोग आहे हेंही आम्हांस कबूल आहे, परंतु संस्थेचा उद्देश मात्र अजून होता तितकाच लांब आहे.

बाईनीं व्याख्यानांत एक गोष्ट सांगितली ती विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यांच्याकडे एकदां एक १० वर्षांची ख्रिस्ती मुलगी नोकरी लावून द्या म्हणून आली. ती गोवा किंवा मंगळूर कडून आईबापांस सोडून कोणाच्या तरी ओळखीनें मुंबईस आली होती. तिची एक मोठी बहीण १३ वर्षांची असतांना नोकरीकरतां मुंबईस येऊन नंतर वेश्या झाली होती. इतक्या लहान वयांत मुलींनीं मुंबईस नोकरीकरतां येणें म्हणजे वेश्यावृत्तीची पूर्व तयारीच आहे.

[ परंतु या इतक्या लहान मुली आईबापांस सोडून मुंबईस कां येतात ? ज्यांना दोन, तीनच मुलें आहेत, तीं आईबापें गरीब असलीं तरी सुद्धां अशा रीतीनें त्यांस आपल्यापासून दूर करणार नाहींत. जेव्हां मुलांची संख्या अतोनात वाढून काय करावें हें सुचेनासें होतें, तेव्हांच त्यांची अशा रीतीनें कांहीं तरी वाट लावण्यास आईबाप तयार होतात. मिस् डिकिनसन म्हणतात अशा मुलींची जबाबदारी त्यांस नोकरीस ठेवणारांवर आहे. परंतु आईबापांस जी काळजी नाहीं ती इतरांस कशी असणार ? ]

नंतर अध्यक्ष प्रो. आंत्या यांचें भाषण झालें. ते म्हणाले कीं हल्लीं मुंबईंत पुष्कळ हमामखाने झाले आहेत, त्यांपैकीं बहुतेक खरोखर हमामखाने नसून वेश्यागृहें आहेत. [ पोलिसानें या संबंधीं एकदां चौकशी करून अशा विधानांत कांहीं तथ्य नाहीं असें प्रसिद्ध केलें होतें. ] अध्यक्षांचें असें म्हणणें पडलें कीं जागरूक संस्थेनें या कामावर नेमलेल्या इसमांस किंवा पोलिसास लोक ओळखतात, व ते चौकशीकरतां अशा ठिकाणीं गेल्यास खरा प्रकार त्यांच्या नजरेस पडत नाहीं, परंतु मीं म्हटलें तें खरें आहे. मी वकील असूनही असें

विधान करतों आहें व याबद्दल मजवर फिर्याद झाली तरी हरकत नाहीं, त्यांत लोकांचें कल्याणच होईल. पुष्कळ लोक असें म्हणतात कीं पोलिसनें या बाबतींत कांहीं करावयास पाहिजे. परंतु तसें होण्यास कोणी तरी पोलीसाकडे तक्रार नेली पाहिजे व पुरावा केला पाहिजे. याकरतां सामाजिक कामें करणारांनीं पुढें आलें पाहिजे व लोक काय म्हणतील याचा विचार न करतां अशा हमामखान्यांत जाऊन तीं वेश्यागृहें असल्याबद्दल पुरावा मिळवला पाहिजे.

[ असा पुरावा मिळणें आम्हांस बरेंच कठिण दिसतें, परंतु समजा पुरावा मिळाला, तरी पोलीस काय करूं शकेल हें आम्हांस समजत नाहीं. अमुक एका हमामखान्यांत वेश्या असतात असें जरी सिद्ध झालें तरी हल्लींच्या कायद्याप्रमाणें स्त्रियांनीं वेश्यागृहें चालवणें हा गुन्हा नाहीं, व बहुतेक सर्व हमामखाने स्त्रियांचेच नांवानें चालतात. तेव्हां शिक्षा कोणाला व कशी करणार ? हमामखान्यांत चंपीच्या किंवा स्नानाच्या मिषानें जाऊन कोणत्याही दोन स्त्रीपुरुषांस एकत्र येतां येईल असेंही अध्यक्षांचें म्हणणें आहे. परंतु त्यांनीं एकत्र येऊं नये असा कायदा नाहीं, व असा कायदा करणें, निदान तो अमलांत आणणें, शक्य दिसत नाहीं. ]

वेश्यांस वळविण्याकरतां प्रत्येक ज्ञातीची एक कमिटी असावी असें दोन्ही वक्त्यांनीं सुचविलें. परंतु हिंदु समाजांत वेश्यांचीच एक निराळी जात आहे, त्यांची कमिटी कोणीं नेमावयाची ?

# नवीन लेखांतील निवडक विचार.

यूरोपांत पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या जास्त आहे, व एका पुरुषास दोन स्त्रिया करण्याची परवानगी नसल्यामुळें कित्येक स्त्रियांस अविवाहित रहावें लागतें. शिवाय सर्व पुरुष लग्न करीत नसल्यामुळें ही संख्या अधिक वाढते. अशा स्त्रिया नीतीनें राहिल्यास त्यांस आपली कामेच्छा दाबून ठेवावी लागते इतकेंच नाहीं तर अपत्येच्छाही सफल होत नाहीं.

हा अन्याय आहे व यामुळें स्त्रियांच्या वात्सल्याचा पूर्ण विकास होत नाहीं. हा दोष दूर करण्याकरतां फ्रेंच लेखक लेऑं फ्रॅपिए यांनीं एक उपाय सुचवला आहे. मातृपद हा प्रत्येक स्त्रीचा हक्क आहे, याला समाजाचीं आडकाठी असतां कामा नये, व या उद्देशानें त्यांनीं एक कायदा सुचविला आहे. तो असा कीं यापुढें मुलांना बापाचें नांव देण्याऐवजीं आईचें द्यावें, म्हणजे अविवाहित स्त्रीस मूल झाल्यास कोणतीही अडचण राहणार नाहीं, व हल्लीं त्यांत कमीपणा समजतात तो कालांतरानें नाहींसा होईल असें त्यांचें म्हणणें आहे.

असा कायदा केल्यास एक अन्याय मात्र निःसंशय दूर होईल. मुलाची आई कोण हें जसें निश्चित सांगतां येतें, तसें बाप कोण हें समजण्यास मार्ग नसतो. अर्थात् विवाहींत स्त्री असल्यास तिचा नवरा कायद्याच्या दृष्टीनें तिच्या मुलांचा बाप ठरतो, पण तो असतोच असें नाहीं, व तरीही मुलें त्यांचेंच नांव लावतात. वरील कायद्यानें ही अडचण दूर होईल.

× × × ×

मलेरियावर उपचार म्हणून पिचकारीनें कोयनेल् कधीं कधीं रक्तवाहिन्यांत घालतात हें सर्वांस माहीतच आहे. तें साखरेच्या पाण्यांत मिश्र केलें असतां रक्तवाहिन्यांस इजा न होऊन उपयोग जास्त होतो असें एका फ्रेंच डॉक्टरानें सिद्ध केलें आहे. शेंकडा १० या प्रमाणांत साखर घालून पाणी तयार करून ५ ग्रेन कोयनेलास अजमासें २ पासून ३ ड्राम पर्यंत तें पाणी घेऊन ते मिश्रण एका वेळीं घालावें, व जरूर पडल्यास दिवसांतून चार वेळांपर्यंत असें केल्यानें मलेरियावर उत्तम परिणाम होतो असें त्यांचें म्हणणें आहे.

+ + + +

डॉ. रॉबिनसन हे पॅरिसपासुन मार्सेल्सपर्यंत जात असतां त्यांच्यावर एक चमत्कारिक प्रसंग आला. ते विडी ओढीत नाहींत म्हणून मुद्दाम विडी न ओढणारांकरतां राखून ठेवलेल्या खणांत बसले होते, तरीही त्यांच्या खणांतील एका इंग्लिश स्त्रीनें सिगारेट्च्या धुरानें खणभरून टाकला. यूरोपांत थंडीमुळें खिडक्या बंद ठेवाव्या लागतात, व धूर कोंडून राहून अतिशय त्रास होतो. यामुळें शेवटीं त्यांनीं त्या स्त्रीस विडी बंद करण्यास सांगण्याचा धीर केला. अर्थातच तिला ऐकणें भाग पडलें. धुरामुळें कोणास कितीही त्रास झाला तरी विडी ओढणाऱ्या लोकांस त्याची बिलकुल पर्वा नसते, व आपला हक्क असतांही त्यांस बंद करण्यास सांगण्याचा धीर पुष्कळ लोकांस होत नाहीं. त्यांतून यूरोपांत पुरुषांनीं स्त्रियांस असें सांगणें म्हणजे खरोखरच जबर धैर्याची गोष्ट आहे.

* * *

पारंपरिक लोकांनीं कितीही अकांडतांडव केलें व जुन्या चालीरीति कितीही घट्ट धरून ठेवल्या तरी त्यांत नेहमी फरक होत असतो. डॉ. रॉबिनसन् म्हणतातः—'त्या स्त्रीस सिगारेट् ओढण्याची मनाई केल्यावर ती कादंबरी वाचूं लागली. हल्लींच्या पद्धतीप्रमाणें तिचा झगा फारच अखूड असल्यामुळें व ती जरा आरामानें बसल्यामुळें गुडघ्याच्यावर मांडीचा भाग दोन तीन इंच दिसत होता. माझ्या आईनें किंवा आजीनें जर असा पोषाख केलेली, केंस मानेपर्यंत कापलेली, गाल व ओंठ रंगवलेली बाई पाहिली असती तर खात्रीनें जगांतील सर्वांत जुन्या ( म्हणजे वेश्यांच्या ) धंद्यांत तिची गणना केली असती. परंतु ही स्त्री अर्थातच अत्यंत सभ्य व उच्च कुटुंबांतली होती. दहा पंधरा वर्षांपूर्वी आम्हीच असा पोषाख पाहून थक्क झालों असतों. झग्याची लांबी अशीच कमी होत गेल्यास कांहीं दिवसांनीं मुळींच नाहींशी होईल, कारण आतांच निम्मेपेक्षां कमी झाली आहे !

* * * *

पाम्पेआय शहरांत रोमन लोकांच्या वेळच्या बऱ्याच गोष्टी जशाच्या तशा सांपडतात. त्या पाहण्याकरतां पुष्कळ लोक जातात, तसे डॉ. रॉबिनसन

गेले होते. एका ठिकाणीं त्यांच्या वाटाड्यानें 'येथें बायकांना परवानगी नाहीं, फक्त पुरुषांनीं आंत यावें,' असा हुकुम सोडला. अशा ठिकाणीं त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें खोदलेलीं जननेंद्रियांची चित्रें असतात. डॉ. रॉबिनसन् यांचे मतें स्त्रियांसही तेथें जाण्यास हरकत नसावी. अशा चित्रांचा पुरुषांच्या मनावर मात्र चांगला परिणाम होतो व स्त्रियांच्या मनावर वाईट होतो अशी आमचीही कांहीं केल्या खात्री होत नाहीं. शिवाय विवाहित स्त्रियांस खरी बातमी नवऱ्यांकडून लागतेंच. अविवाहित स्त्रियांची जिज्ञासा मात्र निदान त्यावेळीं तरी अपूर्ण राहते.

× × × ×

इंग्लंडांतील 'लॅन्सेट्' नांवाच्या प्रसिद्ध वैद्यकपत्रांत डॉ. जाइलस् यांनीं 'संततिनियमनाचें शिक्षण डॉक्टरांस दिलें पाहिजे' अशा आशयाचा एक लेख लिहिला आहे. कधीं प्रकृतीच्या दृष्टीनें तर कधीं गरीबीच्या दृष्टीनें संततिनियमन करणें जरूर असतें असें ते कबूल करतात. यापैकीं दुसऱ्या कारणावर ते जरी फारसा जोर देत नाहींत तरी डॉक्टरांच्या शिक्षणांत संततिनियमनाच्या महत्त्वाकडे दुर्लक्ष होतें असें एक डॉक्टर सर्वमान्य पत्रांत लिहितात हें काय थोडें झालें?

* * * *

चीन देशांतील हल्लींच्या चळवळीमुळें सर्व राष्ट्रांचे डोळे तिकडे लागले आहेत व चीनवर दररोज नवीन ग्रंथ बाहेर पडत आहेत. यांवरून चीनची किती दुर्दशा झाली आहे याची चांगली कल्पना येते.

शंभर नातवंडें व हजार पणतवंडें झालीं म्हणजे मनुष्य कृतार्थ झाला ही चीनमधील प्राचीन कल्पना आहे. परंतु पोटाला चिमटा बसूं लागल्यामुळें, इतकी संतति नसल्यास काय बिघडेल? अशी कल्पना चिनी लोकांचे मनांत अलीकडे येऊं लागली आहे. कांहीं चिनी विद्यार्थी एक खेडेगांव पहावयास गेले असतां गांवांतील शेतकरी लोकांनीं त्यांस सांगितलें:—'पीक आधींच वाईट, त्यांत लुटारू होतें नव्हतें ते घेऊन गेले. फार मुलें न होण्याची कांहीं

युक्ति आहे असें म्हणतात, ती काय ती आम्हांला सांगा नाहीं तर मुलें मारण्याचा प्रसंग येईल.'

तेथील मजुरांची स्थिति भयंकर आहे. डुकरें सुद्धां कोणी ठेवणार नाहीं अशा जागेंत त्यांस रहावें लागतें. एका घाणेरड्या खोलीत सात आठ माणसें रहातात. छप्परांतून पाऊस येतो, जमीन केलेलीच नसते, भिंतींस भोंकें पडलेलीं असतात, मोऱ्या, गटारें, यांचें नांव नाहीं, अशी स्थिति शांघाई व इतर शहरांत आहे.

पंधरा दिवस काम केल्यास एक टोपी घेण्याइतके पैसे मिळतात, एक महिना काम केल्यास दोन चादरी घेतां येतील; परंतु हे लोक अर्थातच टोप्या, चादरी, जोडे वगैरे ऐशआरामाचे पदार्थ वापरीत नाहींत, व याच पगारांत सुख मानतात! यामुळें चिनी मजूर ८ वर्षें काम केल्यावर थकून निरुपयोगी होतो.

चीनचे नांवाजलेले उद्योग म्हणजे चहा, मातीची भांडीं व रेशीम, यांत चीनचा हात धरणारा जगांत कोणीही नव्हता. परंतु अधिक फायद्याच्या आशेनें हे पदार्थ आतां तितके चांगले निघत नाहींत, यामुळें यांचा व्यापार बसला आहे. याशिवाय लढाईमुळें होणारे हाल वेगळेच.

---

## कॉलरा टोंचून घ्यावा.

१९२६ सालीं इंडोचायनाच्या फ्रेंच वसाहतींतील सायगाँ शहरीं कॉलऱ्याची सांथ आली असतां त्यास प्रतिबंधक म्हणून ३७,८६५ लोकांनीं टोंचून घेतलें, व ७२,४३५ लोकांनीं घेतलें नाहीं. टोंचून घेतलेल्या लोकांपैकीं तीनच लोक कॉलऱ्यानें मेले, व इतरांपैकीं ५०५ कॉलऱ्यानें लागले व २०४ मेले. एकदांच टोंचून घेण्यापेक्षां दोनदां टोंचण्याचा पुष्कळ जास्त उपयोग होतो असें तेथील डॉक्टरांचें मत पडतें.

# ताजी व शिळी बातमी.

ग्रीसमधील 'अॅथॉस्' पर्वतावरील जोग्यांस आतां ग्रीक सरकारनें स्वराज्याचे हक्क दिले आहेत, परंतु गव्हर्नर मात्र सरकार नेमणार. त्यांचे हद्दींत स्त्रियाच नव्हे तर स्त्रीजातीचा कोणताही प्राणी राहूं देत नाहींत ( ईव्हनिंग् न्यूज् ऑफ् इंडिया ). असो. अशा रीतीनें तरी त्यांची नीतिमत्ता कायम राहो म्हणजे झालें.

× × × ×

प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार व्हिक्तर मारगरीत यांजकडून त्यांच्या नवीन कादंबरीची एक प्रत आम्हांस नुकतीच भेट म्हणून आली. त्यांची आमची ओळख नसल्यामुळें आम्हांस प्रथम त्याचा कांहींच अर्थ कळेना. नंतर पुस्तकांतील एका छापील चिठ्ठीवरून समजलें कीं त्या पुस्तकाचा विषय 'संततिनियमन' आहे. तेव्हां थोडाबहुत उलगडा झाला.

यांची निर्भीड लेखक म्हणून प्रसिद्धि आहे. फ्रेंच सरकारनें त्यांस मोठी पदवी दिली होती, परंतु त्यांच्या शेवटच्या तीन कादंबऱ्यांतील त्यांच्या निर्भीडपणामुळें सरकारची मर्जी खप्पा होऊन त्यांनीं ती काढून घेतली. संततिनियमनाचे तर्फेनें लिहिणें हा फ्रान्समध्यें गुन्हा होतो. तेव्हां याचा परिणाम काय होईल तें पहावें.

\+ + + +

येत्या ऑगस्टचे ३१ तारखेपासून तीन दिवस जिनीव्हा येथें सर्व जगाची लोकसंख्यापरिषद् भरावयाची आहे. अशाप्रकारची परिषद् आजपर्यंत कधींही भरलेली नाहीं. लोकसंख्या व अन्नाचा पुरवठा, लोकसंख्येच्या वाढीचा शास्त्रदृष्ट्या विचार, लोकसंख्या किती असावी, देशांतर व वसाहती, इत्यादि सर्व लोकसंख्येसंबंधी प्रश्नांचा तेथें खल व्हावयाचा आहे. यांतून काय निष्पन्न होतें पहावें.

\+ + + ×

जपानी डॉक्टर कोनासु यांनीं एका व्याख्यानांत नुकतेंच असें सांगितलें कीं गेल्या ५० वर्षांत जपानी लोकसंख्या दुप्पट झाली आहे व लागवडीची जमीन मात्र त्या मानानें वाढली नाहीं. जपानांत नेहमीं धरणीकंपानें हजारों लोक मरत असतात हें लक्षांत ठेवल्यास ही वाढ खरोखरच: आश्चर्य करण्या-सारखी आहे. अन्न पुरवठ्यास येण्याकरतां जपानी लोकांनीं आतां भाताऐवजीं बटाट्यांवर मुख्य भिस्त ठेवावी अशी कांहीं जपानी अर्थशास्त्र्यांची सूचना आहे !

× × × ×

इंग्लंडांतील 'माल्थ्यूजिअन लीग 'ची जुबिली २६ जुलै १९२७ ला झाली. ही संततिनियमनाची पहिली संस्था. संततिनियमनावरील एका पुस्तका-बद्दल जान्युआरी १८७७ मध्यें एका पुस्तकवाल्यास व प्रकाशकास शिक्षा झाली. त्याबरोबर प्रसिद्ध नास्तिक चार्ल्स ब्रॅडला व त्यांची शिष्यीण मिसेस् बेझंट यांनीं तें पुस्तक मुद्दाम पुनः छापलें व तें आम्ही विकणार अशी पोलिसास वर्दी दिली. २४ मार्च १८७७ रोजीं त्यांनीं विक्री सुरू केली व ५ एप्रिल पर्यंत ५००० प्रती विकल्यानंतर त्यांजवर खटला होऊन जूरीनें त्यांस दोषी ठरवलें. तरीही, विक्री बंद करण्याच्या अटीवर जज्ज त्यांस सोडून देण्यास तयार होता. परंतु ही अट कबूल न झाल्यामुळें त्यानें त्यांस प्रत्येकीं सहा महिने तुरुंग व शिवाय दंडाची शिक्षा करून दोन वर्षेपर्यंत चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन मागितले. ही शिक्षा अपिलांत रद्द झाली.

हा खटला चालू असतां, म्हणजे १८ जूनपासून ५ दिवसांत त्या पुस्तकाच्या व १,८५,००० प्रती खपल्या. नंतर २६ जुलै रोजीं डॉ. जॉर्ज ड्रिसडेल अध्यक्ष मिसेस् बेझंट सेक्रेटरी नेमून 'माल्थ्यूजिअन् लीग' स्थापन झाली. ब्रॅडलॉ व मिसेस बेझंट या दोघांचीही वक्तृत्वाबद्दल प्रसिद्धि असल्यामुळें सर्व देश त्यांनीं हालवून सोडला. तेव्हांपासून इंग्लंडांतील जन्ममान सारखें उतरत गेलें आहे. हें मान १८७७ मध्यें दर हजारीं ३६ होतें, तें आज १८ झालें आहे. या संस्थेचें 'न्यू जनरेशन' नांवाचें मासिक हल्लीं चालू आहे.

× × × ×

व्हिरोना येथील स्त्रियांनीं लांब झगे घालावे याकरितां तेथील पारंपरिक लोकांनी खूप खटपट केली, पण कांहीं जमेना. शेवटीं कांहीं ऑफिसांच्या व दुकानांच्या वरिष्ठांनीं असा हुकूम फर्माविला कीं तेथील नोकर स्त्रियांपैकीं कोणीही आंखूड झगे घालून आल्यास त्यांस नोकरीवरून काढून टाकण्यांत येईल. अन्नावरच धाड आली तेव्हां स्त्री नोकरांनां एक युक्ति सुचली. झग्याला एक स्प्रिंग लावून तो पाहिजे तितका लांब आंखूड करण्याची व्यवस्था केली, व रस्त्यांत तेच झगे आंखूड व ऑफिसांत लांब दिसूं लागले !

\+ + + +

व्हीनस् डी मायलो [ या नांवाचा रोमन कामदेवतेचा एक नग्न पुतळा हल्लीं पॅरिस् येथें आहे ] ची प्रतिकृति कोणीं करूं नये असा बुदापेस्त येथील अधिकाऱ्यांनीं हुकूम सोडला आहे, व जेसुइट् धर्मोपदेशक आंखूड केस, पारदर्शक मोजे वगैरे सर्व आधुनिक युरोपांतील चालींविरुद्ध कोलाहल करीत आहेत.

\+ + + +

येथील म्युनिसिपालिटीच्या मुलींच्या शाळांतील एक शिक्षक देवजी कुका नांवाचा ख्रिस्ती धेड होता, त्यानें आपली बायको हिरूबाई हिचा खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल जस्टिस पाटकर यांचे पुढें खटला होऊन त्यास सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. हिरूबाईच्या डोक्याच्या डाव्या बाजूस पंधरा जखमा झाल्या होत्या. व तिच्या डाव्या डोळ्यास कायमची जखम झाली होती. ‘ नवरा तापट असुन त्रास देत असल्यामुळें मी व्हिक्टोरिआ मिल्सजवळ बापाकडे रहात असें, परंतु जातीच्या जमातीच्या हुकमावरून पुनः गेल्या डिसेंबरच्या १९ तारखेस, नवऱ्याकडे गेलें व नंतर चार दिवसांनीं हा प्रकार घडला ’असें तिनें सांगितलें.

आरोपीनें पुढील हकीकत सांगितली. ‘ मी तीन वर्षांपूर्वी सासऱ्याला रु. ६०० देऊन या मुलीशीं लग्न केलें [ ती हल्लीं २० वर्षांची आहे ]. बऱ्याच विनवण्या केल्यावर त्यानें तिला मजकडे पाठवली व एक वर्षभर आम्ही सुखानें राहिलों. नंतर ती आजारी पडून बापाकडे गेली.

' दोन महिन्यांनीं मी तिला आणण्यास गेलों तेव्हां तो तिला पाठवीना, व तिला त्रिकम नांवाऱ्या एका मुकादमानें ठेवली आहे अशी मीं बातमी ऐकली. ही गोष्ट मी तिच्याजवळ बोललों तेव्हां मी शुद्ध आहें असें शपथेवर सांगितलें. परंतु तिचा बाप तिला पाठवीना व जातीचे सर्व लोक त्रिकमसंबंधीं बोलत होते. जान्युआरी १९२६ अखेर शाळाकमिटीच्या सेक्रेटरींनीं मला कामावरून काढलें.

' बायको माझ्या सांगण्यानें परत येत नाहीं असें दिसल्यावर मी जमातीकडे अर्ज केला व त्यांनीं तिला परत यावयास लावलें. डिसेंबर २४ तारखेला सकाळीं तिला घरकाम संपल्यानंतर अभ्यास करण्यास सांगून मी बाहेर गेलों. मी आठ वाजतां परत येतों तों दरवाजा आंतून लावलेला होता. मीं फटींतून पाहिलें तेव्हां ती अस्ताव्यस्त स्थितींत दिसली व मी ओरडलों. तेव्हां दरवाजा उघडला व खोलींतून एक पुरुष बाहेर पळून गेला. बायकोकडे वळतों तो ती शिव्या देऊं लागली, तेव्हां मी तिला पोलीस म्हणतात तशी मारली [तिला आडवी पाडून तोंडांत बोळा घालून हात बांधून गळ्याला फांस घातला व नंतर काठीनें डोक्यावर डाव्या डोळ्याजवळ मारलें. ] व मीच पोलीसच्या स्वाधीन झालों. तिला ठार मारण्याचा माझा उद्देश नव्हता. आपलें सौंदर्य गेलें असें समजून तिनें जगावें अशी माझी इच्छा होती. '

जूरीनें एकमतानें आरोपीस दोषी ठरविलें, परंतु त्याला चीड येण्यास सबळ कारण असल्यामुळें त्यावर दया करावी अशी शिफारस केली. जज्जानें हें मान्य करून वरील प्रमाणें शिक्षा दिली.

जूरीचा निकाल ठीक आहे, परंतु आरोपीच्या हकीकतींत बऱ्याच विचार करण्यासारख्या गोष्टी आहेत. सहाशें रुपये देऊन विकत घेतलेला माल दुकानदाराकडेच राहूं देण्यास कोणी तयार होणार नाहीं हें खरें. परंतु दार उघडें टाकलें असतां माल चोरीस जाण्याचा बराच संभव असतो. यांत आरोपीचा हलगर्जीपणा दिसून येतो. शेवटीं चीड येऊन त्यानें तिला रागाच्या भरांत ठार मारली असती तर तें स्वाभाविक झालें असतें. परंतु तिला विद्रूप करून जिवंत

ठेवण्याची इच्छा धरणें हा शुद्ध रानटीपणा आहे. समंजस मनुष्यानें एकतर बायको विकत घेतली नसती, व घेऊनही ती आपणाजवळ राहण्यास खुषी नाहीं व दुसऱ्या कोणी तिला ठेवली आहे असें ऐकल्यावर शांत मनुष्यानें तिचा नाद सोडला असता, व एखाद्या तापट मनुष्यानें बापाच्या घरीं जाऊन तावडतोब तिचा खून करण्याचा प्रयत्न केला असता. परंतु ती वाईट चालीची आहे असें समजल्यावरही तिला जुलमानें घरीं आणून ठेवण यापेक्षां आणखी मूर्खपणा तो काय राहिला ? या सर्व हकीकतींत तिनें खुषीनें लग्न केलें होतें असे कोठेंच दिसत नाहीं यामुळें तिच्याकडे दोषच येत नाहीं. परंतु खुषीनें केलें असतें तरीही न पटल्यास लग्न मोडण्याचा अधिकार प्रत्येकास असला पाहिजे. तो नाहीं तेथ-पर्यंत हे प्रकार व्हावयाचेच.

---

## कॉलरा कसा टाळावा ?

प्रसिद्ध फ्रेंच शास्त्रज्ञ पॅस्तर यांनीं बरेच रोग जंतूमुळें उद्भवतात असा शोध लावल्यापासून त्याचे नांवावर कित्येक लोक पाहिजे तीं विधानें ठोकून देत असतात. अशा प्रकारचें एक विधान ' अमुक एक जंतुजन्य रोग जेथें आहे, तेथें त्याचे जंतु असलेच पाहिजेत, व जेथें जंतु आहेत तेथें रोग असलाच पाहिजे' असें इंडियन नॅशनल हेरल्डनें पॅस्तरच्या नांवावर दडपून दिलें होतें, परंतु यांतील शेवटचा भाग साफ खोटा आहे. जंतूंचा फैलाव होण्यास एक विशिष्ट परिस्थिति लागते, ती नसल्यास रोग होणें शक्य नाहीं, हें कोणासही समजण्यासारखें आहे, व कित्येक रोगांची लस टोंचून घेण्यानें त्यांपासुन सरक्षण होतें तें यामुळेंच. कॉलऱ्यांतून नुकत्याच उठलेल्या मनुष्याच्या अंगांत कॉलऱ्याचे जंतु सांपडतात, व त्यांपासून त्यास इजा होत नाहीं, परंतु तेच जंतु दुसऱ्याच्या अंगांत शिरल्यास त्याला कॉलरा होऊं शकेल. टॉयफाइड प्रमाणेंच कॉलऱ्याचे जंतूहो रोग्याच्या मलांत सांपडतात. हे जंतु एक तर जमीनींतून पिण्याच्या पाण्यांत जाणें शक्य आहे, किंवा रोग्याच्या व आसपासच्या माणसांच्या हलगर्जीपणामुळें व स्वच्छ-तेची काळजी न घेतल्यामुळें अन्नपाण्याला त्याचा संपर्क होणें शक्य आहे. अशा रीतीनें जीवंत जंतु पोटांत गेल्यास कॉलऱ्याचा संसर्ग होतो.

यूरोपांत एक बाई कॉलऱ्याचे सांथीचे वेळीं आपल्याकडून स्वच्छतेची शिकस्त करून रहात असे, व संसर्गाचे भीतीनें घराचे बाहेरही पडत नसे. तरी तिला कॉलरा झाला, व शोधाअंतीं तिच्या स्वयंपाकिणीच्या मलांत कॉलऱ्याचे जंतु सांपडले, व तिला रोग नसल्यामुळें शंकेचेंही कारण नव्हतें. शोध करणाऱ्या डॉक्टरानें पुढील उपाय सुचवला.

कॉलऱ्याचे जंतु थोड्या उष्णतेनें सुद्धां मरतात; तेव्हां कोणताही पदार्थ गरम असल्याशिवाय तोंडांत घालावयाचा नाहीं असा नियम केल्यास कॉलरा होणें शक्य नाहीं. विशेषत: ज्या पदार्थांस हात लागण्याचा संभव असतो, त्यांबद्दल काळजी घेतली पाहिजे. चमचे, कांटे, ताटें, बशा वगैरेही अर्थात गरम पाहिजेत. चटण्या, कोशिंबिरी गरम केल्या पाहिजेत, आईस्क्रीम् सारखे पदार्थ खातां कामा नये. खाण्याच्या पदार्थास खाणाऱ्याशिवाय दुसऱ्या कोणाचाही हात लागूं नये, व हें नच साधल्यास प्रत्येक पदार्थ आयत्यावेळीं गरम करून मग खावा, म्हणजे कॉलरा होणार नाहीं.

---


## विणकर वर्गाचें पहिलेंच मासिक.

वर्ष ७ वें ) **स्वकुळ साळी विजय** ( सुरूं होणार.

या मासिकांत कसलेल्या लेखकांचे लेख, देशी व विदेशी रंगाविषयीं माहिती, शिवया मनोरंजक व बोधपर गोष्टी, विनोदी चुटके, महात्म्यांचे बोल वगैरे विषय नियमित येत असतात. तरी सर्व विणकामाची माहिती मिळवूं इच्छिणारांनीं त्वरित वर्गणीदार व्हावें. तसेंच जाहिराती देणारांनीं जाहिराती पाठविणें. दर फारच माफक आहेत. वार्षिक वर्गणी २ रुपये व्ही. पी. नें २ रुपये ८४ आणे.

महादेव पुंडलिक बिचकर, संपादक–**स्वकुळ साळी विजय.**

मु० पो० कऱ्हाड ( सातारा )

## साभार पोंच.

'स्वकुळ साळी विजय' मासिकाचे जून व जुलैचे अंक संपादकांनीं अभिप्रायाकरतां पाठविले आहेत. हें मासिक एका विशिष्ट ज्ञातीकरतां असल्यामुळें संपादकांचे आभार मानण्यापलीकडे आम्ही कांहीं लिहूं शकत नाहीं. त्यांची जाहिरात दुसरीकडे छापली आहे त्यावरून त्यांचा उद्देश कळेल.

---

## जेलोटयूब

यानें **गुप्त रोग बरे होत नाहींत,** हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून, काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फेंच डॉक्टर गोडयुशे याच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे.

**राइट एजन्सी, २० भटवाडी रस्ता, गिरगांव मुंबई.**

# समाजस्वास्थ्य




वर्ष १] डिसेंबर १९२७ [अंक ६

संपादक--र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | वेश्यांसंबंधीं कायदे. १ ... ... ... | १ |
| २. | तिबेटांतील चालीरीति ... ... ... | ५ |
| ३. | मनुष्याची उत्पत्ति ... ... ... | ८ |
| ४. | आमच्याबद्दल लोकमत ... ... ... | ९ |
| ५. | एक पत्र ... ... ... ... | १० |
| ६. | वेश्यागृहें ... ... ... ... | १३ |
| ७. | तोतरेपणा ... ... ... ... | १५ |
| ८. | नवीन लेखांतील निवडक विचार ... ... | १९ |
| ९. | ताजी व शिळी बातमी ... ... | २० |



उच्च दर्जाचें व उच्च ध्येयाचें मनोरंजक पण भारदस्त व प्रगतिप्रिय असें

## स्त्रियांचें सर्वांगसुन्दर मासिक.

# गृहलक्ष्मी

सम्पादिका— **तारा टिळक**, बी. ए.

**फिरोज आनन्दकर**, बी. ए.

[ वार्षिक वर्गणी ट. ख. सह फक्त ३॥ साडेतीन रुपये. ]

**प्रत्येक १५ व्या तारखेस प्रसिद्ध होतें.**

स्त्रियांना उपयुक्त व आवडतील अशा सर्व विषयांवर विद्वान् अधिकारी लेखिकांचे व लेखकांचे लेख " **गृहलक्ष्मी** " मध्यें असतात.

तीन रंगी मुखपृष्ठ, तीन रंगी दर्शनी चित्र व आर्टपेपरवरील अनेक फोटो प्रत्येक अंकांत असतात.

**' गृहलक्ष्मी ' कार्यालय,**

**खटाव भुवन, मुम्बई ४.**

# * वेश्यांसंबंधीं कायदे.

## लेखांक १

प्राचीन हिंदुस्थानांत व ईजिप्तमधेंही वेश्यावृत्तीचा धर्माशीं बराच संबंध असे [ हिंदुस्थानांत अजूनही आहे ]. ज्यू लोक ईजिप्तमधून पळून जाईपर्यंत त्यांचेमधेंही वेश्यावृत्ति प्रचलित होती. परंतु तेथपर्यंत वेश्यांसंबंधीं कोठेंही कायद्याचा उल्लेख सांपडत नाहीं. मोझेस् नांवाच्या मनुष्यानें ईजिप्तमधून आपल्या ( ज्यू ) लोकांना काढून नेलें व त्यानें प्रथम वेश्यांसंबंधीं कायदा केला, तो असा कीं ज्यू लोकांपैकीं कोणीं वेश्यावृत्ति करतां कामा नये, व वेश्यांच्या संततीस दहा पिढ्यापर्यंत देवळांत घेऊं नये. तरीही इतर लोकांच्या बायकांशीं संबंध ठेवण्यांत त्यांस कांहीं गौण वाटत नव्हतें असें दिसतें. या कायद्याचा मुळींच उपयोग झाला नाहीं. व रोगांचा अतिशय प्रसार झाल्यामुळें सर्व रोग्यांस त्यानें हांकून दिलें असा उल्लेख आहे. या रोगांमधें गर्मी होती असें कांहीं लेखकांचें म्हणणें आहे, परंतु याबद्दल बराच मतभेद आहे. रोगांचा प्रसार शेवटीं इतका झाला कीं मोझेस् यानें २३००० पुरुष व ३२००० स्त्री कैद्यांची कत्तल करण्याचा हुकूम दिला, व यानंतर सुंता करण्याची पद्धत सुरू झाली.

ग्रीस देशांतील सात प्रसिद्ध शहाण्या पुरुषांपैकीं सोलन् नांवाचा एक होता ( ख्रिस्तीशकापूर्वी ६४०–५५८ ) त्यानें उत्तम कायदे केले अशी त्याची सर्वत्र प्रसिद्धि आहे. यावेळीं जननेंद्रियांस देव समजण्याची कल्पना आशियामधून ईजिप्तमधें व तेथून ग्रीसमधें जाऊन तेथें लोकप्रिय झाली होती व जननेंद्रियास प्रामुख्य दिलेल्या मूर्ति जिकडे तिकडे असत. कुमारिकांचें कौमार्य हरण करण्याचें काम प्रथम या मूर्तींकडे असे व नंतर तेंच काम मूर्तींच्या पुजाऱ्यांकडे आलें, नंतर देवस्थानास पैसे मिळवण्याकरितां कुमारिकांनीं वेश्याकर्म

---

* ही माहिती गेल्या वर्षीं प्रसिद्ध झालेल्या एका फ्रेंच पुस्तकांतून घेतली आहे.

करण्याची पद्धत सुरू झाली, व यांतला कांहीं हिस्सा आईबापांसही मिळत असे. या सर्व धार्मिक प्रकारामुळें त्यावेळीं ग्रीक लोक अतिशय उल्लू बनले होते व कांहीं निसर्गविरुद्ध (समसंभोग वगैरे) चालीही त्यांच्यांत सुरू झाल्या होत्या. यापेक्षां नैसर्गिक प्रकार पुष्कळ बरा असें समजून सोलन यानें म्युनिसिपालिटी-तर्फ कुंटणखाने स्थापन करविले. या सोलनची नीतीची कल्पना ईतकी कडक होती कीं तो व्यभिचारिणी स्त्रीस मृत्यूची शिक्षा देत असे, व कुमारिकांची व विवाहित स्त्रियांची अब्रू सुरक्षित रहावी एवढ्याकरतांच त्यानें अशी व्यवस्था केली. वेश्या अजीबात नाहींशा करण्याच्या प्रयत्नास अजूनपर्यंत केव्हांही यश आलेलें नाहीं व त्यांत कांहीं तरी तडजोड काढणेंच नेहमीं भाग पडतें.

सोलन यानें आशियांतील कांहीं स्त्रिया गुलाम म्हणून विकत घेतल्या व त्यांस आथेन्स येथें बंदराच्या आसपास वेश्यागृहांत ठेवल्या. या वेश्यांस गिऱ्हाइकांकडून ठरलेली रकम मिळत असे व प्रत्येक वेश्यागृहावर कर असे.

या व्यवस्थेबद्दल एका कवीनें सोलनची अतिशय स्तुति केली आहे. यावेळीं विवाहित स्त्रियांच्या वागणुकीवर लक्ष ठेवण्याकरतां कांहीं लोक मुद्दाम नेमलेले असत. पुरुषांवर जरी असा पाहरा नसे तरी बाहेरख्याली लोकांस कोणतीही अधिकाराची जागा मिळत नसे.

या सरकारी वेश्यागृहांशिवाय कांहीं खासगी गृहेंही असत व या गृहांचा दरवर्षा—येथें दारूच्या दुकानांचा लिलांव होतो तसा—लिलांव होत असे. याशिवाय स्वतंत्र वेश्या असत, त्या सहज ओळखतां याव्या म्हणून त्यांस एक विशेष प्रकारचा पोषाख करावा लागत असे, व सूर्य मावळण्यापूर्वीं त्यांस शहरांत हिंडण्याची परवानगी नसे.

या सुमारास स्पार्टा येथील व्यवस्था पाहिल्यास दोहोंतील फरक विचार करण्यासारखा आहे. तेथें लायकरगस् यानें शरीरसंपत्तीस विशेष महत्त्व दिलें होतें, व त्यामुळें तेथील पुरुष सुप्रजाजननाच्या दृष्टीनें सुदृढ व देखण्या लोकांस आपले घरीं बोलावून त्यांजकडून हें काम करून घेत असत. असा प्रकार सोलननें कधींही चालूं दिला नसता.

रोम येथें विवाहव्यतिरिक्त समागम करणाऱ्या सर्व स्त्रियांस वेश्या

समजत असत. वेश्यांस पोलीसचे परवानगी शिवाय धंदा करतां येत नसे. त्यांचीं नांवें नोंदलीं जात, व ज्या नोंदणार नाहींत त्यांस देशपार करीत असत. मी धंदा करणार असें उघडपणें सांगावें लागणें ही वेश्यांस पुरेशी शिक्षा आहे असें ते समजत. ही समजूत इतकी खोटी ठरली कीं उच्च दर्जाच्या स्त्रियांचीं नांवें नोंदणीबुकांत दिसूं लागलीं. तेव्हां सरदार घराण्यांतील स्त्रियांस नांव नोंदूनही वेश्या होण्याचा हक्क नाहीं असा कायदा झाला. या कायद्याअन्वयें एका स्त्रीला काळ्या पाण्यावर पाठवलें असें टॅसिटस्‌नें लिहिलें आहे. यानंतर वेश्यांनीं वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे असा कायदा झाला. परंतु वेश्यागृह उघडण्याची परवानगी मागेल त्याला मिळत असे.

नंतर ' सीझर ' पदवी धारण करणारे जेवढे रोमचे बादशहा झाले ते बहुतेक सर्व अत्यंत उल्लू असल्यामुळें, त्यांनीं केलेले कायदे जरी भयंकर होते तरी त्यांचा उपयोग झाला नाहीं टायबीरियस सीझर यास सरदारांकडे मेजवान्या होत तेव्हां तेथें नग्न स्त्रीसेवक असत. कॅलिग्यूला याचा आपल्या सर्व बहिणींशीं संबंध असे. तो स्वतःची नग्न स्त्री मित्रांस दाखवीत असे व मोठमोठ्या लोकांच्या बायकांचा त्यांचे देखत उपमर्द करीत असे. शेवटीं त्यानें स्वतःच्या राजवाड्यांत वेश्यागृह ठेवलें, व त्याचे सेवक रस्त्यांत गिऱ्हाईक शोधीत हिंडत असत!

अलेक्झांडर बादशहानें यांत बरीच सुधारणा केली, परंतु त्यावेळीं समसंभोग इतका पसरला होता कीं तो बंद करण्याची त्याची छाती झाली नाहीं. त्याविरुद्ध पुढें कॉनस्टंटाईन या ख्रिस्ती बादशहानें कायदा केला. परंतु त्यासही सोलनचीच व्यवस्था योग्य वाटली, व वेश्यागृहें कायदेशीर ठरलीं.

जस्टिनिअन् यानें नंतर बऱ्याच वर्षांनीं वेश्यांसंबंधीं जो कायदा केला त्यावरून हल्लींच्या व त्या वेळच्या स्थितींत फारसा फरक दिसून येत नाहीं. लहान मुलींस फुसलाऊन आणून वेश्यागृहांत ठेवणें, त्यांनीं मिळविलेल्या पैशाचा बहुतेक भाग लुबाडून घेणें, दहा वर्षांच्या आंतील मुलींवरही वेश्यावृत्ति लादणें, वगैरे प्रकार त्यावेळींही होते. त्याकरतां त्यानें पुढील प्रमाणें कायदा केला.

'वेश्यांस कोणींही थारा देतां कामा नये; विवाहित किंवा अविवाहित स्वतंत्र स्त्रिया किंवा गुलाम यांस बिघडवतां कामा नये; त्यांस अन्न वस्त्र किंवा

दागिन्यांचें आमिष दाखवून फुसलावतां कामा नये, इत्यादि. सर्व कुंटणांस त्यानें कॉन्स्टान्टिनोपल मधून हांकून दिलें व कोणी राहिल्यास त्यांस मृत्यूची शिक्षा होईल असें फर्माविलें. एके काळीं उल्लू म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्याच्या राणीनेंही या वेळीं सभ्यपणाचें अवसान आणून, पांचशें वेश्यांस कोंडून ठेवतां येईल अशी इमारत स्वतःच्या खर्चानें सजविली, व त्यांस तेथें कंटाळा येऊं नये म्हणून शक्य तितकी आरामाची सोय केली. परंतु इतकें करूनही त्यां पैकीं बहुतेक वेश्यांनीं रात्रीं समुद्रांत जीव दिला! या वेळींही वेश्यावृत्ति हा गुन्हा समजत नसत. फक्त कुंटणपणा हा गुन्हा होता. तसाच तो कांहीं अंशीं हल्लींही आहे. [ फ्रान्समध्यें स्त्रियांनीं कुंटणपणा करणें हा गुन्हा नाहीं, परंतु पुरुषांनीं करतां कामा नये. येथील नवीन कायदाही असाच आहे. ]

फ्रान्समध्यें रोमन लोकांचेच कायदे बरेच दिवस चालू होते, परंतु इ. स. ५०६ मध्ये अलॅरिक् नांवाच्या राजानें अत्यंत कडक कायदे केले. या कायद्या-अन्वयें कोणाही स्त्रीवर वेश्यावृत्तीचा आरोप शाबीत झाल्यास तिला तीनशें फटके देऊन हद्दपार करीत असत, व ती पुनः परत आल्यास आणखी तीनशें फटके देऊन एखाद्या गरीब मनुष्याकडे तिला नोकरी करावी लागत असे व घराबाहेर पडण्याची परवानगी नसे. वेश्यांच्या मिळकतीवर रावणाऱ्या लोकांसही फटक्यांची शिक्षा असे. परंतु या कायद्यांचीही इतर कडक कायद्यांप्रमाणेच स्थिति झाली व लोकांचा उल्लूपणा वाढतच गेला.

या नंतर इ. स. ८०० मध्यें शार्लमॅन्य नांवाच्या प्रसिद्ध राजानें हे कायदे पुनः अमलांत आणिले व कांहीं नवीन केले. ज्या घरांत वेश्या सांपडेल त्या घराच्या मालकानें तिला खांद्यावर घेऊन बाजार चौकांत नेली पाहिजे, व तेथें तिला फटके मारावे, व त्यानें न नेल्यास दोघांसही तेथें नेऊन फटके मारावे असा कायदा केला. या कायद्याचा दरबारी लोकांवर तरी निदान मुळींच परिणाम झाला नाहीं, व त्याच्या मुलान आणखी कडक कायदे केले. वाईट चालीच्या स्त्रियांच्या कपाळावर एक चिट्टी मारून त्यांस वरून कमरेपर्यंत उघड्या करून जिकडेतिकडे हिंडवाव्या अशी शिक्षा फर्मावली.

इतकें करूनही उल्लपणास आळा बसला नाहीं. राजे व दरबारी लोकच काय परंतु ख्रिस्ती जोगी व जोगिणींच्याही दुर्वर्तनाला कांहीं ताळ उरला नाहीं. वेश्यांच्या धंद्यास तेजी आली, व त्यांची एक संस्था स्थापन होऊन त्यांची दरवर्षी एक जंगी मिरवणूक निघत असे.

वेश्यांस ओळखतां यावें म्हणून त्यांनीं एक विशिष्ट प्रकारचा पोषाख करून विशेषतः सोनेरी कमरपट्टा घातला पाहिजे असा कायदा आठव्या लुईनें केला.

नंतर १२५४ मध्यें सेंट लुई नावांच्या राजानें त्यांस शहरांत किंवा खेड्यां ही राहूं देऊं नये असा कायदा केला, व सुधारलेल्या वेश्यांस राहण्याकरतां एक इमारत बांधली, त्यांनीं न ऐकलें तर त्यांची मालमत्ता जप्त होत असे व त्यांस कोणीं भाड्यानें घर दिल्यास तें घर जप्त होत असे. कुंटिणीस प्रथम अपराधाबद्दल फटके व पुनः सांपडल्यास देहांत शासन होत असे.

याचे अगोदर प्रत्येक शहरांत वेगळा कायदा असे. नारबॉन् येथें एक रस्ता वेश्यांकरतां राखलेला असे; टुलूज् येथें एक वेश्यागृह असे. त्याच्या उत्पन्नांतून शहराच्या दागदुजीस व इस्पितळांस मदत होत असे. मार्सेल्स येथें शहराच्या कांहीं भागांतच वेश्यांस परवानगी असे. या पूर्वापार चालींमुळें नवीन कायद्याची बजावणी होणें शक्य नव्हतें, व वेश्यांस एके ठिकाणीं त्रास दिल्यास त्या दुसरीकडे जात. परंतु खुद्द पॅरिस येथेंही वेश्यांचा नायनाट झाला नाहीं. त्या सभ्यपणाचा आव आणून राहूं लागल्या इतकेंच. याचा परिणाम असा झाला कीं आपणांस कोणती स्त्री सहज मिळेल हें उल्लू लोकांस समजेनासें झालें व कांहीं खरोखर चुकीमुळें व कांहीं चुकल्याचें ढोंग करून सर्वच स्त्रियांस ते त्रास देऊं लागले. असा परिणाम झालेला पाहून वरील कायदा राजानें त्याच वर्षी रद्द केला, व वेश्यांसंबंधीं अधिक सौम्य कायदे केले. ते असे.

वेश्यांकरतां कांहीं स्थळें नेमून दिलीं, व त्यांनीं अमुक प्रकारचा पोषाख केला पाहिजे, व अमुक वाजतां घरीं गेलें पाहिजे वगैरे नियम केले. सरकारी हुद्देदारांनीं वेश्यांकडे जातां कामा नये असाही हुकूम केला.

# तिबेटांतील चालीरीति.

---:o:---

मि. मॉट्गॉमरी मॅक्गव्हर्न् यांच्या तिबेटांतील प्रवासाच्या हकीकतींतून कांहीं उतारे खालीं दिले आहेत.

तिबेटांत (बौद्ध) धर्माचें माहात्म्य फार आहे, व तेथील लोकांपैकीं एक चतुर्थांश भिक्षु आहेत, व त्यांचा चरितार्थ इतरांच्या धार्मिकपणावर चालतो. देवळांच्या भिंतींत चाकें बसवलेलीं असतात. तीं फिरवलीं असतां पापाचें क्षालन होतें!

कोणी मेल्यास त्याचें प्रेत स्मशानांत नेऊन त्यचे तुकडे करून टाकतात व पशुपक्षी त्याचा फन्ना करतात. अर्थात् ही पद्धत थोडीशी रानटी दिसली तरी पुरण्यापेक्षां बरी. फक्त तेथील श्रीमंत लोक मात्र प्रेत जाळतात. कारण तेथें झाडें, लांकूड व कोळसा दुर्मिळ आहे. यामुळें तेथें नेहमीं सर्पणाकरतां गोंवऱ्या वापराव्या लागतात, व त्या केवळ स्वयंपाकापुरत्याच.

तेथील धर्मगुरु दलाई-लामा यास जवळजवळ देवच समजतात. तो ब्रह्मचारी असुन तंबाकू व दारूही घेत नाहीं. तो मेल्यास त्याचा आत्मा पुढील धर्मगुरूच्या शरीरांत शिरतो अशी समजुत आहे. तो कोण हें ठरवण्यास भिक्षु-मंडळास तीन महिनेपासून दोन वर्षें लागतात! व धर्मगुरूच्या मृत्यूनंतर जन्मलेला कोणताही मुलगा ते अशा रीतीनें निवडतात. कधीं कधीं पूर्वीचा गुरु मरण्यापूर्वीं, मीं अमुक कुटुंबांत जन्म घेणार आहें असें सांगतो; परंतु कधीं कधीं चिठ्या टाकण्याची वेळ येते!

दलाई-लामा वयांत येईपर्यंत क्वचितच जगतो. तो जाचक होऊं लागल्यास त्यास मारण्याची व्यवस्था होते. चिनी लोकांनीं स्वारी केल्यामुळें दोनदां दलाई-लामाला पळून जावें लागलें, तरीही त्याचे अंगांत अद्भुत शक्ति असते ही समजूत कायमच आहे! [ त्यांस हंसण्याचें कारण नाहीं. हिंदु देवांच्या मूर्ती मुसलमानांनीं फोडल्या किंवा फेंकून दिल्या, तरी त्यांचा देवपणा थोडाच कमी होतो!–सं. ]

तिबेटांतील पारंपरिक लोक कधीं स्नान करीत नाहींत, व या चालीमुळें आपणास थंडीचा त्रास कमी होतो असें ते म्हणतात. तेथें कांहीं प्रदेशांत वर्षा–

तून आठ महिने पाणी गोठण्याइतकी थंडी असते, व कधीं कधीं सेंटिग्रेड् यंत्रांत शून्याचे खालीं ३० डिग्री पारा उतरतो.

अंगावर घाण सांचल्यामुळें उवा, पिसवा वगैरेंची चैन असते व बौद्ध धर्मांप्रमाणें कोणताही प्राणी मारतां येत नाहीं !

तेथें याक नांवाचा प्राणी सर्वत्र सांपडतो व त्याचें दूध चांगलें असतें, परंतु तें मूत्रासारखेंच अपवित्र समजतात. त्याचें लोणी मात्र पुष्कळ दिवस ठेवून बरीच घाण येऊं लागल्यावर खातात. तेथील नेहमींचें अन्न म्हणजे याकचें किंवा मेंढ्यांचें मांस, सातू व चहा. साखर तेथें माहीतच नाहीं.

तेथील लोक कधीं तंबाखू ओढीत नाहींत. तेथील रीतीप्रमाणें प्रत्येक स्त्रीस द्रौपदीसारखे पांच नवरे करतां येतात. पुष्कळ कुटुंबांत सर्व भावांमिळून एकच बायको असते. नवऱ्यानें किंवा बायकोनें कांहीं रकम भरल्यास काय- देशीर काडी मोडून घेतां येते.

धर्मानें कडक ब्रह्मचर्य हें ध्येय ठरवल्यामुळें तेथें नीतीचें नांवच नाहींसें झालें आहे. ध्येय असाध्य असल्यास तें नसल्यासारखेंच होतें, व विशेषतः ध्येय शारीरशास्त्रास धरून नसल्याचा हा परिणाम होय.

---

# पुढील अंकीं

**वेश्यांसंबंधीं कायदे** ( लेखांक २ )

**पुस्तक परीक्षणः—लंघन-चिकित्सा-शिक्षक**
( लेखक, ल. ना. जोशी )

# मनुष्याची उत्पत्ति

मनुष्य व बिनशेंपटाचे वानर या दोहोंचे पूर्वज एक असले पाहिजेत या शास्त्रीय तर्कास कांहीं प्रत्यक्ष पुरावा मिळाला तर पहावा या उद्देशानें आज जवळ जवळ एक वर्षभर प्रयोग चालू आहेत.

प्राण्यांच्या दोन जाती जितक्या जास्त जवळच्या असतील तितका त्यांपासुन मिश्र उत्पत्ति होण्याचा संभव जास्त, हें पुष्कळांस माहीत असेल; जसें, घोडा व गाढव यांपासून खेंचर होतें, परंतु कुत्रा व मांजर यांपासुन मिश्र जात होत नाहीं. याप्रमाणें मनुष्य व बिनशेंपटाचे वानर यांपासून मिश्र संतति होणें शक्य आहे कीं काय, याचा शोध लावण्याकरितां मॉस्को येथील प्रो. इव्हॅनॉक यांचे देखरेखीखालीं, फ्रेंच पश्चिम आफ्रिकेंत किंद्या येथील पॅस्तर इन्स्टिटयूटमध्यें प्रयोग करण्याची व्यवस्था केली आहे. याकरितां सॉव्हिएट सरकारनें १०००० डॉलर दिले आहेत, व अमेरिकेंतील नास्तिक लोकांची एक संस्था व कांहीं शास्त्रवेत्ते यास मदत करीत आहेत. एकंदर खर्च १००००० डॉलर येईल असा अंदाज आहे.

अमेरिकेंतील धार्मिक लोकांनीं यासंबंधीं बरीच ओरड चालवली आहे. वास्तविक पाहतां अशी मिश्र संतति करण्याचे प्रयोग नैसर्गिक मार्गानें झाले तरीही त्यांत कोणाचेंच नुकसान नसल्यामुळें त्यांत ओरड करण्यासारखें कांहींच नाहीं, परंतु हे प्रयोग कृत्रिम गर्भधारणेनें, म्हणजे पिचकारीनें रेत योनींत घालून होत आहेत.

बिनशेंपटीच्या वानरांच्या चार प्रसिद्ध जातींपैकीं ओरँग्–ओटँग ही जात पिवळ्या म्हणजे मंगोलियन लोकांस जास्त जवळ आहे व तशीच गोरीला ही जात काळ्या म्हणजे शिद्दी लोकांस व चिंपँझी ही गोर म्हणजे आर्य लोकांस जास्त जवळ आहे. चौथी जात गिबन, ही यूरोपांतील आंखूड डोक्याचे लोकांस अधिक जवळ आहे. हें लक्षांत घेऊन त्या धोरणावर प्रयोग चालू आहेत. डॉ. इव्हॅनॉक यानीं अशा तऱ्हेचे पुष्कळ प्रयोग केलेले आहेत. किंद्या येथील हवा या सर्व वानरांस व मनुष्यांस मानवते. किंद्या येथें हजारों एकर जागा

फ्रेंच सरकारनें दिली आहे व दरवर्षी त्याच्या व्यवस्थेकरतां २०००० फ्रँक् सरकारांतून मिळून शिवाय प्रयोगशाला वापरण्याची परवानगी आहे. आरंभाचा खर्च सॉव्हिएट सरकारनें सोसला आहे, व नंतरचा बराच खर्च कांहीं श्रीमान अमेरिकन गृहस्थ सोशीत आहेत. या प्रयत्नांत आपणास यश येणार अशी चालकांस खात्री वाटत आहे.

---

# आमच्याबद्दल लोकमत.

( भाषांतर ) पुणें, ३-११-२७

सा. न. वि. वि.

आपल्या देशकार्याबद्दल अभिनंदन करण्याकरतां एकच ओळ लिहितों. राजकीय विषयांवर धंदेवाले वक्ते व्याख्यानें झोडीतच आहेत, व त्यांत कांहीं मोठेंसें कठीणही नाहीं ! आपण मात्र मोठ्या धैर्यानें खरें बोलत आहां. आपलें 'समाजस्वास्थ्य' मला फार आवडतें व मीं त्याची उत्सुकतेनें वाट पहात असतों.

माझ्या सध्यांच्या नोकरीमुळें माझें नांव प्रसिद्ध करूं नये अशी विनंती आहे. आपणांकरतां मला कांहीं करतां येण्यासारखें आहे काय ?

आपला

× × ×

आणखी वर्गणीदार मिळवून देणें हें काम सर्व वर्गणीदारांस सहज करतां येण्यासारखें आहे—संपादक.

* * *

माटुंग्याच्या बैरामजी जीजीभाई अनाथगृहाचे सुपरिंटेंडंट डॉ. कॅन्ट्रॅक्टर व तेथील व्यवस्थापिका शेवंतीबाई साळवी यांची एकमेकांशीं सलगी होती असें बेअब्रू करणारें विधान केल्याबद्दल दोघांनींही माजी डेप्युटी म्युनिसिपल कमिशनर मसानी यांवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली आहे.

# एक पत्र.

श्री ××××××
२११९।२७ ई.

प्रोफेसर महाराज

आपली ×××× मधील संततिनियमनाबद्दलची जाहिरात वाचून पाहून सदर पुस्तक मीं माझ्या ओळखीच्या डॉक्टराकडून मागवून घेतलें. पण सदर पुस्तकांतील मजकूर माझ्या अपेक्षेप्रमाणें निघाला नाहीं. आपलें संततिनियमन पुढें होणाऱ्या संततीचें नियमन आहे. पण अगोदरच इच्छेविरुद्ध राहिलेल्या व होऊं घातलेल्या संततीचें नियमन अगर परिवर्तन कसें करावें हें आपण आपल्या सुप्रसिद्ध पुस्तकांत मुळींच सांगितलें नाहीं. तरी सदर पुस्तकांतील कांहीं मजकुरावरून व सोबत पाठविलेल्या साधनांच्या फुकट क्याटलागावरून आपल्याकडे ह्या बाबतींत कांहीं माहिती अगर औषधें मिळण्याचा संभव दिसून आल्यावरून मी आपल्याकडे ह्या पत्रद्वारें धांव घेत आहें. माझी संपूर्ण हकीकत अशी आहे.

मी एक दीन अबला आहें. मला माझ्या नवऱ्यानें सोडून दिलें असून मी लोकांच्या घरीं कामधाम करून पोट भरतें. पण माझा मोहक चेहरा माझ्या घातास व अब्रूनाशास कारण होतो. मी बरींच वर्षें न बिघडतां राहिलें पण शेवटीं एका नराधमाच्या कामवासनेस माझ्या इच्छेविरुद्ध बळी पडलें. या गोष्टीस आज चार महिने होत आले. हल्लीं मला तितक्याच मुदतीचा अजमासें गर्भ राहिला. चार महिने कसे तरी मीं अब्रूनें काढिले. पण ह्यापुढें चार बायकांत तोंड काढणें अवघड वाटूं लागलें आहे. प्रोफेसर महाराज आपले आडनांवावरून आपणही ब्राह्मण दिसतां. तरी एका निराश्रित ब्राह्मण अबलेस तिच्या घातापासुन तिची सुटका करण्याचें श्रेय आपण घेणार नाहीं काय? अलबत घेणें आपलें कर्तव्य आहे. तरी ह्या माझ्या अवस्थेंतून सुखरूप पार पडण्याचा उपाय, औषधें अगर साधनें जें कांहीं असेल तें मज गरीब अबलेकरितां व्हीपीनें लवकर पाठवावें अशी मी सविनय विनति करीत आहें. आपण पत्रव्यवहार गुप्त राखण्याचें अभिवचन देतांच. तरी मला थोडासा गुप्तपणा राखल्यावांचून गत्यं-

तर नाहीं. मी माझें नांव मात्र आपणास कळवितें पण आडनांव वगैरे न कळवलेलेंच बरें. येथील पोस्टमन माझ्या अगदीं ओळखीचा आहे. व त्याला मीं माझ्या नांवचा पत्रव्यवहार मजकडे गुप्तपणें आणून देण्यास सांगितलें आहे. तरी मी खालीं दिलेल्या पत्त्यावर माझी वरील सर्व हकीकत लक्ष्यांत आणून योग्य योजना करून औषध गोळ्या अगर पेय अथवा इतर साधनें जें कांहीं या बाबतींत उपलब्ध असेल तें व्हीपीनें पाठविल्यास मज दीन अबलेवर आपले अनंत उपकार जन्मोजन्मीं न फिटतील असे होतील यांत बिलकूल शंका नाहीं. कदाचित आपण ह्या बाबतींत कसें कळवावें म्हणून कचराल तर मज गरीब दीन अबलेचा घात कराल. तरी कोणत्याही तऱ्हेची शंका कुशंका न काढितां जरूर शक्य तितकें लवकर योग्य औषध पाठविणेची तजवीज मेहेरबानीनें करावी. सुज्ञास विशेष लिहिणें नलगे. आपला पत्रव्यवहार मी अगदीं गुप्त राखीन. आपण मला केवळ देवाप्रमाणें दिसतां. तेव्हां आपल्या उत्तराची मी चातकाप्रमाणें वाट पहात आहें. महराज—आपण लिहितां कीं फ्रान्स देशांतील पुष्कळ बायकांस गेल्या जर्मन महायुद्धांत मर्जीविरुद्ध जुलमानें भ्रष्ट करण्यांत आल्यानंतर त्यांना गर्भ राहिला. तेव्हां त्या बायकांनीं तिकडील सरकाराकडे अर्ज करून गर्भपात करविण्याची विनंती केली तशीच विनंती आपल्या देशांतील आपल्या जातीची एक दीन गरीब अबला करीत आहे. तरी तिचा आपण अव्हेर करणार नाहीं अशी आशा आहे. हें पत्र मीं एका मुलाकडून लिहविलें आहे. उत्तर जरूर यावें. कळावें ही विनंती.

आपली

**दीन गरीब सौ. ++ बाई + + +**

अशीं पत्रें आमचेकडे वारंवार येतात, परंतु गर्भपात हा कायद्याच्या दृष्टीनें गुन्हा आहे व त्यासंबंधाची माहिती देणें म्हणजे गुन्ह्यास मदत केल्यासारखी होते. हा कायदा बदलणें जरूर आहे असें जरी आमचें मत आहे तरी कायदा मोडण्याची आमची तयारी नाहीं. सर्व वाचकांच्या माहितीकरतां आम्हीं येथें इतकेंच सांगूं शकतों कीं औषधें घेऊन गर्भपात करण्याचा प्रयत्न करणें धोक्याचें आहे. गर्भपाताचा सर्वांत सुरक्षित मार्ग म्हणजे शस्त्रक्रिया. परंतु

गर्भावस्था तडीस जाऊं दिल्यास स्त्रीच्या जीवास धोका आहे असें डॉक्टरांस वाटल्यासच गर्भपात करण्याची कायद्याची परवानगी आहे, व हें ज्याचें त्यानें ठरवावयाचें नसून डॉक्टरांनीच ठरवावयाचें असतें. पंजाबमधील एका वकीलानेंही या कायद्यावर थोडीशी वकिली लढवून आमच्याकडून अशी माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला होता, परंतु त्यांसही आम्हांस हेंच उत्तर द्यावें लागलें.

ज्यांस संततिनियमाचे ऊपाय माहितच नसतात त्यांची अशा वेळीं दया येते परंतु उपाय माहीत असूनही ते वापरण्यांत हयगय केल्यामुळें स्त्रीस गर्भ राहिल्यावर किंवा राहिला अशी शंका वाटतांच कांहीं नवरे गर्भपाताचे उपाय विचारावयास येतात, त्यांची दयाही येत नाहीं. कांहीं लोक खर्चामुळें हयगय करतात, परंतु एक मूल वाढविण्यासही या उपायांपेक्षां जास्त खर्च लागतो, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. शिकवून अक्कल किती येणार !

× × ×

दस्सन चेट्टी नांवाच्या एका मनुष्यास आपल्या बायकोचा संशय आल्यावरून त्यानें तिला धमकी दिली होती. गेल्या मार्च ८ तारखेला तो घरीं येतो तों बायको माहेरीं गेली असें समजल्यावरून तो तेथें गेला व त्यास बायको परमेश्वरन नायर नांवाच्या मनुष्याबरोबर सांपडली. त्यानें नायरचें डोकें कापून तीन मैलांवर लपवून ठेवलें व धड एका तळ्याच्या कांठाशीं टाकलें. त्याच्या बायकोनें व सासूनें कोर्टांत सर्व हकीकत सांगितली, परंतु सेशन कोर्टांत त्या नाकबूल झाल्या. तरी कोर्टानें त्यास दोषी ठरवून जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा दिली.

\+ + +

महात्मा गांधी मद्रास येथील एका कॉलेजांतील विद्यार्थ्यांस उपदेश करतांना म्हणाले, ‘ बालविधवांची स्थिति भयंकर आहे. मी पुष्कळ वेळां परमेश्वराजवळ असें म्हटलें आहे कीं, हे परमेश्वरा ! मी जगावें अशी तुझी इच्छा असेल तर असले प्रकार मला कां दाखवतोस ? [ यावर परमेश्वर काय म्हणाला हें समजत नाहीं—सं. ] याकरतां आपण विधवांशींच लग्न करणार असा निश्चय करून तो जाहिर करा ’. कुमारिकांच्या बापांनीं सावध व्हावें !

# वेश्यागृहें.

'धी न्यू जनरेशन'च्या सप्टेंबरच्या अंकांत एका गृहस्थाचें पत्र छापलें आहे, त्याचा सारांशः--

'वेश्यागृहांमुळें तोट्यापेक्षां फायदाच जास्त होतो. त्यांनीं रोग व इच्छेविरुद्ध होणारी संतति टळते. जेथें पगार थोडा व काम फार असतें अशा कोणत्याही धंद्यांतील स्त्रियांपेक्षां अत्यंत कनिष्ठ वेश्यागृहांत सुद्धां वेश्यांची स्थिति वाईट नसते. बडया बडया इंग्लिश किंवा फ्रेंच नीतिशास्त्रज्ञांचीं पुस्तकें मी वाचीत नाहीं, व फ्लेक्स्नरनें केलेले आरोप हल्लींच्या शिस्तवार फ्रेंच वेश्यागृहांस लागू नाहींत. आपण फ्रेंच वेश्यागृहांत गेलां नाहीं असें दिसतें परंतु मी गेलों आहें. [ गिऱ्हाईक म्हणून नव्हे, तर तेथील स्त्रियांसह एखादें पेय घेऊन स्वतःची करमणूक करण्याकरतां ] व म्हणून ही गोष्ट मला माहीत आहे. मी तेथील पुष्कळ मुलींशीं बोललों आहें—त्यांतील बऱ्याच वयानें लहान असतात, व फ्रेंच स्त्रिया एकंदरींत मायाळू असतात. मला भेटलेल्या बहुतेक वेश्या सुखी दिसल्या, व कांहीं नंतर लग्न करून सुगृहिणी झाल्या—तशा नीतीचें ढोंग करणाऱ्या लोकांत मिळणें कठिण. त्यांची मिळकत कोणीं हिरावून घेत नाहीं इतकेंच नाहीं तर त्यांस जें बक्षिस मिळतें [ फ्रेंच वेश्यागृहाची फी म्हणून जी रक्कम द्यावी लागते तितकीच—किंवा त्याहूनही अधिक—रक्कम पसंत केलेल्या वेश्येस बक्षिस देण्याची पद्धत आहे ] तें त्या शिल्लक टाकतात व अशा रीतीनें स्वतंत्र होण्यास पुरेशी पुंजी जमवतात. या स्त्रियांची तपासणी व जोपासना योग्य रीतीनें होते. कोणत्याही राष्ट्रांत हीं गृहें बंद करण्याची वेळ अजून आलेली नाहीं. हीं बंद केल्यास लक्षावधि स्त्रियांचें काम बंद होऊन त्या उपाशीं मरतील, कारण 'नीतिमान' लोक त्यांस नोकरीस ठेवणार नाहींत.

अज्ञान, रोग व अवांछित संतति यांनीं त्यांचे हाल होतील हें उघड आहे. आरोग्य, सुव्यवस्था किंवा सभ्यता ( इंग्रजांची सभ्यतेची कल्पनाच चमत्कारिक असते ) यांपैकीं कोणत्याही दृष्टीनें वेश्यागृहें बंद करावीं असें वाटत नाहीं. पूर्वी वेश्यागृहांत अन्याय व जुलूम होत असे परंतु आतां ती स्थिती गेली.

कामविपर्यास तुम्ही कशाला म्हणतां हें मला समजत नाहीं. हलकट पुरुषांमध्यें चेतना उत्पन्न करण्याकरतां पैसे घेऊन चाबूक मारून घेणाऱ्या स्त्रिया हल्लीं नाहींत. वेश्यांस गुलामांप्रमाणें परदेशीं पाठविण्याचा जो व्यापार चालतो त्याचा व या वेश्यागृहांचा संबंध आहे हा आरोप खोटा आहे. या वेश्यांस कदाचित जास्त 'काम' पडत असेल, आणि या बाबतींत जास्त कशास म्हणावें हें ठरवणें कठिण आहे. मीं एकदां एका इंग्रज एम. डी. डॉक्टरास विचारलें कीं नवराबायकोनें समागम किती वेळां करावा ? तो म्हणाला, हें मला सांगतां येत नाहीं. हा व्यक्तींचा प्रश्न आहे. कांहीं लोक इतरांपेक्षां जास्त कां खातात ?

या गृहांसंबंधीं प्रश्नाचा निकाल करण्याचा लोकांचा बेत दिसतो. ज्यांस घर, बायको वगैरे आहेत ते, इतरांनीं कसें रहावें, कोणते मित्र करावे, कोणते नियम पाळावे, हें ठरवणार असें दिसतें ! खासगी व करमणूकींचे बाबतींत ज्यांचे बाजूस अधिक मतें असतील त्यांनीं इतरांवर जुलूम करावा हा असहिष्णुतेचा कळस आहे. तुम्हांस वेश्यागृहें किंवा नाटक, तमाशा आवडत नसेल तर तुम्ही तिकडे जाऊं नका. अशा प्रकारच्या जुलमामुळेंच क्रांति होते. कायद्यानें किंवा बहुमतानें लोकांस नीतिमान बनविण्याचा प्रयत्न फोल आहे.'

---

# जेलोटयूब

यानें **गुप्त रोग बरे होत नाहींत,** हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून, काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोडयुशो यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळा वापरण्याचें पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २

# तोतरेपणा.

बोलण्याची क्रिया मोठीशी कठिण आहे असें साधारणतः कोणाच्या मनांतही येत नाहीं, परंतु ती बरोबर होण्याकरतां पुष्कळ निरनिराळया स्नायूंना आपलें काम योग्य रीतीनें करावें लागतें. तें न झाल्यास तोतरेपणा किंवा उच्चाराचे इतर दोष उत्पन्न होतात. यामुळेंच २–३ वर्षांचे मुलांत थोडासा तोतरेपणा स्वाभाविक असतो, कारण तीं बोलण्यास शिकत असतात. परंतु ज्या मज्जातंतूंचे द्वारें हे स्नायू हालतात त्यांत कांहीं दोष असल्यास हा तोतरेपणा पुढेंही कायम राहतो.

या तोतरेपणाला अनेक कारणें असूं शकतात. उदाहरणार्थ तोतऱ्या आईबापांची मुलें केवळ अनुकरणानें तोतरीं होतात. कधीं कधीं मुद्दाम दुसऱ्या मनुष्याला वेडावून दाखवणाऱ्या मुलांस तीच संवय लागते व तो नंतर सुटत नाहीं. कधीं कधीं भीतीमुळें किंवा लहानपणच्या एकाद्या रोगामुळें मुलें तोतरीं होतात.

तोतरेपणाचें आणखी एक सामान्य कारण म्हणजे डावखुऱ्या मुलांचा डावखुरेपणा काढून टाकण्याचा प्रयत्न. जोंपर्यंत मुलें दोन्ही हात सारखेच वापरीत असतात, तोंपर्यंत त्यांस इतर लोकांचें उदाहरण दाखवल्यास तीं हळूहळू उजवा हात जास्त वापरावयास शिकतात. परंतु एखाद्या मुलाचा डावाच हात वापरण्याकडे कल आहे असें दिसून आल्यानंतर त्याला धाक दाखवून, रागें भरून उजवा हात वापरावयास लावण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा परिणाम पुष्कळ वेळां तोतरेपणा हा होतो. याकरतां कधींही जबरीनें उजवा हात वापरावयास लावूं नये.

कोणतीही गोष्ट दोन्ही हातांनीं करतां येण्यांत गंमत आहे असें मुलांस सांगितल्याचा कधीं कधीं इष्ट परिणाम होतो, व नंतर इतर लोकांप्रमाणें उजव्या हातानेंच जेवणें व लिहिणें बरें असें सांगावें. जागा आकुंचित असल्यास डावखुऱ्या मनुष्यापासून इतर लोकांस खरोखरच त्रास होतो, परंतु सौम्य उपायांनीं हें न साधल्यास मारून मुटकून साधण्याचे भरीस पडूं नये, कारण तोतरेपणा आल्यास तो कमीपणा आणणारा असतो व त्याचे परिणाम जन्मभर सोसावे लागतात. [ हायजिआ ]

# नवीन लेखांतील निवडक विचार.

आपणांस कोणताही संसर्गजन्य किंवा आनुवंशिक रोग नाहीं अशाबद्दल डॉक्टरचें सर्टिफिकीट वधूवरांनीं लग्नापूर्वी परस्परांस दाखवण्याची चाल फ्रान्स-मध्यें पडत आहे, व अशा प्रकारच्या कायद्याचा मसुदा फ्रेंच पार्लमेंटपुढें आला आहे. फ्रान्समध्यें रजिस्टर केल्याशिवाय लग्नच होऊं शकत नाहीं यामुळें कायदा चुकवतां येणार नाहीं. अशी चाल सर्वत्र पडेल तर ठीक.

* * *

लंडन येथील डॉ. नॉर्मन् हेअर यांनीं विवाह या विषयावर एक लेख लिहिला आहे. अन्नांत ज्याप्रमाणें फेरपालट करण्याची जरूर असते, त्याच-प्रमाणें प्रेमसंबंधांतही मनुष्यांस अशी जरूर भासते यांत शंका नाहीं, असें ते म्हणतात. बाळंतिणींच्या जोपासनेची व मुलांच्या संगोपनाची जबाबदारी हळू हळू व्यक्तींवर न राहून समाजाकडे येईल. हल्लीं मुलांस शिक्षण व जरूर असल्यास अन्न ( विलायतेंत ) फुकट मिळतें, त्याचीच ही पुढची पायरी आहे. आईबापांस पुष्कळ वेळां मुलांचें संगोपन कसें करावें हें माहीत नसतें, व ही उणीव नुसत्या प्रेमानें भरून येत नाहीं.

* * *

डॉ. रॉबिनसन म्हणतातः अजूनही मनुष्याचें नग्न शरीर बीभत्स व लज्जा-स्पद गोष्ट आहे असें कांहीं लोकांस वाटतें ! आणि भटांना किंवा रजिस्ट्रारला कळवल्याशिवाय एखाद्या स्त्रीला मूल झालें तर तो जवळ जवळ खुनाइतका भयं-कर गुन्हा वाटतो !

* * *

श्री. देशपांडे व घुर्ये यांनीं कोकणांतील चार गांवांतील सांपत्तिक स्थिती-बद्दल कांहीं माहिती ' इंडियन एकॉनॉमिक जर्नल् ' मधें प्रसिद्ध केली आहे. त्यांनीं १९२ कुटुंबांबसंधीं माहिती मिळवून असा निष्कर्ष काढला आहे कीं शेतकी करणारे लोक नेहमीं कर्जबाजारी असतात, शेंकडा ५६ कुटुंबांस पुरेसें खावयास मिळत नाहीं, पाणी पुरेसें नसतें व जमीनही पुरेशी नसल्यामुळें वर्ष-भर पुरेल इतकें काम नसतें व शरीरप्रकृतीही समाधानकारक नसते. कुटुंबाच्या फाजील विस्तारामुळें अशी स्थिति होत असावी असें कित्येकांस वाटेल परंतु

त्यांनीं जमवलेल्या माहितीवरून तसें दिसत नाहीं, असें लेखकांचें म्हणणें आहे. आमची माहिती याच्या उलट आहे. अन्नाचा पुरवठा पुरेसा होईल अशा बेतानेंच कुटुंबाचा विस्तार झाला पाहिजे, व अन्न पुरेसें मिळत नाहीं यावरूनच कुटुंबें फाजील मोठीं आहेत असें दिसतें व तीं तशीं असतात हें आम्हांस माहीत आहे.

× × +

श्री. दुर्गाबाई म्हसकर ( गृहलक्ष्मी, सप्टेंबर ) म्हणतातः—'परमेश्वराबद्दल आस्तिक बुद्धि राहील अशीं वचनें मुलांना शिकवावीं व तीं त्यांच्याकडून नेहमीं पाठ म्हणवून घ्यावीत. वरील गोष्टी लक्ष्यांत ठेवून त्या अमलांत आणणाऱ्या मनुष्यास डॉक्टरांचें घर पाहण्याचा प्रसंग बहुधा येत नाहीं. हा आरोग्याचा उपाय खरा असल्यास पंढरपूरसारख्या क्षेत्राचे ठिकाणीं यात्रेचे वेळीं कॉलऱ्याचा उद्भव होतो तो कां ?

\+ + +

' अविवाहित स्त्रीस गर्भ राहिला म्हणून नाइलाज होऊन अयोग्य वराशीं लग्न करण्याचा प्रसंग येण्यापेक्षां त्यांनीं संततिनियमनाचे उपाय वापरणें बरें ' असें डा. लुई नांवाच्या एका ख्रिस्ती धर्मोपदेशकानें एका धार्मिक परिषदेंत स्पष्ट विधान केलें आहे.

× × ×

येथील ' इंडियन् नॅशनल हेरल्ड ' पत्रांत मुंबईतील वेश्यांवर एक लांब लचक लेख आला आहे. त्यांत पुरुषांचें लग्न विसाव्या वर्षीं व्हावें, वेश्यांस शहराच्या कांहीं भागांतच राहूं द्यावें, व वेश्यावृत्ति वाईट आहे असा वेश्यांस उपदेश करावा, असे उपाय सुचवले आहेत. सांपत्तिक स्थितीचा विचार न करतां सरसकट सर्वांनीं विसाव्या वर्षीं लग्न करणें हा आमचे मतें मूर्खपणा आहे. वेश्यांस किंवा त्यांच्या गिऱ्हाइकांस केलेल्या नीतीच्या उपदेशाचा परिणाम क्वचितच होईल. वेश्यांपासून विशेषतः रोग प्रसाराचे भय असतें, तेव्हां वेश्यांस व त्यांच्या गिऱ्हाइकांसही रोगांपासून स्वतःचा बचाव कसा करावा याचें शिक्षण देणें अधिक चांगलें. याची माहिती आमच्या ' गुप्तरोगांपासून बचाव ' या बारा आण्यांच्या पुस्तकांत दिली आहे, व याची थोडक्यांत माहिती आम्ही कोणासही फुकट पाठवूं.

\+

# ताजी व शिळी बातमी.

—:०:—

कैरा जिल्ह्यांतील एका गांवांत बाबाजी नांवाचा एक ४९ वर्षांचा पातीदार व त्याची बायको नाथीबाई गेलीं २० वर्षे रहात असत. पैकीं गेलीं ८ वर्षे नाथीबाईचा शेजारच्या एका अविवाहित पातीदाराशीं सबंध होता. त्याचा गांवांत बभ्रा झाल्यामुळें तिला माहेरीं पाठविली होती, तेथें एक वर्ष राहून ३ वर्षांपूर्वी ती नवऱ्याकडे परत आली. गेल्या जानेवारीच्या ४ तारखेस नवरा बाहेरगांवीं गेला असतां दुसरा पातीदार तिच्याकडे गेला परंतु तें कांहीं लोकांनीं पाहून त्याला तेथून हांकून दिला, व बायकोला भीति वाटून ती एका नातलगाकडे जाऊन राहिली. तीन दिवसांनीं तिला नवऱ्यानें क्षमा करून परत घेतली, व त्या रात्रीं तिला काय हकीकत झाली असा प्रश्न केल्यावरोबर ती शिव्या देऊं लागली व मला पाहिजे तर एकच काय पण चार पुरुष सुद्धां घरांत आणीन असें म्हणाली, नवऱ्यानें संतापून एक फावडें तिच्या डोक्यांत घातलें व ती तावडतोब मेली.

कैरा येथील सेशन जज्जानें त्याला १० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली, परंतु हायकोर्टानें अपिलांत त्यांतील ५ वर्षे कमी केलीं.

+ + +

फ्रान्समध्यें एका बाईनें आपल्या नवऱ्यास अशाच प्रकारचें उत्तर दिल्यावरून त्यानें तिला एक चपराक दिली. तिनें कोर्टांत फिर्याद केली व नवऱ्याला दंड झाला.

बायकोबरोबर दुसरा मनुष्य एका बिछान्यांत सांपडून नवऱ्यानें दोघांनाहि गोळी घालून ठार मारल्यास त्यांचा संताप सकारण समजून त्याला सोडून देण्याची वहिवाट आहे. मद्रास येथें अशा खटल्यांत जज्जानें आरोपीस एक पैसा दंड केला होता. आमच्या मतें ही चूक आहे व अशा रीतीनें खून करण्यास उत्तेजन मिळतें. दहा वीस वर्षे सक्त मजुरी मिळेल असें वाटल्यास हे खून होणार नाहींत.

+ + +

त्यावरून संतापून तिला त्यानें भावाकडून परत आणून एका खांबाशीं बांधून इतकी मारिली कीं तिची बरगडी मोडून ती कांहीं मिनिटांत मेली. ठाणें येथील सेशन जज्ज संजाना यांनीं त्याला पांच वर्षें सक्त मजुरीची शिक्षा दिली; पण बायकोची पळून जाण्याची संवय कायमची मोडली.

× × ×

हिंदु विधवा म्हणजे वेश्याच असतात असे लिहिल्याबद्दल कलकत्त्याच्या ' स्टेट्स्मन ' पत्रावर मणींद्रनाथ गांगुली वकील यांनीं फिर्याद केली, परंतु मॅजिस्ट्रेटनें ती काढून टाकली.

+ + ×

२७ आगस्ट रोजीं गुलाबराय महिपतराय व त्यांची रखेली सिनेमांतील नर्तकी सीता यांस काझी अबदुल नांवाच्या इसमानें मोटारींतून फिरावयास नेऊन दारु पाजली व नंतर नायगांवच्या बाजूला मोटार नेली. तेथें गुलाबरायचा नोकर खालीं उतरला परंतु काझीनें सुरा काढला व बाकीच्यांस उतरूं देईना. नोकर मधें पडला तेव्हां काझीनें त्यास खालीं पाडून त्यांची मारामारी सुरू झाली व बाकीच्या दोघांनीं पोलिसास वर्दी दिली. ते परत आले तों काझीनें सीतेला उचलून दुसऱ्या मोटारींत घातलें परंतु पोलिसानें त्यास पकडलें. त्यास मॅजिस्ट्रेटानें एक दिवस तुरुंग व रु. १००० दंड फर्मावला.

× × ×

लंडन येथील एका नाटकांत बायबलमधील एक उतारा घातला होता, परंतु तो अश्लील असल्यामुळें नियामक अधिकाऱ्यानें तो गाळावयास लावलें. बायबलइतकें अश्लील पुस्तक फारच क्वचित् सांपडेल, परंतु तें लहान मुलांसही वाचूं देण्यास ख्रिस्ती लोकांची हरकत नसते.

* * *

मूल उपजतांना आईच्या इंद्रियांत परम्याचे किंवा इतर जंतु असल्यास ते मुलांचे डोळ्यांत शिरून त्यामुळें डोळे जाण्याचा संभव असतो, याकरतां उपजल्याबरोबर सर्व मुलांच्या डोळ्यांत औषध ( सिल्व्हर नैट्रेट ) घालण्याचा प्रघात यूरोपांत आहे. नुकतेंच पॅरिस येथें एका स्त्रीचें पोट कापून मूल बाहेर

काढलें व अशा वेळीं परम्याच्या जंतुंचा संबंध नाहीं असें वाटल्यावरून डोळ्यांत औषध घातलें नाहीं. पांच दिवसांनीं मुलाचे डोळे आले व त्यांत परम्याचे जंतु सांपडले, डॉक्टरचे हातांनीं किंवा अन्य मार्गानें डोळयांत जंतु गेले असले पाहिजेत, तेव्हां अशा वेळीं सुद्धां डोळ्यांत औषध घालणें हा उत्तम मार्ग.

* * *

पॅरिस येथें एका मनुष्यानें एका हाडाच्या नळीच्या साहाय्यानें आपल्या बायकोचा गर्भपात करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सिद्धीस न जातां नळी भलतीकडे शिरून मूत्राशयांत जाऊन बसली. ती स्त्री आजारी पडून पुष्कळ डॉक्टरांस बोलावलें, परंतु खरें कारण न सांगितल्यामुळें त्यांसही पत्ता लागेना. तिचा शेवटीं गर्भपात झाला व शेवटीं पांचव्या डॉक्टरनें क्ष–किरणाच्या मदतीनें फोटो घेतला तेव्हां खरें कारण समजलें ! संततिनियमनाची माहिती देणें हा फ्रान्समधें गुन्हा आहे, म्हणून यां गोष्टी होतात.

× × ×

एक गिरणींतील मजूर गंगाराम सखाराम हा चेंबूर येथें सिताराम नारायण याजकडे रहात असे व तो सप्टेंबरचे आरंभीं सितारामच्या बायकोबरोबर पळून जाऊन कुरला येथें एका चाळींत राहिला. नवऱ्यास त्यांचा पत्ता लागून तोही कुरल्यास येऊन कांहीं दिवस त्याचेचकडे गोडीगुलाबीनें राहिला. ७ सप्टेंबर रोजीं गंगाराम कामावर असतां सितारामानें खिडकी व दरवाजा बंद करून एक कोयता, वस्तरा व दगड यांचे सहाय्यानें बायकोला ठेंचून कापून ठार मारली. आरडाओरड झाल्यावर पोलीसनें त्यास पकडून नेलें.

हिंदु मुलींचें वय कमींत कमी १२ व मुलांचें १५ वर्षे असल्याशिवाय त्यांची लग्नें कायदेशीर समजूं नये असें एक बिल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें येऊन विचार करण्याकरतां कमिटी नेमिली आहे. त्यांतही मुलगी ११ वर्षांची झाल्यावर तिचें लग्न केलेंच पाहिजे असें बापास धर्माच्या दृष्टीनें वाटल्यास त्यानें मॅजिस्ट्रेटकडे अर्ज करावा म्हणजे त्याच्या परवानगीनें कायदेशीर लग्न करतां येईल अशी सवलत ठेवली आहे. या कायद्याच्या दृष्टीनें हिंदु शब्दामध्यें जैन, शीख, ब्राह्मो, आर्यसमाजिस्ट व बौद्ध यांचीही गणना केली आहे.

हिंदु समाजाची कोणत्याहि रीतीनें सुधारणा झाल्यास ब्रिटिश सरकारचें राज्य हिंदुस्थानांतून नाहींसें होईल व मग आपणास कोणी विचारणार नाहीं अशी 'टाइम्स ऑफ इंडिया'स नेहेमींप्रमाणें भीति पडून त्यांनीं या बिला-विरुद्ध एक लेख खरडला आहे. सुधारणेला कोणी वाईट कसा म्हणेल? ती केलीच पाहिजे परंतु या बाबतींत घाई न करतां गोगलगाईचें अनुकरण करून शक्य तितकी त्वरा करावी असें त्यांचें म्हणणें आहे!

* * *

मुक्ताबाई शेवंतीबाई नांवाच्या येथील एका कुंटीणीनें पारूबाई नांवाची एक १४ वर्षांची मुलगी आपल्या कुंटणखान्यांत ठेवल्याबद्दल तिला १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. ही मुलगी दोन लहान बहिणींसह रायचूर येथून अडीच वर्षांपूर्वी मुंबईस येऊन रस्त्यांत भीक मागत असे. गेल्या वर्षी बाळू नांवाचा एक मनुष्य त्यास भेटून त्यानें पारूबाईस कुंटणखान्यांत नेलें व बाकीच्या दोन मुली घेऊन मुंबई सोडून गेला त्याचा अजून पत्ता नाहीं. कुंटणखान्याच्या एका गिऱ्हाइकानें ही बातमी येथील जागरूक संस्थेस दिली म्हणून हें सर्व बाहेर पडलें. या संस्थेच्या अभावीं ही बातमी पोलीसला देतां आली असती.

पंधरा वर्षांचे आंतील मुलें कुंटणखान्यांत असतां कामा नये असा कायदा आहे म्हणून मुक्ताबाईस शिक्षा झाली. पंधरा वर्षांचे आंतील मुलींनीं वेश्या बनावें असें आमचें म्हणणें नाहीं, परंतु वेश्यावृत्तीपेक्षां भीक मागण्याचा धंदा बरा असें मात्र आम्हांस वाटत नाहीं.

× + ×

येथील वॉलेस कपनींतील खांडेकर नांवाचा एक कारकून व गाडगीळ व फातरपेकर नांवाचे त्याचे दोन मित्र रेलवे होटेलमधें व्हिस्की पिण्यास गेले असतां तेथें मेरी डायस् नांवाच्या वेश्येची गांठ पडली व फातरपेकर यांनीं सर्वांची ओळख करून दिली. सर्वांनीं व्हिस्की घेतल्यावर खांडे-कर यांनीं तिला पांच रुपये दिले व माझ्या खोलींत येशील तर आणखी देईन असें सांगितलें. त्याप्रमाणें तीं दोघें गाडींतून त्यांचे

खोलींत गेलीं व ती दोन तास तेथें राहून आणखी कांहीं पैसे मिळवून जाऊं लागली. खांडेकर यांनीं आपणास भूक लागली असें सांगून तीन रुपये परत मागितले, ते न देतां तिनें त्यांस खावयास देण्याचें कबूल केलें परंतु फार उशीर झाल्यामुळें सर्व दुकानें बंद होतीं. लॅमिंगटन रोडजवळ आल्याबरोबर खांडेकर यांनीं एकदम तिचा हात पकडून पैसे मागितले, व बरेच लोक जमा झाले तेव्हां तिच्यावर चोरीचा आळ घालून तिला पोलीसचे हवालीं केली. परंतु गाडगीळ आणि फातरपेकर यांनीं तिच्यासारखीच साक्ष दिल्यामुळें तिचें म्हणणें खरें ठरलें, व खोटी फिर्याद करून तिला त्रास दिल्याबद्दल खांडेकरांनीं तिला रु. १५ द्यावे असा मॅजिस्ट्रेटनें निकाल दिला.

\+ + ÷

भागूबाई नांवाच्या एका मराठा बाईच्या वाईट वर्तनावरून आपलें नांव बद्द झालें असें वाटून रामा कृष्णा नांवाच्या तिच्या एका नातलगानें तिला बाहेरगांवीं पोंचवण्याच्या मिषानें दूर नेऊन कुऱ्हाडीनें ठार मारली. साताऱ्याच्या सेशन जज्जानें त्यास फांशीची शिक्षा दिली होती, परंतु हायकोर्टानें ती कमी करून जन्मठेप काळें पाणी दिलें.

* * *

बल्गेरियामधील एका खेडयांतील लोकांनीं फार दिवस पाऊस न पडल्यामुळें, ईश्वरी कोप झाला असें समजून, चार पापी पुरुषांस बळी दिलें.

कांहीं वर्षांपूर्वी यूरोपांत कांहीं लोकांनीं नरमांस खाल्ल्याची हकीकत एका फ्रेंच वर्तमानपत्रानें प्रसिद्ध केली होती. धार्मिक वेडगळपणा, क्रूरता व रानटी प्रकार हिंदुस्थानांतच सांपडतात असें नाहीं.

× × ×

येथील बनाम हॉल गल्लींत सुभगचंद्र नांवाचा एक जैन तीन वेश्या बाळगून त्यांच्या मिळकतीवर नोव्हेंबर १९२६ पासून उपजीविका करीत असे. त्यांपैकीं एका १८ वर्षांच्या मुलीनें त्या धंद्यांतून सुटण्याकरतां पोलिसाकडे अर्ज केल्यावरून सुभगचंद यास पकडलें, व मॅजिस्ट्रेटानें सहा महिने सक्त मजुरी व रु. ३०० दंड केला.

\+ + +

आगस्टचे १३ तारखेस शिवा ईश्वर व माधु शिवा नांवाच्या २५ व ३५ वर्षं वयाच्या दोन मनुष्यांनीं १० व १२ वर्षांच्या दोन मुलींस फुस लावून राणीचे बागेंत व नंतर शेवरीकडील एका एकांत जागेंत नेऊन त्यांवर बलात्कार केला व नंतर त्या मुलींस बोरी बंदरजवळ सोडून ते नाहींसे झाले. नंतर पांच दिवसांनीं शिवा ईश्वर यास १० वर्षांची 'बकुळी' पुनः भेटली व तो तिला फुस लावून नेपिअन सी रोडकडे घेऊन गेला. पोलिसास शंका आल्यावरून त्यानें त्यांस विचारलें तेव्हां ती मुलगी आपली बहिण आहे असें शिवानें सांगितलें, परंतु पोलिसानें त्या मुलीला बाजूला नेऊन विचारतांच तिनें सर्व हकीकत सांगितली, व पोलिसानें शिवास व नंतर माधूस पकडलें. या दोन्ही आरोपीस गर्मी होती असें डॉक्टराच्या साक्षीवरून समजलें. कुमारिकेशीं संभोगानें गर्मी बरी होते या वेडगळ समजुतीनें त्यांनीं हा प्रकार केला. हाय-कोर्टानें त्या दोघांस १० वर्षं सक्त मजुरीची शिक्षा दिली.

ही वेडगळ समजूत सर्व जगभर पसरलेली आहे. वरील १० वर्षांची मुलगी त्याच इसमाबरोबर पुनः जाण्यास तयार झाली यावरून झालेला प्रकार केवळ तिच्या मर्जीविरुद्धच होता असें दिसत नाहीं, व निदान तिला कांहीं इजा झाली असें वाटत नाहीं आणि तिच्या वयाबद्दलही शंका येते. तरी ही झालेली शिक्षा योग्यच आहे. कोणत्याही वयाचे स्त्रीला जाणून बुजून रोग देण्याचा प्रयत्न करणें हा आमचे मतें भयंकर गुन्हा आहे.

* * *

हेनले नावांच्या एका साहेबाच्या बायकोला लखनौच्या एका हिंदी जमिनदारानें नोकरीस ठेवलें व नंतर ती त्याजवळच राहिली, तेव्हां बायकोला फुसलावून नेल्याबद्दल साहेबानें फिर्याद केली, व नंतर तो खटला जमीन-दारानें पैशाच्या साहाय्यानें आपसांत मिटवला, ही हकीकत बऱ्याच लोकांनीं वाचली असेल. कितीही वयाच्या स्त्रीला कायद्याच्या दृष्टीनें लहान मुलांप्रमाणें फुसलावून नेतां येतें, म्हणजे स्त्रियांसही लहान मुलांइतकीच कमी अक्कल असते असें कायद्यांत समजलें जातें, हा कायद्यानें स्त्रियांचा केलेला अपमान त्या किती दिवस सहन करणार ?




वर्ष १ ] फेब्रुवारी १९२८ [ अंक ८

## संपादक--र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.

| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | वेश्यांसंबंधी कायदे. ३ ... ... ... | १ |
| २. | कांहा पत्रे ... ... ... ... | ७ |
| ३. | आमच्याबद्दल लोकमत ... ... ... | १५ |
| ५. | नवीन लेखांतील निवडक विचार ... ... | १६ |
| १३. | किरकाळ ... ... ... ... | २१ |
| १४. | ताजी व शिळी बातमी ... ... ... | २४ |


# जेलोटयूब

यानें गुप्त रोग बरे होत नाहींत, हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोडयु यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २

उच्च दर्जाचें व उच्च ध्येयाचें मनरंजक पण भारदस्त व प्रगतिप्रिय असें

स्त्रियांचें सर्वांगसुन्दर मासिक.

# गृहलक्ष्मी

सम्पादिका— तारा टिळक, बी. ए.
पिरोज आनन्दकर, बी ए.

[ वार्षिक वर्गणी ट. ख. सह फक्त ३॥ साडेतीन रुपये. ]

**प्रत्येक १५ व्या तारखेस प्रसिद्ध होतें.**

स्त्रियांना उपयुक्त व आवडतील अशा सर्व विषयावर विद्वान् अधिकारी लेखिकांचे व लेखकांचे लेख "गृहलक्ष्मी" मध्यें असतात. तीन रंगी मुखपृष्ठ, तीन रंगी दर्शनी चित्र व आर्टपेपरवरील अनेक फोटो

'गृहलक्ष्मी' कार्यालय,

# वेश्यांसंबंधीं कायदे–३

———:०:———

## प्रचलित व्यवस्थाः–फ्रान्स.

वयांत आलेल्या प्रत्येक मनुष्यास आपल्या शरीराचा व मनाचा पाहिजे तसा उपयोग किंवा दुरुपयोग करण्याचा पूर्ण हक्क आहे, मात्र त्यापासून इतरांस त्रास होतां कामा नये, हें तत्त्व हल्लींच्या फ्रेंच कायद्यानें मान्य केल्यामुळें, १८ वर्षांवरील वयाच्या स्त्रियांस वेश्यावृत्तीनें राहण्यास तेथें पूर्ण मुभा आहे. परंतु आरोग्याच्या दृष्टीनें इतर रोग्यांसंबंधीं जसे कायदे आहेत तसेच गुप्तरोगांपासून संरक्षणाच्या दृष्टीनें वेश्यांसंबंधीं कायदे आहेत. याकरितां प्रत्येक वेश्येस पोलीसाच्या नोंदणी बुकांत नांव नोंदावें लागतं, व कोणी स्त्री नांव नोंदल्याशिवाय वेश्येचा धंदा करीत असल्याचें पोलीसचे नजरेस आल्यास तिचें नांव सक्तीनें नोंदतां येतें. वेश्यागृहांतील वेश्यांस दर आठ दिवसांनीं व स्वतंत्र वेश्यांस १५ दिवसांनीं सक्तीची डॉक्टरची तपासणी असते, व त्याकरतां या नोंदणीबुकाचा उपयोग होतो. कोणी वेश्येनें धंदा सोडून दिला असें सिद्ध केल्यास तिचें नांव बुकांतून काढून टाकतात.

वेश्यांनीं रस्त्यांत लोकांस खुणेनें किंवा शब्दांनीं बोलवतां कामा नये असा कायदा करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीस असतो, परंतु नोंदलेल्या वेश्यांशिवाय इतर स्त्रियांस हा कायदा लागत नाहीं. प्रथम त्या वेश्या आहेत असें सिद्ध करून, त्यांची सक्तीनें नोंद करून नंतर कायदा लावतां येतो.

त्याचप्रमाणें अमुक ठिकाणीं वेश्यांनीं जातां कामा नये, किंवा अमुक वेळीं रस्त्यांत उभें राहतां कामा नये, असे कायदे म्युनिसिपालिट्यांस करतां येतात. परंतु स्त्रिया कितीही वाईट चालीच्या असल्या तरी त्या जोंपर्यंत वेश्या या सदरांत येत नाहींत ( म्हणजे समागमाबद्दल पैसे घेत नाहींत ) तोंपर्यंत त्यांस असे कायदे लागू होत नाहींत. आपल्या हद्दींत परवानगीशिवाय वेश्यागृह उघडतां कामा नये असा (अर्थातच वेश्यागृहें मुळींच उघडतां कामा नये असाही)

कायदा करतां येतो. परंतु स्वतंत्र वेश्यांनीं उपाहारगृहांत जातां कामा नये असा
कायदा करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीस आहे असें वरिष्ठ कोर्टानें ठरवलें.

वेश्यागृह उघडण्यास म्युनिसिपॅलिटीनें हरकत घेतली नाहीं तरीही शेजा-
ऱ्यांस त्रास झाल्यास त्यांस फिर्याद करतां येते व कोर्ट नुकसान भरून देववतें व
जरूर वाटल्यास वेश्यागृह बंद करण्याचा हुकूम देतें.

वर सांगितल्याप्रमाणें नोंदलेल्या वेश्यांस सक्तीनें तपासणी असते व
त्यांस रोग आहे. असें आढळल्यास त्यांस जबरीनें इस्पितळांत पाठवतात, परंतु
या जबरीस कोणत्याही कायद्याचा आधार नाहीं. ही पोलीसची अरेरावी
आहे, परंतु ती सार्वजनिक हिताची असल्यामुळें त्याचा कोणी जास्त खल
करीत नाहीं.

या पोलीसच्या हुकुमाप्रमाणे कोणी न वागल्यास तीन पासून पंधरा
दिवस पर्यंत तुरुंगाची शिक्षा देण्याचा अधिकार पोलीसचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसच
दिलेला असतो. हा अरेरावीपणाचा आणखी एक मासला आहे, परंतु ही
चालू वहिवाट आहे.

१८ वर्षांचे आंतील मुलींनीं वेश्येचा धंदा केल्यास तिला कोर्टांत हजर
करून कोर्ट सांगेल त्याप्रमाणें आईबापांकडे किंवा एखाद्या सार्वजनिक संस्थेंत
पाठवतात. परतु याचा बहुधा फारसा उपयोग होत नाहीं. काळजी घेणारे आई-
बाप असल्यास मुलगी १८ वर्षांचे आंत वेश्या होण्याचा संभवच नसतो व सार्व-
जनिक संस्थातूनही पळून जाणें कठिण नसतें !

## प्रशियांतील कायदे.

जर्मनी व डेनमार्क या दोन देशांत सरकारी परवान्या शिवाय वेश्या-
कर्म करणें हा गुन्हा समजतात, व यास दोन वर्षां पेक्षाही अधिक सक्तमजु-
रीची शिक्षा देतां येते [ इतर कोणत्याही देशांत अशी शिक्षा नाहीं ]. का-
कायदेः—

१. वेश्यांनीं वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे.

कायदा करतां येतो. परंतु स्वतंत्र वेश्यांनीं उपाहारगृहांत जातां कामा नये असा कायदा करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीस आहे असें वरिष्ठ कोर्टानें ठरवलें.

वेश्यागृह उघडण्यास म्युनिसिपॅलिटीनें हरकत घेतली नाहीं तरीही शेजाऱ्यांस त्रास झाल्यास त्यांस फिर्याद करतां येते व कोर्ट नुकसान भरून देववतें व जरूर वाटल्यास वेश्यागृह बंद करण्याचा हुकूम देतें.

वर सांगितल्याप्रमाणें नोंदलेल्या वेश्यांस सक्तीनें तपासणी असते व त्यांस रोग आहे. असें आढळल्यास त्यांस जबरीनें इस्पितळांत पाठवतात, परंतु या जबरीस कोणत्याही कायद्याचा आधार नाहीं. ही पोलीसची अरेरावी आहे, परंतु ती सार्वजनिक हिताची असल्यामुळें त्याचा कोणी जास्त खल करीत नाहीं.

या पोलीसच्या हुकुमाप्रमाणे कोणी न वागल्यास तीन पासून पंधरा दिवस पर्यंत तुरुंगाची शिक्षा देण्याचा अधिकार पोलीसचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसच दिलेला असतो. हा अरेरावीपणाचा आणखी एक मासला आहे, परंतु ही चालू वहिवाट आहे.

१८ वर्षांचे आंतील मुलींनीं वेश्येचा धंदा केल्यास तिला कोर्टांत हजर करून कोर्ट सांगेल त्याप्रमाणें आईबापांकडे किंवा एखाद्या सार्वजनिक संस्थेंत पाठवतात. परतु याचा बहुधा फारसा उपयोग होत नाहीं. काळजी घेणारे आईबाप असल्यास मुलगी १८ वर्षांचे आंत वेश्या होण्याचा संभवच नसतो व सार्वजनिक संस्थातूनही पळून जाणें कठिण नसतें !

## प्रशियांतील कायदे.

जर्मनी व डेनमार्क या दोन देशांत सरकारी परवान्या शिवाय वेश्याकर्म करणें हा गुन्हा समजतात, व यास दोन वर्षां पेक्षांही अधिक सक्तमजुरीची शिक्षा देतां येते [ इतर कोणत्याही देशांत अशी शिक्षा नाहीं ]. कांहीं कायदे:—

१. वेश्यांनीं वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे.

२. वेश्यागृहें मोठ्या रस्त्यावर असूं नयेत.

३. त्यांवर नेमलेल्या मॅजिस्ट्रेटानें डॉक्टरास घेऊन तेथें वारंवार तपासणीकरतां गेलें पाहिजे.

४. तेथें मादक पेयें विकतां कामा नये.

५. मालकानें इतर कोणत्याही स्त्रीस तेथें येऊं दिल्यास तो दंडास पात्र होईल.

६. अशा गृहांत कोणत्याही वेश्येस रोग आहे असें आढळल्यास मालकिणीनें ही गोष्ट मॅजिस्ट्रेटला तावतोब कळवली पाहिजे व उपचाराविषयीं व संसर्गाविषयीं खबरदारी घेतली पाहिजे.

७. वेश्येनें रोग लपवल्यामुळें कोणास संसर्ग झाल्यास तिला ६ महिने प्रथमतः तुरुंग व शेवटीं ५० फटके मिळतील.

८. अशा गृहांत चोरी, मारामारी वगैरे झाल्या मुळें कोणाचें नुकसान झाल्यास, इतर मार्गाचे अभावीं, तें मालकिणीला भरून द्यावें लागेल.

९. कोणाही वेश्येस ती वृत्ति सोडून प्रामाणिकपणें रहावेंसें वाटल्यास तिला मालकिणीनें अडथळा करतां कामा नये.

१०. कोणत्याही वेश्येस तपासणीचे वेळीं रोग आहे असें दिसल्यास तिनें योग्य उपचार केले पाहिजेत तिनें ते खुषीनें न केल्यास तिला सक्तीनें इस्पितळात पाठवून ती बरी होईपर्यंत तिला तेथें ठेवण्यांत येईल.

वेश्यांची नोंद करण्यासंबंधीं कायदे फ्रान्ससारखेच आहेत. मात्र इतर धंदा करणारी स्त्रीसुद्धां समागमा बद्दल पैसे घेत असेल तर ती वेश्या समजली जाते.

जर्मन साम्राज्यांत वेश्येसंबंधीं खालील नियम आहेतः—त्यांनीं रस्त्यांत किंवा सार्वजनिक ठिकाणीं इतर वेश्यांबरोबर किंवा कुंटणांबरोबर किंवा असभ्य तऱ्हेनें फिरतां कामा नये व उघडपणें गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न करतां कामा नये. शाळा, देवळें, सार्वजनिक इमारती, नाटकगृहें, सर्कसी वगैरेचे आसपास रेंगाळतां कामा नये, व अज्ञान मुलांशीं कोणत्याही प्रकारचा संबंध

ठेवतां कामा नये. त्यांनीं पोलीसास आपल्या घरांत केव्हाही येऊं दिलें पाहिजे व तेथें असलेल्या कोणाही मनुष्याबद्दल पोलीसास माहिती दिली पाहिजे. त्यांनी आपला पत्ता बदलल्यास पोलीसास कळवलें पाहिजे. हे नियम मोडल्यास ६ आठवडे तुरुंग, व नंतर पोलीसास वाटल्यास आणखी २ वर्षे पर्यंत एखाद्या तुरुंगवजा कारखान्यांत काम करावयास लावतां येतें.

## इंग्लंड

इंग्लंडमध्यें वेश्यांसंबंधीं कोणत्याही प्रकारचे कायदे नाहींत, म्हणजे कायद्याच्या दृष्टीनें तरी इंग्लंडमध्ये वेश्या नाहींत असें इंग्रज लोक प्रतिपादतात, तें कितपत खरें आहे, हें पाहूं.

१८८६ पासून इंग्लंडमधील 'सांसर्गिक रोगांचा कायदा' बंद केला. त्यानंतरचा प्रचलित कायदा असा आहे:—'कोणीही वेश्या रस्त्यांत जाणाऱ्या लोकांस गिऱ्हाईक मिळवण्याकरतां थांबवून व विनवणी करून अडथळा करील, त्रास देईल किंवा संकटांत आणील,' तर तिला वॉरंटाशिवाय पकडतां येतें, व ४० शिलिंग [ अजमासें रु. २६–१२ ] दंड किंवा १५ दिवस तुरुंगाची शिक्षा होते.

या कायद्याप्रमाणें वेश्येनें गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न करणें हा गुन्हा नाहीं, त्रास देणें हा गुन्हा आहे. वरील कायद्याअन्वयें शिक्षा करणें झाल्यास ती स्त्री वेश्या आहे असा पुरावा व्हावा लागतो, व वेश्यांची नोंद वगैरे नसल्यामुळें तसा पुरावा होणें कठिण असतें. शिवाय, ती गिऱ्हाईक मिळवण्याकरतां सार्वजनिक ठिकाणीं हिंडत होती, व लोकांस तिच्या वागणुकीपासून त्रास झाला इतका पुरावा करावा लागतो. अशा तऱ्हेची साक्ष देण्यास बहुधा पुरुष नाखूष असतात. व पुराव्याशिवाय एखाद्या स्त्रीला पकडल्यास पोलीसावर वर्तमानपत्रांतून अतिशय कडक टीका होते, यामुळें पोलीस कचरून वागतात. इतर देशात या कामावर वेगळे लोक नेमलेले असतात, परंतु इंग्लंडांत हें काम नेहमींच्या पोलीसच्या शिपायासच करावें लागतें. [ येथेंही हीच पद्धत आहे ]. यामुळें लंडनमधील मोठ्या रस्त्यांत व रेलवेच्या स्टेशनांवर वेश्यांचा सुळसुळाट

असतो जेथें कायद्याच्या दृष्टीनें मुळींच वेश्या नाहींत, तेथें वस्तुस्थिति अशी आहे.

बरें, निदान वेश्यागृहें तरी नसतील असें म्हणावें तर वेश्यावृत्तीचे कट्टे शत्रु फ्लेक्सनर साहेब काय म्हणतात तें पहा. 'कुंटणखान्यांस बंदी आहे खरी, परंतु कुंटणखान्याची इंग्लंडांतील व्याख्याच कांहीं और आहे. स्त्रिया व पुरुष जेथें समागमाकरतां जातात, तो कुंटणखाना; मग तें सबंध घर असो किंवा एखादी खोलीच असो. परंतु जेथें एखादी स्त्री एकटीच रहात असेल, किंवा पुष्कळ स्त्रिया एखाद्या घरांत वेगळे गाळे घेऊन रहात असतील; परंतु मालक तेथें रहात नसेल व त्याचा त्यांच्यावर बिलकुल ताबा नसेल, तेथें पुष्कळ पुरुष समागमाकरतां गेले तरी तीं घरें कायद्याखालीं येत नाहींत.

ह्मणजे कोणतीही स्त्री स्वतंत्रपणें वेश्याकर्म करूं शकते, व एकाच घरांत अनेक वेश्याही स्वतंत्रपणें धंदा करूं शकतात. फक्त वेश्या दुसऱ्याच्या ताब्यांत असतां कामा नये, इतकीच कायद्याची बंदी आहे. ह्मणजे वेश्यांच्या प्राप्तीवर इतरांनीं उपजीविका करतां कामा नये, व हें रास्त आहे असेंच ह्मणावें लागतें. मात्र यामुळें वेश्यावृत्ति नाहींशी झाली असें ह्मणणें हें ढोंग आहे. शिवाय यांत रोगांचा बिलकुल विचार केलेला नाहीं.

अर्थात् हा कायदा अंमलांत आला आहे असें मात्र नाहीं. खाजगी रीतीनें चाललेले पुष्कळ कुंटणखाने आहेत व शिवाय निरनिराळ्या मिषांनीं त्याच धंद्याकरतां काढलेलीं स्नानगृहें, चंपीगृहें वगैरेही आहेत, व तेथें कांहीं दंगा, मारामारी झाल्याशिवाय पोलीस मध्यें पडत नाहीं.

यामुळें गुप्त रोगांच्या प्रसारास तेथें कोणत्याही प्रकारचा आळा नाहीं, व हें तेथील आंकड्यांवरूनही स्पष्ट दिसतें.

## स्कॅन्डिनेव्हिआ ( नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क )

इंग्लडांतील कायद्यांपेक्षां या देशांतील कायद्यांत एक असा विशेष आहे कीं त्यांत रोगांचा विचार केलेला आहे. डॉक्टराकडे रोगी गेल्याबरोबर डॉक्टरानें सरकारी ऑफिसांत कळवलें पाहिजे, व हा कायदा वेश्यांपुरताच नसून

सर्वांस लागू आहे. दुसऱ्यास संसर्ग होऊं दिल्यास शिक्षा होते, त्याचप्रमाणें इस्पितळांत जाण्यास डॉक्टरानें सांगितलें असतां न गेल्यासही होते.

वेश्यावृत्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्व लोकांस शिक्षा होते, व उघडपणें गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न करण्याबद्दल वेश्यांसही होते, व डेनमार्कमध्यें याबद्दल पोलीसची साक्ष बस होते. परंतु त्यांस पाहिजे त्या रस्त्यांत एकटें किंवा पुष्कळ जणी मिळून हिंडण्यास मोकळीक आहे. मात्र त्यांनीं लोकांचें लक्ष वेधण्याचा उघड प्रयत्न करतां कामा नये. डेनमार्कमधेही जर्मनीप्रमाणेंच वेश्यांस रिकामटेकड्या भटक्या लोकांचे सदरांत घालतात, व अशा लोकांप्रमाणेंच त्यांसही भटकण्याबद्दल १२ पासून ९० दिवसपर्यंत तुरुंग वजा कारखान्यांत ठेवतां येतें. या कायद्याच्या अंमलबजावणीची पद्धत अशीः— एखादी स्त्री निरनिराळ्या वेळीं रस्त्यांत हिंडतांना दिसल्यास, तिला कांहीं धंदा नाहीं असें समजून तिला पोलीसकडून इशारा मिळतो. त्याचा परिणाम न झाल्यास तिचें नांव व पत्ता उतरून घेऊन, 'कांहींतरी नोकरी पहा व पोलीसला कळवा' अशी एक छापील चिट्ठी तिला पाठवतात. तसें न केल्यास मात्र वरीलप्रमाणें शिक्षा होते.

वेश्यागृहें कायद्यानें बंद केल्यास परिणाम इंग्लंडप्रमाणेंच झाला आहे. म्हणजे अनेक मिषांनीं गिऱ्हाईक मिळवणारीं चोरटीं गृहें अतोनात वाढली आहेत.

स्वीडनमध्यें १८१८ पासून वेश्यावृत्ति कायद्यानें बंद केली. तेथें वेश्यांस कोंडून ठेवतात, कुंटणांस कडक शिक्षा करतात, व गुरु रोग्यांस उपचार व इस्पितळाची व्यवस्था फुकट करतात. रोगी योग्य उपचार करतो कीं नाहीं हें पहाण्याकरतां त्यांवर नजर ठेवतात, व ज्यांपासून संसर्ग होण्याचा संभव आहे असें वाटेल, त्यांस सक्तीनें तपासतात. गुप्त रोग असलेल्या मनुष्याचें लग्न होऊं शकत नाहीं, व नवराबायकोपैकीं एकास गुप्त रोग आहे, हें कारण काडी मोडण्यास पुरेसें होतें. रोग्यांच्या दृष्टीनें हे कायदे उत्तम आहेत व फ्रान्समध्यें असे कायदे करण्याचा प्रयत्न चालू आहे.

(अपूर्ण)

---

# कांहीं पत्रें

——:०:——

१

श्री. पुणें ता. २।१२।१९२७

सा. न. वि. वि. आपला माझा प्रत्यक्ष परिचय नाहीं त्यामुळें आपणांस माझें नांव, पत्ता कळविला नाहीं. तथापि, खालील गोष्टीसंबंधीं आपणास ठाऊक असलेली माहिती प्रसिद्ध कराल अशी आशा करतों.

आपण गुप्त रोगांसंबंधीं, आणि आजपर्यंत सर्वांनींच टाळलेल्या विषयांसंबंधीं जो ऊहापोह चालविला आहे तो समाजास अत्यंत उपयुक्त असुन, बऱ्याच अंशीं स्वास्थ्य देणारा आहे, यांत शंका नाहीं. तथापि गुप्त रोग, अगर वैवाहिक अवस्थेंतील पुढच्या जबाबदाऱ्या ज्यांच्या अंगावर अद्याप पडलेल्या नाहींत, अशा तरुणांचें मनःस्वास्थ्य पुष्कळदां त्यांस होणाऱ्या एका प्रकारानें नाहींसें होत असतें. तो प्रकार म्हणजे स्वप्नावस्था. यासंबंधानें अनेकांच्या अनेक कल्पना असुन त्यामुळें पुष्कळांचें मनःस्वास्थ्य बिघडलेलें मी पाहिलेलें आहे. नपुंसकत्व अगर क्षय यामध्यें याचें पर्यवसान होणार, अशीही कित्येकांनीं धास्ती घेतलेली असते. अशीच मंडळी जाहिरातींवर विश्वास ठेऊन फसतात. आणि औषध खपावें या हेतूनें जास्त भडक केलेलें त्यांतील वर्णन वाचून घाबरतातही, तरी यासंबंधीं आपण चर्चा केल्या पुष्कळांस उपयुक्त होईल.

मी यासंबंधीं वाङ्मय अगर शास्त्रीय माहिती वाचलेली नाहीं. तथापि कोणत्याही तरुणांस १०।१५ दिवसांनीं—अर्थात् स्त्रीसंग घडत नसेल तर—स्वप्नावस्था होणें अपरिहार्य आहे, असें मला वाटतें. तरी ती याहून लवकर होत असेल तर त्यापासून अपाय होतो किंवा काय, होत असल्यास तो कोणता, आणि त्यावर प्रतिबंध काय ? तसेंच पुष्कळ मंडळीस असें वाटतें कीं अशा तऱ्हेनें वीर्यनाश होण्यापेक्षां ताबडतोब स्त्रीसंग केलेला काय वाईट ? या समजुतींत तथ्य कितपत आहे ?

जर २४।२५ वर्षांपर्यंत पुरुषानें अविवाहित राहावें, हे आरोग्यशास्त्रदृष्ट्या योग्य आहे, तर त्याचें वीर्यरक्षणही नीट झालें पाहिजे, हें उघड आहे. १४।१५ च्या वर्षीं कित्येक गुप्त इच्छा मनांत उद्भवून २०।२१ च्या सुमारास त्या अनिवारही होण्याचा संभव आहे. याच सुमारास मुष्टिमैथुनादि कित्येक संवयी जडतात आणि अगोदरच अपराधी झालेलें मन स्वप्नावस्थेमुळें जास्त भडकतें. तरी वरील प्रश्नाप्रमाणेंच वीर्य म्हणजे काय ? त्याचें रक्षण आणि संवर्धन कसें करावें इ. त्याच्याशीं निगडित असलेल्या प्रश्नांबद्दल आपण चर्चा करावी, अशी विनंति आहे. कळावें लोभ असावा ही विनंति.

आपला,

**अपरिचित जिज्ञासु.**

१. **स्वप्नावस्था.** याबद्दल डॉ. निष्ट्रॉम् म्हणतात "पंधरापासुन सतरा वर्षे वयाचे सुमारास पुरुष वयांत येतो व या वेळीं अंडयुग्मामध्यें शुक्रजंतु उत्पन्न होऊं लागतात, व हे इतर कांहीं मांसग्रंथींत उत्पन्न होणाऱ्या रसाशीं मिश्र होऊन जननेंद्रियांतून बाहेर पडतात, व या स्रावास वीर्य म्हणतात. हें साधारणतः महिन्यांतून दोनदां झोंपेंत स्त्रीसंबंधीं स्वप्न पडून घडतें. परंतु स्वप्नामुळें स्राव होतो, ही कल्पना चुकीची आहे. उलट रेताशयांत शुक्राचा संचय झाल्यामुळें दाब उत्पन्न होऊन इंद्रियास चेतना झाल्यामुळें त्याशीं जुळेल अशा प्रकारचे स्वप्न पडतें, ही वस्तुस्थिति आहे. [ स्त्रियांसही अशा तऱ्हेचा स्राव कधी कधीं होतो, व याचा उल्लेख 'मालतीमाधव' नाटकांत आहे, अर्थात् त्यांत शुक्रजंतूंच्या जातीचें कांहींही नसतें, व हें सर्वच स्त्रियांस होतें असें नाहीं—स ]. याचा अतिरेक न झाल्यास स्त्रीसंगाचे अभावीं अशा रीतीनें रेताचा दाब कमी झाल्यामुळें एक प्रकारचा आरामच वाटतो, व इतर कामें करणें जास्त सुलभ होतें."

"या संबंधांत स्वाभाविक काय, व अतिरेक केव्हां म्हणावें हें ज्याचें त्याचे प्रकृतीवर राहील; तरीही स्वप्नावस्था ८ दिवसांत एकदां होऊन, विशेषतः

त्यामुळें थकवा येऊन मानसिक श्रमांत अडचण होईल, तर तो रोगच समजला पाहिजे व त्या पुरुषास ब्रह्मचर्य मानवत नाहीं, किंवा फाजील कामोद्दीपन होतें असें समजलें पाहिजे. स्वप्नावस्था कधीं कधीं यापेक्षांही लवकर म्हणजे १।२ दिवसांनीं, किंवा एका रात्रींत अनेक वेळां होणें शक्य आहे. अशा मनुष्यास अतिशय थकवा येऊन शेवटीं जीव नकोसा होतो. याचीं कारणें अनेक असूं शकतील. संध्याकाळीं फार जेवणें, दारू पिणें, फार गरम बिछाना, उताणें निजणें, सदैव स्त्रियांविषयीं विचार करणें, आधींच असलेली मुष्टिमैथुनाची संवय, जननेंद्रियाचे पुढचे कातडीचा कांहीं विकार, मूळव्याध, जंत वगैरेंनीं स्वप्नावस्थेस मदत होते. यांपैकीं एकही कारण दिसल्यास हा रोग ब्रह्मचर्याचाच परिणाम समजला पाहिजे, व हें कारण चालू आहे तोंपर्यंत रोग बरा होणें शक्य नाहीं. कांहीं दिवसांनीं झोंपेऐवजीं जागेपणींही क्षुल्लक कारणावरून स्राव होतो. कधीं कधीं अशा रीतीनें उद्दीपनाचा अतिरेक झाल्यावर तें कमी कमी होत जाऊन शेवटीं नपुंसकत्व येतें." २. कामवासना उत्पन्न झाल्याबरोबर स्त्रीसंग करण्यांत कोणतेंही नुकसान नाहीं असें पुष्कळ तज्ज्ञांचें मत आहे. अर्थात् अशा वयांत संतति होणें इष्ट नाहीं. २४।२५ वर्षांपर्यंत अविवाहित राहणें इष्ट आहे, हें सांपत्तिक दृष्ट्या खरें असेल, आरोग्य दृष्ट्या नाहीं. स्वसंभोग (मुष्टिमैथुन वगैरे) निःसंशय हानिकारक आहे व नैसर्गिक मैथुन त्यापेक्षां केव्हाही बरें, व यांत अतिरेकांचा संभवही फारच कमी.

३. वीर्य कशास म्हणतात हें वर सांगितलें. त्याचें रक्षण करणें, याचा अर्थ तें बनल्यानंतर शक्य तितका वेळ शरीराचे बाहेर पडूं न देणें. यानें कोणताही इष्ट हेतु साधत नाहीं, कारण त्याचा संचय जास्त होऊन तें बाहेर न पडल्यास डोकें दुखणें किंवा अशाच प्रकारचे इतर वाईट परिणाम होतात. मग त्याचें रक्षण कशाकरतां करावयाचें ? वीर्य बनतेवेळीं शुक्र जंतूशीं जे इतर स्राव मिश्रित होतात असें वर सांगितलें, त्या इतर रसांचा उपयोग शुक्र जंतूंचा मार्ग जननेंद्रियांतून समागमाचे वेळीं योनिमार्गांत, गर्भाशयांत व रजोगोलाची गांठ पडेपर्यंत गोलवाहक नलिकेंत सुलभ व्हावा, असा असतो. या रसांमुळें वीर्य

बुळबुळीत होतें व अडचणीच्या मार्गांतूनही निसटून जातें. वीर्य बाहेर न पड-ल्यास रक्तांत मिसळून प्रकृतीस त्याचा उपयोग होतो ही कल्पनाच खोटी आहे, व या पायावर रचलेली ब्रह्मचर्याची इमारतही त्यामुळेंच अत्यंत डळमळीत आहे.

× × ×

२

×××, ३०–११-२७

कृ. सा. न. वि. वि.—

प्रोफेसर साहेब, तुमचा व माझा प्रत्यक्ष परिचय बिलकूल नाहीं इतकेंच नव्हे, तर दोघेही एकमेकांपासून फारच दूर आहोंत आणि एकमेकांस कधीं भेटूं किंवा नाहीं याचीही शंकाच आहे. तरी पण मला आपला परिचय अन्य रीतीनें करून घेतां आला व झाला. हा म्हणजे आपण लिहिलेल्या 'संततिनियमन' ह्या पुस्तकामुळें होय. आपण दिलेल्या या उपयुक्त ज्ञानामुळें हिंदवासी यांचें कल्याण होणार; याबद्दल मी आपला फार आभारी आहें. हें पुस्तक आपण लिहिलेलें आहे असें आजपर्यंत मी ऐकत होतों परंतु परवां मला माझ्या एका मित्राच्या घरीं तें सहज वाचावयास मिळालें, व तें वाचल्या-नंतर आपणास आणखी कांहीं माहिती विचारून माझ्या एका होतकरू पण वाईट संगतीमुळें घाणेरड्या संवयी लागलेल्या मित्रास ह्या पंकांतून काढून नीट मार्गास लावतां आलें तर पहावें ह्याच केवळ उद्देशानें मी आज आपणास पत्र लिहून तसदी देत आहे ह्याबद्दल माफी असावी. वास्त-विक पाहतां माझ्या मित्रानेंच आपणास स्पष्ट व निर्भीडपणें पत्र लिहून स्वतःची सुधारणा करून घ्यावयास पाहिजे होती, परंतु तितका त्याचे अंगीं मनाचा कमकुवतपणा असल्याकारणानें त्याला माहीत नसतां मीं आपणांस विचारीत आहें.......माझा मित्र एका कॉलेजचा पदवीधर असून सध्या नोकरी करीत आहे. त्याचें लग्न झालेलें नाहीं व तें त्यानें स्वतःची प्रकृति चांगली व शरीर बळकट झाल्याखेरीज करूं नये असें मला वाटतें. त्यास–मला लिहिण्यास

अत्यंत वाईट वाटतें एक घाणेरडी संवय–मुष्टिमैथुनाची आहे. ही त्यास कशी जडली हें मला माहीत नाहीं व तें सांगण्याची त्यास शरम वाटते. कांहीं स्नेह्यांच्या संगतीनें अगर घाणेरडीं पुस्तकें वाचून जडली असावी असें मला वाटतें. तर ही त्याची संवय घालविण्यास व त्याची गेलेली शक्ति परत आणण्यास काय उपाय योजावेत व कोणत्या उपायांचा अवलंब करावा लागेल हें आपणास माहीत असल्यास मला लिहून कळवावें म्हणजे मी ते उपाय योजून पाहीन. यशस्वी झाले तर आपल्या एका बांधवास जीवदान दिल्यासारखें होईल.

आत्मसंयमन हा मुख्य उपाय आहे हें तर उघडच आहे. पण तो किती कठिण आहे हें आपण जाणतच आहां. त्याचें लग्न करून द्यावें हा दुसरा उपाय आहे. परंतु ज्याचें शुक्र अगोदरच कमी झालेलें आहे व त्यामुळें शरीर क्षीण झालेलें आहे अशा मनुष्यानें लग्न करून अगोदर क्षीण झालेली धातु आणखी घालवून स्वतःचे व त्याबरोबर दुसऱ्या माणसांचें जन्माचें नुकसान करावें हें बरोबर नाहीं. त्यापेक्षां तो एकटाच जगांतून नाहींसा झालेला बरा.

सबब माझी आपणास नम्र विनंति आहे कीं, जर त्याची वाईट संवय घालविण्यास व त्याची क्षीण झालेली धातु पुन्हां प्रबळ करण्याचे उपाय माहीत असले तर ते जरूर कळवावेत. त्यास योग्य व उपयुक्त नागरिक बनविण्याची माझी फार इच्छा आहे. तो फार कामासक्त आहे तर त्याची कामवासना कमी करण्यास काय करावें, कोणतीं औषधें द्यावीत, अगर नैसर्गिक उपाय काय योजावेत ? त्यास चेतना उत्पन्न होऊं नये म्हणून काय करावें ? वगैरे माहिती अवश्य द्यावी. सोबत उत्तराकरतां एक आण्याचें तिकिट पाठवीत आहे. कळावें.

× × ×

ता. क. आणखी एक गोष्ट आपणांस विचारावयाची राहिली व ती ही कीं संततिनियमनाकरितां जे आपण उपाय सुचविले आहेत ते केवळ संततिनियमनाकरितांच. त्यांच्या अवलंबनानें संभोगामुळें होणारा धातूचा क्षय व शरीर–

हानि हीं थांबत नाहींत. तरी संभोगेच्छा तृप्त होऊन धातुक्षय व शरीरहानि होणार नाहीं अशा तऱ्हेचे उपाय आपणास माहीत असल्यास कळवावे. संततिनियमनाइतकीच धातुक्षय न होऊन शरीर व प्रकृति चांगली राहण्याची आम्हा सर्वांस फार जरूरी आहे.

पत्राचें उत्तर जरूर पाठवावें.

**स्वसंभोग** [ दुसऱ्याचे मदतीशिवाय रेतस्खलन करण्याचे सर्व प्रकार यांत येत असल्यामुळें हा शब्द ' मैथुन ' पेक्षां जास्त व्यापक आहे ] ही संवय घातक आहे ही गोष्ट खरी, परंतु या संवयीच्या वाईट परिणामांबद्दल पुष्कळ लोकांनीं फाजील बाऊ केलेला आहे, हेंही तितकेंच खरें आहे. आधुनिक तज्ज्ञांचे मतें अतिरेक न झाल्यास फारसे वाईट परिणाम होतही नाहींत. परंतु अतिरेक होणें अतिशय सुलभ असतें, हाच संवयीमधें मुख्य धोका आहे.

ही संवय मोडण्याइतकें आत्मसंयमन नसल्यास वेळींच एखाद्या तज्ज्ञ डॉक्टराचा सल्ला घेणें बरें. यावर नेहमीं देण्यांत येणारीं ' ब्रोमाइड स् ' नामक औषधें आहेत, व त्यांनीं एकंदर प्रकृतीवर चांगला परिणाम होत नाहीं, परंतु केवळ उद्दीपन कमी करण्याकरतां तीं द्यावीं लागतात. त्यांतल्या त्यांत ' सोडिअम् ब्रोमाईड् ' हें ' लॅक्टोपेप्टीन् ' सारख्या पाचक औषधाबरोबर दिल्यास नुकसान होण्याचा संभव कमी. ' अॅड्रेनल, ' ' थायरॅाइड् ' ' अॅट्रोपीन ' वगैरेंचा बराच उपयोग होतो, परंतु डॉक्टरचे सल्ल्याशिवाय औषधें घेण्याचे भानगडीत न पडणें बरें.

२. थंड पाण्याचें स्नान सोसेल तर करणें बरें. ' सोसेल तर ' याचा अर्थ स्नान करून अंग पुसल्यानंतर आपोआप अंगांत उष्णता आली पाहिजे, थंडी वाजतां कामा नये. गरम पाण्यामुळें उद्दीपन होतें हें लक्षांत ठेवावें, व स्नानाचें निदान फार गरम पाणी असूं नये.

३. अशा मनुष्यानें लग्न करावें कीं नाहीं हें ठरवणें कठिण आहे. पुष्कळ वेळां अशा पुरुषाची किंवा स्त्रीची नैसर्गिक समागमाची इच्छाच नाहींशी होते

इतकेंच नाही, तर त्याचा तिटकारा येतो. अशी स्थिति असेल तर लग्न करणें मूर्खपणा आहे. अशा लोकांनीं लग्न केल्यानंतरही त्यांची संवय मोडत नाहीं. ज्याला कांहीं दिवस तरी आत्मसंयमन करून [ औषधाच्या साहाय्यानें कां होईना ] आपली संवय दाबून ठेवतां येते, व ज्याची नैसर्गिक समागमाची इच्छा अजीबात गेली नाहीं, त्याची संवय लग्न केल्यानें मोडणें शक्य आहे. परंतु त्याची नैसर्गिक समागमाची शक्ति मात्र शिल्लक असली पाहिजे. नैसर्गिक समागम शक्य आहे कीं नाहीं हें समजण्यास एकच मार्ग आहे, तो म्हणजे ती शक्ति अजमावून पाहणें. डॉ. रॉबिनसन हे अशा रोग्यास या उद्देशानें वेश्येकडे जाण्यास सांगतात व वेश्यांचा हा एक नैतिक दृष्टीनेंही मोठाच उपयोग आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. अशा रीतीनें समागमशक्तीची खात्री पटल्याशिवाय लग्न केल्यास बायकोचें जन्माचें नुकसान होण्याचा संभव असतो, व ती बेइमान झाल्यास तिला नांवें ठेवण्यास बिलकूल जागा नाहीं. परंतु अशा वेळीं नैसर्गिक उपभोगानें आपलें समाधान होतें व संवयीची आठवण होत नाहीं अशी खात्री झाल्यास मात्र लग्न करण्यास हरकत नाहीं. केवळ मुष्टिमैथुनाची संवय आहे म्हणून लग्न करतां कामा नये असें नाहीं. प्रसिद्ध तज्ज्ञ हॅव्‌लॉक् एलिस यांनीं यासंबंधीं असें लिहिलें आहे कीं शेकडा ९० लोक केव्हांतरी स्वसंभोग केल्याचें कबूल करतात व बाकीचे १० खोटें बोलतात, तेव्हां याबद्दल विशेष घाबरण्याचें कारण नाहीं.

४. वीर्य म्हणजे कांहीं जतन करून ठेवण्यासारखी चीज आहे व ती निघून गेल्यानें भयंकर नुकसान होतें, ही कल्पना खोटी आहे हें वर सांगितलेंच आहे. वीर्याचा मुख्य भाग म्हणने शुक्रजंतु हे अंडयुग्मांत तयार झाल्यावर रेतवाहक नलिकेंतून रेताशयांत जाऊन बसतात. उद्दीपनामुळें त्यांस प्रेरणा होईल तेव्हां ते मूत्रमार्गांत उतरतात व दुसऱ्या अनेक रसांशीं मिश्र होऊन तें मिश्रण बाहेर पडतें, त्यास वीर्य म्हणतात. हे शरीरांत आगाऊ तयार नसतें, तें आयत्या वेळीं तयार होतें. तयार झाल्यावर तें बाहेर पडलेंच पाहिजे, न पडल्यास त्रास होतो, व तें शरीरांत राहिल्यापासून कोणताही फायदा नाहीं.

नियमित नैसर्गिक समागमापासून कोणत्याही प्रकारचें नुकसान नाहीं, फायदाच आहे.

×××, ता. १३।१२।२७

कृ. सा. न. वि. वि. आपण पाठविलेलीं पुस्तकें ( संततिनियमन, गुप्त रोगांपासून बचाव, बाहेरख्याली०) २ रुपये व्ही. पी. नें पोंचली. संततिनियमन पुस्तकाचे पृष्ठ ६२।६३ वरून आपलेकडे क्षमेची याचना करीत आहें तिचा अव्हेर न व्हावा. एका १८।१९ वर्षे वयाच्या कुमारीशीं तिचे प्रबल इच्छेमुळें संभोग घडून तिचे रजोदर्शनाच्या दोन तीन पाळया चुकल्या आहेत तरी तात्काळ गर्भमुक्त करणारें खात्रीलायक औषध घेणेंचें माहितीसह व कोणत्याही प्रकारचा त्रास न होणारें असें किंमत आकारून जरून व्ही. पी. नें पाठवावें. आमची परिस्थिति गरिबीची असल्यानें किंमत माफक आकारावी अशी विनंति आहे. मजप्रमाणेंच दुसरे इसमासही औषधाचा उपयोग होईल तर फार बरें. औषध इंग्रेजी ॲलोपाथी असलेसं उत्तम. आपले इच्छेप्रमाणें तात्काळ गुण देणारें औषध पाठवावें कळावें, लोभ पूर्ण असावा हे विनंति. आ.

×××

डिसेंबरचे अंकांत अशा एका पत्रास उत्तर दिलेंच आहे. लिहिणारे गृहस्थ वर्गणीदार आहेत, त्यांस संततिनियमनाचे मार्ग माहीत असावे. असें समजण्यास हरकत नाहीं. मग असें कां झालें ? हलगर्जीपणामुळें, असें म्हणावें लागत.

( सारांश )

सा. न. वि. वि. रजोदर्शन होऊन दोन महिने होत आले. पुन: नियमित रजोदर्शन होईल असा उपाय कळवावा.

५

× × ×

मासिकाचा ६ वा अंक पाहिला. सदरहू अंकांत ' एक पत्र ' वाचून

खरोखरच मनास चटका लागला......सदरहू बाई अगदीं निराश्रितच असेल व कोठेंही कामकाज करून राहण्याची इच्छा असेल तर पोषणाची सर्व व्यवस्था करण्यास तयार आहें. मात्र गरीबीनें, विश्वासानें, सचोटीनें वागलें वागलें पाहिजे. गैरशिस्त वर्तन बिलकूल दिसतां कामा नये............

× × ×

६

आपण प्रसिद्ध करीत असलेल्या ' समाजस्वास्थ्य ' च्या डिसेंबरच्या अंकांत ' एक पत्र ' वाचण्यांत आलें........गर्भपात करणें हा कायद्याच्या दृष्टीनें गुन्हा होतो व त्याच्या औषधी सांगणें हें फूस देणें असें होतें पण अशा स्थितींत माझ्या मतें ' पंढरपूर ' हा एक मार्ग आहे........अशा केसीस यापुढें आपणाकडे आल्यास त्यांना संततिनियमन सांगावेंच पण गर्भ राहिला तर वर लिहिलेला मार्ग त्यांना सुचवावा अशी विनंति आहे. कळावें,

× × ×

पंढरपूरच्या संस्थेची आम्हांस माहिती आहे. व सदरहू बाईस योग्य तो सल्ला वेळींच दिलेला आहे. ( सं. )

---

# आमचेबद्दल लोकमत.

' आपण काढीत असलेलें ' समाजस्वास्थ्य ' मासिक आमचे येथील बरेच नवीन पिढींतील लोक मोठ्या हौसेनें वाचीत असतात. सदरहू विषयावर आजपर्यंत मराठी भाषेंत नसलेलें असें मासिक काढण्याची जी आपण धडाडी व मनोधैर्य दाखविलें त्याबद्दल येथील सर्व वाचकमित्रांच्या तर्फे मी आपलें अभिनंदन करतों.

सातारा जिल्ह्यांतील वर्गणीदार.

१३-१-२८

# नवीन लेखांतील निवडक विचार

प्राचीन ग्रीक व रोमन लोकांचे वेळीं रस्त्यांत व रंगभूमीवर नग्नतेस कोण-त्याही प्रकारचा बाध नसे व नंतर जरी ख्रिस्ती लोकांनीं शरीराला अपवित्र ठर-विलें, तरी पडलेल्या रीतीमुळें १५०० वर्षे पर्यंत ख्रिस्ती धार्मिक नाटकांतही नग्न पात्रें दिसत असत. ख्रिस्ताला सुळावर देण्याकरतां नेतांना त्याचे अंगाव-रचीं सर्व वस्त्रें काढून घेतलीं असें रंगभूमीवर प्रत्यक्ष दाखवित असत. हा प्रकार इ. स. १५४८ मधें फ्रान्समधें कायद्यानें बंद केला. ( मेर्क्यूर् द. फ्रांस् )

× × ×

लोकांनीं आपलें कौतुक करावें अशी लहानापासून थोरांपर्यंत सर्वांची इच्छा असते, परंतु ती वयपरत्वें निरनिराळ्या स्वरूपांत दिसते. लहान मुलांस यामुळेंच इकडे तिकडे नागवें हिंडावें असें वाटतें. या साहजिक इच्छेस दडपण्याचा प्रयत्न आसपासच्या माणसांनीं केल्यास त्याचा पुढें अत्यंत अनिष्ट परिणाम होतो. मुलींचे बाबतींत हा परिणाम भडक पोषाख करून लोकांचें लक्ष वेधण्यापलीकडे फारसा जात नाहीं. परंतु पुरुषांपैकीं मात्र कित्येकांस आपलें नग्न शरीर दुसऱ्यास दाखवल्याशिवाय राहवत नाहीं. असे लोक मुलींच्या शाळा सुटण्याचे सुमारास त्यांच्या दृष्टीस आपलें जननेंद्रिय पडेल अशा रीतीनें आसपास उभे राहिल्याचीं उदाहरणें आहेत. हे लोक बहुधा निरुपद्रवी असतात, परंतु अशा वागणुकीबद्दल पोलिसानें पकडून त्यांची कितीही फजीति झाली तरीही पुनः तसेंच केल्याशिवाय त्यांस कधीं कधीं राहवत नाहीं. तरीही इतर कोण-त्याही बाबतींत त्यांची वाईट वागणूक दिसत नाहीं. याकरतां मुलांस जबरीनें कपडे घालण्यास न लावलेलें बरें. त्यांत कोणाचेंही नुकसान नाहीं.

+ + +

# नवीन लेखांतील निवडक विचार

अमेरिकेचे माजी प्रेसिडेंट् हार्डिंग हे विवाहित गृहस्थ होते तरी नॅन ब्रिटन् नांवाच्या एका बाईवर त्यांचें प्रेम होतें. ही एक पोरकी अविवाहित मुलगी असून त्यांच्या वयांत बरेंच अंतर होतें. तिला हार्डिंगपासून एक मुलगी झाली व ते मरेपर्यंत तिचा खर्च चालवीत असत. त्यांची मुलाखत 'व्हाइट हाऊस' (अमेरिकन प्रसिडेंटचें घर) मधेंच त्यांच्या बायकोला नकळत होत असे. अर्थात् ते वारल्यावर तिला व तिच्या मुलीला आधार नाहींसा झाला व हार्डिंग याचे कुटुंबांतील मंडळी तिची मुळींच दाद घेईना. या सर्व हकीकतीचें एक पुस्तक तिनें आतां प्रसिद्ध केलें आहे. तें दाबून टाकण्याचा बराच प्रयत्न झाला, परंतु त्या लहान मुलीच्या नांवानें एक संस्था स्थापन होऊन तिनें शेवटीं तें प्रसिद्ध केलेंच. औरस व अनौरस मुलांस कायद्यानें सारखेच हक्क देवविण्याचा या संस्थेचा उद्देश आहे.

\+ \+ \+

'न्यू हेल्थ सोसायटी' (नवीन आरोग्यसमाज) चे अध्यक्ष सर डब्ल्यू आर्बथनॉट् लेन् यांनीं 'ॲन् सर्स' नांवाच्या साप्ताहिकांत आहारासंबंधीं एक लेख लिहिला आहे. प्रत्येक जेवणांत कांहीं तरी न शिजवलेले पदार्थ असावे, फळें व पालेभाज्या पुष्कळ खाव्या व मलरोध होऊं देऊं नये हीं सर्वमान्य तत्त्वें सांगून पुढें ते म्हणतात:—, ओ येई पर्यंत खाऊं नये, परंतु नैसर्गिक म्हणजे न शिजवलेलें अन्न भरपूर खाल्यानें आतड्याची क्रिया बरोबर होते व न झाल्यास पद्धतशीर व्यायामानें त्यास मदत होते. अन्नाच्या पचनाला तोंडांतच सुरवात होते, परंतु अज्ञानामुळें पुष्कळ लोक अन्न पुरेसें चावल्याशिवाय गिळतात. (भात चावल्याशिवाय गिळतां येतो हा भाताचा मोठा दोष आहे.—सं.) सारक औषधें होतां होईल तों घेऊं नये. योग्य तऱ्हेचें अन्न व व्यायाम घेतल्यास अशा औषधांची जरूर पडत नाहीं. जेवतांना चित्त प्रफुल्लित असावें, याकरतां एकट्यानें जेवणें शक्य तितकें टाळावें. सायंकाळच जेवणाचे वेळीं थोडी दारू घेतल्यानें व नंतर थोडा तंबाखू ओढ-

त्यानें जेवणाचें व निद्रेचें सुख द्विगुणित होतें असें माझें मत आहे.' हे लेखक डॉक्टर आहेत, परंतु माफक दारूचा व तंबाखूचाही प्रकृतीवर वाईट परिणाम होतो कीं काय याबद्दल तीव्र मतभेद आहे.

\+ + +

भ्रूणहत्येसंबंधीं बहुतेक सर्व सुधारलेल्या देशांत जवळ ळवळ सारखेच कायदे आहेत, व स्त्रीच्या जीवाला धोका आहे असें वाटल्यास डॉक्टरास कृत्रिम रीतीनें गर्भपात करण्यास कायद्याची परवानगी असते. यास आपवाद म्हटले म्हणजे रशियात सांपत्तिक स्थितीमुळेंही सरकारी डॉक्टरांकडून कायदेशीर रीतीनें गर्भपात करवतां येतो, व स्वित्झर्लंड मधें पहिल्या तीन महिन्यांत गर्भपात हा गुन्हा होत नाहीं.

इतर देशांत मात्र स्त्रीच्या जीवास धोका आहे कीं काय हें डॉक्टरांस ठरवावें लागतें, व हें ठरवणें केवळ त्यांच्या सचोटीवर असतें. अर्थात् यांत मत-भेद होतो व गेल्या सप्टेंबर–आक्टोबरमधें पॅरिस येथें भरलेल्या फ्रेंच बोल-णाऱ्या डॉक्टरांच्या परिषदेत यावर बराच वाद झाला.

विशेषतः गर्भिणीस क्षय असल्यास, किंवा गर्भावस्थेमुळें अतिशय वांति होऊन ती न हटल्यास, किंवा रक्तक्षय ( अनीमिआ ) झाल्यास फारशी वाट न पाहतां गर्भपात करावा असें बहुतेक डॉक्टरांचें मत पडलें. अशा वेळीं धार्मिक कल्पनांमुळें म्हणा किंवा अज्ञानामुळें म्हणा, डॉक्टरांनीं जास्त वाट पाहिल्यामुळें किंवा गर्भपात न केल्यामुळें गर्भिणी स्त्रिया प्राणास मुकल्याचीं दोन तीन उदाहरणें आमच्या पाहण्यांत आहेत. जास्त वाट पाहिल्यानें शस्त्रक्रियेचाही उपयोग होत नाहीं. किंवा प्रथम गर्भिणीस थोडीबहुत शक्ति आणण्याकरतां दुसऱ्या कोणाचें तरी रक्त तिच्या अंगांत घालण्याचा उपद्व्याप करावा लागतो. प्रथम लक्षणें दिसूं लागतांच गर्भपात केल्यास स्त्रीचा जीव बचावण्याचा पुष्कळच संभव असतो.

× × ×

## नवीन लेखांतील निवडक विचार

परम्याचीं सर्व चिन्हें नाहींशी झाल्यावरही त्याचे जंतु कधीं कधीं रेतामधें सांपडतात तेव्हां रोग्याचें रेत घेऊन, त्यांत रोगजंतु असल्यास त्यांस वाढीस लावण्याचे वेगवेगळ्या रीतीनें प्रयत्न केल्यावरही जर रोगजंतु सांपडले नाहींत तरच तो बरा झाला असें समजावें, नाहींतर त्यापासून संसर्ग होण्याचा संभव आहे असें समजून त्यास आणखी उपचार केले पाहिजेत, असें बुखारेस्ट येथील एक फ्रेंच डॉक्टर १६०० लोकांच्या रेत परीक्षेवरून म्हणतात.

× × ×

सर डॅनिएल् हॉल् व प्रो. ईस्ट्. हे दोन्ही शेतकींतील तज्ज्ञ समजले जातात व त्यांचे मतें दर माणशीं अडीच एकर जमीन असेल तरच तिच्या उत्पन्नांत हल्लींच्या यूरोपीय पद्धतीचें पुरेसे अन्नवस्त्र सर्वांस मिळूं शकेल. इंग्लंड व वेल्समधें माणशीं एक एकर सुद्धां पडत नाहीं.

× × ×

मजुरांच्या दाट वस्तींत स्त्रीपुरुषांस एकांत मिळणें शक्य नसते. ' मँचेस्टर येथील दाट वस्तीचे भागांत १००० पैकीं ७११ बाळंतिणीस बाळंत होण्याकरतां सुद्धां एकांत मिळत नाहीं. ' ( न्यू जनरेशन ). तरीही लोकसंख्या कमीच आहे असें म्हणणारे लोक आहेत ! हिंदुस्थानांतील मजुरांची स्थिति यापेक्षांही वाईट आहे.

× × ×

अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे नवीन वसाहतीचे प्रदेशांत एशिया व युरोपमधील जुन्या देशांचे मानानें लोकसंख्या कमी आहे. या देशांची तुलना करून पाहतां असें दिसतें कीं जेथें लागवडीच्या जमीनीच्या मानानें लोकसंख्या कमी आहे त्या त्या देशांतील लोक इतरांपेक्षां जास्त सुखी आहेत. चीन व हिंदुस्थान सारखे जास्त लोकसंख्येचे देश सुखी नाहींत हें सर्वांस माहीत आहे, व त्याचें मुख्य कारण फाजील लोकसंख्या हें होय.

× × ×

ज्यास शेतकीची माहिती नसते त्यापैकीं पुष्कळांस असें वाटतें कीं त्याच जमिनीवर जास्त मेहनत व पैसा खर्च केल्यास त्यांतून पाहिजे तितकें उत्पन्न

काढतां येतें ! परंतु अमेरिका व जपान यांच्या तुलनेवरून वरील कल्पना किती खोटी आहे यांचा प्रत्यय येईल. अमेरिकेंत जमीन विपुल असल्यामुळें त्यांतून थोडया मेहनतीनें माणशीं जितकें उत्पन्न होतें, तितकें अन्न जपानांत प्रत्येक मनुष्य १२ तास खपल्यानें सुद्धां निघत नाहीं. अधिक मेहनतीनें जमिनीच्या मानानें जास्त उत्पन्न निघतें खरें, परंतु दर माणशीं जास्त उत्पन्न पडत नाहीं, यामुळें हाल होतात.

\+ + +

वेल्समधील कार्डिफ् शहरांत स्त्रियांस फसवून आणून वेश्या म्हणून दूर-देशीं पाठवण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो व वेल्सच्या दक्षिण भागांतून पांच आठवडयात १७ मुली अशा तऱ्हेनें नाहींशा झाल्याचें आपणास माहीत आहे असें विधान रेव्हरंड टॉमस यानीं केलें होतें, परंतु चवकशीअंतीं त्या सर्व ठिकठिकाणीं नोकरीवर गेलेल्या आढळल्या व त्यांपैकीं एकही वेश्या झाली नव्हती. ( ईव्हनिंग् न्यूज ऑफ इंडिया ). अशा प्रकारचीं खोटीं विधानें करून पराचा कावळा करण्याची पुष्कळ लोकांस संवय असते, व यांच्याच आधारावर 'लीग ऑफ नेशन्स्' ( राष्ट्र संघ) नें ही वेश्याव्यापाराबद्दल मोठी ओरड केली आहे.

\+ + +

'दारिद्र्यांत विपुल प्रजा दुःखालाच कारणीभूत होते, त्याचप्रमाणें नेभळट, कर्तव्यशून्य, ऱ्याड, आळशी आईबापांची प्रजाही देशाला लांछनास्पदच! रोगी प्रजेलाहि हाच नियम लागू आहे. हिंदुस्थानाला सध्यां हा आशीर्वाद नको आहे. आमच्या पुरुषांचे बळ, स्त्रियांची प्रकृति, लहान मुलांच्या मृत्यूचें प्रमाण पाहिलें म्हणजे मनाला अत्यंत खेद वाटतो. या वेळीं कोणत्याही स्त्रीला अष्टपुत्र होण्याचा वर देण्यापेक्षां 'आठ जन्म वंध्या हो' असा सद्यः कालीं खरोखरच सुखकर आशिर्वाद देण्याचा मोह मनावर होतो.

'म्हणून याविषयीं समंजस पतिपत्नीनीं समंजस विचार करून संतति-नियमन करण्याची आवश्यकता लक्षांत घेणें अगत्याचें होऊन बसलें आहे—

पौष १८४९. 'मधुकर'

× × ×

# किरकोळ

—— ० ——

डांस व इतर हानिकारक कींटकांचा नाश वाघळें करतात असा अनुभव आल्यावरून व्हिएना येथील अधिकाऱ्यांनीं वाघळांच्या वाढीस उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे.

× × ×

जवळ वाद्यें वाजविल्यास गाई व शेळया जास्त दूध देतात असा शोध दोन जर्मन डॉक्टरांनीं प्रयोग करून लावला आहे. यूरोपांत म्हशी नसल्यामुळें त्यांवर प्रयोग केलेले नाहींत, ते करून पाहण्यासारखे आहेत. प्रत्येकाच्या घरीं बजवय्ये असणें शक्य नाहीं हें खरें, तरी गुरें बाळगणारांस ग्रॅमोफोन ठेवणें शक्य आहे, इतके ते हल्लीं स्वस्त मिळतात. मुलें पाजणाऱ्या स्त्रियांस मात्र संगीतामुळें जास्त दूध येत नाहीं असें दिसतें.

× × ×

दक्षिण अमेरिकेंतील ब्रॅझिल् संस्थानांतील कांहीं रानटी लोकांमधें तान्हें मूल आजारी असल्यास बाप औषधं घेतो. हा वेडगळपणा खरा, पण हिंदू लोकांस याला हंसण्याचा हक्क पोचत नाहीं. श्राद्धाचे दिवशीं ब्राह्मणानीं खाल्लेलें अन्न जर मेलेल्या बापाला पोंचतें तर बापानें घेतलेलें औषध मुलास कां पोंचूं नये ?

× × ×

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत एका मनुष्याला ३४ मुलें झालीं म्हणून तेथील प्रेसिडेंट व कॉंग्रेसच्या सभासदांनीं त्यास भेटावयास बोलावलें. मुलांस जन्म देण्यांत बापास जास्त त्रास पडतो अशी अमेरिकन लोकांची कल्पना दिसते !

× × ×

हिंदुस्थानची नालस्ती करतांना मिस् कॅथरीन् मेयो लिहितातः–' ख्रिस्ती देशांत स्त्रीपुरुषसंबंधास पाप समजतात, पण हिंदुस्थानांत तें धार्मिक कृत्य समजतात. ' परंतु ही गोष्ट सर्व जगभर प्रचलित असल्यामुळें ख्रिस्ती देशांतील लोक पापी ठरतात व हिंदुस्थानांतील धार्मिक ठरतात, हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं ! कदाचित् त्या अविवाहित असल्यामुळें यासंबंधीं त्यांस कांहीं माहितीच नसेल; पण माहिती नसलेल्या विषयावर लिहायला कोणी सांगितलें होतें ?

× × ×

मलेरिया ज्या डांसांमुळें पसरतो त्यांस मनुष्यापेक्षां इतर प्राणी जास्त आवडतात. यामुळें ज्याचेकडे गुरें, वगैरे आहेत त्यांस डांसांपासून त्रास कमी होतो.

× × ×

इंग्लंड आणि वेल्स येथील जननांचें मान गेल्या वर्षीं फ्रान्सपेक्षांही कमी होतें हें ऐकून कित्येकांस आश्चर्य वाटेल. परंतु फ्रान्समध्यें मृत्यूंचें प्रमाण जास्त असल्यामुळें लोकसंख्येची वाढ फ्रान्स मध्येंच कमी होते.

× × ×

शाळेचे तास कमी केल्यानें अभ्यास अधिक चांगला होतो असा अमेरिकेंतील अनुभव आहे, परंतु मुंबई म्युनिसिपालिटीनें शाळेचा वेळ नुकताच वाढविला आहे असें समजतें. आईबापांस घरीं मुलांची कटकट कमी ! शिक्षण किती होतें हा प्रश्नच नाहीं.

× × ×

हत्तीरोग पुष्कळ वेळां क्षयरोगाच्याच जंतूंमुळें होतो.

× × ×

एका ६ वर्षांच्या मुलीच्या अंगावर गर्मीच्या द्वितीयवस्थेच्या खुणा सांपडल्या. संशयावरून आईची तपासणी केली तेव्हां तिच्या अंगावरही तशाच खुणा सांपडल्या. टॉवेल किंवा इतर द्वारें आईपासून मुलीला संसर्ग झाला असावा असा डॉक्टरनें अंदाज केला. गर्मीच्या रोग्यांनीं आपले कपडे वेगळे ठेवले पाहिजेत.

× × ×

वेश्यांनीं भाडें न दिल्यास घरवाल्यांस तें फिर्याद करून वसूल करतां येत नाहीं, कारण वेश्यांचा धंदा अनीतीचा आहे, व अनीतिकरतां केलेला करार कोर्ट ओळखीत नाहीं. जणूं काय वेश्यांस धंद्या पुरतीच जागेची जरूर असते, व त्यांस रहावयास जागा लागतच नाहीं! या दृष्टीनें चोरानें दिलेल्या वकिलाची फी जर त्यानें बुडवली, तर वकिलासही फिर्याद करण्याचा हक्क नसावा, कारण चोराला मदत करणें हीही अनीतिच आहे.

× × ×

मिस कॅथरीन् मेयो म्हणतात कीं हिंदुस्थानांतील दहांपैकीं ८ पुरुष २५ पासून तिशीचे आंत नपुंसक होतात. हें त्यांस कळलें कसें हा प्रश्न वेगळा, परंतु हिंदुस्थानांत वेश्या फार आहेत असेंही त्याच म्हणतात. या दोहोंचा मेळ बसत नाहीं. डॉ. रॉबिनसन् म्हणतात कीं यूरोप व अमेरिकेंत शकडा पाउणशें लोकांत पौरुष कमी असतें!

* * *

१९२० सालीं इंग्लंडांतील हल् नांवाच्या बंदरांत हिंदी व विलायती खलाशांमध्यें मोठी मारामारी झाली. तपास करतां असें कारण समजलें कीं तेथील स्त्रिया विलायती खलाशांपेक्षां हिंदी खलाशांबरोबरच जास्त दिसत. मिस् मेयो यांच्या म्हणण्याशीं हें जुळत नाहीं.

× × ×

क्षयरोग्यांस नियमित प्रमाणांत सल्फ्यूरिक आसिड् ( तेजाब ) दिल्यास त्याचा फार उपयोग होतो व अशा रीतीनें आपण २६ रोग्यांस औषध दिलें व त्यांची प्रकृति पुष्कळ सुधारली असें डॉ. बार्कमन एम. डी यांचें म्हणणें आहे. या औषधानं रोगी साफ बरे होतील अशी त्यांस आशा आहे.

× × *

वधूवरांनीं लग्नापूर्वीं आपणांस मुलें किती व्हावीं, त्यांस शिक्षण कसें द्यावें, प्रत्येकानं मिळविलेल्या पैशाची वांटणी कशी करावी, आपलें पुढें कांहीं कारणानें न पटल्यास काडी मोडतेवेळीं काय व्यवस्था करावी, यासंबंधीं आपसांत एक लेखी ठराव करण्याची पद्धत पाडली पाहिजे. असें प्रसिद्ध कामशास्त्रज्ञ डॉ. लिट्टाम् यांचें मत आहे.

× × ×

# ताजी व शिळी बातमी

जान्युआरीचे ११ तारखेस गौरीशंकर नांवाचा एक बनिया बायकोसह ग्रँटरोडचे स्टेशनावर उतरला, व बायको दोन परक्या इसमांशीं बोलत आहे असें पाहून संतापून तिला घरीं ओढून घेऊन गेला. तेथें त्याचा बाप बसला होता त्याला बाहेर जावयास सांगून चाकूनें बायकोला भोंसकून मारली. ती ओरडूं लागली तेव्हां बापानें पोलीसला कळवलें व ते येऊन पाहतात तों ती मेलेली असून तिच्या शरीरावर २२ जखमा सांपडल्या.

× × ×

पतंग पकडण्याकरतां भिंतीवर चढल्याबद्दल नवरा रागें भरला, तें सहन न झाल्यामुळें कृष्णाबाई शंकर हिनें अफू खाल्ली; व ती जांनेवारी १२ तारखेस जे. जे, हॉस्पिटलांत वारली.

× × ×

रत्नागिरी जिल्ह्यांतील मदनगडचे पोलिस सबइन्स्पेक्टर रा. चव्हाण यांनीं २३ जून १९२६ रोजीं अनसूयाबाई नांवाच्या १९ वर्षांच्या मुलीशीं लग्न केलें परंतु तिच्या जननेंद्रियाची पुरी वाढ झालेली नसल्यामुळें संभोग अशक्य आहे असें त्यांस आढळून आलें. तिच्या बापानें तिला परत घेतली व दागिने व लग्नाचा खर्च जांवयास परत दिला. पुढें मुलीनें नवऱ्यावर पोटगी-करतां फौजदारी केली. ती मुलगी वास्तवीक स्त्रीच नसल्यामुळें तिच्याशीं लग्नच होणें अशक्य आहे असें चव्हाण यांनीं सांगितलें. परंतु लग्न झालें कीं नाहीं हें ठरवणें फौजदारी कोर्टाचें काम नाहीं, व बापानें मुद्दाम फसवलें नाही असें जज्जानें ठरवून रु. ३० पोटगी देवविली. चव्हाण यांनीं हायकोर्टाकडे अपील केलें, परंतु हायकोर्टानें शिक्षा कायम केली.

लग्नापूर्वी वधूवरांनीं डॉक्टरांच्या सर्टिफिकिटांवरून परस्परांविषयीं खात्री करून घेणें इष्ट आहे, हें आतां तरी लोकांस उमजेल काय ?

* * *

मद्रासकडील तिरुप्पूर येथील एका मजुरास खुनाच्या खटल्यांत फांशीची शिक्षा झाली. त्याची बायको त्यास तुरुंगांत भेटावयास गेली तेव्हां माझा भाऊ तुझा व मुलांचा सांभाळ करील असें त्यानें तिला सांगितलें. तिला तें पसंत पडलें नाहीं व स्वत;स व मुलांस दिवसांतून एकदां सुद्धां धड अन्न मिळत नाहीं असें पाहून तिनें एके दिवशीं मुलांस विहिरींत ढकलून दिलें व त्यांचे मागोमाग आपणही उडी घेतली !

* * *




# समाजस्वास्थ्य

वर्ष १] जानेवारी १९२८ [अंक ७

संपादक--र. धों. कर्वे.

किमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| १. वेश्यांसंबंधीं कायदे. २ ... ... ... | १ |
| २. साभार पोंच ... ... ... ... | ५ |
| ३. एक पत्र ... ... ... ... | ६ |
| ४. आमच्याबद्दल लोकमत ... ... ... | ६ |
| ५. गर्भधारणेबद्दल रानटी कल्पना ... ... | ७ |
| ६. पुस्तकपरीक्षणः लंघन–चिकित्सा-शिक्षक ... | ८ |
| ७. संततिनियमन बरें कीं हें बरें ? ... ... | १४ |
| ८. गर्भाचा एक प्रकार ... ... ... | १५ |
| ९. गुप्त रोगांस प्रतिबंध ... ... ... | १६ |
| १०. 'स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो' ... ... | १७ |
| ११. धार्मिक दुराग्रह... ... ... ... | १८ |
| १२. संततिनियमनावरील एक आक्षेप ... ... | १९ |
| १३. मांसाहार ... ... ... ... | २० |
| १४. ताजी व शिळी वातमी ... ... ... | २१ |


# जेलोटयूब

यानें **गुप्त रोग बरे होत नाहींत,** हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्या-करतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोब्यु यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २

# वेश्यां संबंधीं कायदे

लेखांक २

सोलन हा ग्रीसमध्यें व सेंट लुई हा फ्रान्समध्यें उत्तम कायदे करण्याबद्दल प्रसिद्ध पुरुष होऊन गेले, व या दोघांसही वेश्यावृत्तीस परवानगी देणें भाग पडलें ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे, व या दोघांच्या कालामध्यें १८०० वर्षांचें अंतर होतें हीही गोष्ट तितकीच महत्त्वाची आहे. हे दोघेही विचारशील, नीतिमान व धर्मिक होते.

लंडन येथें ११६१ सालीं वेश्यांसंबंधीं प्रथम कायदा झाला. यावेळीं सार्वजनिक स्नानगृहांत वेश्यावृत्तीस परवानगी असे, व कायदा झाला तो असा:— कोणत्याही स्त्रीनें समागमाबद्दल पैसे घेतल्यास तिनें सबंध रात्र एकाच पुरुषाबरोबर घालविली पाहिजे. स्नानगृहांच्या मालकांनीं रोगी स्त्रियांस तेथें राहूं देऊं नये.

बर्लिन येथें वेश्यांस कांहीं रस्ते व घरें नेमून दिलेलीं असत. त्यांस विशिष्ट प्रकारचा पोषाख करावा लागे व त्यांवर देखरेख करण्याचें काम फांशीं देणाऱ्या मांगाकडे असे. त्यांपैकीं कोणी नियम मोडल्यास तिला फटके मारून गांवाबाहेर हांकून देत असत. या शिवाय जत्रेच्या ठिकाणीं जाऊन धंदा करणाऱ्या फिरत्या वेश्या असत. इ. स. १४१ मध्यें कॉन्स्टन्स येथें भरलेल्या महापरिषदेच्या सभासदांकरितां व बरोबरच्या लोकांकरितां ६०० वेश्या राखून ठेवल्या होत्या असें इतिहासकार म्हणतात !

ल्यूथरनें केलेल्या धार्मिक क्रांतीनंतर बर्लिन येथें वेश्यांविरुद्ध अति कडक कायदे करून त्यांस हांकून दिलें. लवकरच चोरटे संबंध, बालहत्या, गर्भपात वगैरे इतके वाढले कीं पुनः कायदा बदलावा लागला, व लोकसंख्येच्या मानानें वेश्या पुरेशा नसल्यामुळें त्यांची संख्या वाढविली पाहिजे असा ठराव पास झाला !

बर्न् येथें लंडनप्रमाणें स्नानगृहांतच वेश्या असत, व याच स्नानगृहांत स्त्रियाही जात असत.

स्पेनमध्यें फ्रान्ससारखीच स्थिति होती. इ. स. १२६० मध्यें आल्फॉन्सो नांवाच्या राजानें कांहीं कायदे केले. त्यापैकीं विशेष चमत्कारिक कायदा असा होता कीं गिऱ्हाइकानें ठरलेले पैसे वेश्येला आगाऊ दिल्यास तिनें नंतर करार मोडला तर गिऱ्हाईकास कायदेशीर इलाज नसे. [ येथें वेश्यांनीं घरभाडें न दिल्यास तें कायद्यानें वसूल करतां येत नाहीं. सं. ] याचें कारण या बाबतींत विकत घेणाराचाच दोष आहे, असें स्पष्टीकरण कायद्यांत दिलें होतें !

यावेळीं वेश्यागृहें राजांच्या मर्जीतल्या अधिकाऱ्यांस बक्षिस दिलेलीं असत, व त्यांपासून मोठी मिळकत असे.

फ्रान्समध्यें सेंट लुई यानें जरी वेश्यावृत्तीस परवानगी दिली तरी तिला आला घालणारे कायदे होतेच. ठरलेल्या रस्त्यांशिवाय त्यांस कोठेंहि जागा विकत किंवा भाड्यानें मिळत नसे, व वेश्याकर्म खासगी घरांत होतां कामा नये असा निर्बंध होता. यामुळें वेश्यांच्या रस्त्यांची बदनामी होऊन त्या रस्त्यांत दिवसा किंवा पूर्वरात्रीं कोणी सभ्य मनुष्य फिरत नसे. हें पाहून वेश्यागृहांत उन्हाळ्यांत ७ व हिंवाळ्यांत ६ वाजल्याचे पुढें कोणी राहतां कामा नये असा नवीन कायदा झाला.

वेश्यागृहांत बऱ्याच वेश्या एके ठिकाणीं राहून स्वतंत्रपणें धंदा करीत असत व त्या पोलीसाशिवाय कोणाचाही अधिकार ओळखीत नसत.

शिवाय वेश्यांनीं अमुक प्रकारचाच पोषाख केला पाहिजे किंवा अमुक प्रकारचा करतां कामा नये, असेही कायदे होते. व कुंटणकीविरुद्ध कायदे इतके कडक होते कीं कधीं कधीं या गुन्ह्याबद्दल देहांत शासन देत असत.

यानंतर १५६० मध्यें पुनः वेश्यागृहें बंद केलीं व वेश्यांविरुद्ध भयंकर कडक कायदे केले. कांहीं शहरांत वेश्यांनीं २४ तासांत आपला धंदा न बदलल्यास किंवा शहर सोडून न गेल्यास ह्यांची हजामत करून व फटके मारून त्यांस हद्दपार करीत असत.

या सुमारास प्रथम वेश्यांस तुरुंगवासाची शिक्षा फर्माविण्यांत आली. व १५०० मधें असा एक तुरुंग बांधला. परंतु या सुमारास लोकांची सांपत्तिक स्थिति इतकी वाईट होती कीं तुरुंगांत जावयास मिळावें म्हणून कांहीं स्त्रिया मुद्दाम वेश्याकर्म करून पोलीसांत कळवीत असत, व कांहीं कुमारिका सुद्धां आईबापांच्या सांगण्यावरून, आपण वेश्या आहोंत असें खोटेंच सांगून तुरुंगांत पोटापाण्याची सोय लावून घेत असत. यामुळें त्यांस तपासूं लागले व एखादी स्त्री कुमारिका नसली तरीही, आपण मुद्दाम या उद्देशानें वेश्याकर्म केलें नाहीं अशी तिला शपथ घ्यावयास लावीत. जिला कुमारिका म्हणून एकदां परत पाठवली तिला पुढें कधींही तुरुंगांत घेत नसत, व थकल्यामुळें देवधर्माला लागलेल्या वेश्यांनीं तेथें येऊं नये म्हणून तीस वर्षें वयाच्या पुढें तेथें शिरकाव होत नसे. अशी या तुरुंगाची स्थिति झाली; व लवकरच तो बंद करावा लागला!

परंतु हा प्रयत्न पुनः १६६५ मधें केला व लवकरच अशीं बरींच बंदीगृहें झालीं. तुरुंगाची शिक्षा झालेल्या वेश्यांनीं अमुक वेळ प्रार्थना करावी, व त्यांना शक्य तितकें कठिण काम शक्य तितका वेळ करण्यास लावावें, व काम करतांना त्यांस धार्मिक पुस्तकें वाचून दाखवावीं, व असेच हाल करण्याचे इतर प्रकार या कायद्यांत सांगितले होते! ही शिक्षा पोलीसचा वरिष्ठ अधिकारी आपल्या जबाबदारीवर देत असे, व त्यावर अपील नसे. गुप्त रोगांवर सक्तीनें उपचार करण्याची व्यवस्था प्रथम याच कायद्यानें केली.

याच वेळचा एक लष्करी कायदा सांपडतो, तो असा कीं, लष्करी शिपायांबरोबर व्हेर्साय् ( हें पॅरिस पासून ११ मैल आहे ) येथें किंवा आसपास ५ मैलांचे टापूंत कोणी वेश्या सांपडल्यास तिचें नाक व कान कापले जातील. परंतु या कायद्याची अंमलबजावणी झाल्याचा कोठें उल्लेख नाहीं.

इतका अधिकार पोलिसास दिल्याबद्दल गवगवा होऊन शेवटीं तो कायदा बदलावा लागला, व नंतर अपिलाची व्यवस्था झाली. सर्व कडक कायद्यांप्रमाणें हे कायदेही शेवटीं ढिले पडले, ते इतके कीं कांहीं जत्रांमधून वेश्यांचीं दुकानें दिसूं लागलीं!

कांहीं प्रांतांत निराळे कायदे असत व १६४२ मध्यें एके ठिकाणीं तर

वेश्यांकडे कोणीही जातां कामा नये, असा कायदा झाला. एका शहरांत वेश्यांस ओळखतां यावें म्हणून त्यांनीं केसांत एक गुलाबी फीत बांधली पाहिजे असा कायदा होता.

१८ व्या शतकाचे आरंभीं व्हेनिस् येथून सर्व वेश्यांस हांकून दिल्यामुळें तेथील सर्व दर्जाच्या उल्लू लोकांनीं गर्ती स्त्रियांवर हल्ला केला ते लोकांच्या घरांत व जोगिणींच्या मठांतही शिरले. यामुळें सरकारनें वेश्यांस परत बोलावून त्यांस राहण्यास जागा व धंदा चालू लागेपर्यंत पैशाचीही मदत दिली !

इ. स. १७७८ मध्यें पॅरिस येथील अधिकाऱ्यानें कडक नियम अंमलांत आणले, व याचा परिणाम असा झाला कीं वेश्या पोलिसच्या देखरेखीखालीं राहण्याऐवजीं सर्वत्र पसरल्या व त्यांच्याबरोबरच गुप्त रोगांचाही अत्यंत प्रसार झाला. १७८९ मधील राज्यक्रांतीचे सुमारास सर्व इस्पितळें गर्मीच्या रोग्यांनीं भरून गेलीं होतीं, व नवीन रोग्यांस इस्पितळांत जाण्याकरतां वर्ष वर्ष थांबावें लागत असे.

राज्यक्रांतीनंतर पोलीसचा वेश्यांचे बाबतींतील जुल्म कमी करण्याकडे लोकांचा कल होता, परंतु कुंटणकीवर मात्र नेहमींप्रमाणें कटाक्ष होता. वेश्यांकडे दंगाधोपा किंवा मारामारी झाल्यास मात्र त्यांस शिक्षा होत असे, परंतु एरवीं त्यांस धंदा करण्याची मोकळीक असे. परंतु १७९५ सालीं कडकपणाची आणखी एक लाट आली व वाईट चालीच्या स्त्रियांस पकडण्याकरतां एक कमिटी नेमली. त्यांनीं घरोघर हिंडून ज्या स्त्रियांस आपल्या उपजीविकेचें साधन धड सांगतां आलें नाहीं त्यांस पकडून पोलीस चौकीवर नेलें. अर्थात् यांत पुष्कळ गर्ती स्त्रियाही सांपडल्या, व इतकें करूनही उल्लूपणा वाढतच गेला. प्रत्यक्ष वेश्याकर्म उघडपणें होत नसल्यामुळें पुरावा नाहीं म्हणून सर्व आरोपी सुटत असत.

नंतर १८३० चे सुमारास पुनः पूर्वींचीच व्यवस्था–म्हणजे देखरेखीखालीं वेश्यागृहांस परवानगी, व रोगांकरतां तपासणी–सुरू झाली. येथून हीच व्यवस्था यूरोपांतील सर्व देशांत पसरली.

वरील सर्व हकीकतीवरून असें दिसून येतें कीं आजपर्यंत कोणासही कोणत्याही मार्गानें कधींही वेश्यांचा नायनाट करतां आलेला नाहीं, इतकेंच

नाहीं तर वेश्यांविरुद्ध ज्या मानानें अधिक कडक कायदे करावे त्या मानानें लोकांसच त्यांपासून जास्त त्रास व धोका उत्पन्न झालेला आहे.

वेश्यावृत्तीचा नायनाट करूं पाहणारांनींही असें कबूल केलें आहे कीं, उघड वेश्यावृत्तीपेक्षां चोरटी अधिक धोक्याची आहे. ज्या ज्या वेळीं ती जबरीनें नाहींशी करण्याचा प्रयत्न झाला, त्या त्या वेळीं हें सिद्ध झालेलें आहे. असा प्रयत्न म्हणजे चोरट्या वेश्यावृत्तीस आव्हानच होय.

१९ व्या शतकापर्यंत हा केवळ नीतीचा किंवा धर्माचा प्रश्न समजत असत, व गुप्तरोगांच्या महत्त्वाच्या प्रश्नाचा फारसा विचारच करीत नसत, व याचें मुख्य कारण म्हणजे या रोगांवर खरोखर उपायच सांपडलेले नव्हते, व प्रतिबंधाचा मार्ग म्हणजे वेश्यांस कोंडून ठेवणें हाच होता.

वेश्यांस जेथें परवानगी असे तेथेंही त्यांस कांहीं रस्ते नेमून दिलेले असत, परंतु इतर धंद्यांचीही अशीच व्यवस्था असल्यामुळें त्यांत विशेष असें कांहींच नसे.

अधिकाऱ्यांचे दृष्टीनें स्वतंत्र वेश्यांपेक्षां वेश्यागृहांवर नजर ठेवणें अधिक सोपें असल्यामुळें त्यांनीं नेहमीं वेश्यागृहांचीच पद्धत पसंत केली आहे.

या बाबतींतील कायदे केवळ स्त्रियांविरुद्धच असतात. अर्थात् कुंटणकी हा आजपर्यंत सर्वत्र गुन्हाच मानलेला आहे, व वेश्यागृहांस परवानगी देणारानींही कुंटणांस अपराधीच ठरवलें आहे.

आतां हल्लीं निरनिराळ्या देशांत यासंबंधीं कायदे कशा प्रकारचे आहेत हें पाहूं.

---

## साभार पोंच

'भारत मित्र' 'हिंदु,' 'सोलापूर समाचार,' 'दूत,' 'टणत्कार' 'लोकमित्र' 'भंडारी विजय' 'स्वकुळसाळी विजय' 'विद्यासेवक' यांचे भेटी आलेले अंक पोंचले. अभिप्राय सवडी प्रमाणें देण्यांत येतील.

# एक पत्र.

——:०:——

त्रावणकोर, १-११-२७

सा. न. वि. वि.

आपलें पुस्तक मिळालें. हें पत्र पोंचतांच गर्भपातासाठीं कांहीं औषध असल्यास ताबडतोब पाठवावें. गर्भ राहून एकच महिना झाला आहे. औषध गुणकारी असुन अपाय न व्हावा. कळावें, हे विनंति.

*   *   *

मागें अशा प्रकारचें एक पत्र छापलेंच आहे. या पत्रासंबंधीं आम्हांस इतकेंच लिहावयाचें आहे कीं ऋतुकालास महिन्यापेक्षां थोडे दिवस जास्त लागतांच पुष्कळ लोक गर्भ राहिला असें समजून विनाकारण घाबरत असतात. वरील प्रकारचे पत्र लिहिणारे एक गृहस्थ, आम्हीं यासंबंधीं माहिती देण्याचें नाकरल्यामुळें अतिशय घाबरले होते, परंतु अशा तऱ्हेनें तीन आठवडे जास्त गेल्यानंतर त्यांची भीति निराधार ठरली. हे गृहस्थ संततिनियमनाचीं साधनें आमच्या उपदेशाप्रमाणें वापरीत होते असें त्यानीं लिहिलें होतें, व तीं फसलीं कीं काय अशी आम्हांसही भीति वाटत होती. परंतु आह्मी शिफारस केलेलीं साधनें फसल्याचें एकही उदाहरण अजून आमचे माहितींत नाहीं.

———

# आमच्याबद्दल लोकमत

' 'समाजस्वास्थ्य—' हे क्रांतिकारक व प्रत्येकाला विचार करावयास लावणारें मासिक संततिनियमनाचे पुरस्कर्ते म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. प्रो. कर्वे हे काढीत असुन, नवीन चिकित्सक दृष्टीनें समाजविचार करणाऱ्यांना ते खात्रीनें पटण्याजोगें आहे. लेख वाचनीय आहेत. 'व्यक्तीच्या व समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधीं उपायांची चर्चा करणें ' हा त्याचा उद्देश आहे. वर्गणीदार होऊन वाचकांनीं आश्रय द्यावा. ''—लोकमित्र ( खानापूर—बेळगांव ).

# गर्भधारणेबद्दल रानटी कल्पना.

——:०:——

मध्य ऑस्ट्रेलियामधील रानटी लोकांना, गर्भधारणेंत पुरुषांचा कांहीं संबंध असतो अशी कल्पनाच नाहीं !

आग्नेय भागांतील लोकांच्या समजुतीनें चंद्र मुलांचें बीज झाडांवर ठेवतो व स्त्रिया या झाडांखालून गेल्यास गर्भधारणा होते. चंद्रावर कावळ्याचा अंमल असल्यास मुलगी व पालीचा असल्यास मुलगा होतो.

मलाकामधील लोकांचे मतें त्यांचा मुख्य देव हें बीज आकाशांतून स्त्रियांचे अंगावर टाकतो व म्हणून त्यांस गर्भ राहतो.

अंदमान मधील लोकांचे मतें त्यांचा देव मेलेल्या लोकांचे आत्मे स्त्रियांचे शरीरांत घालतो. ग्रीनलंडमधील लोकांस वाटतें कीं मुलें चंद्रापासुन होतात व त्यांत वैद्य मध्यस्थ होऊं शकतो. अमेझॉन नदीच्या उगमाजवळचे लोक असें समजतात की पूर्वजांचे आत्मे अरण्यांत किंवा इतर प्राण्यांचे शरीरांत बराच काल घालवून मग स्त्रियांचे अंगांत शिरतात.

फिलिपाइन् बेटांतील लोकांत अशी आख्यायिका आहे कीं त्यांच्यांतील एका राजाच्या थुंकीनें एक बेडकी गर्भार होऊन तिला राजकन्या झाली !

गुरें पाळणाऱ्या काफर व हॉटेनटॉट लोकांत अशी गोष्ट सांगतात कीं एका कुमारीनें एक विशिष्ट प्रकारचें गवत चोखल्यामुळें ती गर्भवती होऊन तिचा मुलगा त्यांचा मुख्य देव झाला. गाईनें हें गवत खाल्यामुळें तिला गर्भ राहिल्याचीही एक गोष्ट आहे. अशा प्रकारच्या समजुती आपल्या देशांतही कांहीं कमी नाहींत, व त्याही तितक्याच हास्यास्पद आहेत.

---

## पुढील अंकीं

**वेश्यासंबंधीं कायदे—लेखांक ३**

**कांहीं पत्रें.**

# पुस्तकपरीक्षण.

—— : o : ——

'**लंघन-चिकित्सा-शिक्षक,**' लेखक ल. ना. जोशी.

'मी सर्व जगांत अत्यंत हुषार, तेजस्वी, व एकंदरींत सर्वगुणसंपन्न मनुष्य आहें; जगांत माझ्यासारखा दुसरा सांपडणार नाहीं, मी करतों त नेहमीं बरोबर असतें, व मी कधींही चूक केलेली नाहीं,' असें जर एखादा गोमाजी कापशे सांगूं लागला तर त्याला आपण वेडा किंवा निदान अहंमन्य म्हणूं. बरें, या गोष्टी स्वतःबद्दल सांगण्याऐवजीं तो आपल्या कुटुंबांतील सर्व माणसांबद्दल सांगूं लागला तर ? तरीही त्याला आपण मूर्खांत काढूं. परंतु याच गोष्टी जर तो आपल्या देशाबद्दल सांगूं लागला, तर आपण टाळयांचा गजर करून त्याला दे. भ. वगैरे पदव्या देतों. असें कां ? ( डॉ. रॉबिनसन यांचा अनुवाद )

अशाच प्रकारचीं विधानें रा. जोशी यांनीं प्रस्तुत ग्रंथांत केलीं आहेत २३ पानावर 'प्राग्द्रवं पुरुषोऽश्नीयान्मध्ये च कठिनाशनः । अन्ते पुनर्द्रवाशी तु बलारोग्यैर्न मुंचति ॥' असा विष्णुपुराणांतील उतारा देऊन त्यावर लेखक म्हणतातः 'ही भोजनपद्धति अत्यंत संस्कृत असून ती फक्त आर्यजनांतच आहे. इतरत्र अन्य पद्धति आहेत. पाश्चात्य कोणचीही भोजनपद्धति दोषार्ह आहे'! ९१ पानावर ते म्हणतातः—'सांगण्याचें तात्पर्य म्हणून इतकेंच कीं, पूर्वाचार्यांनीं जे अबाधित सिद्धांत ठरविले आहेत, तेच खरे आहेत.'

आधुनिक शास्त्रीय ज्ञानाशीं विसंगत अशीं विधानें सर्व ग्रंथभर पसरलीं आहेत, त्यांपैकीं कांहीं:—

पान १३:'आमचा स्नायुसमूह पुढें येणाऱ्या भावी आपत्तीसंबंधानें... स्वभावतःच आम्हांला रोगोत्पत्तीची सुचना देतो ( गर्मी, कॅन्सर, क्षयरोग अंगांत भिनेपर्यंत रोग्यास त्याची बिलकूल दाद नसते. )

पान १४:'शरीरांतला चुला—म्हणजे जठराग्नि—घाणेऱ्या वस्तूंना जाळून टाकण्यास सदासर्वदा प्रदीप्त झालेला असतो. ( हा जठराग्नि अजब आहे ! )

पान १५:'दूषित हवा बाहेर टाकण्याचें काम मुख्यत्वेंकरून आमची त्वचा करीत असते'!

पान २७:' सर्व रोगांचें बीज अजीर्णांत असतें ' ( हा सर्व ग्रंथाचा पाया आहे परंतु हाच खोटा आहे. )

पान २८: ' कारण, कोणचाही प्राणी, उपास पडल्यानें मरत नसुन अजीर्णानें मरतो, असा परमेश्वरी स्वाभाविक नियम आहे ' ( तरी मुलांस वक्तशीर दूध पाजावें असेंही तेच सांगतात, तें कशाकरतां ? मुळींच पाजलें नाहीं म्हणजे अजीर्णाची भीतिच राहणार नाहीं ! )

पान ३०:' सर्व व्याधींचा उदय आंतड्यांत होतो ' ( हें साफ खोटें आहे. उदाहरणार्थ खरूज; ही एका विशिष्ट प्राण्यानें त्वचेंत घर केल्यामुळें होते, व त्यांत आंतड्याचा बिलकुल संबंध नसतो. )

पान ३३:' आहार वाढवावा तेवढा वाढतो व कमी करावा तेवढा कमी होतो ' !

पान ३९:' औषधांनीं रोगांचा समूळ उच्छेद होणें अशक्य आहे. जी गोष्ट मानवी कृतीनें निर्माण झालेली नाहीं तिला, मानवी कृतीनें म्हणजे कृत्रिमपणानें वरी करतां येणें शक्यच नाहीं ' ( अधिक खाण्यानें अजीर्ण होतें व अजीर्णापासून सर्व रोग होतात असें हेच म्हणतात. अधिक खाणें ही मानवी कृति नव्हे काय ? )

पान ४०:' औषधांत लाभदायक अंश जितका कमी असतो, त्यापेक्षां हानिकारक अंश अधिक असतो ' ( याचा अर्थ होत असेल तर याला पुरावा काय ? )

पान ४७: ' मनुष्याला वाटेल त्या तऱ्हेचा कां रोग होईना, त्याला कोणच्याहि प्रकारच्या औषधाची, जरूर नाहीं. कारण त्यापासून रोग बरा होत नाहीं !

पान ५४: ' वास्तविक रोग एकच असतो, आणि आह्मी जे अनेक रोग आहेत असें मानतों, ते—'

पान ५९: ' सर्वांत पहिली गोष्ट ही आहे कीं, औषधी या विषमय आहेत ' [ औषधींची ज्यांस बिलकूल माहिती नाहीं, तेच अशीं निरर्थक विधानें

करीत असतात. औषधी कशास म्हणावयाचें ? लंघनांत लिंबाचा रस, आल्याची कोशिंबीर हेच ग्रंथकार खावयास सांगतात; हीं औषधें नव्हेत काय ? ]

पान ५९: 'यामुळें खनिज व दुसरे जड पदार्थ आमच्या देहांत उतरल्याबरोबर त्यांचें विष बनतें. या सिद्धांतास अलीकडील बऱ्याच विद्वानांनीं मान्यता दिलेली असून, याच्या सत्यतेबद्दल कोठेंच मतभिन्नता झालेली नाहीं'! ( मग 'बऱ्याच विद्वानांनीं' असें कां म्हणतात ? )

पान ६३: 'यूरोप, जर्मनी, अमेरिका वगैरे देशांतून पौष्टिक औषधांचें मुख्य सारभूत द्रव्य स्पिरिट किंवा आल्कोहोल हें जसें असतें,...' ( खोटें )

पान ७३ 'काय चमत्कार आहे पहा कीं, काम करणारीं आम्हीं माणसें मध्यें मध्यें विश्रांतीसाठीं सुट्या घेतों,......तद्वत् आपल्या पोटाला मात्र आपण कधीं सुटी देत नाहीं.' ( हें खरें नाहीं. शरीराच्या प्रत्येक भागाला आपोआप सुट्टी मिळत असते. हृदय व फुप्फुसें एकसारखीं काम करतात असें आपणास वाटतें मात्र, परंतु त्यांतही प्रत्येक स्नायूला एक सारखें काम नसतें. पोटास तर पुष्कळच सुट्टी मिळते. निरनिराळ्या प्रकारचें अन्न पचवण्याचें काम अन्ननलिकेच्या निरनिराळ्या भागांत होतें व कोणत्याही एका भागास एकसारखें काम पडत नाहीं. शिवाय दररोज रात्रीं ८।१० तासांत बहुतेक लोक कांहीं खात नाहींत, ही पुष्कळच लांब सुट्टी होते. आधाशीपणा न केल्यास दररोज इतकी सुट्टी पुरेशी होते. नियमितपणानें खाणारास लंघन करण्याचें बिलकूल कारण नसतें. )

धर्मग्रंथ आणि उपवासः—पान ७४ वर या सदराखालीं 'सर्व धर्मांत लंघनाची आज्ञा आहे, तेव्हां तें चांगलें असलेंच पाहिजे, असें सांगितलें आहे. धर्मांत सांगितलेल्या गोष्टी शास्त्रीय दृष्टीनें चांगल्याच असतात असें नाहीं. जी गाय मनुष्याची विष्ठा खाते, तिची विष्ठा व मूत्र पवित्र म्हणून शुचिर्भूत ब्राह्मण खाऊन पवित्र होतात ! यानें कदाचित् पुण्य लागत असेल, परंतु हा प्रकार किळसवाणा आहे ! कॅथरीन मेयो सारख्या लेखकांनीं याचा फायदा घेऊन 'हिंदूंच्या अत्युच्च जातीचे लोक सुद्धां गलिच्छ असतात' असें लिहिलें तर तें मात्र आम्हांस खपत नाहीं !

धर्मातील उपोषणें प्रकृतीच्या दृष्टीनें सांगितलेलीं नसतात. शरीराचे जितके हाल करावे तितकें अधिक पुण्य लागतें या कल्पनेवर धर्माज्ञा बसवलेल्या असतात. याच कल्पनेनें ख्रिस्ती साधु चाबुकाचे फटकेही मारून घेतात. त्यानेंही रोग बरे होतात काय ?

हिंदु धर्माची मोटी शिताफी ग्रंथकारानें ७५ पानावर सांगितली आहे:- ' हिंदुस्थानांत आर्यधर्मीय स्त्रीपुरुषांत बायकांना अधिक व्रतें करण्यास धर्मग्रंथांनीं अनुज्ञा दिलेल्या आहेत. याचें कारण असें आहे कीं, आमच्या स्त्रियांना पुरुषांच्या इतके श्रम व व्यायाम होत नाहींत आणि त्यांना खुल्या हवेंत हिंडायलाहि फारसें सांपडत नाहीं. त्यामुळें त्यांना अपचन आणि बद्धकोष्ठाची व्यथा होण्याचा संभव फार असतो. यास्तव, त्यांना पुरुषांपेक्षां जास्त उपवास आणि व्रतवैकल्यें करण्यास सांगितलें आहे. ' वाहवा ! खुल्या हवेची उणीव उपोषणानें भरून काढावयाची. हिंदु धर्माची तारीफ करावी तितकी थोडी आहे !

पान ७९:-' श्रमाचीं कामें करणारे हमाल सुद्धां आठ आठ दिवस नुसत्या पाण्यावर राहून आपलीं कामें चोखपणानें करीत असलेले सध्या दृष्टीस पडतात. ' ( पुराव्याशिवाय खरें वाटत नाहीं. )

पान ८३; 'रोगी जेव्हां आहार सोडतो तेव्हां आहाराचें पाचन करणारी शक्ति रोग्याच्या रोगाचें शमन करण्यांत गुंतते व रोगी त्वरित मुक्त होतो ! ( वाफेच्या यंत्रांत कोळसा घातल्यानें यंत्राची शक्ति तो जाळण्यांत खर्च होईल, तेव्हां तो न घालणें बरें ! )

पान ८७; जोंपर्यंत देहांत रोगाचें वास्तव्य असतें तोंपर्यंत देह निराहार स्थितींत राहू शकतो.' ( मग रोग बरा करण्याच्या भानगडींत पडा कशाला ? )

पान १४५: ' बऱ्याच डॉक्टरांचें असें म्हणणें आहे कीं, भोजनसमयीं अन्नाव्यतिरिक्त जलपान मुळींच करूं नये पण ही गोष्ट बरोबर नाहीं. साधारणतः सर्व लोकांनीं अन्नग्रहणासमवेत मध्यें मध्यें यथेष्ट जलपान करणें अवश्य आहे. आमच्या वैद्यशास्त्रांत पाण्याला ' अमृत ' असें नांव दिलें असुन त्यापासून कोणच्याहि स्थितींत कोणच्याच प्रकारची हानि होत नाहीं.' ( यासंबंधीं बराच मतभेद आहे, परंतु कोणत्याही प्रकारच्या अतिरेकानें नुकसानच होणार.

जेवणाचे वेळीं अगदीं थोडें पाणी प्यावें व नंतर १ तासानें भरपूर प्यावें, असें आधुनिक मत आहे व त्याला शास्त्रीय आधार आहे. निदान अर्धवट चावलेलें अन्न तसेंच गिळण्यास पाण्याची मदत होतां कामा नये.)

पान १४६–४८: ग्रंथकाराचें रेतासंबंधीं काय म्हणणें आहे याचा पत्ता लागत नाहीं. रेत किंवा शुक्र हा खाण्याचा पदार्थ आहे व त्यानें अजीर्ण नाहींसें होतें असें हे म्हणतात. तें दाणेदार व स्वच्छ असावें, नसल्यास उकळत्या पाण्यांत बुडल्यानें स्वच्छ होतें असें हे सांगतात, 'हजारों रोग्यांत एकहि रोगी असा असा निघाला नाहीं कीं, ज्याला रेतव्यवहारानें हानि पोंचली आहे'...'साधारणतः प्रतिदिवशीं एकशेंतीन चमचे रेतस्फालन होऊं शकतें.'...'उपवास न करणाऱ्यांनाहि जडांश वाटला तर त्यांनींही रेतस्फालन करून, अजीर्णांश नष्ट करावा. अजीर्ण नाहींसें करण्याचा यासारखा दुसरा सोपा व साधा उपाय नाहीं.' याचा अर्थ ग्रंथकारासच माहीत !

मांसाहार—पान २३९: 'मांसाहारी लोक बहुधा उग्र, हिंसक, क्रूर आणि अत्याचारी असून, त्यांपासून इतर जीवांना त्रास सहन करावा लागतो...स्मार्त आणि शाक्त, हिंदू आणि यवन व ससाणा आणि पोपट अशीं उदाहरणें कितीतरी देतां येतील !' ( तींही खोटीं ! हिंदूंपैकीं फक्त कांहीं प्रांतांतील ब्राह्मण तेवढेच शाकाहारी, बाकी सर्व मांसाहारी असतात. पोपट पिंजऱ्यांत ठेवल्यास शाकाहारी ठेवतां येतो, परंतु स्वभावतः नसतो. शाकाहारी गाय मारकुटी असते, व पुष्कळ मांसाहारी कुत्रे अत्यंत गरीब असतात. हेच ग्रंथकार पुढच्याच पानावर मांसरसाची अत्यंत स्तुति करतात ! )

पान २४३—' एकंदर जगताचें बारकाईनें जर निरीक्षण केलें तर असेंच सिद्ध होईल कीं, कोणचाहि प्राणी स्वाभाविकपणें जन्मतःच मांसाहारी नसतो, पण दुग्धाहारी मात्र असतो. अस्सल मांसाहारी हिंस्र वाघिणीचीं पिलेंहि प्रथम दुग्धपानच करीत नाहींत का' ? ( तरमग जन्मभर दूधच प्यावें व निदान शाकाहार करतां कामा नये ! )

पान २४५ 'मांसपचनाला आवश्यक असे जे आसवादि मादक पदार्थ........' ( हे गृहस्थ स्वतः मांसाहारी नाहींत इतकेंच या अज्ञानावरून

सिद्ध होतें. मांस पचण्याला कठिण नसतें व त्यास मादक पदार्थांचीही जरूर नसते. )

पान २४९: 'पशु, पक्षी आहाराबाहेर व हवें तें कधींच खात नाहींत हें जसें प्रसिद्ध आहे तसेंच त्यांचें संगमसुखही फारच मर्यादित असतें, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे.' ( हीं दोन्ही विधानें प्रसिद्ध असतील परंतु खोटीं आहेत. शिवाय सर्व प्राण्यांची राहणी सारखीच असली पाहिजे काय ? )

पान २२५:–' जेथें स्वच्छ हवा फिरत असेल तेथें मच्छरें राहणे शक्यच नाहीं; कारण त्यांना अस्वच्छ हवेचीच आवश्यकता असते.' ( मच्छर स्वच्छ हवेनें मरत नाहीं व अस्वच्छ हवेची कोणत्याही प्राण्याला आवश्यकता नसते. मच्छरांच्या नाशाचे उपाय वेगळे आहेत. )

वरील उताऱ्यांवरून अशी कल्पना होते कीं या ग्रंथकारांनीं निदान गेलीं ५० वर्षे झोंप घेतली असावी. रोगजंतु सुद्धां अजीर्णापासूनच उत्पन्न होतात, अशी ज्यांची कल्पना, त्यांनीं लंघनानें सर्व रोग बरे होतात असें म्हटल्यास त्याचीही किंमत तितकीच ! एकादी वस्तु हरवली तर ती सांपडण्याकरतां तिच्या महत्त्वाचे मानानें हे ग्रंथकार ३ पासून ७ दिवस लंघन सांगतील असें वाटतें ! म. गांधींचे मतें हिंदुमुसलमानांचे दंगे बंद होणें किंवा इतर कोणतीही इष्ट गोष्ट लंघनानें होते, याचाही उल्लेख या ग्रंथांत जरूर पाहिजे होता, तो पुढचे आवृत्तींत येईल अशी आशा आहे. यांना लंघनचिकित्सेचें वेड लागलेलें दिसतें, व तें बरें होई पर्यंत यांनीं स्वतः लंघन करावें असें अमची सुचना आहे.

या लंघनचिकित्सेचे अमेरिकेंतील अध्वर्यु मॅक् फॅडन यांच्या उपदेशानें एक धडधाकट मनुष्य लंघन करून मेला, असें अमेरिकन पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. त्याला कोणताही रोग नव्हता, परंतु त्यानें वजन कमी करण्याकरतां गुरुजींचा उपदेश घेऊन एकनिष्ठपणानें मरेपर्यंत लंघन केलें ! हें उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

मनुष्यानें अन्न किती खावें याचा हिशोब रोजच्या कामावरून अचुक करतां येतो. जास्त काम करणारांस जास्त अन्न खावें लागतें. धार्मिक उपोषणें

विवक्षित वार, तिथि वगैरेंवर अवलंबून असल्यामुळें ज्या दिवशीं जास्त कामामुळें जास्त अन्नाची जरूर असेल त्याच दिवशीं धार्मिक उपोषण असूं शकेल, व असें झाल्यास अत्यंत हानि होईल. अशा रीतीनें शरीराचे हाल झाल्यामुळें पुण्य लागण्याचा धार्मिक उद्देश कदाचित् अधिक साध्य होईल, परंतु तें प्रकृतीस मात्र हितकर होणार नाहीं. ज्यांस भरपूर काम करावें लागतें, त्यांनीं अन्नही भरपूर खाल्लें पाहिजे, असें डॉ. रॉबिनसन यांचें म्हणणें आहे. परंतु हें त्यांनीं म्हटलें नसतें तरीही डोकें वापरणारांस तें सहज कळेल. घरकाम करणाऱ्या स्त्रियांस पुरुषांसारखा व्यायाम होत नाहीं हें खोटें आहे. त्यांसही भरपूर अन्नाची जरूर असते.

सारांश 'तातस्य कूपोऽयं' म्हणून खारें पाणी पिण्याची ज्यांची तयारी असेल; ज्ञान काय तें संस्कृत श्लोकांत भरलें आहे, त्यापेक्षां निराळें ज्ञानच असणें शक्य नाहीं अशी ज्यांची कल्पना असेल; ज्ञान म्हणजे सर्व एकच असतें, त्यांत पौर्वात्य व पाश्चिमात्य असा भेद नसतो हेंही ज्यांस समजत नसेल; त्यांस हें पुस्तक वाचून कदाचित् बरें वाटेल, इतरांस तो वेळेचा अपव्यय होईल.

---

## संततिनियमन बरें कीं हें बरें ?

२३ आगस्ट रोजीं काझी सय्यद रस्त्यांतील एका भंग्याच्या वाटेंत काळ्या कपड्यांत गुंडाळलेली एक नुकतीच उपजलेली मुलगी मेलेली सांपडली. तिच्या मानेवर एक जखम होती. पोलीसनें चौकशी केली परंतु आईबापांचा पत्ता लागला नाहीं.

* * * *

सप्टेंबर १३ रोजीं येथील राणीचे बागेंतील झुडपांत एक तान्ह्या मुलीचें कुजून गेलेलें प्रेत सांपडलें. मरून बरेच दिवस झाल्यामुळें तें आपोआप मेलें कीं मारलें हें समजण्यास मार्ग नव्हता. तथापि तें मूल एखाद्या कुमारिकेचें किंवा विधवेचें असलें पाहिजे हें उघड आहे. या पेक्षां गर्भधारणाच बंद केलेली बरी.

# गर्मीचा एक प्रकार.

——:०:——

गर्मीवर वेळींच उपचार न केल्यास त्याचे जंतु पुष्कळ वेळां मेंदूपर्यंत पोहोंचून त्यास इजा करतात व याचा परिणाम पक्षघात होऊन शरीराची चलन-वलन शक्ति नाहींशी होऊन वेडही लागतें. पुष्कळ दिवसपर्यंत, इतकी स्थिति आल्यावर डॉक्टरांची त्यावर कांहीं मात्रा चालत नसे, व रोगी थोड्याच वर्षांत मरे. परंतु मलेरियाचा जंतु गर्मीच्या जंतूचा पाडाव करूं शकतो असा अलीकडे शोध लागला आहे व त्यामुळें पक्षाघातावर एक नवीन उपाय निघाला आहे. रोग्याच्या अंगात मलेरिया ( हिवताप ) चा जंतु घातल्यानें पुष्कळ रोगी बरे होतात असा अनुभव आल्यामुळें हा उपाय अमेरिकेंत जारीनें सुरू झाला आहे.

हॉलंड् मधें मलेरियाच्या रोग्याचें रक्त घेऊन तें पक्षाघाताच्या रोग्याच्या अंगांत घालतात, व याचा परिणाम जरी बहुधा चांगला होतो तरी एकाच्या अंगांतले इतर रोग रक्ताबरोबर दुसऱ्याच्या अंगांत जाणें शक्य असतें, व त्यामुळें ही पद्धत बरीच धोकयाची असते. इंग्लंडमध्यें रोग्यास मलेरियाचे डांस चावबून जंतु अंगांत घालण्याची पद्धत आहे. [ मलेरियाचे जंतु डासांच्या तोंडांतून मनुष्याच्या रक्तांत व मनुष्याच्या रक्तांतून डांसांच्या अंगांत जात असतात. त्यांच्या वाढीस डांसांच्या शरीराची जरूर असते, व डांस नाहींसे केल्यास थोड्याच दिवसांत जंतूही नाहींसे होतात. ]. १९२६ सालीं ४७९ माणसांवर हा प्रयोग केला, त्यापैकीं शेंकडा ४३ बरे झाले व शेंकडा ४० बरेच सुधारले. अर्थात् हे प्रयोग फार काळजीपूर्वक करावे लागतात व रोग्यास अतिशय जपावें लागतें.

इटालीमधें निरनिराळ्या प्रांतांतील रोग्यांच्या संख्येवरून असें दिसतें कीं जेथें मलेरिया फार आहे तेथें पक्षाघात फारसा नाहीं, व जेथें मलेरिया फारसा नाहीं तेथें पक्षाघात जास्त आहे. तुर्कस्थानांतही अशीच स्थिति दिसून येते.

———

# गुप्त रोगांस प्रतिबंध.

---:o:---

फ्रान्सनें आपल्या वसाहतींत गुप्त रोगांशीं जोरानें लढाई चालविली आहे. पैकीं मॅडॅगस्कार बेटांत शेकडा पाऊणशें लोकांस गर्मी असते. सुतिकागृहांत जन्मलेल्या मुलांपैकीं १९११ त शेकडा २८ मुलांस गर्मीत असे, व हें प्रमाण १९२०त शेंकडा ४३ झालें.

पश्चिम आफ्रिकेंतील वसाहतींत शेंकड ५५ लोकांस गर्मी असते. इंडोचायनामध्यें मलेरि याचा नंबर पहिला व गर्मीचा दुसरा लागतो.

हिंदुस्थानांतील व इतर वसाहतींतही खालील उपाय योजण्यांत येणार आहेत.

१. गरोदर स्त्रियांकरितां मोफत दवाखाना.

२. त्या त्या देशाच्या भाषांतून हस्तपत्रकें वगैरे वाटून व व्याख्यानांनी लोकशिक्षण.

३. रोगांचा प्रतिबंध कसा करावा हें प्रत्येक व्यक्तीस शिकवणें, व सैन्यांत ' जेलोटयूब ' नळया वांटणें ( या अंकांतील जाहिरात पहा )

४. व्यापाराचे बंदरांत येणाऱ्या खलाशांकरतां दवाखान्यांची वेगळी व्यवस्था.

मॅड गॅस्कार बेटांत १९२१ सालीं ७ दवाखाने होते. ' ते १९२५ सालीं ११७ झाले. या दवाखान्यांत १९२१ सालीं गर्मीकरतां ४१०० पिचकाऱ्या मारल्या; १९२५ सालीं ११३२०० मारल्या. याचा अर्थ गर्मीचा प्रसार जास्त झालेला असा नव्हे, तर जास्त लोक दवाखान्यांत जाऊं लागले.

या मानानें ब्रिटिश सरकारनें काय केलें आहे? नीतीच्या गप्पा मारण्यानें हें काम होत नाहीं.

---

# ‘स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो’

——:०:——

( एका फ्रेंच लेखावरून )

हे परमेश्वरा, तूं सर्वशक्ति, सर्वसाक्षो, सर्वव्यापी असुन अत्यंत दयाळू आहेस. तूं अगाध आहेस तरीसुद्धां मनुष्यानें तुला ओळखावें अशी तुझी इच्छा आहे.

वीज, तुफान, ज्वालामुखी पर्वत, धरणीकंप, जलप्रलय हीं सर्व तुझ्या कृपेचींच फळें आहेत. प्राण्यांची वाढ बेसुमार होऊन त्यांस खावयास मिळूं नये ही तुझीच व्यवस्था आहे. दुष्काळ, दारिद्र्य, जीवनकलह, लढाया, खून वगैरे तुझ्याच मुळें होतात, कारण तुझ्या आज्ञेशिवाय पान हालत नाहीं. पटकी प्लेग वगैरे सांथी तूंच आमच्या कल्याणाकरतां पाठवतोस क्षय, रक्तपिती वगैरे तूंच उत्पन्न केलींस. मनुष्यास कामवासना देऊन ती पूर्ण करण्याचा त्यानें प्रयत्न केल्यास परमा, गर्मी वगैरे रोग व्हावे, ही तुझीच युक्ति. बापाच्या कृत्याबद्दल मुलांस शिक्षा तुझ्याशिवाय दुसरा कोण करील ? लहान बालकांचे परम्यामुळें डोळे जावे, किंवा आईबापांपासून गर्मी व्हावी, ही तुझीच कल्पना; कारण इतका दयाळू दुसरा कोण आहे ? कांहीं बालकें जन्मांध, कांहीं बहिरीं, मुकीं असावींत ही तुझीच कृति. दृष्टीसही दिसत नाहींत अशा रोगजंतूंकडून मोठ्या प्राण्यांचे हाल व नाश तूंच करतोस.

तूं सर्वशक्तिमान असल्यामुळे या सर्व गोष्टी तुला बदलतां आल्या असत्या, परंतु तशी तुझी लहर लागली नाहीं व तुला याच गोष्टी बऱ्या वाटल्या. ही तुझी लीला अगाध आहे व तुझे आमच्यावर अनंत उपकार आहेत.

---

येथें कुंभारवाड्यांत गिरजाबाई नांवाच्या एका खाणावळवाल्या विधवेनें आपलें तान्हें मूल खोलींत फरशीखालीं पुरून ठेवलें, तें आक्टोबर २ तारखेस सांपडलें तेव्हां इतकें कुजलें होतें कीं, मुलगा कीं मुलगी हें ओळखतां येईना. तिच्या मुलाच्या साक्षीवरून असें समजलें कीं तिला १५ दिवसांपूर्वी मूल झालें व तिनें तें पुरून ठेवलें व जागा सोडली. यापेक्षां संततिनियमन शतपट बरें !

# धार्मिक दुराग्रह.

——:०:——

‘अरबी भाषेतील सुरस गोष्टी’ पुष्कळ लोक वाचतात, तरी या गोष्टी मूळांत तर राहोच पण त्यांचें अक्षरशः भाषांतर फारच थोड्या लोकांनीं वाचलें असेल. या मूळ गोष्टी अश्लील वाटल्यामुळें इंग्रजी भाषांतरकारांनीं त्यांतील कांहीं भाग सोडून दिला इतकेंच नव्हे तर आणखी कांहीं भागांत वाटेल तसा फेरबदल केला.

या गोष्टींचें इंग्रजींत अक्षरशः भाषांतर प्रथम सर रिचर्ड बर्टन (१८२१–९०) यांनीं टीका व टीपा भरपूर देऊन प्रसिद्ध केलें. त्यांचे मतें या भाषांतराचें ऐतिहासिक दृष्ट्या इतकें महत्त्व आहे कीं त्यांनीं तें केलें नसतें तर जगाचें अतिशय नुकसान झालें असतें. इतर विद्वानांचेंही त्या संबंधीं असेंच मत आहे.

त्यांची बायको लेडी बर्टन ही अडाणी, धार्मिक व हट्टी होती व ती जेझुइट लोकांच्या [ हा एक ख्रिस्ती धार्मिक पंथ आहे, व पाहिजे त्या मार्गानें आपलें काम साधण्यांत त्यांचा हातखंडा असतो अशी प्रसिद्धि आहे. ] पुरी तावडींत सांपडलेली होती. नवरा वारल्यावर त्या गोष्टींची पुन्हां आवृत्ति काढण्याची वेळ आली, तेव्हां ती काढूं देईना, व इतर कांहीं हस्तलिखित भाषांतरेंही तिनें जाळून टाकलीं ! प्रकृति क्षीण झाल्यावरही सकाळपासून संध्याकाळपर्यंत अव्याहत परिश्रम करून तयार केलेल्या ग्रंथांची शेवटीं या बाईच्या मूर्खपणामुळ ही स्थिति झाली, व त्यांतील महत्वाचे भाग तेवढेच तिनें जाळून टाकले.

तिचा मूर्खपणा नवऱ्यास माहीत असल्यामुळें तो तिला हस्तलिखित ग्रंथ कधींही दाखवीत नसे. त्याच्या मरणानंतर तिनें ते वाचले, तेव्हां तिच्या अंगावर शहारे येऊन तिनें त्यांचा नाश केला. इतर विद्वान् लोकांनीं तिला याबद्दल नांवें ठेविलीं तेव्हां, नवऱ्यानेंच स्वप्नांत येऊन ते जाळून टाकण्यास सांगितलें, असें तिनें त्यांस उत्तर दिलें.

जिवंतपणीं तो कॅथोलिक धर्माचा धिक्कार करीत असे, परन्तु त्याचें मृत शरीर या मूर्ख स्त्रीनें कॅथोलिक धर्मोपदेशकांच्या ताब्यांत दिलें व त्या धर्माच्या विधींप्रमाणें त्यास पुरलें, व त्याच्या मित्रांस मुळींच जुमानलें नाहीं.

* * *

पुण्यांतील एका मृत सद्गृहस्थांच्या चिरंजीवांनीं त्यांच्या स्पष्ट इच्छेविरुद्ध त्यांस मंत्राग्नि दिला असें समजतें. यांतही वरील प्रकारचाच दुराग्रह व्यक्त होऊन शिवाय मृत पित्याबद्दल अनादर दिसून येतो.

# संततिनियमनावरील एक आक्षेप.

'टाइम्स ऑफ इंडिया' च्या २५ आगस्टच्या अंकांत जिनीव्हा येथें भरणाऱ्या लोकसंख्यापरिषदेस अनुलक्षून एक संपादकीय लेख आला आहे त्यांत संततिनियमनावर जातां जातां एक शिंतोडा उडवण्याचा प्रयत्न केला आहे- संततिनियमन केल्यानें कुटुंब बेतशीर राहून नेहमींसारखे हाल होणार नाहींत, व यामुळें अशक्त माणस जास्त दिवस जगून आपल्यासारखीच अशक्त प्रजा पैदा करतील असें लेखकाचें म्हणणें आहे. जेथें संततिनियमन प्रचलित नाहीं अशा हिंदुस्थान, चीन वगैरे देशांतील लोक, व संततिनियमन चालू असलेल्या यूरोप, अमेरिकेंतील लोक, यांची शक्तीचे बाबतींत तुलना केल्यास वरील विधानांत कितपत तथ्य आहे हें कोणासही समजेल. संततिनियमनाचीं साधनें किंवा माहिती उपलब्ध नसल्यास अशक्तांबरोबर सशक्तांसही पुरेसें अन्न न मिळाल्यामुळें त्यांचेही हाल होऊन सर्वच अशक्त होतात.

यापेक्षां अधिक समंजसपणाचा आणखी एक आक्षेप संततिनियमनाविरुद्ध घेण्यांत येत असतो, तो हा कीं, उच्च दर्जाचे लोक मात्र संततिनियमन करतात व खालच्या दर्जाचे लोक करीत नाहींत, यामुळें खालच्या दर्जाच्या प्रजेचें प्रमाण वाढतें व एकंदर समाजाचा दर्जा खालावतो. ही गोष्ट इष्ट नाहीं खरी, परंतु त्यावर उपाय कोणता योजतां येईल एवढाच प्रश्न आहे. ज्या लोकांस संततिनियमनाचे मार्ग माहीत झाले आहेत ते ते वापरणारच. तें कायदे करून किंवा व्याख्यानें देऊन बंद होणार नाहीं. तेव्हां सर्वांस या उपायांचें ज्ञान करून देणें एवढाच उपाय राहिला. म्हणजे खालच्या दर्जाचे लोक त्यांचा उपयोग करून अधिक सुखी होतील, व समाजाचा दर्जाही खालावणार नाहीं.

त्याप्रमाणें प्रसार केल्यामुळें स्वीडन देशांत हल्लीं श्रीमंत लोकांपेक्षां गरीब लोकांमध्यें संततीचें मान एक चतुर्थांश कमी झालें आहे, व हीच स्थिति सर्वत्र होऊं शकेल.

शिवाय, प्रजा सुदृढ व्हावयास पाहिजे असेल तर रोगट लोकांस मुलें न होऊं देणें, व त्यांनीं हें खुषीनें कबूल न केलें तर मागें वर्णन केल्याप्रमाणें ( सप्टेंबर १९२७ चा अंक पहा ) शस्त्रक्रियेचा प्रयोग करणें एवढाच उपाय हल्लीं शक्य आहे.

———

# मांसाहार*

——:o:——

या विषयाचा शास्त्रीय विचार करण्याऐवजीं बहुतेक लोक धार्मिक किंवा पारंपरिक समजुतींवर जोर देत असतात. कोणत्याही एकाच प्रकारच्या अन्नावर विशेष भर न देतां अनेक प्रकारचा मिश्र आहार करणें हेंच सर्वांत हितावह आहे असें शास्त्रीय दृष्टीनें दिसतें. म्हणजे पाप, पुण्य, जनावरांचे आत्मे वगैरे धार्मिक कल्पनांस थोडा वेळ रजा देऊन केवळ शारीरशास्त्राच्याच दृष्टीनें विचार केला तर मिश्र आहारच प्रशस्त दिसतो. हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचा प्रसार होण्यापूर्वी ब्राह्मणही मांस खात होते व इतर जाति हल्लींही खातात.

'मनुष्याची उत्पत्ति वानरांपासून आहे, वानरांप्रमाणेंच मनुष्याचे दांतही मांस खाण्यास योग्य नाहींत, तेव्हां वानरांप्रमाणेंच त्यांनींही वनस्पत्याहार करावा' असें कांहीं लोक म्हणतात. परंतु हें सर्वच काल्पनिक आहे. लहान प्राणी व अंडीं वानरांचे भक्ष्यस्थानीं पडतात हें सुप्रसिद्ध आहे.

कांहीं प्रकारचे रोगजंतु व जंतांचीं अंडीं मांसाबरोबर पोटांत जाण्याचा संभव असतो हें खरें, परंतु मांस चांगलें शिजल्यास त्यांपासून भीति नाहीं. मांसामुळें यूरिक ॲसिड उत्पन्न होतें व त्यामुळें बरेच रोग होतात अशी समजूत गेल्या शतकांत होती परंतु तीही आतां खोटी ठरली आहे. संधिवात झालेल्या लोकांस मांस बाधेल हें खरें, परंतु त्यांस नुसतें मांसच वर्ज करून भागत नाहीं, बरींच कडधान्येंही वर्ज करावीं लागतात.

मांसाहारानें कॅन्सर होतो या म्हणण्यांतही बिलकुल तथ्य नाहीं. कॅन्सरचें कारणच अजून सांपडलेलें नाहीं, तेव्हां त्यासंबंधीं पाहिजे त्यानें पाहिजे तें म्हणावें इतकेंच.

मांसाहारानें मनुष्य वाघासारखा क्रूर होण्याचा संभव आहे असें कांहीं लोकांस वाटतें, परंतु पुष्कळ गाई म्हशी मारकुट्या असतात व पुष्कळ कुत्रे अत्यंत गरीब असतात हे ते विसरतात. एस्किमो हे लोक अत्यंत सौम्य असतात, व त्यांचा आहार केवळ मांसमय असतो. स्टीफन्सन यांचा या बाबतींतील अनुभव मागें दिलाच आहे.

कांहीं लोक बर्नार्ड शॉ किंवा ॲनी बेझंट सारख्या प्रसिद्ध व्यक्तींचें अनुकरण करण्याकरतां मांसाहार सोडतात. अशा एका मनुष्यास मांसाहार सोडल्यापासून चार महिन्यांत ॲपेंडिसिटिस झाला. तेव्हां तो आहार बदलल्यामुळें झाला अशी त्याची (चुकीची) खात्री होऊन तो दिवसांतून तीनदां मांस खाऊं लागला!

---

* हा लेख अमेरिकन मेडिकल असोशिएशननें चालविलेल्या 'हायजिया' मासिकांतील एका लेखाचे आधारें लिहिला आहे.—सं.

# ताजी व शिळी बातमी.

——:०:——

१९२६ सालांत निरनिराळ्या देशांतील दरहजारीं जन्ममानाचे आंकडे खालील प्रमाणें होते. स्वीडन १६. ९, ग्रेटब्रिटन १८. १, स्विट्झर्लंड १८. ४, फ्रान्स १८. ८, बेल्जिअम् १९, जर्मनी १९.५, नॉर्वे १९. ७, युनाइटेड् स्टेट्स २०. १, हॉलंड् २३. ८, हंगेरी २६. ७, इटाली २७. ६. यावरून हें स्पष्ट होतें कीं फ्रान्सबद्दल जी विधानें नेहमीं करण्यांत येतात त्यांत फारसें तथ्य नाहीं. फ्रान्सचें जन्ममान ग्रेट ब्रिटन पेक्षां जास्त असतांही तेथें लोकसंख्या मात्र फारच सावकाश वाढते याचें कारण तेथील मृत्यूंचें प्रमाण जास्त आहे. व याचें कारण आरोग्याच्या बाबतींत कांहीं युरोपीय राष्ट्रांच्या मानानें तो देश मागसलेला आहे.

* * *

कौन्सिलच्या पुणें येथील बैठकींत श्री. रहिमतुल्ला यांनीं मुंबईतील वेश्यांसंबंधीं प्रश्न विचारला, त्यास सरकारनें दिलेल्या उत्तरावरून असें समजतें कीं मुंबईत विदेशी वेश्या १९२४ मधें ५, १९२५ मधें ६ व १९२६ मधें ६ नवीन आल्या. त्यांस कोणींही आणलें नाहीं, त्या आपण होऊन स्वखुषीनें आल्या, व त्यांस येऊं न देण्याचा प्रयत्न सरकारनें केला नाहीं. मुंबईतील जपानी वेश्यांपैकीं जपान सरकारच्या प्रतिनिधीमार्फत १९२४ मधें ९, १९२५ मधें ४, १९२६ मधें ९ व १९२७ मधें ५ वेश्या जपानांत परत पाठवल्या.

× × ×

खांडवा येथील अबदुल हुसेन नांवाच्या एका बोहऱ्यानें ४ वर्षे वयाच्या हिंदु मुलीवर अत्याचार केल्याबद्दल मॅजिस्ट्रेटानें त्यास ५ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली, त्यावर त्यानें अपील केलें आहे.

\+ + +

तीन हिंदु नवऱ्यांनीं क्षुल्लक कारणांवरून आपल्या बायकांचीं नाकें कापल्याबद्दल त्यांस मॅजिस्ट्रेटांनीं दिलेल्या शिक्षा हायकोर्टानें वाढवून प्रत्येकीं दोन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा दिली. बायका म्हणजे भाजी नव्हे हें अजूनही कित्येक नवऱ्यांस समजत नाहीं.

* * *

बडोद्याचे राज्यांत लग्नाचे वेळीं मुलीचें वय कमींत कमी १४ वर्षे व मुलाचें १६ वर्षे असलेंच पाहिजे असा कायदा पास झाला. याविरुद्ध वागणारांस तुरुगांत जावें लागेल.

* * *

ऑक्टोबर २५ तारखेस गोव्याची एक मुलगी शेख मेमन रस्त्यांतील रोषनाई पहात असतां मागून कोणीं स्पर्श केला असें वाटल्यावरून मागें वळते तों अबदुल हुसेन नांवाच्या एका बोहऱ्यानें तिला मिठी मारिली व पोलीसचा शिपाई येऊन त्याला पकडीपर्यंत तिला तो सोडीना. मॅजिस्ट्रेटापुढें उभें केल्यावर, ती गाडीखालीं सांपडूं नये म्हणून मीं तिला बाजूला ओढून वांचवली, अशी थाप दिली. त्या दिवशीं अर्धा रस्ता मनुष्यांकरतां राखून ठेवल्यामुळें हें असंभाव्य वाटून त्यानें आरोपीस रु. ३०० दंड केला. आरोपीस शौक जरा महागच पडला !

× × ×

विजापूर येथील एका अज्ञान मुलीला फुसलावून आणून सफेद गल्लींतील एका वेश्यागृहांत ठेवल्याच्या आरोपावरून येथील एक कुंटीण शेऊबाई व तिची आई यांवरील खटला सेशन कमिट केला.

* * *

माटुंगा येथील त्रिंबक चाळींतील संडासांत नवंबर ६ तारखेस तान्हें मूल मेलेलें सांपडलें. त्याच आवारांतील एका झोंपडींत एक विधवा रहात होती तिचें तें मूल असावें असा पोलीसनें शोध लावला. मूल गुदमरून मेलें अशी डॉक्टरनें साक्ष दिली.

सातारा जिल्ह्यांत कोरेगांव तालुक्यांतील गोविंदा माळी याची मुलगी सखू नवऱ्यानें मुंबईहून घालवून दिल्यावरून बापाकडे आली. तिला भूत लागलें आहे असें वाटून त्यानें तिला वाई तालुक्यांत एका पंचाक्षऱ्याकडे नेली. तिला असाध्य रोग असुन तिची कामवासना फार प्रबल आहे, तेव्हां ती बरी होणें शक्य नाहीं असें त्यानें सांगितलें. परत येतांना त्यांचें भांडण होऊन त्यानें तिच्या पाठींत एक दगड घातला व ती मेली असें समजून तिला कड्यावरून लोटून दिली. ती एका झाडांत अडकून वांचली, व खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल बापावर खटला झाला. तिला हलक्या लोकांची संगत लागल्यामुळें आपली बेअब्रू झाली व ती बरी होणार नाहीं असें पंचाक्षऱ्यानें सांगितल्यावरून आपण तिला मारली, असें त्यानें सांगितलें. परंतु जज्जास ही सबब पुरेशी न वाटून त्यानें सात वर्षे सक्त मजुरीची शिक्षा फर्माविली. बायकोच्या, मुलीच्या, बहिणीच्या वाईट वागणुकीमुळें आपली बेअब्रू होते. व स्वतः खून करण्यानें बेअब्रू होत नाहीं, अशी बऱ्याच लोकांची कल्पना दिसते !

* * *

उमरावती येथें एका मुसलमान वेश्येस हिंदु करून घेतली असें समजतें. मुसलमान वेश्यांपेक्षां हिंदु वेश्यांत काय अधिक असतें ?

* * *

ग्वालेरच्या लष्करांतील रहिमतुल्ला नांवाच्या एका शिपायानें एका सुंदर मुलीशीं लग्न करून नोकरी सोडून दिली व तिला वेश्येचा धंदा करावयास लावून तिच्या मिळकतीवर चरितार्थ चालवूं लागला ! तो पंजाब, मध्यप्रांत वगैरे करीत कलकत्ता येथें राहूं लागल्यावर तिच्या एका गिऱ्हाइकानें ही हकीकत तिच्या बापास कळविल्यावरून त्यानें पोलीसकडे तक्रार केली व त्यास सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली.

* * *

एक मुसलमान स्त्री आपल्या नवऱ्यास सोडून एका वीस वर्षांच्या तरुणाजवळ राहिली. तो एके दिवशीं घरीं येतो तों ती त्याच्या बहिणीच्या नवऱ्याबरोबर एकांतांत सांपडली, व माझी तुझ्यावर आतां प्रीति नाहीं असें तिनें त्यला सांगितलें. रात्रभर तिचें मन वळविण्याचा प्रयत्न निष्फळ झाल्यामुळें तरुणानं

तिचा गळा वस्तऱ्यानें कापून समोरच्या चाळींत जाऊन तिच्या आशकास जखम केली. हायकोर्टानें त्यास दहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली.

* * *

बोरीबंदरावर एक परदेशी मजुर व त्याची बायको निजली असतां त्यानें एकाएकीं रात्रीं १ वाजतां उठून बायकोच्या छातीवर बसून तिचें नाक कापलें. बायको एका मुसलमानाबरोबर पूर्वी दोनदां पळून गेली होती, व तोच मुसलमान पुनः तेथें दिसल्यावरून चिडून आपण हें काम केलें, असें त्यानें कोर्टांत सांगितलें. त्यास १ वर्ष सक्तमजुरी व ३० रु. दंड झाला.

* * *

पांच वर्षापूर्वी नाशिक जिल्ह्यांतील सुंदराबाई नांवाची एक खेड मुलगी ११ वर्षांची असतां विधवा झाली, व पुनः लग्न करून नवऱ्याबरोबर मुंबईस आली. त्याच्या पहिल्या बायकोनें तिला जाच केल्यामुळें ती एक वर्षापूर्वी भावाकडे माटुंग्यास पळून गेली. कांहीं दिवसांनीं तिला दुसरा भाऊ सुखा हा भेटला व ती त्याच्याबरोबर कुरला येथें रहावयास गेली. या भावानें तिला खारवा गल्लींत हसीनाबाई नांवाच्या कुंटणीकडे नेली व प्रथम तिला रु. ८ पगारावर घरकामाला लावून नंतर वेश्येच्या धंद्याला लावावी असा ठराव केला. कुंटिणीनें भावाला एका पठाणाकडून रु. २५ देवविले, व ते तिच्या पगारांतून फेडावे असें ठरलें. हा सर्व प्रकार पोलीसला कळल्यामुळें कुंटिणीस दीड वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली.

× × ×

मल्व्वा नांवाच्या एका मुलीनें आपल्या सासुस एका मुसलमानाशीं बोलतांना पाहिलें व त्यासंबंधीं तिला विचारलें. यावरून रागावून गेल्या सप्टेंबर १० रोजीं मध्यरात्रीं सासू सासऱ्यांनी तिचे हातपाय धरून ठेवले व नवऱ्यानें बिब्याचें तेल व ॲसिड ( तेजाब ) यांचें मिश्रण तयार करून तिच्या गुप्त भागांवर ओतलें व चोळून लावलें. त्यामुळें आग होऊन ती ओरडूं लागली तेव्हां सुरीनें मान कापण्याची तिला भीति घातली यानंतर तीन दिवस तिला कोठें जाऊं दिली नाहीं व सक्त पहारा ठेवला. चौथे दिवशीं तिनें संधि पाहून ही हकीकत एका नातलगास कळविली व बापास कळल्याबरोबर त्यानें तिला वेळगांवचे सरकारी इस्पितळांत नेली.

याबद्दल फिर्याद होऊन नवऱ्यास एक वर्ष सक्त मजुरी व सासू सासऱ्यास प्रत्येकीं ५० रुपये दंड झाला.

* * *

UNIVERSITY OF
POONA
Jayakar Library

समाज-स्वास्थ्य.

Vol. १. Nos. १-१२.
Pages
Months जुलै-जून.
Year १९२७-२८.

POONA UNIVERSITY
JAYAKAR LIBRARY
RARE-BOOK
Kept Separately
Not to be issued out

Y1m2:N27
155F7.1
289530

जुने
Vol.1 - 1927-28
Vol. 1 - 12

289530.

श्रीमती. शकुंतलाबाई परांजपे.

यांजकडून

पुणे विद्यापीठ, जयकर ग्रंथालयास भेट

# आमचा उद्देश.

व्यक्तींच्या व समाजाच्या शरीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधीं उपायांची चर्चा करणें हा या मासिकाचा उद्देश आहे. विशेषतः ज्या विषयां-संबंधीं लेख छापण्यास इतर पत्रकार लाजतात किंवा भितात असे विषय कितीही महत्त्वाचे असले तरी त्यासंबंधीं माहिती मिळवण्यास सामान्य वाच-कांस अतिशय अडचण पडते, व ही अडचण दूर करण्याचा आमचा विचार आहे. यांत केवळ तत्त्वज्ञानाचा खलच न करतां व्यवहारोपयोगी माहितीही दिली जाईल.

'कामशास्त्र' या शब्दाचा दुरुपयोग झालेला आहे, तरी ही 'कामवासनेचा शास्त्रीय दृष्टीनें विचार' अशा अर्थानें हा शब्द वापरणें आम्हांस भाग पडत आहे. याबद्दल कोणासही क्षुब्ध होण्याचें कारण नाहीं.

सध्यां २४ पानेंच छापीत आहों. लोकाश्रय पुरेसा मिळाल्यास पृष्ठसंख्या वाढवितां येईल.

मुंबईवैभव छापखान्यानें हें मासिक छापण्याचें एकाएकीं नाकारल्यामुळें हा अंक निघण्यास थोडा उशीर झाला आहे, व अशा अडचणीच्या वेळीं वैद्य ब्रदर्सच्या छापखान्यानें हें काम हातीं घेतलें याबद्दल आम्ही फार आभारी आहों.

संपादक.

* प्रस्तुतकालीं ...

S. Yhm2: N27
155F71
289530

# समाजस्वास्थ्य.

वर्ष १ जुलै १९२७ अंक १

संपादकः—र. धों. कर्वे.

## अनुक्रमणिका.



| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ आमचा उद्देश | ... | ... | १ |
| २ विनय म्हणजे काय. | ... | ... | २ |
| ३ संततिनियमन | ... | ... | ९ |
| ४ ताजी व शिळी बातमी. | ... | ... | ११ |
| ५ नवीन ग्रंथांतील निवडक विचार. | | ... | १३ |
| ६ ब्रह्मचर्य. | ... | ... | १५ |
| ७ गर्भपाताचें एक कारण. | ... | ... | १६ |
| ८ सर्दी कशानें होते. | ... | . | १७ |

९ एक उपयुक्त संस्था—भुतांची सरकस. बॉम्बे सोशल हायजीन् कौन्सिल—एकत्र शिक्षण. चालू नीतीचे परिणाम.

# विनय म्हणजे काय ?

विनय या शब्दाचा निरभिमान किंवा निरहंकार असाही अर्थ आहे, परंतु हा अर्थ येथें घेण्याचा आमचा विचार नाहीं. त्याचा दुसरा अर्थ म्हणजे मर्यादशीलपणा याचा विचार येथें कर्तव्य आहे. हा गुण स्त्रियांमध्यें स्वाभाविक असतो व त्यांनाच तो विशेष शोभतो अशी सामान्य कल्पना प्रस्तुतकालीं* दिसून येते. आपल्या समाजांत या गुणामुळें स्त्रियांस पुरुषांचे देखत सरळ बसतां किंवा उभें राहतां येत नाहीं; मुरकावें लागतें, किंवा खालीं मान घालावी लागते. अनोळखी पुरुषाशीं आपण होऊन बोलणें लांबच, परंतु त्यानें एकादा प्रश्न विचारल्यास त्याचें उत्तरही स्त्रियांकडून मिळणें कठिण. यामुळें, यजमान घरीं आहेत कीं नाहींत ही बातमी सुद्धां स्त्रीकडून परक्या पुरुषास मिळणें शक्य नसतें. या गुणाचा आणखी एक परिणाम म्हणजे शृंगारविषयक बोलणें निघालें असतां स्त्रियांनीं उठून जाणें, किंवा तें शक्य नसल्यास न ऐकलेंसें करणें. देशकालपरत्वें शरीराचे निरनिराळे विशिष्ट भाग किंवा सर्व शरीर पुरुषांचे दृष्टीस उघडें पडल्यास लज्जेचा अगदीं कळस होतो.

विनय किंवा लज्जा हा स्त्रियांचा स्वाभाविक गुण नसून सामाजिक परिस्थितीमुळें उत्पन्न होतो हें थोड्याशा विचाराअंतीं सहज दिसून येईल. मुलीं-

---

* प्रस्तुतकालीं म्हणण्याचें कारण प्राचीनकालीं जवळ जवळ सर्व देशांत स्त्रियांचें वर्चस्व होतें, व तेव्हां हा गुण विशेषतः पुरुषांनाच उचित व स्वाभाविक समजला जात असे, असा शोध अलीकडे लागला आहे.

[ The Dominant Sex, by Eden & Cedar Paul.]

मध्यें स्वाभाविक रीतीनें लज्जा उत्पन्न होत नसून आया मुलींस लाजण्यास शिकवितात असें आमच्या पाहण्यांत आहे. अर्थात् हा सामाजिक गुण असल्यामुळें जोंपर्यंत स्त्री दुसऱ्याच्या, विशेषतः पुरुषांच्या दृष्टीस पडत नाहीं, तोंपर्यंत विनयाचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. यामुळेंच उघडपणें पुरुषांकडे पाहिल्यानें जरी विनयास बाध येतो, तरी स्त्रिया शक्य असल्यास चोरून पाहतात हें सर्वांस माहीत आहे. यासंबंधीं सर्व निर्बंध पुरुषांच्या वर्चस्वाचा परिणाम होत, व पडदा, बुरखा वगैरेंचे जाचक नियम केवळ पुरुषांच्या दराऱ्यामुळेंच पाळले जातात. पडदानशीन स्त्रियांचा पडदा पुष्कळ वेळां घरांतल्या पुरुषांपुरताच असतो व इतर पुरुषांच्या दृष्टीस पडल्याबद्दल त्यांना बिलकूल वाईट वाटत नाहीं. अशी एकादी स्त्री घरांतील पुरुषाबरोबर गाडींतून जात असल्यास त्या दोघांचे मध्यें पडदा असतो, परंतु स्त्री मागच्या खिडकींतून रस्त्यांतील मौज पहात असते! प्रसिद्ध फ्रेंच लेखक प्येर लॉती यांनीं तुर्की स्त्रियांसंबंधीं असें लिहिलें आहे कीं त्यांच्या बुरख्याची जाडी सौंदर्याच्या व्यस्त प्रमाणांत असते, म्हणजे स्त्री जितकी अधिक सुंदर तितका बुरखा पारदर्शक होतो! सौंदर्य झांकून ठेवण्याची बुद्धि स्वाभाविक कशी असेल?

शरीराचे कोणते भाग कोणत्या वेळीं लज्जास्पद समजावे याबद्दल निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या विचित्र समजुती आढळतात. कांहीं रानटी जातींमध्यें स्त्रिया व पुरुष नेहमींच नग्न असतात हें पुष्कळांस माहीत असेल. परंतु कपडे घालणाऱ्या रानटी लोकांसही नग्नपणाची लाज वाटत नाहीं इतकेंच नव्हे तर सणाच्या दिवशीं स्त्रियांनीं नग्न होऊन नाच करण्याची वहिवाट असते. न्यू गिनीमधील नर्तकींचें डॉ. सलिग्मन यांनीं पुढील वर्णन दिलें आहे: नाचतांना त्यांच्या जघनास इतकी वेगावान गति मिळते कीं त्यामुळें नसलेलें वस्त्र साफ वर उडून जघनावरचें गोंदणें दृष्टीस पडतें.

आणखी एका लेखकानें पुढील वर्णन दिलें आहे. कांहीं लोक दुसऱ्या दिवशीं होणाऱ्या जंगी नाचाची तयारी म्हणून नग्न स्त्रियांच्या व मुलांच्या

अंगावर रंगी बेरंगी चित्रें काढीत होते....दुसऱ्या दिवशीं नाच करतांना त्या स्त्रियांचे अंगावर भडक रंगांशिवाय कांहींही आच्छादन नव्हतें, व नाच संपल्यावरही त्या तशाच इकडे तिकडे हिंडत होत्या, परंतु त्यांच्या चेहऱ्यावर लज्जेची छाया बिलकूल दिसली नाहीं.

आफ्रिकेंतील नीग्रो लोक रतिसंभोगाबद्दल आपसांत उघडपणें चर्चा करतात, परंतु परकी मनुष्यासमोर मात्र ते स्पष्ट बोलत नाहींत. समागम म्हणजे पाप ही कल्पना रानटी लोकांत नसते व म्हणूनच या कल्पनेची आनुषंगिक लज्जा ही त्यांच्यांत दिसत नाहीं. टॅस्मॅनियामधील मूळच्या रहिवाश्यांबद्दल मि. रॅाथ म्हणतात कीं त्यांचे नग्न नाच युरोपीय लोकांस कसेसेच दिसतील हें खरें परंतु त्यांच्या कोणत्याही कृतींत किंवा हालचालींत बीभत्सपणा नसतो.

आतां सुधारलेल्या लोकांतील विनयाचे कांहीं प्रकार पाहूं. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या लोकांच्या स्त्रियांचे पोषाख पाहिल्यास, कोठें नखसुद्धां कोणाच्या दृष्टीस पडूं नये अशी व्यवस्था असते, तर कोठें मध्यवर्ती विशिष्ट भाग तेवढाच झांकण्याची इच्छा दिसते. जवळ जवळ नग्न राहणाऱ्या कांहीं, व सर्वांग झांकणाऱ्या कांहीं जाती वर्ज केल्यास, डोकें, हात व पाय यांशिवाय बाकी बहुतक शरीर झांकण्याचा प्रघात दिसतो. पारंपरिक महाराष्ट्रीय स्त्रियांच्या पोटाचा कांहीं भाग व चालतांना जंघांपर्यन्त पाय दिसल्यास विनयभंग होत नाहीं इतकेंच नाहीं, तर हे भाग झांकण्याकरतां पोलकीं किंवा मोजे घातल्यानेंच मर्यादेचें उल्लंघन होतें असें पुराणमत आहे. शिवाय नदींत किंवा समुद्रांत स्त्रिया व पुरुष एकत्र स्नान करतांना दोघांचेंही जवळ जवळ सर्व शरीर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें परस्परांस दृश्य झाल्यास त्यापासून विनयास बाध येत नाहीं.

तोंडावर बुरखा किंवा पदर घेणाऱ्या कांहीं जातींतील स्त्रियांस फक्त चेहऱ्याची मात्र लाज वाटते, व इतर सर्व नग्न शरीर लोकांस दाखविण्यास त्यांची हरकत नसते. तें शरीर कोणाचें आहे हें समजलें नाहीं म्हणजे झालें !

इंग्लंडांत स्त्रियांचे पाय–पाऊल सुद्धां–उघडे दिसतां कामा नये, परंतु खांद्यापर्यंत हात व चूचुकांशिवाय स्तनांचा बाकीचा भाग उघडा असल्यास चालतो इतकेंच नव्हे, तर निदान उच्च दर्जाच्या स्त्रियांस सायंकाळीं मेजवानीचे किंवा नाचाचे प्रसंगीं हे भाग उघडेच ठेवावे लागतात. अर्धवट पोषाख केलेला किंवा रात्रीचे कपडे*घातलेला पुरुष दृष्टीस पडल्यास स्त्रियांनीं लाजलें पाहिजे असा तेथें निर्बंध आहे. यासंबंधीं एका फ्रेंच लेखकानें एक मजेदार गोष्ट दिली आहे, ती अशीः—मी इंग्लंडांत एका ओळखीच्या गृहस्थाकडे उतरलों असतां त्याची तरुण मुलगी माझ्याच वयाची असल्यामुळें आमची चांगली गट्टी जमली. एके दिवशीं सकाळीं मी रात्रीच्या कपड्यानिशींच स्नानगृहाकडे जात होतों तों जिन्यांत तिची गांठ पडली. मी 'गुड् मॉर्निंग्' म्हटलें पण जणूं काय मी दिसलोंच नाहीं असें मिष करून ती चालती झाली. तिची मर्जी खप्पा होण्याचें कारण मला कांहीं केल्या समजेना. नंतर मी पोषाख करून भोजनगृहांत गेलों तों तेथें ती नेहमीप्रमाणें बोलूं लागली तेव्हां मी तर्क बांधला कीं हा पोषाखाचा परिणाम असावा! कांहीं वेळानें तिला घेऊन मी एका होडींतून नदीवर फिरावयास गेलों. कांहीं अंतर जातों तों कांहीं पुरुष तेथील रिवाजाप्रमाणें दिगंबर होऊन एका फळीवरून नदींत उड्या मारीत होते. तें पाहून त्या मुलीला लाज वाटली नाहीं इतकेंच नाहीं तर त्यांपैकीं तिच्या ओळखीचा एक तरुण पोहत आमच्या होडीजवळ आला व अशा स्थितींत ती त्याच्याशीं गप्पा मारीत राहिली! मी आपल्या मनाशीं ठरवलें कीं इंग्रजांच्या विनयाच्या कल्पना कांहीं अजब आहेत.

ही गोष्ट काल्पनिक परंतु संभवनीय आहे, व पुढील प्रकार आम्ही स्वतः पाहिला आहे. सकाळचे प्रहरीं आमची बोट सुएझच्या कालव्यांतून संथपणें चालली होती. कालवा अरुंद असल्यामुळें कांठावरील गोऱ्या लष्कराचें ठाणें

* रात्रीं निजतांना जास्त सैल कपडे घालण्याची यूरोपांत वहिवाट आहे.

अगदीं जवळ होतें. त्यांतून कांहीं सैनिक नग्न स्थितींत पोहत बोटीच्या अगदीं जवळ आले, व बोटींतील बहुतेक सर्व युरोपियन् स्त्रिया हा प्रकार बिलकूल लाजल्याशिवाय पहात होत्या !

आमचे एक हिंदी मित्र एका जपानी गृहस्थाकडे रहात असतां एके दिवशीं स्नानाचे खोलींत स्नान उरकून पाहतात तों कपडे निजावयाचे खोलींत राहिले. तसेंच तेथपर्यंत पळत जावें तर वाटेंत घरची मालकीण शिवीत बसली होती. हे स्नान करून बाहेर कां येत नाहींत म्हणून तिनें तपास केला व कारण समजलें तेव्हां तिला मोठें हंसूं कोसळलें ! 'त्यांत लाजण्याचें कांहींच कारण नव्हतें, आमचा हा प्रघातच आहे' असें तिनें सांगितलें. जपानी पुरुष व स्त्रिया एकमेकांचे देखत उघडपणें नग्न स्नान करतात हें विश्रुतच आहे.

यावरून स्त्रियांमध्यें कांहीं विशेष प्रकारचा नैसर्गिक विनय असतो ही कल्पना खरी दिसत नाहीं. स्त्रियांच्या आपसांतल्या गोष्टी त्यांना नकळत ऐकण्याची संधि मिळाल्यास यांचा अनुभव येतो. विनय म्हणजे एक सामाजिक ढोंग आहे. मनुष्यास वेड लागल्यास त्याच्या मनावरचा सामाजिक दाब नाहींसा होतो, व त्याबरोबर लज्जाही साफ नाहींशी होते. डॉ. फॉरेल् बरींच वर्षें वेड्यांचे इस्पितळावर होते, त्यांनीं असें लिहिलें आहे कीं ज्या स्त्रियांची विनय-शीलत्वाबद्दल विशेष ख्याती असते त्यांस वेड लागलें असतां त्या इतरांपेक्षां जास्त बीभत्स होतात.

वस्तुतः स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या नग्न शरीरांत, तटस्थ वृत्तीनें पाहणाराला लाज वाटण्यासारखें कांहींच नाहीं. परंतु नैसर्गिक प्रवृत्ति दडपून टाकूं पाह-णाऱ्या सामाजिक निर्बंधांच्या तडाख्यांत मनुष्याची तटस्थ वृत्ति रहावी कशी ? स्त्रीपुरुषांच्या परस्पर आकर्षणामुळें परस्परांचें अनावृत शरीर पाहण्याची दोघांसही इच्छा असणें स्वाभाविक आहे. ही इच्छा नैसर्गिक असल्यामुळें ती दाबण्याचा जितका प्रयत्न करावा तितकी ती अधिक प्रबल होते. नग्न चित्रें

व पुतळे लोकांस विशेष आवडतात यांतील इंगित हेंच आहे. नग्न चित्रें विकणें कायद्यानें बंद केल्यास लोक दसपट किंमती देऊन तीं घेण्यास तयार होतात. उलटपक्षीं ज्यांस अशीं चित्रें किंवा शरीरें वारंवार दिसतात त्यांची ही इच्छा नेमस्त राहते.

ईश्वराचें अस्तित्व मानणारांस तरी निदान ईश्वरनिर्मित मानवी शरीरांत कांहीं लज्जास्पद दिसणार नाहीं असें कोणास वाटेल, परंतु हे लोक ईश्वरासही नीति आणि विनय शिकवूं पाहतात ! स्पेनमधील ख्रिस्ती जोगिणींच्या मठांतील विद्यार्थिनींचें लक्ष भलतीकडे जाऊं नये म्हणून त्यांना जननेंद्रिय धुण्याची सक्त मनाई असते ! ऑस्ट्रिआमधील पुष्कळ जोगिणी ख्रिस्तानें आपणांस नग्न पाहूं नये म्हणून निजतांना त्याचे मूर्तींवर रुमाल टाकतात ! अलीकडे कॅथोलिक पंथाच्या ईश्वराचे प्रतिनिधि पोप यांनीं स्त्रियांचे हात अस्तनीच्या बाहेर अमुक इंचांपेक्षां जास्त दिसतां कामा नये असा फरमान सोडला आहे. या बहादरांना हातही अश्लील दिसूं लागले ! हा प्रकार वाढत गेल्यास शरीराचा कोणताही भाग अश्लीलतेच्या आरोपांतून सुटणार नाहीं.

ग्रीक आणि रोमन लोकांच्या भरभराटीचे वेळीं स्त्रीपुरुषांचे व देवादिकांचे पुतळे नग्न असत, व त्यांची त्यांना लाज वाटत नसे. नंतर ख्रिस्ती धर्माबरोबर दांभिकवृत्ति वाढत गेल्यामुळें पुतळ्यांचे मध्यभागीं अश्वत्थपत्र खोदण्याची पद्धत पडली. यामुळें अश्वत्थपत्राचें नांव काढल्याबरोबर अश्लील कल्पना मनांत येऊं लागल्या, व गरीब बिचारें झाडाचें पान सुद्धां अश्लील होऊन बसलें ! याच तत्वावर इंग्लंडांत ‘ विजार ’ हा शब्द अश्लील झाला आहे व तो स्त्रियांच्या देखत उच्चारीत नाहींत ! आपल्या समाजांत पतिपत्नींनीं परस्परांचें नांव न घेण्याच्या पद्धतीच्या मुळाशीं अश्लीलतेच्या फाजील कल्पनाच असाव्या असें दिसतें.

सारांश, अशा रीतीनें अश्लीलतेच्या व विनयाच्या कल्पनांस फाजील व्यापकता देणें अत्यंत हास्यास्पद आहे, व या कल्पना वर सांगितल्याप्रमाणें

स्वच्छतेच्या आड येऊं लागल्यास तें धोक्याचें आहे. स्वच्छतेपेक्षां विनयाचें महत्व जास्त समजणें समाजास घातक आहे व अशा प्रकारास शक्य तितक्या लवकर आळा घातला पाहिजे. नग्न राहणाऱ्या रानटी लोकांचें शरीर कोणत्याही सुधारलेल्या लोकांपेक्षां मजबूत व बांधेसूद असतें याचें एक कारण * त्यांची नग्नता हेंच आहे.

समाजाच्या अंगीं खिळलेल्या कल्पना एकदम बदलणें शक्य नाहीं हें खरें परंतु या दृष्टीनें प्रत्येकानें जोराचा प्रयत्न केला पाहिजे. त्याची पूर्वतयारी म्हणजे प्रत्येक स्त्रीनें व पुरुषानें शरीराचे सर्व भाग शक्य तितके स्वच्छ ठेवण्याचा मनापासून यत्न केला पाहिजे. जसें कित्येक लोकांच्या घरीं दिवाणखान्यांत खूप ऐट केलेली असून बाकीच्या खोल्या घाणेरड्या असतात त्याचप्रमाणें कांहीं लोक हात, तोंड वगैरे शरीराचे दृश्य भाग तेवढेच स्वच्छ ठेवतात व बाकीच्या शरीराची तितकी निगा राखीत नाहींत. हें योग्य नाहीं. आपणांस कोणीं नग्न पाहिलें असतां त्यास किळस येतां कामा नये अशी प्रत्येकाची तयारी पाहिजे. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्.'

---

## संततिनियमन.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील कायद्याप्रमाणें संततिनियमनांच्या साधनांबद्दल माहिती देणें हा गुन्हा आहे. तरीही तेथें सर्व शहरांत जन्मसंख्या झपाट्यानें कमी होत आहे. न्यूयॉर्कमध्यें ही संख्या १९२० सालीं दर हजारीं २३-४५ होती, ती १९२५ सालीं २०.६० झाली. शिकॅगो शहरीं याच पांच वर्षांत ही संख्या २४.३० पासून १९.९१ पर्यंत उतरली. हीच स्थिति इतर मोठ्या शहरांची आहे.

---

* दुसरें कारण म्हणजे त्यांचे व्यायामाचे प्रकार: पळणें ( चालणें नव्हे ) उड्या मारणें व विशेषत: पोट घुसळून निघेल अशा प्रकारचे त्यांचे विशिष्ट नाच यांमुळें सुधारलेल्या लोकांचा मुख्य रोग जो मलावरोध, तो त्यांस होत नाहीं. ( Sex and Exercise, by Miss Ettie Rout )

फ्रान्समध्यें १९२० च्या नवीन कायद्यामुळें या विषयाची चर्चा करणेंही गुन्हा झाला आहे. परंतु तेथेंही जन्मसंख्या वाढलेली दिसत नाहीं. संततिनियमनाचे फायदे स्पष्ट दिसूं लागल्यावरही कायद्यांनीं लोकसंख्या वाढवतां येईल अशी फ्रेंच मुत्सद्द्यांची कल्पना दिसते.

× × × ×

**मिसेस बेझंट यांचें मत:** ' यूनिटी ' पत्रातर्फे एक गृहस्थ बाईस भेटण्यास गेले असतां त्या म्हणाल्या: ' तरुण विवाहित जोडप्यांस संततिनियमनाची आवश्यकता आहे व ज्या विवाहित जोडप्यांस ब्रह्मचर्यानें राहवत नाहीं किंवा राहण्याची इच्छा नाहीं त्यांनींही संततिनियमन करणें वाजवी आहे असें अजूनही माझें मत आहे.' या दृष्टीनें मिसेस मारगारेट सँगर यांचा प्रयत्न स्तुत्य आहे व श्रीमंतांस असलेलें यासंबंधीं ज्ञान मिळविण्याचा गरीबांचाही हक्क आहे, असेंही त्या म्हणाल्या.

' रेन्डेल्स् सोल्यूबल् पेसरीज् ' म्हणून ज्या वड्या विकत मिळतात त्यांस बेझंट बाईचें सर्टिफिकेट असे परंतु त्या थिऑसॉफिस्ट झाल्यावर त्यांनीं तें सर्टिफिकेट काढून टाकलें. तरीही बाईचें मत बदललें नाहीं असें दिसतें.

× + × × ×

गतानुगतिक लोकांस आणखी एक गोष्ट सांगावयाची म्हणजे महात्मा गांधींनीं कृत्रिम संततिनियमनाचे विरुद्ध मत दिलें असतांही कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांनीं आपलें अनुकूल मत अमेरिकेंतील' बर्थ कन्ट्रोल रिव्ह्यू'चे मार्फत सर्व जगास जाहीर केलें आहे.

+ × × × ×

' वाढत्या राष्ट्रास तीन मार्ग मोकळे असतात: लोकसंख्येस आळा घालणें, लढाई करणें, किंवा इतरत्र वसाहती करणें. पहिला मार्ग पतकरण्याइतके इटालियन् लोक मूर्ख नाहींत ' असें एका भाषणांत सांगून म्युसोलिनीनें लढाईची धमकी इतर राष्ट्रांस दिली आहे, व ही गोष्ट लीग् ऑफ् नेशन्स-( राष्ट्रसंघ ) नें लक्षांत घेण्यासारखी आहे, असें डॉ. मेरी स्टोपस् म्हणतात.

# ताजी व शिळी बातमी.

---

## एक उपयुक्त संस्था.

बर्लिन् म्युनिसिपालिटीनें जून १९२६ मध्यें विवाहेच्छु स्त्रीपुरुषांसाठीं एक ऑफिस् उघडलें. येथें वधूवरांस तपासून ते प्रकृतीच्या दृष्टीनें एकमेकांस योग्य आहेत किंवा नाहीं व त्यांस सुप्रजा होणें शक्य आहे कीं नाहीं हें सांगतात, व पाहिजे असल्यास सर्टिफिकिटें देतात. येथेंच विवाहित जोडप्यांसही कामसंबंधी अडचणी असल्यास त्यांस योग्य उपदेश देतात व संततिनियमनाचीही माहिती देतात. या ऑफिसांत जाणाऱ्या लोकांसंबंधीं कोणतीही माहिती बाहेर न फोडण्याची तेथील सर्व कामदारांस शपथ घ्यावी लागते. या सर्व कामाबद्दल बिलकूल फी पडत नाहीं.

अशा प्रकारच्या संस्थांची निदान प्रत्येक शहरांत तरी विशेष अवश्यकता आहे. म्हणजे वधूवरांपैकीं एकास क्षय किंवा गर्मीसारखा एकादा संसर्गजन्य रोग असल्यास त्यापासून दुसऱ्याचें जन्माचें नुकसान होणार नाहीं.

## भुतांची सरकस.

आधुनिक भुताटकीचे हिंदुस्थानांतील अध्वर्यु श्री. ऋषि यांनीं आपल्या भुतांच्या सरकशीकरतां श्री. तुलसीदास खटाव यांजकडून फुकट जागा मिळविली असून सरकशीचे प्रयोग लवकरच सुरू होणार आहेत असें ऐकतों. येत्या बैठकींत हॅमलेट्चें भूत आपल्या चेष्टा दाखवणार आहे असें समजतें !

वास्तवीक पाहतां यांत नवल कांहींच नाहीं. यूरोपांतील एका बैठकींत अंद्रोक्लीजाच्या सिंहाच्या भुताला बोलावयास लावलें होतें ! डोळ्यांत धूळ टाकण्याचे सर्व प्रकार हिंदुस्थानांत खपतात.

## धी बॉम्बे सोशल हायजीन कौन्सिल

या नांवाची संस्था येथें नुकतीच निघाली असून त्यांत बडे बडे लोक सामील आहेत. सामाजिक आरोग्याबद्दल शक्य तितकी फोल वटवट करणें हा

या संस्थेचा उद्देश. अशाच नांवाची इंग्लंडांत एक संस्था आहे तिचेंच हें पिल्लूं आहे. प्रगतीस विरोध करणाऱ्या मठ्ठ व गतानुगतिक लोकांची इंग्लंडांत रेलचेल आहे हें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं, व हिंदुस्थान आज त्यांचे ताब्यांत असल्यामुळें त्यांच्या मठ्ठपणाचे परिणाम आम्हांस भोगावे लागतात.

कोणताही रोग होऊं देऊन नंतर त्यावर उपचार करीत बसण्यापेक्षां त्याचा प्रतिबंध करणें अधिक श्रेयस्कर असतें हें त्यांच्या मठ्ठ डोक्यांत न उतरल्यामुळें या संस्थांचा उद्देश गुप्त रोगांचा प्रतिबंध करणें हा नसून त्यांवर उपचारांची तजवीज करणें हा आहे. अर्थात् प्रतिबंध करावयाचा तर तो रासायनिक उपायांनींच केला पाहिजे. हे उपाय ताबडतोब फलप्रद होतात. परंतु हें या लोकांस पाहवत नाहीं. रोगांची भीति नाहींशी झाल्यास लोकांची नीति बिघडेल अशी या मठ्ठ लोकांची कल्पना आहे, परंतु नीतीबरोबरच रोगांचा प्रसार होईल तर तिला नीति तरी कां म्हणावयाचें ? या बाबतींत नीतिप्रद व्याख्यानें झोडणें, किंवा रोग नाहींसे करण्याकरतां वश्यांचा नायनाट करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे ईश्वराच्या प्रार्थनेइतकेंच निष्फळ आहे.

हें समजून प्रतिबंधाच्या उपायांचा प्रसार करणारा इंग्लंडांतही एक पक्ष आहे, परंतु समजूतदार लोकांची संख्या तेथें कमी असल्यामुळें त्यास सरकारचें पाठबळ नाहीं. यूरोपांतील इतर देशांतील लोक जास्त हुशार असल्यामुळें या उपायांचा प्रसार इतर देशांत जारीनें चालला आहे.

## एकत्र शिक्षण

मुलांमुलींच्या एकत्र शिक्षणाकरतां येथें एक 'फेलोशिप स्कूल' या नांवाची शाळा निघाली आहे व तेथें कांहीं नवीन शिक्षणपद्धति अमलांत येणार आहेत असें समजतें. संस्थेचा उद्देश सर्वथैव स्तुत्य आहे. या संस्थेचे चालक थिऑसोफिस्ट आहेत, परंतु शिक्षणांत थिऑसॉफी घुसडली जाणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे.

## चालू नीतीचे परिणाम

१. पारंपरिक कल्पनांमुळें व इष्ट विवाह घडून न आल्यामुळें येथें नुकत्याच झालेल्या दोन आत्महत्यांची हकीकत सर्वांच्या लक्षांत असेलच. अशीच एक गोष्ट मद्रास येथें नुकतीच घडली. जानकी अम्मल नांवाची एक नायर मुलगी आपल्या भावी नवऱ्याजवळ आठ दिवस राहिल्यावर त्याचे आईबाप लग्नास परवानगी देत नाहींत असें पाहून वस्तऱ्यानें आपला गळा कापून आत्महत्या करण्यास उद्युक्त झाली. तिला लगेच इस्पितळांत नेल्यामुळें ती कदाचित् जगण्याचा संभव आहे. या आत्महत्यांचा दोष समाजाकडे येतो.

२. कालिकत येथील एक विधवा एका पुरुषाबरोबर घर सोडून गेली व तीं दोघें शेजारच्या एका घरांत सांपडलीं. तिच्या नातलगांनीं त्या दोघांस जबरदस्तीनें घरीं नेऊन निरनिराळ्या खोल्यांत कोंडून ठेवलें. त्यांच्या चालीप्रमाणें अशा वेळीं त्यांच्या जातीच्या पंचायतीनें या प्रकरणाचा निकाल लावून तिला व त्याला जातीबाहेर टाकीपर्यंत अशा प्रकारचा तुरुंगवास त्यांस भोगावा लागतो, व नंतर अशा स्त्रीस शरीरविक्रयाशिवाय दुसरा मार्ग नसतो. समाज अशा रीतीनें वेश्या तयार करतो !

---

## नवीन ग्रंथांतील निवडक विचार.

मिस् एटी राउट् यांनीं मोरी ( न्यूझीलंडमधील मूळचे रहिवासी ) लोकांसंबंधीं दोन ग्रंथ नुकतेच प्रसिद्ध केले आहेत, व त्यांत त्यांनीं व्यायामाच्या दृष्टीनें त्यांच्या नर्तनपद्धतीची फार प्रशंसा केली आहे. या पद्धतीमुळें खालच्या पोटास बरेंच चलन मिळाल्यानें मलावरोध अशक्य होतो, व ढेरपोटये लोक तेथें सांपडत नाहींत.

या ग्रंथांस सर विलिअम् आर्वथनॉट् लेन यांनीं प्रस्तावना लिहिल्या आहेत. दिवसांतून एकदां मलविसर्जन झालें म्हणजे बस ही युरोपीयन कल्पना चुकीची आहे, तें निदान दोन किंवा तीन वेळां झालें पाहिजे, व मलावरोधामुळें

वैवाहिक सखास व प्रजोत्पादनशक्तीस अडथळा होतो असें प्रतिपादन केलें आहे.

मौरी लोकांच्या धर्मात सुप्रजाजनन हें मुख्य तत्त्व समजलें जातें. यामुळें त्यांच्यांत जरी विवाहपद्धति प्रचलित आहे तरी संतति नवऱ्यापासूनच झाली पाहिजे असें नाहीं, व या कामीं कोणत्याही पुरुषाची मदत घेण्याची मुभा असते. नवऱ्यास यामुळें कदाचित वाईट वाटेल, परंतु राग येत नाहीं. राग आल्यास त्याचें पत्नीवर प्रेम नाहीं असा अर्थ होतो. इतकें करूनही ती आपणाजवळच राहते यांतच तो आनंद मानतो. याचप्रमाणें विधवांसही संतति झाल्यास चालते.

× × × ×

चोवीस प्रसिद्ध लोकांचे विवाहासंबंधी विचार एकत्र करून **काउन्ट केसरलिंग** यांनीं प्रसिद्ध केले आहेत. या पुस्तकाकरितां लेख लिहिण्यास बर्नार्ड शॉ यांस विनंती केली असतां त्यांनीं लिहिलें कीं ' स्वतःची बायको जिवंत असतां कोणीही पुरुष विवाहासंबंधीं आपले खरे विचार लिहू शकणार नाहीं. एखादा पत्नीचा द्वेष्टा कदाचित् खरें लिहू शकेल, परंतु मी तसा नाहीं. खऱ्या मुद्यांची टाळाटाळी लोक कशी करतात हें पाहण्याकरतां मी हें पुस्तक वाचीन, परंतु मी त्यांत लिहिणार नाहीं ! व हें पुस्तक खरोखरच उडवाउडवीच्या लेखांनीं भरलेलें आहे असें पुष्कळांचें मत आहे.

यावरून बर्नार्ड शॉ यांचे विचार निदान प्रचलित विवाहपद्धतीस फारसे अनुकूल नाहींत असें अनुमान काढण्यास फारशी हरकत दिसत नाहीं. शिवाय, ' दोन माणसें एका बिछान्यावरच काय, पण एका खोलींत तरी कशीं निजू शकतात कोण जाणे ! असे विचार त्यांनीं एका ग्रंथांत प्रकट केले आहेतच.

# ब्रह्मचर्य.

या बाबतींत पशूंची आणि मनुष्यांची निरर्थक तुलना करण्याची खोड ब्रह्मचर्याच्या अध्वर्यूंस असते. वास्तवीक पाहतां आहार, निद्रा, मैथुन वगैरे शारीरिक गरजा जरी इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्यासही असतात, तरी त्यांचें समाधान सर्व प्राणी सारखेंच करतात असें नाहीं. कोणत्याही दोन प्राण्यांच्या या बाबतींतील रहाणींत फरक दिसून आल्यास त्यांतील एकास चांगलें व दुसऱ्यास वाईट म्हणण्याचा अधिकार कोणासही पोहोंचत नाहीं. मनुष्याचे आनुवंशिक संस्कार व परिस्थिति इतर प्राण्यांपेक्षां निराळीं असल्यामुळें त्याची वागणूक इतर प्राण्यांपेक्षां निराळी असल्यास नवल नाहीं. इतर प्राण्यांची काम-वासना कालमानावर अवलंबून असते तशी मनुष्याची नसते यावरून मनुष्य कमी प्रतीचा ठरत नाहीं, व इतर प्राण्यांवर आत्मसंयमनाचा आरोप करण्या-चेंही कारण नाहीं.

तरीही इतर प्राण्यांसंबंधीं पाहिजे तीं विधानें ठोकून देणारांनीं खालील गोष्टींचा विचार करण्यासारखा आहे. कोणत्याही इतर प्राण्यांतील मादी ऋतुकालाशिवाय नरास जवळ येऊं देत नाहीं, हें जरी खरें असलें तरी अशा कालीं किती वेळां समागम घडतो हें पाहिल्यास मनुष्य थक्क होतो.

' एके दिवशीं मी आपलीं बंदूक घेऊन हिंडत असतां एका हरिणीमागें आठ हरिण पळत जातांना पाहिले. मधून मधून यांपैकीं एखादा त्या हरिणीस पकडी व त्यांचा समागम होई. मला त्या हरिणीची दया येऊन काय करावें असा विचार करतों तों ती सर्व टोळी माझ्या अगदीं जवळून गेली, तेव्हां मीं त्यांतल्या म्होरक्यास गोळी घातली. तरी त्याकडे बिलकूल लक्ष न देतां बाकीचे सर्व हरिण त्या हरिणीमागें तसेच पळत गेले.

' मनुष्यास अगदीं जवळचा प्राणी म्हणजे बिनशेंपटीचे वानर, यांतील एका जोडप्यामध्यें अर्ध्या तासांत पांच वेळां समागम घडलेला मीं प्रत्यक्ष पाहिला आहे. ( एच. एस्. जॉइस्, ' न्यू जनरेशन ', जाने. १९२७ ).

वरील मासिकाच्या त्याच अंकांत एका शेतकऱ्यानें आपला अनुभव दिला आहे. ' एका डेअरीमध्यें ६० गाई एका वर्षांत गाभण करण्याची कामगिरी एका बैलाकडे असे. गाय भरांत असेल त्या वेळीं २४ तासांत तीन चार वेळां समागम होतो, व इतकेंही करून काम होतेंच असा नियम नाहीं. '

या बाबतींत मनुष्याची इतर प्राण्यांशीं तुलना करून कोणताही अर्थ निष्पन्न होत नाहीं.

---

## गर्भपाताचें एक कारण

वेश्यांस ज्याप्रमाणें फारशी संतति होत नाहीं, तशीच कामुक जोडप्यांस संतति कमी; असा सामान्य अनुभव आहे. या दोन्ही गोष्टींचें कारण एकच आहे, तें हें कीं समागमाच्या पुनःपुनरावृत्तिमुळें पुष्कळ वेळां गर्भपात होतो, व गर्भधारणेनंतर लौकरच पात झाल्यास तो लक्ष्यांतही येत नाहीं. कधीं कधीं पहिल्याच महिन्यांत तर कधीं दोन तीन महिन्यांत या कारणानें गर्भ-पात झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. अशा जोडप्यांस जर संततीची इच्छा असेल तर त्यांनीं गर्भावस्थेंत पूर्ण विश्रांति घेतली पाहिजे. ज्यांची कामेच्छा फारशी तीव्र नसते परंतु जे पूर्ण ब्रह्मचर्य पाळीत नाहींत अशाच लोकांस सर्वांत जास्त मुलें होतात असें दिसतें.

---

## मांसाहार.

मांसाहारास विरोध करणारांनीं खालील गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत. स्टीफनसन यांनीं उत्तर ध्रुवाकडे सफर करून त्या प्रदेशांत एकंदर साडे-अकरा वर्षें घालविलीं. यापैकीं एकंदर नऊ वर्षें त्यांचा आहार केवळ मांसमय होता. त्यांत लागोपाठ नऊ महिने त्यांनीं मांसाशिवाय कांहीं खाल्लें नाहीं. त्यांचें सर्वांत अधिक वजन यावेळीं झालें, व यावेळीं त्यांची प्रकृति उत्तम व मन उल्लसित होतें. यावेळीं त्यांनीं व्यायाम केला किंवा न केला तरी व

हवामान कसेंही असलें तरी त्यांना नेहमीं बरेंच वाटलें. मलावरोध कधींही झाला नाहीं. एक महिनाभर बिलकुल व्यायाम केला नाहीं तरी मलावरोध झाला नाहीं व क्षीणता आली नाहीं. त्यांचे केंस अधिक दाट झाले व डोक्याची त्वचा सुधारली. केवल मांसाहारी ६०० एस्किमो लोकांमध्यें तीन वर्षांत एकासही मलावरोध झाला नाहीं, असें ते म्हणतात.

त्यांचें असेंही म्हणणें आहे कीं ज्यांनीं सुधारलेल्या राष्ट्रांप्रमाणें मिश्र आहारास सुरवात केली अशा एस्किमोंची शरीरप्रकृति खालावलेली दिसते, व त्या राष्ट्रांतील रोगांचाही त्या लोकांत फैलाव होत आहे.

डॉ. लिएब् यांनीं दोन गृहस्थांची हकीकत दिली आहे. यांपैकीं एक ४५ वर्षांचा होता तरी त्याचें वय बरेंच कमी दिसत असे. तो दिवसांतून तीनदां गोमांस खात असे, हाच त्याचा आहार. आपण कधींही व्यायाम घेत नाहीं अशी त्यास घमेंड असे, तरीही १२ सेकंदांत १०० यार्ड पळत असे व ५ मैल दमल्याशिवाय पोहत असे. दुसरा ५५ वर्षांचा असून तोही केवळ मांसाहारी होता तरी त्याचें पोट, मूत्रपिंड, हृदय वगैरे चांगल्या स्थितींत होतीं.

---

## सरदी कशानें होते ?

' अमेरिकेंतील निरनिराळ्या प्रदेशांत व निरनिराळ्या हवामानांत किती लोकांस किती वेळां सर्दी होते यासंबंधीं प्रसिद्ध झालेल्या आंकड्यांवरून असें सिद्ध होतें कीं सर्दीचा व हवामानाचा फारसा संबंध नसतो. यामुळें कित्येक डॉक्टरांनाही आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. हवेंतील उष्णता, थंडी व दमटपणा हीं फक्त वरवर दिसणारीं कारणें आहेत, परंतु सर्दीचें मुख्य कारण अन्नाची अव्यवस्था हें होय ', असें डॉ. लायबर यांचें म्हणणें आहे.

शरीरास ज्या पदार्थांची जरूर असते ते त्यास अन्नांतून पोंचले पाहिजेत. व ते विशिष्ट प्रमाणांत पोंचले पाहिजेत. विशेषतः फाजील खाण्यानें सर्दीस मदत होते.

# शिक्षण व प्रजोत्पादन.

प्रजोत्पादनासंबंधीं मुलांमुलींस खरी माहिती द्यावी कीं नाहीं व द्यावयाची असल्यास ती कोणीं, केव्हां व कशी द्यावी, हा आजकालच्या वादग्रस्त प्रश्नापैकीं एक आहे.

आपल्या समाजांत रजस्वला स्त्री बाजूला बसते व लहान मुलांनीं याचें कारण विचारल्यास ज्याप्रमाणें ' कावळा शिवला ' असें कारण सांगतात, तसें इंग्लंडांत एखाद्या लहान मुलानें ' नवीन भावंड कोठून आलें? ' अशी शंका काढल्यास, बगळ्यानें आपल्या चोंचींतून किंवा डाक्टरनें आपल्या बॅगेंतून आणलें असें सांगण्याची पद्धत आहे. फ्रांसमध्यें तें कोबीच्या कांद्यांत सांपडलें असें सांगतात. अर्थात अशा उत्तरांनीं मुलांचें फारसें समाधान होत नाहीं व तीं खऱ्या उत्तराच्या शोधांत असतात व आईबाप खरें बोलत नाहींत असें ती मनांत पक्कें समजतात. ही माहिती त्यांस पुढेंमागें बऱ्यावाईट मार्गांनीं मिळते, व मलें होणें ही लज्जास्पद व लपवण्यासारखी गोष्ट आहे अशी त्यांची समजूत होते.

खेडयापाडयांत इतर प्राण्यांपासून त्यांस पुष्कळ वेळां खरा प्रकार समजतो परंतु तेंही कोणी मोठीं माणसें जवळ नसल्यास ! यूरोपांतील एका खेडयांत कुत्री वीत असतांना घरांतील सर्व मुलें टक लावून पहात आहेत असा प्रकार एका पाद्र्याच्या दृष्टीस पडला. त्या मुलांची जिज्ञासा स्वाभाविक नव्हती असें कोण म्हणेल ? परंतु या पाद्रीसाहेबांनीं बिचाऱ्या कुत्रीला मारून तेथून हांकून दिली, व मुलांस त्यांच्या भयंकर गुन्ह्याबद्दल रागें भरून खोलींत कोंडून ठेवलें !

या एकंदर लपवालपवीचा परिणाम मुलांचे मनावर चांगला होत नाही असें अलीकडे लोकांस वाटूं लागलें आहे. याची चर्चा करून निकाल लावण्या-

करितां इंग्लंडांतील ' नॅशनल् कौन्सिल ऑफ् पब्लिक् मॉरल्स् ' * या संस्थेनें एक कमिशन् नेमलें होतें. त्यांनीं १९२३ सालीं यासंबंधीं एक ग्रंथ प्रसिद्ध करून त्यांत असा सिद्धांत काढला आहे कीं स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं मुलांमुलींस शिक्षण देणें कितीही कठिण असलें तरी नीतीच्या व आरोग्याच्या दृष्टीनें अवश्य आहे. लहान मुलांनीं स्वतःच्या उत्पत्तीविषयीं प्रश्न विचारल्यास त्यांस समजेल तितकेंच परंतु खरें उत्तर द्यावें, याबद्दल जवळ जवळ सर्वांचें एकमत झालें.

यासंबंधीं शक्य तितकी स्पष्ट माहिती आईबापांनीं किंवा शिक्षकांनीं न दिल्यास मुलांची जिज्ञासा वाढत जाऊन तीं नोकरचाकरांचे नादीं लागतात व पुष्कळ वेळां बिघडतात. ही माहिती कोणत्या वयांत द्यावी हें निश्चित सांगणें कठीण आहे, कारण सर्व मुलांस ही जिज्ञासा सारख्याच वयांत उत्पन्न होत नाहीं. परंतु जेव्हां ही जिज्ञासा होईल तेव्हांच तिचें समाधान केलें पाहिजे. मुलांचा आईबापांवर विश्वास असल्यास तीं त्यांसच हे प्रश्न प्रथम विचारतात, व ते त्यांनीं कितीही लवकर विचारले तरी खरें उत्तर देण्यास हरकत नसते. या बाबतींत दिरंगाई करण्यानें नुकसान होण्याचा संभव असतो. माहिती देतांनाच यासंबंधीं उघड बोलण्याची चाल नाहीं असें त्यांस प्रेमानें समजून सांगितल्यास तीं ऐकतात.

इंग्लंडांतील कांहीं शाळांत आरोग्यशिक्षणाबरोबरच प्रजोत्पादनासंबंधीं व गुप्त रोगांसंबंधींही माहिती देण्याची पद्धत आहे, व ही जगांतील सर्व शाळांनीं घेण्यासारखी आहे.

---

## आपलें वजन करा.

अमेरिकन विमा कंपन्यांनीं मनुष्याचें वजन व दीर्घायुष्य यांतील संबंध दाखवण्याकरतां कांहीं आंकडे प्रसिद्ध केले आहेत.

---

* ही संस्था खाजगी असून त्यांनीं स्वतःसच असें नांव दिलें आहे. त्यांत राष्ट्राचा बिलकूल संबंध नाहीं.

त्यांवरून असें दिसतें कीं ६ फुटांपेक्षां ठेंगण्या मनुष्याचें वजन तीशी आणि चाळिशीच्या मध्यें जर शेंकडा २० वाढलें, तर त्याचा मृत्यूचा संभव शेंकडा ३० वाढतो, व वजन शेंकडा ३० वाढल्यास मृत्यूचा संभव शेंकडा ८० वाढतो. अधिक उंच मनुष्यांस वजन वाढल्यापासून तितकी भीति नसते.

एकंदरींत मध्यम प्रमाणापेक्षां ज्यांचें वजन दहा बारा पौंड कमी असेल, असे लोक सर्वांत दीर्घायुषी असतात.

चरबी वाढण्यास पोटापासून सुरवात होते. बेतानें खाऊन व्यायाम करा. वाढलेलें वजन कमी करण्याचे दोन उपाय आहेत. व्यायाम व पथ्य. नुसत्या व्यायामानें काम होत नाहीं. वजन कमी करण्याकरतां औषधें घेण्यांत धोका आहे

---

## कायदे करणारांची अक्कल.

संततिनियमनासंबंधीं माहिती देणें हा फ्रान्स व अमेरिकेंत गुन्हा आहे, व इटालींतही असाच कायदा झाला आहे. गुप्त रोगांच्या प्रतिबंधाची माहिती देणें हा गुन्हा नाहीं, व या दोहोंचे कांहीं उपाय सारखेच असल्यामुळें फ्रान्स-मध्यें संततिनियमनाचीं कांहीं साधनें रोगांच्या प्रतिबंधाकरतां म्हणून उघडपणें विकतात !

इंग्लंडांत याचे उलट स्थिती आहे. गुप्त रोगांच्या प्रतिबंधाचीं साधनें विकणें हा गुन्हा आहे, व संततिनियमनाचीं साधनें उघडपणें विकलेलीं चाल-तात. एका कंपनीनें स्त्रियांकरतां संततिनियमन व रोगांचा प्रतिबंध अशीं दोन्ही कामें करणाऱ्या वड्या तयार केल्या, तेव्हां सरकारकडून त्यांस अशी सूचना मिळाली कीं त्या वड्या संततिप्रतिबंधक म्हणन विकण्यास हरकत नाहीं, परंतु त्यांनींच रोगांचा प्रतिबंध होतो ही गोष्ट बाहेर फोडतां कामा नये !

शेंकडा ३० कॅलोमेल घालून मलम तयार केल्यास त्यानें गर्मीचा प्रतिबंध होतो असें मेचनिकॉफ यांच्या शोधावरून पुष्कळांस माहीत झालें आहे. गिऱ्हाइकानें हें मलम मागितल्यास तें विकणें हा गुन्हा नाहीं, परंतु त्यानें

रोगप्रतिबंधाचा उपाय मागितल्यास त्यास तेंच मलम विकणें हा गुन्हा आहे ! अकलेचे खंदक सर्वच देशांत असतात इतकेंच नव्हे, तर कायदे करण्याचें काम त्यांजवर सोंपवण्यांत येतें !

## प्रेतें जाळावीं कीं पुरावीं ?

फ्रान्समधील एका खेड्यांत एकाएकीं दहा बारा मुलें घटसर्पानें मेलीं. हा संसर्गजन्य रोग असल्यामुळें तो आसपास कोठेंही नसतां तेथेंच एकदम कसा उद्भवला याचा सर्वांस अचंबा वाटून शोध करतां त्याच खेड्यांत २३ वर्षांपूर्वीं कांहीं मुलें या रोगानें मेलीं होतीं असें समजलें. तीं प्रेतें जेथें पुरलीं होतीं ती जागा थोड्या दिवसांपूर्वीं खणली होती व खणणाराचा १४ वर्षांचा मुलगा खणतांना जवळ होता व त्यासच प्रथम हा रोग होऊन नंतर तो पसरला असा शोध लागला. तीं प्रेतें जाळलीं असतीं तर रोगजंतु अशा रीतीनें शिल्लक राहिले नसते.

यासंबंधीं जागृति सर्व जगभर होत चालली आहे व जर्मनींत याकरतां ९००००० सभासदांची एक संस्था स्थापन झाली आहे. तरीही दहनाची सोय सगळीकडे नाहीं, व इतर प्रगतीच्या बाबींप्रमाणें यांतही कांहीं धर्माची आडकाठी आहे. परंतु प्रेतें पुरल्यामुळें रोगजंतु फैलावतात, व कधीं कधीं तर जमिनींतून पिण्याच पाण्यांत जाऊन टायफॉइड् वगैरे रोगांच्या सांथी उत्पन्न करतात. शिवाय थडग्यांकरतां जागा व पैसा फुकट खर्च होतो तो वेगळा. बरें इतकेंही करून प्रेताचा नाश होत नाहीं असें थोडेंच आहे ? तो व्हायचा तसा होतोच, त्यास थोडा वेळ जास्त लागतो इतकेंच.

## लोक संख्येची वाढ.

एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थांनांची लोकसंख्या ५३,००,००० होती, ती १९२५ मध्यें ११,२०,००,००० म्हणजे २२ पट जास्त झाली.

याच अवधींत जर्मनीची लोकसंख्या २,२०,००,००० ची ६,३०,००,००० झाली. जपानची २,००,००,००० पासून ५,६०,००,०००, व ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंडची १,२०,००,००० होती ती चौपट झाली.

हा औद्योगिक प्रगतीचा परिणाम होय. इटालींतील लोकसंख्या दरवर्षी एक लक्ष वाढते. अशी स्थिति असल्यावर लढाई होईल नाहींतर काय होईल ? इतकें असूनही फ्रान्स, इटाली व अमेरिकेंत संततिनियमनाची माहिती देणें हा गुन्हा आहे !

× × × × +

इटालीची लोकसंख्या शक्य तितकी वाढवून नंतर इतर राष्ट्रांशीं लढाई करण्याचा बेत म्युसोलिनीनें जाहीर केलाच आहे. त्यास जर्मनी सामील झाल्यास फ्रान्सची स्थिती काय होईल अशी भीति वाटून, फ्रान्सनेंही लोकसंख्या वाढविण्यास शक्य तितकें उत्तेजन द्यावें, असें प्रतिपादन करणारे लोक फ्रान्समध्यें पुष्कळ आहेत. राष्ट्र म्हणजे लढाईंत मरण्याकरतां माणसें तयार करण्याचा कारखाना ही कल्पना जरी चुकीची आहे, तरी या बुद्धीनें सुचविलेले उपाय कधीं कधीं राष्ट्रास हितावह होतात; उदाहरणार्थ आरोग्याचे उपाय. अशा मताच्या एका लेखकानें पुढील उपाय सुचविला आहे.

प्रत्येक मूल उपजल्याबरोबर त्याच्या प्रकृतीचें टिपण ठेवण्याकरतां एक चोपडी करावी. त्यांत उपजतेवेळच्या अडचणी, कृत्रिम उपाय वगैरे लिहावें. नंतर केव्हांही त्यास कोणताही रोग झाल्यास प्रत्येक वेळीं डाक्टरानें त्या रोगाची सर्व हकीकत त्यांत लिहिली पाहिजे अशी डॉक्टरांवर सक्ती असावी. याचा डॉक्टरांसही उपयोग होऊन रोगनिदानांत चुकीचा संभव कमी होईल. विवाहाचे वेळीं वधुवरांच्या चोपड्या दोन्ही कुटुंबांनीं नेमलेल्या डॉक्टरांनीं एकत्र ताडून पहाव्या, व आरोग्याच्या दृष्टीनें तो विवाह इष्ट आहे कीं नाहीं याबद्दल मत द्यावें. या बाबतींत लोक डॉक्टरांचें ऐकतीलच असें नाहीं, परंतु निदान त्यांस धोक्याची सूचना मिळेल. या चोपड्या अर्थातच डॉक्टरांशिवाय दुसऱ्या कोणास दाखवण्याचें कारण नाहीं. शिशुसप्ताह व आरोग्यसप्ताहवाल्यांचें या सूचनेकडे लक्ष जाईल तर बरें.

289530

# हिद्रालिन्.

या फ्रेंच औषधाची एक पुडी ४ पाइंट पाण्यांत टाकली असतां सुगंधी जंतुनाशक पाणी तयार होतें. योनिमार्ग स्वच्छ ठेवण्याकरितां हें प्रत्येक स्त्रीनें दररोज वापरण्यास योग्य आहे. हें साध्या किंवा भोंवऱ्याच्या पिचकारींतून वापरावें. तितक्याच पाण्यांत दोन पुड्या टाकून दिवसांतून दोन तीन वेळां धुतल्यास धुपणी-सारखे विकार बरे होतात. २० पुड्यांचे पेटीस रु. १ आ. ४.

**पत्ताः—राइट एजन्सी,**

२० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.

# पुढील अंकीं.

१. वेश्या कोणास म्हणावें ?

२. चंदावरकरांचा वेश्यांवर हल्ला.

३. मिश्रविवाह व असहिष्णुता.

४. रानटी लोकांच्या चालीरीति

# समाजस्वास्थ्य




वर्ष १] जून १९२८ [अंक १२

संपादक–र. धों. कर्वे.

---

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.

| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| ७ | स्वत:संबंधी दोन शब्द ... ... ... | १ |
| २. | संततिनियमनावरील कादंबरी ( पुढें चालू ) ... | ४ |
| ३. | वेश्यासंबंधीं जर्मनींतील नवीन व्यवस्था ... | ११ |
| ४ | वेश्यांविरुद्ध अजब उपाय ... ... ... | १३ |
| ५. | नवीन लेखांतील विचार ... ... | १५ |
| ६. | पत्राचा सारांश ... ... ... ... | १९ |
| ७. | ' आनांडा ' समाजाची हकीकत ... ... | २२ |
| ८ | ताजी व शिळी बातमी ... ... .. | २३ |


संततिनियमनाकरितां

'मॅटोरी' वड्या वापरा

डझनाचे नळीस दीड रुपया.

सोल एजंटः—र इट एजन्सी,

२० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.

जेलोटयूब

यानें **गुप्त रोग बरे होत नाहींत,** हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोब्यु यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे, तीन पेट्यांस रु २

# स्वतःसंबंधीं दोन शब्द.

आज या मासिकास एक वर्ष पुरें झालें. यांतून फायदा झाला नाहीं तरी आपल्या वेळाच्या व श्रमाच्या मोबदल्याची अपेक्षा न केल्यास निदान खर्च भागण्या इतके वर्गणीदार मिळतील अशी आमची कल्पना होती ती सर्वथैव निराधार ठरली. लोकांस रुचतील अशींच मतें प्रतिपादन करून व वारा येईल तशी पाठ फिरवून लोकप्रिय होणें फारसें कठिण नसतें, व अशा तऱ्हेनें मासिक लोकप्रिय करण्याची आमची कधींच इच्छा नव्हती. कामशास्त्र व तदनुषंगिक इतर विषयांवर आधुनिक शास्त्रीय पद्धतीचे स्वतंत्र विचार प्रसिद्ध करण्यास इतर पत्रें किंवा नियतकालिकें तयार नाहींत याचा आम्हांस अनेक वेळां अनुभव आल्यामुळेंच हें मासिक काढण्याचें आम्हीं ठरवलें, व तें एकदम लोकप्रिय होणार नाहीं हें आम्ही जाणून होतों. परंतु केवळ ५०० वर्गणीदार मिळतांच छपाईचा खर्च बाहेर पडेल व जास्त मिळाल्यास आपणास मासिकाचा आकार वाढवतां येईल अशी आम्हांस उमेद होती. अजून वर्गणीदारांची संख्या २०० वरही गेलेली नाहीं.

याचें कारण काय असावें ? खरें बोलावें, खोटें बोलूं नये, सकाळीं उठोनी देवासि भजावें, यापेक्षां अधिक दर्जाचे लेखच लोकांस नको असतात, कीं आपले विचार मनोरंजक रीतीनें मांडण्याची ताकदच आपले अंगांत नाहीं ? असे विचार आमचे मनांत प्रथम आले, परंतु कांहीं कसलेल्या लेखकांकडून व विचारी वाचकांकडून उत्तेजनपर पत्रें आल्यामुळें आम्हांस हे विचार बाजूला ठेवावे लागले; व वर्गणीदार कमी असण्याचीं इतर कांहीं कारणेंही आमचे निदर्शनास आलीं.

कांहीं लोकांना वर्गणीदार होण्याची भीति वाटते. हो, कोणाला समजलं तर काय होईल ? या विचारानें त्यांचा थरकांप होतो. ही भीति नाहींशी

होण्यास एकच उपाय आहे. कोणत्याही दोन विचारी माणसांचीं मतें कधींही तंतोतंत पटणार नाहींत, त्याचप्रमाणें आमचीं मतें विचारी वाचकांच्या मतांशींही जुळतीलच असें नाहीं. तथापि ज्यांना अशा प्रकारचीं स्वतंत्र मतें प्रसिद्ध व्हावीं असें वाटत असेल त्यांनीं या मासिकाचा शक्य तितका प्रसार केला पाहिजे. आपल्यासारखे पुष्कळ लोक झाले म्हणजे कोणालाच भिण्याचें कारण राहणार नाहीं. सद्यःस्थिति अशी आहे कीं या बाबतींत स्वतंत्रतावादी दोन लोक एकत्र आले तरी प्रत्येक जण दुसऱ्याजवळ बोलावयास भितो. वर्गणीदारांचीं नावें प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार नाहीं, परंतु लोकांची भीति थोडी कमी व्हावी म्हणून येथें इतकेंच सांगतों कीं आमच्या वर्गणीदारांत डॉक्टर, वकील, प्रोफेसर वगैरे सन्मान्य धंद्यांतील उच्च दर्जाचे लोक आहेत; जज्ज, कलेक्टर, वगैरे मोठ्या हुद्द्याचे लोक आहेत; व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ११ सुशिक्षित स्त्रिया असून यांपैकीं कांहीं विवाहित व कांहीं अविवाहित आहेत. तेव्हां आतां पुरुषांसारख्या पुरुषांनीं लाजण्याचें कांहीं कारण राहिलेलं नाहीं.

दुसरें कारण म्हणजे या मासिकाची सर्वांस व्हावी तशी माहिती झालेली नाहीं. जाहिरात देणें हें बऱ्याच खर्चाचें काम आहे, तरी मधून मधून तिरनिराळ्या ठिकाणीं जाहिरात दिलेली आहे.

‘ मासिक मनोरंजन ’ सारख्या मागसलेल्या मासिकानं पैसे घेऊनही जाहिरात छापण्याचें नाकारलें. परंतु ‘ गृहलक्ष्मी ’ व ‘ स्वकुळसाळीविजय ’ या मासिकांनीं परस्परांच्या फुकट जाहिराती छापण्याचा करार करून तो अमलांत आणला.

शिवाय एरत भेट म्हणून आयुर्वेद, उदय, टणत्कार, दूत, भारतमित्र, सोलापूरसमाचार, स्वकुळसाळीविजय, कलावैभव ( हिंदी ), हिंदु व ज्ञानमित्र हीं पत्रें व मासिकें येत असतात त्यांचा येथें साभार उल्लेख करणें जरूर आहे.

मासिकाची माहिती जाहिरातीपेक्षां वर्गणीदारांकडूनच जास्त होते. कोणाही मित्राचा पत्ता आमचेकडे पाठवल्यास आम्ही नमुन्याचा अंक फुकट

पाठवूं, व कोणींही दहा नवीन वर्गणीदार मिळवून दिल्यास त्यास आम्हीं एक वर्षभर मासिक फुकट पाठवूं. इतर मासिकांचे वर्गणीदारही हें काम करतात, परंतु या मासिकास अशा कामाची जरूरी विशेष आहे. जरूर पडल्यास पदरचे पैसे खर्चूनही हें मासिक निदान आणखी एक वर्षभर तरी चालवण्याचा संपादकाचा संकल्प आहे. या पेक्षां जास्त तें चालावें असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं वर्गणीदार मिळवण्याची खटपट केल्यासच तें शक्य आहे, इतकें सांगून हा स्वपर लेख येथेंच संपवतों.

---

न्यूयॉर्क येथें स्त्रियांच्या दुधाचें एक दुकान निघालें आहे. या स्त्रिया आपापल्या घरींच राहतात व त्यांची मर्जी असेल तेव्हां दुकानांत जातात. तेथें एक परिचारिका ( नर्स ) ठेवलेली असते, तिच्या देखत त्यांचें दूध काढतात, व बाटल्यांत भरून विकतात किंवा रतीब घालतात. विक्री होईपर्यंत तें बर्फांत ठेवतात [ यामुळें तें जास्त वेळ टिकतें. ] सध्यां तेथें ३२ स्त्रिया अशा तऱ्हेनें दूध देतात. एका स्त्रीपासून एका दिवसांत ४२ औंसपर्यंत दूध मिळालें आहे. [ १०५ तोळे ]. एक लिटर ( दारूची मोठी बाटली ) दुधाची स्त्रीस अजमासें रु. १०। किंमत मिळते, व तें गिऱ्हाइकांस रु. १३॥ स विकतात, यामुळें यांत गाईचे दुधापेक्षां फायदा जास्त होतो. लहान मुलांस स्त्रियांचे दूध सर्वांत अधिक हितावह असल्यामुळें त्याला मागणी फार असते व किंमत चांगली येते. [ धंदा करण्यासारखा आहे. सं. ]

*   *   *

केनिया कॉलनीमध्यें बलात्काराला फांशीची शिक्षा देण्याचा नवीन कायदा १९२६ सालीं झाला त्याची हकीकत मागें दिलीच आहे. युरोपीय स्त्रीवर बलात्कार करणाऱ्या एका शिद्द्यास या नवीन कायद्याप्रमाणें एप्रिल २७ रोजीं फांशीची शिक्षा झाली. त्यांतील बऱ्याच गोष्टी किळसवाण्या असल्यामुळें हा खटला उघडपणें न चालतां दरवाजे बंद करून चालला असें समजतें. भयंकर शिक्षा ठेवल्यानें असे गुन्हे बंद होतात ही कल्पना चुकीची आहे.

*   *   *

# संतति नियमनावरील कादंबरी.

( पुढे चालू )

या गोष्टीला तीन वार होऊन गेले. गेले आठ दिवस स्पिरिता मासिक स्रावाची वाट पहात होती. ती आपलें शरीर तीन तीनदां तपासून पाही, पोटाच्या घेर मोजून पाही. परंतु त्यावरून काय समजणार ? आपणास गर्भ राहिला आहे काय ? हा प्रश्न सुटल्याशिवाय मन स्वस्थ होणें शक्य नव्हतें.

तिचा मामा गांवीं गेला होता. त्याच्या अभावीं तिचें मन फ्रांस्वाकडे धांव घेऊं लागलें, परंतु ही सर्व हकीकत सांगितल्यास त्याला कांहीं निराळेंच वाटेल हें ती जाणून होती, व म्हणून त्याला ती टाळीत असे. ही गोष्ट घडल्या-दिवशींच आईजवळ सांगून टाकण्याची तिला इच्छा झाली, परंतु ती आई कसची ? शिव्यांची खाण होती. राहिला तिचा भाऊ लुई. परंतु कांहीं वेडेंवाकडें झालें तर घराबाहेर घालवून देईन, संभाळ, असें त्यानें तिला आधींच सांगितलें होतें, व त्यांनाही तिची हकीगत खरी वाटली नसती. तिचा बाप फारसा घरींच नसे व नेहमीं तर्र असे.

कोठला कोण अनोळखी मनुष्य ! त्याचें नांव सुद्धां तिला माहीत नव्हतें. त्याला लाथ मारून हांकून देण्याची शक्ति आपणामध्यें कशी राहिली नाहीं, याचें तिला आश्चर्य वाटे. परंतु त्याचा तिला कितीही राग आला, त्याला कितीही शिव्या दिल्या, तरी त्या प्रसंगीं आपणास बिलकूल शारीरिक सुख झालें नाहीं, असें तिचें तिलाच खात्रीनें सांगतां येईना, व यामुळें तिला स्वतःचा राग आला.

गर्भपात करणाऱ्या ज्या ज्या औषधांची तिनें नांवें ऐकिलीं होतीं तीं सर्व तिनें घेऊन पाहिलीं, परंतु उपयोग झाला नाहीं इतकेंच नव्हे तर कांहीं भयंकर चिन्हें दिसूं लागलीं. कांहीं विशिष्ट प्रकारच्या अन्नाचा तिला किळस येऊं लागला, व आजच सकाळीं स्तन व पोट यांत थोडा फुगीर-पणा आल्याचा तिला भास झाला.

समुद्रांत जीव दिला तर ? परंतु मामा काय म्हणेल ? व गर्भ राहिला असला तरीही आपण गर्भपाताची कांहीं तरी युक्ति काढूं, असें तिला अजून वाटत होतें. शारलॉतनें नवऱ्याबरोबर पॅरिसला जाऊन एका नर्सकडून गर्भपात करून घेतला होता, तिला विचारलें तर ? पण नको, तिला कळलें कीं गांवभर झालेंच.

पण रोझा ? लोक म्हणत तिनें दोनदां गर्भपात करवला होता. तिला विचारलें म्हणजे झालें, असें म्हणून ती तिच्याकडे जावयास निघाली.

*     *     *     *

लवकर ये, मला तुझी जरूर आहे. अशी स्पिरिताची तार मिळतांच तिचा मामा सेबॅस्तिआं पॅको एकदम परत आला. स्पिरिता स्टेशनावर गेलीच होती. त्यानें तिला पुष्कळ प्रश्न केले परंतु त्याचे घरीं पोंचेपर्यंत ती कांहीं सांगेना. घरीं गेल्यावर 'मी गर्भार आहे' अशी सुरवात करून तिनें सर्व हकीकत त्याला सांगितली. हल्लींच्या सुधारणेच्या काळांत अशा गोष्टी होऊं शकतात व अशा पाजी मनुष्याला कोणत्याही प्रकारची शिक्षा करण्याचें आपल्या हातांत नाहीं, हें पाहून त्याचा संताप झाला, पण काय करणार ? पुढील मार्ग ठरवला पाहिजे.

मामाः—तूं रोझाला विचारलंस हें बरं नाहीं केलंस.

स्पि:—पण मी स्वतः करतां म्हणून नाहीं विचारलं.

मामाः—ठीक आहे, ही गोष्ट चट्कणीं होतां कामा नये. पुढें काय करायचं ? झाल्या गोष्टीला इलाज नाहीं.

स्पि:—फ्रांस्वावर माझं प्रेम असतांनाही मी तुझ्या सांगण्यावरून आत्मसंयमन केलं. आणि आतां हा अनोळखी मनुष्य आला आणि व्हायचं तें शेवटीं झालंच !

मा:—मनुष्य प्रयत्न करतो, परंतु नशीब म्हणून एक असतं ना ? त्याला काय करणार ? तरी पण त्यालाही उपाय आहे.

स्पि:—मी तेंच म्हणतें. आपण मार्सेलसला जाऊं, आणि—

माः—त्याची घाई नाहीं. तीन महिनेपर्यंत गर्भारपण झांकणें शक्य आहे.

स्पिः—नाहीं, नाहीं, आत्तां—

माः—( अर्थ समजून ) काय गर्भपात ? कधीं नाहीं.

स्पिः—रोझानं मला एका बाईचा पत्ता दिला आहे, अगदीं सोपं आहे.—

माः—हें पहा, तुला लागलं आहे वेड. मी यांत तुला मदत करणार नाहीं.

स्पिः—नाहीं तर मी जीव देते.

माः—( रागावून ) तू जीव दिलास तर मला तरी जगून काय करायचं आहे ? तुझ्या तरुण वयांत एवढ्याशा गोष्टी करतां जीव देणें म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे. आणि नर्सकडून गर्भपात करवणं म्हणजे जवळ जवळ तोच प्रकार आहे.

स्पिः रोझानें दोनदां करवलं, ती नाहीं कुठें मेली ती ?

माः--ती मेली नाहीं, पण पुष्कळ मरतात. प्रकृतीला जेथें धोका आहे, अशा मार्गांत मी शिरणार नाहीं.

स्पिः— पण मला यांतून सोडव कशी तरी.

माः—सध्यां तुझ्या जीवाला कांहीं भीती नाहीं.

स्पिः—मला हें मूल नको आहे आणि तें माझ्यावर लादण्याचा कोणालाही हक्क नाहीं.

माः—बाळ, या जगांत न्याय फारसा नाहीं, पण न्यायाधीश मात्र आहेत व कायदेही आहेत. समाजाकडून दुबळयांचें रक्षण न झालें तरी कायदे मोडणारांस समाज शिक्षा करूं शकतो.

स्पिः—पण सांपडलं नाहीं म्हणजे झालं !

माः—ती गोष्ट आपल्या हातची नसते.

स्पिः—पण मला मूल झालं तर मी ते वाढवूं तरी कसं ?

माः--माझी सर्व मालमत्ता तुझीच आहे असें समज.

स्पिः--पण हें मूल मला नको आहे. माझ्या मुलाच्या बापाची निवड मी करीन तेव्हांच मी मूल होऊं देईन. नाहीं तर मेलेलं पतकरलं.

हे ऐकून मामाचा धीरच खचला व तो निराश होऊन बोलत नाहींसा झाला. तिलाही वाईट वाटलें, व ती त्याच्या जवळ येऊन गळ्यांत हात टाकून बसली.

माः -माझं ऐक. माझी मदत असल्यावर मूल वाढवणं फारसं जड होणार नाहीं. आईबापांनीं त्रास दिला तर तूं माझ्याकडे रहा, किंवा आपण हें गांवच सोडून जाऊं. भलत्याच वेळीं मूल होणं ही गैरसोय आहे, गुन्हा नाहीं.

त्यानें आपली शिकस्त केली व तिनें कबूल केल्यासारखें दाखवलें परंतु तें अगदीं वरवर होतें. कांहीं झालें तरी गर्भपात करावयाचाच हा तिचा निश्चय होता.

* * *

नंतर दोन महिन्यांनीं एके दिवशीं पहांटे एक वाजतां दारावर थाप आली.
सेबॅस्तिआं: -कोण आहे ?

—मी आहें, लुई, स्पी आजारी आहे.

मामा:—( कपडे घालीत ) काय होतं आहे ?

लुई:—कोणाला ठाऊक ! छातींत दुखतं आहे, आणि तुला तिनें बोलावलं आहे.

तो धांवतच निघाला. आपण तिची खात्री केली अशा समजुतीवर तो स्वस्थ होता. इतर गर्भिणी कुमारिकांच्या कांहीं गोष्टी त्याला आतां आठवल्या कोणी विणण्याच्या सुया गर्भाशयांत खुपसून घेतात, तर कोणी जालीम औषधें पितात. परंतु या गोष्टी तो लुईजवळ बोलला नाहीं. तिची आई फार घाबरली होती.

आई:—आतां करूं तरी काय ? काढा, चहा, काफी कांहींच ती घेत नाहीं. आतां डॉक्टरला बोलवावा लागला म्हणजे कामच भागलें. फट्दिशीं दहा रुपये जायचे, शिवाय औषधाचे पैसे निराळे.

मामा:-( तिला बाजूला सारून ) बरं, तूं आतां ग? बैस मी औषधं आणलीं आहेत

आई:—उगाच जागरण! आणखी उद्यां काम आहेच!

मामा:—तुम्ही निजा. जरूर लागली तर मी हांक मारीन.

पडत्या फळाची आज्ञा. ती निघून गेलीं. स्पिरिताला श्वास घेण्यास अडचण पडत होती. ओकारी येत होती.

उंदरांकरतां आणलेलें विष तिनें खाल्लें, असें तिनें शेवटीं कबूल केलें, व त्यानें ओकण्याचें औषध दिलें. विष ओकून पडलें, परंतु तिला कांहीं दिवस अंथरुणांतच रहावें लागलें.

याचा एक परिणाम असा झाला कीं, ती आपल्या प्रेमाकरतां जीव द्यायला निघाली, अशी फ्रांस्वाची कल्पना झाली, व तो वारंवार भेटावयास येऊं लागला. तो तिच्याशीं लग्न करील अशा आशेनें आईनेंही हरकत केली नाहीं. यामुळें स्पिरिताची जीव देण्याची इच्छा हळूहळू मावळली, व फ्रांस्वा-वर तिचें प्रेम दृढ होत चाललें. तिच्या मनाला कोणाचा तरी आधार पाहिजे होता, फ्रांस्वाचें प्रेम तिच्या शरीरावर होतें, परंतु आधींची हकीकत त्याला सांगितली नसल्यामुळें ती त्याचें म्हणणें कबूल करीना. तथापि तिचें त्याच्या-वर खरोखर प्रेम असल्यामुळें व आतां नाहीं म्हणण्यांत कांहीं मुद्दाही राहिला नसल्यामुळें, एके रात्रीं नाचानंतर त्यानें आपला उद्देश सिद्धीस नेलाच. नंतर—

फ्रांस्वाः—तरमग ही कांहीं तुझी पहिलीच वेळ नव्हे! [ तो त्यांतला दर्दी असल्यामुळें त्यानें ही गोष्ट तेव्हांच ओळखली. ] बोलत कां नाहींस? मी असा फसणार नाहीं.

तीः—मी तुला आधीं सांगणार होतें, पण तूं ऐकेनास!

तोः—मला माहीत असतं तर मीं इतकी काळजी घेतली नसती. तुला वाटलं मला काय समजायचं आहे? पण संभाळ, तुला मूलबील झालं तर माझा संबंध नाहीं.

ती:—त्याची तुला काळजी नको. ती व्यवस्था आधींच झाली आहे.

तो:—काय ! मुलाची व्यवस्था झाली आहे ?

तिनें त्याला सर्व हकीगत सांगितली, परंतु त्याला खरें वाटेना.

तो:—कांहीं तरी सांगतेस झालं. हे खरं असतं तर तूं केव्हांच आरडाओरडा केला असतास. असं कोणी स्वस्थ बसेल काय ?

दुसऱ्याच कोणाचा तरी नंबर पहिला लागल्यामुळें फ्रांस्वा चिडला होता, तो कांहीं केल्या ऐकेना. तिनें त्याच्या गळ्यांत हात घालून त्याला समजावण्याचा प्रयत्न केला.

ती:—तुझ्या प्रेमाशिवाय मला कांहीं नको. मी कांहीं तुला लग्न करायला सांगत नाहीं. तुला माझा कंटाळा आला म्हणजे मला सरळ सांग.

* * *

आणखी एक महिना लोटला. तिचा मामा कालच गांवीं गेला होता, परंतु आठ दिवसांनीं तो परत येऊन तिला मार्सेलसला घेऊन जाणार होता. तिचें पोट जरी अजून फारसें मोठें दिसत नव्हतें, तरी रोझा व फ्रांस्वाकडून तिची स्थिति बऱ्याच लोकांस माहीत झाली होती, याचा प्रत्यय तिला वारंवार येऊं लागला. फ्रांस्वाला तिची मुळींच पर्वा नव्हती, व त्याचा खिसा रिकामा असेल तेव्हांच तो तिच्याकडे येत असे.

एके रात्रीं ठरल्या ठिकाणीं तो न भेटल्यामुळें ती त्याचा तपास करीत एका नाचाचे ठिकाणीं गेली, तों तिची मैत्रीण मेलॅनी फ्रांस्वाचें चुंबन घेतांना दिसली. तिला येतांना पाहून ती म्हणाली. 'ही कशाला आली आपलं पोट दाखवायला ?' सर्व हंसूं लागले, पण तिला पाहून गप्प झाले. स्पिरिता चवताळल्यास काय करील याचा नेम नाहीं असें वाटून फ्रांस्वा व तिच्या मैत्रिणी निघून गेल्या व ती एकटी राहिली. तीही आशा सोडून घरीं जाऊन निजली. पण तिची बहिण शारलॉत तेथें नवऱ्याबरोबर आली होती, तिनें ही हकीकत आईला कळवली. व दुसऱ्या दिवशीं ती जागी होते तों आई, शारलॉत् व लुई तिच्या खोलींत घुसलीं.

आई:- खरं आहे का हें ?

स्पिरिताला उत्तर सुचेना, परंतु आईनें तिचें पांघरूण ओढलें व पोट उघडें करून पाहिलें.

आई:—खरंच आहे ! काय ग ए अवदसे, तूं आजारी आहेस नाहीं का ? सांग रांडे कोणाकडे गेली होतीस मरायला ! कोणाचं काम हें ?

असें म्हणून तिनें तिला ओढून जमीनीवर पाडलें, व मारूं लागली.

शारलॉत्:—अग, तिला माहित नसेल कदाचित् !

आई:—तसंही असेल ! बोल लवकर, सांग नांव. नाहीं सांगत ? तर मग कपडे घाल आणि पांच मिनिटांत घर सोडून जा कुठे ती भीक मागायला !

लुई:—चल उठ, जा आपल्या फ्रांस्वाला शोधीत !

शारलॉत्:—फ्रांस्वा तिला विचारतो आहे ! त्याचं मेलॅनीशीं लग्न ठरलं आहे, आणि तो सगळीकडे सांगतो आहे कीं, स्पिरीताचं मूल त्याचं नव्हे म्हणून ! हीच त्याच्या मागं लागली तर तो काय नाहीं म्हणेल ?

हें ऐकून स्पिरिताचा शेवटचा आधार नाहींसा झाला.

लुई:—हें मामाच्या शिकवणीचं फळ आहे.

शारलॉत:—अग बाई त्याचंच हें काम असेल कदाचित !

आई:—असेल सुद्धां. ती सदा त्याच्याकडे मरत असते !

स्पिरिता रागानें लाल झाली, तिनें यावेळीं त्यांचा खुन केला असता.

लुई:—तर मग नांव सांग कोणाचं तें ! नांव सांगितलं नाहींस तर तोच तो!

आई:—तीं करूं देत काय हवं तें ! चला आपण जाऊं ( स्पिरितास ) तूं मेलीस असं मी समजतें. पुनः तोंड नको दाखवूं.

मामाचें घर बंद होतें व तिच्याजवळ फक्त २०० फ्रांक ( अजमासें २० रुपये ) होते. आगगाडीच्या स्टेशनावर लोक पहातील या भयानें ती समुद्रावर गेली. व एका बोटीवर काम करण्याचें कबूल करून मार्सेलस येथें गेली. जाण्यापूर्वी, ' मला आईनें हांकून दिलें. काळजी करूं नको. माझी कांहीं तरी व्यवस्था लागली म्हणजे मी कळवीन ' अशी चिठ्ठी मामाचे घरीं टाकून ठेवली. अशा रीतीनें तिनं घर सोडलें ( अपूर्ण ).

# वेश्यांसंबंधींची जर्मनींतील नवीन व्यवस्था *

( लिहून आलेला मजकूर )

आजपर्यंत यूरोपांतील इतर कांहीं देशांप्रमाणें जर्मनींतही वेश्यांसंबंधींच्या सर्व गोष्टींवर पोलिसाच्या एका स्वतंत्र खात्याची देखरेख असे व वेश्यांची नोंद करणें, त्यांची वैद्यकीय तपासणी करवणें इत्यादि कामें या पोलिसाच्याकडून केलीं जात असत. गेल्या ऑक्टोबरच्या पहिल्या तारखेपासून मात्र या बाबतींतला नवा कायदा अंमलांत आलेला असुन ही सर्व व्यवस्था बदललेली आहे. अर्थात आठ महिने हा जरी फार वेळ नसला तरी बर्लिन सारख्या मोठाल्या शहरांतून तरी तिचा परिणाम कसा काय झालेला आहे हें तेवढ्यांत कळून येण्यासारखें आहे. ह्या नवीन व्यवस्थेंतील मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणें आहेत.

( १ ) वेश्यांसंबंधींची सर्व देखरेख पोलिस खात्याकडून काढून आरोग्य खात्याकडे दिलेली आहे.

( २ ) गुप्त रोगांपासुन आपला बचाव कशा रीतीनें करून घेतां येईल याबद्दलची माहिती विशेषतः कामकरी व मजूर लोकांत या खात्यानें शक्य तितक्या मोठ्या प्रमाणावर पसरावी व हे उपाय सर्वांनीं योजावे अशाबद्दलची चळवळ, व्याख्यानें, हस्तपत्रकें जाहिराती इ० चे द्वारें करावी.

( ३ ) आरोग्य खात्याच्या नोकरांनीं व डॉक्टरांनीं कोणालाही फी न घेतां तपासुन औषध द्यावें व आरोग्य खात्याचे दवाखाने कोठें आहेत त्या-बद्दलच्या पाट्या रस्त्यावर ठिकठिकाणीं लावून ठेवाव्या.

( ४ ) वेश्यांच्या नांवांची नोंद आरोग्य खात्यानें करून त्यांची नियत-कलिक तपासणी करण्याचा हक्क सरकारी अगर म्युनिसिपल डॉक्टरांना असावा. मात्र कोणत्याही खासगी डॉक्टराकडून तपासणी करून घेऊन त्याचें सर्टिफिकीट पाठवल्यास मग वेगळ्या तपासणीची जरूरी नसावी.

---

* डॉ. हेलेन श्टोकर यांनीं चालवलेल्या नॉय गेनेरात्स्योन या मासिकाच्या एप्रिलच्या अंकांतील हान्स फोन इवेल यांच्या लेखावरून.

(५) कोणाही जबाबदार रहिवाशाला दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला गुप्त रोग असल्याबद्दलचा संशय आला तर संशयाला कोणचीं कारणें आहेत त्यांसह त्यानें आरोग्य खात्याला आपलें नांव व पत्ता कळवून बातमी द्यावी. ही बातमी मिळाल्यानंतर तपासणी करण्यास पुरेसा पुरावा आहे असें आरोग्य खात्यांतील अधिकाऱ्याचें मत झाल्यास त्याकरतां त्या व्यक्तीला बोलाऊन प्रत्यक्ष चौकशी करण्याचा त्याला अधिकार आहे. व त्यानें हुकुम दिल्यास त्या व्यक्तीनें सरकारी अगर खासगी डॉक्टराकडून तपासणी करून घेऊन आपल्याला रोग नाहीं अशाबद्दलचें सर्टिफिकीट आरोग्य खात्याकडे सादर केलें पाहिजे, किंवा रोग आहे असें दिसुन आल्यास तो बरा होईपर्यंत औषध घेतलें पाहिजे.

(६) गुप्त रोगांबद्दलचा संशय आरोग्य खात्याच्या इन्सपेक्टरांना आला तरी देखील वरील प्रमाणेंच व्यवस्था व्हावी, व पुरुष व स्त्रिया या दोहोंस या बाबतींत सारखेच नियम असावे.

(७) गुप्त रोगांबद्दल औषध घेणाऱ्या सर्व रोग्यांची नोंद खासगी डाक्टरांनीं देखील केली पाहिजे व औषध मध्येंच बंद केल्यास त्यांनीं रोग्याचें नांव व पत्ता तावडतोब आरोग्य खात्याकडे कळवला पाहिजे.

या नवीन कायद्याचा एक विशेष परिणाम असा झालेला आहे कीं पूर्वी ज्या लोकांच्या बाबतींत गुप्त रोगांच्या बद्दलची तपासणी होणें शक्यच नव्हतें त्यांची तपासणी होऊं लागून त्यामुळें स्त्री व पुरुष या दोघांनाही रोगप्रसाराचें काम गुप्तपणें करण्यास प्रतिबंध झाला आहे.

१ ऑक्टोबर पासुन १ जानेवारीपर्यंत बर्लिन शहरांत जवळजवळ १००० पत्रें आरोग्य खात्याकडे तक्रार करणाऱ्या रहिवाशांच्या नांवांसह आलीं व त्यांतील शेंकडा ९० पत्रांतील संशय खरा ठरून त्या त्या व्यक्तींना रोगांवर उपचार करणें भाग पाडलें. या शिवाय निनांवी पत्रें तर असंख्य आलीं, पण कायद्याप्रमाणें त्यांजकडे दुर्लक्ष करणें आरोग्य खात्याला भाग पडलें. या तीन महिन्यांत रोगांवरील उपचार मध्येंच सोडून दिल्याबद्दल खासगी डॉक्टरांकडून

सुमारें १३५० नांवें आरोग्य खात्याकडे आलीं व ह्या रोग्यांनाही रोग बरा होईपर्यंत उपचार करून घेण्याची सक्ती केली.

या सर्व व्यवस्थेचा परिणाम जनतेच्या एकंदर आरोग्यावर काय होतो हें इतक्यांतच सांगणें कठीण आहे पण गेल्या तीन महिन्यांत डॉक्टरांकडे आलेल्या रोग्यांची संख्या बरीच वाढली आहे असें दिसतें. याचें कारण अर्थातच असें आहे कीं, आरोग्य खात्यानें केलेल्या चळवळीमुळें आजपर्यंत रोगाकडे दुर्लक्ष करीत असलेले रोगी व आपल्याला रोग आहे असें माहीत नसलेले रोगी आतां स्वतःला उपचार करून घेऊं लागले आहेत. लवकरच बचावाच्या साधनांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊं लागून रोग्यांचें प्रमाण बरेंच उतरेल अशी आरोग्य खात्याला आशा आहे. ज्या ४० लाख वस्तीच्या बर्लिन शहरांतील आरोग्य खात्यानें क्षय झालेल्या रोग्यापैकीं शेकडा ८० चा शोध लावून त्यांच्या औषधोपचाराची व्यवस्था केली, किंवा अर्भकांच्या मृत्यूचें प्रमाण शेकडा ४० वरून १० पर्यंत आणलें त्याला गुप्त रोगांचा प्रसारही कमी करतां येईल असें मानण्यास बरीच जागा आहे. समाजस्वास्थ्याची किंमत ज्यांना कळते असे सर्व लोक जर्मनींतील या नवीन कायद्याचे परिणाम काय होतात हें विशेष उत्सुकतेनें पहातील यांत संशय नाहीं.

---

# वेश्यांविरुद्ध अजब उपाय.

वेश्यांचें नांव काढतांच कांहीं लोकांचा इतका संताप होतो कीं त्यांचे डोक्यांत विचारशक्तीला जागा रहात नाहीं. गेल्या एप्रिल महिन्यांत श्री. दळवी, जोशी, व चंदावरकर व भगवानदास माधवदास यांनीं प्रेसिडेन्सी सोशल रिफार्म असोसिएशन् तर्फे सरकारला जो खलिता खरडला आहे, यावरून त्या चौकडीला या कोटींत बसवावें लागतें.

कोणती अडचण आली असतां काय उपाय योजावा हें ठरवणें अशा विद्वान मंडळीस फारसें कठिण पडूं नये. त्यांतुन नेहमींच्या संवयीची अडचण

असल्यास मुळींच पंचाइत पडतां कामा नये. असें असूनही त्यांनीं लिहिलेल्या पत्रांतला कोटिक्रम वाचून खरोखर आश्चर्य वाटत.

घरवाले वेश्यांकडून फाजील भाडें घेतात हा त्यांचा मुख्य मुद्दा; व कोणीही वेश्यांस भाड्यानें जागा देणें हा गुन्हा समजावा, हा त्यावर उपाय. खाशी तोड ! म्हातारपण न येण्यास उपाय काय, तर तरुणपणींच जीव द्यावा ! मग वेश्यांवर जुलूम होतो, त्यांची दया येते, हें ढोंग कशाला ? वेश्यांस स्वस्त भाड्यानें जागा मिळाव्या हा यांचा उद्देश नसून, त्यांस मुळीं जागाच मिळूं नये हा उद्देश आहे ! मग घरवाले जास्त भाडें घेतात याचा बादरायण संबंध जोडण्याचा प्रयत्न कशाला ?

गेल्या लढाईचे वेळीं फाजील भाड्याची अडचण जेव्हां सर्व जनतेस उपस्थित झाली, तेव्हां ' कोणीही कोणास भाड्यानें जागा देणें हा गुन्हा आहे ' असा कायदा या लोकांनीं याच तत्त्वावर कां सुचवला नाहीं ? त्या वेळीं ज्याप्रमाणें ' रेन्ट ॲक्ट ' पास करून घरवाल्यांस आळा घालतां आला तसाच येथेंही घालतां येईल परंतु भडकलेल्या डोक्यांस सरळ उपाय कसा सुचणार ?

यांनीं या शिवाय आपल्या मतानें आणखीही एक युक्ति लढवली आहे, परंतु त्यांत ही ते तितकेच फसले आहेत. वरील सूचनेप्रमाणें कायदा नच केला तर अप्रत्यक्ष रीतीनें तीच गोष्ट करतां येईल अशा करतां ही युक्ति आहे. कुंटणखानेच कायद्यानें बंद केले म्हणजे वेश्यावृत्ती करतां जागा देणारा घरवाला गुन्ह्यास मदत करतो असें होईल, असें हे म्हणतात. परंतु कुंटणखाने नाहींसे झाले म्हणजे वेश्या नाहींशा होतात असें मात्र नाहीं. स्वतंत्रपणें धंदा करणाऱ्या वेश्यांस कुंटणखाना म्हणतां येत नाहीं. इंग्लंडांत कुंटणखान्यांविरुद्ध कायदा आहे, परंतु पुष्कळ स्वतंत्र वेश्या एकाच इमारतींत राहूं शकतात व राहतातही. तोच परिणाम येथेंही होणार. वेश्यावृत्ति हा जोंपर्यंत गुन्हा नाहीं तोंपर्यंत स्वतंत्र वेश्यांस जागा देणारा घरवाला गुन्हेगार होणार नाहीं. मग वरील उद्देश कसा साध्य होणार ?

एकंदरींत या खलित्यांत समंजसपणा बिलकूल दिसत नाहीं, व यामुळें ज्या संस्थेच्या तर्फे हा लिहिला आहे तिची मात्र शोभा होते

# नवीन लेखांतील विचार.

———————:+:———————

शरीरांतील इतर कांहीं मांसपेशींप्रमाणे स्त्रियांचें अंडाशयांतून एक प्रकारचा अंतःस्राव होत असतो, व मासिक रक्तस्राव, गर्भावस्था वगैरेशीं त्याचा बराच संबंध असतो. हा अंतस्राव व्हावा तसा होत नसल्यास हा इतर प्राण्यांपासून घेऊन औषध म्हणून दिल्यास त्याचा उपयोग होतो. हा पुरेसा व स्वस्त तयार करण्याचें सोपें साधन हल्लीं सांपडलें आहे. हा स्राव गर्भिणी स्त्रियांच्या रक्तांत व मलमूत्रांतही सांपडत असल्यामुळें, तो मूत्रापासून तयार करणें शक्य आहे, व त्यास फारसा खर्च येण्याचें कारण नसल्यामुळें तो स्वस्त होईल. वंध्या स्त्रियांस याचा कधीं कधीं उपयोग होतो.

*　　　　*　　　　*

चीनच्या अत्यंत पश्चिम भागांतील डोंगरांत लोलो नांवाचे लोक राहतात, व चीनी लोकांचें व त्यांचें हाडवैर आहे. यांतील स्त्रियांची विनयाची कल्पना थोडीशी चमत्कारिक आहे. कोणत्याही स्त्रीला कोणी नग्न पाहिल्यास ती गोष्ट तिला व तिच्या सर्व घराण्याला लाजिरवाणी समजतात. परंतु ज्यावेळीं त्यांतील दोन घराण्यांमध्यें फार दिवस युद्ध माजून राहतें, तेव्हां तें बंद करण्याकरतां एका घराण्याच्या अधिकाऱ्याची बायको त्या दोन सैन्यांचे मध्यें उभी राहून दोघांसही तह करण्याचा उपदेश करते. एवढ्यानें काम भागलें तर ठीकच, परंतु त्यांनीं न ऐकल्यास ती आपलीं सर्व वस्त्रें त्यांचे देखत काढून टाकते, व नग्न उभी राहते. इतकें झाल्यावर दोन्ही बाजूचे वीरांस लाज वाटून ते तह करतात. परंतु तिची अशी स्थिति केल्याबद्दल दोन्ही बाजूचे पुरुषांसच लाज वाटते, तिला बिलकुल वाटत नाहीं !

×　　　×　　　×

क्षयरोग हा निदान कांहीं मुलांस तरी जन्मतः असतो, म्हणजे हा रोग आनुवंशिक असूं शकतो, असें आतां निर्विवाद सिद्ध झालेलें आहे. या रोगा-

वर अजून खात्रीचा उपाय सांपडलेला नाहीं, यामुळें वरील गोष्ट बरीच भीतिप्रद वाटण्याचा संभव आहे. परंतु एकंदर क्षयरोग्यांमध्यें आनुवंशिक रोग्यांचें प्रमाण फारच कमी असतें, व बहुतेकांस हा रोग लहानपणींच आईबापांपासुन संसर्गानें लागतो, अशी वस्तुस्थिति आहे. यामुळें क्षयी आईबापांची मुलें त्यांचेपासुन जन्मतःच दूर केल्यास, त्यांस क्षयरोग होण्याचा संभव इतर लोकांपेक्षां जास्त नसतो, व अशा तऱ्हेनें मुलांचा बचाव करतां येतो ही गोष्ट महत्त्वाची आहे, व समाजास करतां येण्यासारखी आहे. [ प्रो. लेऑं बेरनार, पॅरिस् ]

× × ×

कलकत्त्याचे हेल्थ ऑफिसर आपल्या रिपोर्टांत म्हणतात कीं १५ आणि २० वर्षांचें मधील क्षयरोगानें झालेल्या मृत्युचे आंकडे पाहिल्यास मुलांचे सहापट मुली मरतात असें दिसुन येतें. पडदा व बालविवाह हीं दोन याचीं कारणें आहेत असें त्यांचें मत आहे. कलकत्त्यास नेहमीं निदान १०,००० लोक क्षयानें आजारी असतात असें ते म्हणतात.

× × ×

गर्मीचे परिणाम कोठवर पोंचतील हें सांगणें कठिण असतें. एका स्त्रीला हा रोग जन्मतः होता व त्यामुळें तिला शृंगारोन्माद झाला. ती घोड्यांना प्रेमपत्रिका लिहित असे, व या संबंधापासून ग्रीक पुराणांत वर्णिलेल्या सेंटॉर ( 'विराश्व' म्हणजे वरील भाग मनुष्य व खालचा भाग घोडा ) सारखे पराक्रमी प्राणी जन्माला येतील, अशी आशा प्रदर्शित करीत असे.

* * *

जपानी लोक चुंबन हें अश्लील समजतात. जपानांत चित्रपट दाखवण्यापूर्वी त्यांतील चुंबनाचे प्रसंग कापून टाकतात. तसेंच त्यांस स्नानगृहांत वगैरे नग्न माणसें पाहण्याची बरीच संवय असते, तरीही नग्न चित्रें म्हणजे ते अत्यंत अश्लील समजतात.

× × +

ज्याची लोकसंख्या कमी होत आहे असा पृथ्वीचे पाठीवर आयर्लंड हा एकच देश आहे. गेल्या ८० वर्षांत या देशाची लोकसंख्या निंमे झाली, व

जसजशी लोकसंख्या कमी झाली तसतसे लोक अधिक सुखी झाले आहेत. अर्थात ही स्थिति मुख्यतः बऱ्याच लोकांनीं देशांतर केल्यामुळें झाली आहे, परंतु हा उपाय नेहमी उपयोगी होणार नाहीं. शेवटीं संततिनियमनावरच भिस्त ठेवावी लागेल.

* * *

मार्च ८ तारखेला मि. कर यांनीं लंडन येथें दिलेल्या एका व्याख्यानांत सांगितलें कीं इंग्लंडात सुशिक्षित स्त्रियांपैकीं जवळ जवळ निमे अविवाहित राहतात. व त्या नेहमी संभोगाशिवाय राहतात असें नाहीं. मिसेस ग्रेस नेहॅम नांवाच्या अमेरिकन विधवेला उघडपणें मूल झालें त्याबद्दल बरीच चर्चा झाली, परंतु अलीकडील थोड्या वर्षांत इंग्लंडमधील कित्येक सन्मान्य सुशिक्षित अविवाहित स्त्रियांस उघडपणें मुलें झाल्याच मला माहीत आहे. हा प्रकार वाढत जाणार व २० वर्षांत त्यांत कांहीं नवल वाटणार नाहीं. अशा स्त्रियांजवळ विपुल पैसे मात्र पाहिजेत, किंवा मिळवण्याची ताकद पाहिजे. परंतु आता लोकांना फारशी मुलें होत नाहींत तेव्हां ज्याला एकादीच मुलगी आहे तो तिला अविवाहित ठेवून तिचीं मुलें पोसण्यासही तयार होईल.

* * *

गृहलक्ष्मी मासिकाचे एप्रिलचे अंकांत ‘ अहिल्येचें उत्तर ’ या लेखांतून खालील उतारा घेतला आहे. हे विचार एका हिंदु स्त्रीनें लिहिले आहेत हें खरें वाटणें कठिण आहे तरी पण हें खरोखरच एकाद्या अहिल्येनें लिहिलें असल्यास हिंदु स्त्रिया बऱ्याच धीट होत आहेत असें म्हणावें लागतें. आनंदाची गोष्ट आहे.

‘ स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक प्राणिमात्रसहज अशा कांहीं वैषयिक गरजा आहेत. आणि त्यामुळ, सामान्यपणें स्त्रीला पुरुषाच्या व पुरुषाला स्त्रीच्या निकट सहवासाची तीव्र आवश्यकता भासते. हिंदुसमाजांत वरच्या वर्गामध्यें काडीमोड अथवा घटस्फोट हे प्रचलित किंवा शास्त्रानुमत नसल्याकारणानें, स्त्री नवऱ्याच्या वागणुकीविषयीं कितीही असंतुष्ट

असली, नवऱ्याची वागणूक कितीही अन्याय्य असली, नवरा कितीही दुष्ट किंवा नीच असला तरी, तिलाच नमतें घ्यावें लागतें! यांत स्त्रीचें स्वभावसिद्ध असामर्थ्य किंवा तिचा नैसर्गिक कमकुवतपणा मुळींच तिच्या या अनुकंपनीय स्थितीचें कारण होत नाहीं—तर समाजाची अन्यायमूलक विषम रचना तिला अशा प्रकारच्या दुःसह अन्यायापुढें मान वाकवावयास लावते. पति स्त्रीवर अतिशय असंतुष्ट झाला तर तो तिचा त्याग करूं शकतो व तिच्या जिवंतपणीं दुसरें लग्न करून त्याला आपले वैषयिक विकार शांत करतां येतात त्यास त्याला हिंदु धर्माची आडकाठी नाहीं, याच्याही पलीकडे जाऊन त्यानें दुसऱ्या निंद्य उपायांचें अवलंबन केलें तरी तो समाजांतून बहिष्कृत होत नाहीं, तो समाजाच्या सहानुभूतीला मुकत नाहीं, समाज त्याला स्थानभ्रष्ट करीत नाहीं! पण स्त्रीची गोष्ट अगदीं निराळी आहे, तिची अवस्था फार नाजूक आहे, तिचें असिधाराव्रत आहे. तिच्याकरतां असणाऱ्या नीतिनियमांच्या पालनांत जरा इकडे तिकडे झालें असतां तिला क्षमा नाहीं. पतीनें कसेंही वागविलें तरी तिनें तें निमूटपणें सहन केलें पाहिजे! तिला तिची स्वतःची अशी सुखेच्छा किंवा सुखोपभोग नाहीं!—हीं सर्व पतीच्या मर्जीवर व लहरीवर अवलंबून आहेत, अशा स्थितींत स्त्रियांना हार खावी लागते, नाक मुठींत धरून पतीला शरण जावें लागते यांत नवल नाहीं.

× × × ×

लंडनमधील एका उदार गृहस्थानें तेथील मुक्तिफौजेला एक मोटर गाडी बक्षिस दिली, ती अशा अटीवर कीं एकंदर निदान १०० मुलें असलेल्या १८ आयांस त्यांतून लंडन भोंवतीं हिंडवून आणावें. ज्या आयांस निमंत्रण केलें त्यांपैकीं पहिल्या ८ आयांचींच मुलें १०० भरलीं, व १८ आयांचीं २५१ झालीं. या सर्वांस फेब्रुआरी १० रोजीं लंडन भोंवतीं हिंडवून आणलें. १५ मुलांच्या आयांची एकंदरींत लंडनमध्यें चैन असते!

× × × ×

# पत्रांचा सारांश.

१

सा. न. वि. वि. माझी पत्नी दरवर्षी प्रसुत होते व तिला त्यापासुन अतिशय त्रास होतो. हल्ली तिला बरें नाहीं व विटाळाशिवाय दोन महिने गेले आहेत. ती यांतुन मोकळी होईल असें कांहीं औषध पाठवाल काय? असें केल्यास आम्ही दोघेही आपलीं आजन्म ऋणी होऊं. पोटांतील औषधापेक्षां बाहेरून वापरण्याचें औषध असल्यास बरें. असें उत्कृष्ट व विनधोक औषध व्ही. पी. नें पाठवुन द्यावें. विलंब करूं नये. आपला,

× × ×

[ कायदा मोडण्याची आमची इच्छा नाहीं. सं. ]

२

सा. न. वि. वि. आपण आपल्या समाजस्वास्थ्य मासिकानें लोकांना ऋणी करण्याचा प्रयत्न करीत असलां तरी त्यांना दुसऱ्याचा बेदाम ऋणी होण्याची अक्कल असेल तेव्हां खरें.

आपल्या मासिकाबद्दल बहुतेक सुशिक्षितांची मतें प्रतिकूल असल्याबद्दल माझ्या पाहण्यांत येतें. अशानें "आपण न करि अभ्यास, दुसऱ्यास करूं नेदी जाण,...... तो एक पढत मुर्ख"--पणा दाखविल्यासारखें होत आहे, हे ते विसरतात. आज आपली देश व कौटुंबिक परिस्थिति पाहिल्यास, ती सुधरे-पर्यंत संततिनियमनाशिवाय आपल्या लोकांचें गत्यंतर नाहीं हें निर्विवाद होय. आमच्या व इतर देशांच्या सांपत्तिक परिस्थितीची तुलना केल्यास, आमच्या देशापेक्षां ती ज्या देशांत सहस्रपटीनें बरी आहे अशांत जर या गोष्टीचा उहापोह सार्वत्रिक होऊन त्याचें अवलंबन शेंकडा पंचाहत्तर कुटुंबें करीत आहेत; तर आमच्या देशांत ती पाळणें सक्तीचे झाल्याशिवाय आपल्या लोकांचा तरणोपाय नाहीं, हें निर्विवाद होय. आमच्या देशांतील शेंकडा नव्याण्णव कुटुंबें आज संततीच्या अवाढव्य भाराखालीं चेंगरत आहेत.

माझें म्हणणें नाहीं कीं, त्यांना अनियमित संतति झाली नसती तर तीं आज वैभवाच्या शिखरावर पोंहचलीं असतीं; पण आज त्यांना ज्या वाजवीपेक्षां फाजील संततीच्या व विपत्तीच्या हाल अपेष्टेमुळें दोन्ही वेळ करव्याभरच्या अन्नावरही अर्धपोटीं रहावें लागत आहे तें, संततिनियमन केल्यास निदान तेंच अन्न दोन घांस जास्त मिळेल यांत शंका नाहीं; परंतु अशा कर्मवादाचा विषय बरेच सुशिक्षित लोक दैववादाला भिडवून आपला, समाजाचा व देशाचा मोठा गुन्हा करीत आहेत हें ते विसरतात.

आपल्या एप्रिल १९२८ च्या अंकांतील नंबर ३ च्या पत्रांत केलेल्या सूचना अंमलांत आणिल्यास समाजावर आपले फार उपकार होतील. माझ्या एका विधुर मित्रास आजन्म मित्राची फार जरूरी आहे. कांहीं कौटुंबिक कारणामुळें त्याला द्वितीय-विवाह कर्तव्य नाहीं. त्याची सांपत्तिक परिस्थिति व शरीरसंपत्ति चांगली आहे. याकरतां कोणाही गरजू व्यक्तीनें नैतिक धर्मानें 'आजन्म मित्र' राहण्याचें कबूल केल्यास, तो तिच्या कर्तव्याची सवाई फेड तिला देण्यास तयार आहे. ज्यांना हा सौदा पटत असेल त्यांनीं समाज स्वास्थ्याच्या संपादकामार्फत पत्रव्यवहार करावा. हा 'आजन्म मित्र' नैतिक मांसाहारी व सुशिक्षित असून संततिरहित असावा.

वरील मजकुरास आपल्या मासिकाच्या पुढच्या अंकांत स्थळ दिल्यास फार आभारी होईन. हे विनंति.

आपला,

*　　　*　　　*

[ आनुवंशिक रोगांचे अभावीं संततिनियमनाची सक्ती असण्याचें कारण पडूं नये. सांपत्तिक किंवा प्रकृतीचे दृष्टीनें जरूर पडल्यास संततिनियमन केलें म्हणजे पुरे. अर्थात स्वत:चे हित ज्यांस कळत नाहीं असे महामूर्खही असणारच, परंतु यांची संख्या शिक्षणानें कमी होईल. कुत्र्यांमांजरांप्रमाणें यदृच्छेनें संतति न होतां, ती नको असेल तेव्हां बंद करण्याची ताकद मनुष्यांत आहे. या शक्तीची जाणीव गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांस आली म्हणजे सध्यां पुरे आहे. रोगी किंवा वेड लागलेल्या मनुष्यांवर सक्तीनें शस्त्रक्रिया करून

त्यांची संतति बंद करणें ही पुढची पायरी आहे, परंतु त्यास कायद्याची मदत लागेल व ती मिळणें मुष्किल आहे. सं. ]

३

प्रिय महाशय,

खालील प्रश्नास आपल्या मासिकांत उत्तर दिल्यास उपकार होतील.

गर्भावस्थेंत संभोगानें स्त्रीस इजा होते कीं काय, व होत असल्यास किती महिन्यांनंतर होते ? गर्भावस्थेंत संभोग अजीबात वर्ज करावा व न केल्यास स्त्रीस व भावी अपत्यास इजा होते, अशी लोकांची कल्पना असते—

आपला,

* * *

[ हें बऱ्याच अंशीं स्त्रीचे प्रकृतीवर अवलंबून राहील. कांहीं स्त्रियांस क्षुल्लक कारणानें सुद्धां गर्भपात होण्याची संवय असते. अशांस संततीची इच्छा असल्यास त्यांस गर्भावस्थेंत संभोग वर्ज करावा लागेल इतकेंच नाहीं, तर शरीराची हालचाल शक्य तितकी कमी करावी लागेल. वारंवार गर्भपात झाल्यामुळें मुळींच मुलें न झालेल्या स्त्रिया, गर्भधारणेपासून आजारी मनुष्याप्रमाणें शक्य तितका वेळ अथरुणांत काढतील तर त्यांस मूल होतें, असा पुष्कळांचा अनुभव आहे. मात्र , गर्भपाताचें कारण कधीं कधीं गर्मी हें असतें, तेथें हा उपाय लागू पडणार नाहीं.

सामान्यतः सुदृढ स्त्रियांस शेवटचा महिना दीड महिना संभोग वर्ज केल्यास बस्स होतें, परंतु संभोगाचे वेळीं गर्भाशयावर भार पडणार नाहीं, अशी खबरदारी घेतली पाहिजे. अशी तजवीज केल्यास स्त्रीस किंवा गर्भास इजा होण्याचा संभव नाहीं. यापेक्षां जास्त खुलासा येथें करणें शक्य नाहीं. सं. ]

---

पॅरिस् येथें एका स्त्रीस गर्भावस्थेंत अनीमिआ ( रक्तांतील रक्तगोलक कमी होणें ) झाल्यामुळें गर्भपात करावा असें डॉक्टरानें मत दिलें व अशा वेळीं कायद्याची ही परवानगी असते. परंतु तिनें तें कबूल न केल्यामुळें ती त्यांतच मेली !

# ‘ ओनीडा ’ समाजाची हकीकत.

अमेरिकेंत जे जे सामाजिक प्रयोग करण्यांत आले, त्यांत ‘ ओनीडा ’ समाज हा बराच महत्त्वाचा आहे. सुमारें १०० वर्षांपूर्वी अमेरिकेंत प्युरिटन् पंथाच्या लोकांचें अतिशय वजन होतें. हे अत्यंत धार्मिक असून कोणत्याही प्रकारचा ऐषआराम किंवा करमणूक सुद्धां त्यांस पाप वाटे. यांपैकीं उच्च कुटुंबांतील सुमारें २०० तरुण लोक, प्रत्येकीं ४०० डॉलर (हल्लींचे भावानें रु.११००) बरोबर घेऊन वेगळे झाले व त्यांनीं ‘ ओनीडा ’ नांवाचा समाज स्थापन केला. त्यांतील सर्व स्त्रिया व पुरुष बरोबर काम करीत असत, परंतु शारीरिक मेहनतीचें काम पुरुष करीत असत. परस्पर सहकारितेनें त्यांनीं घरकामाचा बोजा बराच कमी केला. व ते जरी दिवसांतून सहाच तास काम करीत, तरी ते दिवसेंदिवस श्रीमंतच होत गेले. अर्थात त्यांच्या क्रांतिकारक मतांमुळें त्यांचा इतरांकडून छळ व्हावयाचा तसा झालाच.

स्त्रीपुरुषसंबंधांत लज्जास्पद असें कांहीं नाहीं असें ते प्रतिपादीत असत, व ते समागम दोन प्रकारचा मानीत असत. एक प्रजोत्पादनाकरतां व दुसरा प्रेमाकरतां. एकाच व्यक्तीशीं प्रेमसंबंध ठेवला पाहिजे, असें ते मानीत नसत, परंतु शरीरसंबंध होण्यास दोन्ही व्यक्तींची इच्छा असली पाहिजे, असा त्यांचा कायदा होता. हा संबंध कोणातरी मध्यस्थानेंच जुळवून आणिला पाहिजे व त्या दोन व्यक्तींची एकमेकांबद्दलची कामेच्छा कशा प्रकारची आहे, याचा मित्रमंडळींत चांगला खल होत असे, व त्यांत कांहीं निंद्य नाहीं असें ठरल्यासच त्यास परवानगी मिळत असे.

एकच स्त्री आणि एकच पुरुष विवाहशृंखलांनीं जखडून टाकल्यास तीं आपलपोटीं होतात, व नवरा आणि बायको यामध्यें परस्पर मालकीची भावना उत्पन्न होते, तशी या नवीन पद्धतींत होणें शक्य नाहीं व यामुळें सर्व माणसें अधिक सुखी होतात, असें त्यांचें म्हणणें होतें. शिवाय एकंदर मालमत्ता समाईक असल्यामुळें टाकलेल्या बायका किंवा पोरकीं पोरें ह्यांचे हाल होत नसत.

या एकंदर ३०० लोकांचे समाजानें पुष्कळ नवीन कल्पनांचा प्रसार

केला यांत शंका नाहीं. कामशास्त्राचें शिक्षण व संततिनियमन या दोन गोष्टींचे अमेरिकेंतील प्रथम पुरस्कर्ते ते होते. दोन व्यक्तींनीं एकमेकांच्या प्रेमांत गुरफटून राहणं, हें ते अत्यंत आपमतलबी व समाजविरुद्ध वर्तन समजत असत. मुलांच्या संगोपनाची व्यवस्था जरूर पडल्यास समाजाकडून होत असे.

ते अतिशय उद्योगी व प्रामाणिक असत व दारू, तंबाखू व शिवीगाळ त्यांना वर्ज्य असे. ते इतर लोकांशीं संबंध करीत नसल्यामुळें त्यांच्यांत गुप्त रोगांचा प्रसार झाला नाहीं.

शेतकीपेक्षां कारखान्यांवरच त्यांची जास्त भिस्त होती व शेवटीं त्यांनीं दोनच प्रकारचे कारखाने ठेवले. उंदरांचे सांपळे व चांदीचें सामान त्यांचेकडे अप्रतिम निघूं लागलें.

परंतु इतर लोकांस हा सुखी समाज पाहवला नाहीं. त्यांची विवाहपद्धति हाणून पाडण्याकरतां जेव्हां नवीन कायद्याचे मसुदे पुढें येऊं लागले. तेव्हां आपण जमवलेली मालमत्ता कोर्टांत भांडण्याकरतां वकिलांस देण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून त्यांनीं ती पद्धत रद्द केली; व १८८१ चे सुमारास हा समाज नामशेष झाला. नंतर त्यांतून एक लिमिटेड कंपनी निघाली व ती अजून वर सांगितलेले दोन प्रकारचे पदार्थ तयार करून विकते, व ते अजूनही अप्रतिम आहेत

---

# ताजी व शिळी बातमी.

नथू महादू व गोपाळ सखाराम या दोघांनीं मिळून सोपान गणपत यास रस्त्यांत गांठून त्याचा खून केला. हे सर्व महाड तालुक्यांतील विणकर होते. नथू महादू हा २५ वर्षे वयाचा विधुर असून सोपान गणपतीची बायको लक्ष्मी हिच्याशीं त्याची विशेष दाट ओळख होती. सोपानास हें समजलें तेव्हां तो बायकोला रागें भरला व मार दिला. गेल्या फेब्रुवारींत तो आईबापांच्या गांवीं जात असतां त्याचा खून झाला . दोन्ही आरोपींनीं मॅजिस्ट्रेटपुढें गुन्हा कबूल केला, परंतु सेशन कोर्टांत नाकबूल गेले. तरी गुन्हा शाबीत होऊन ठाणें येथील सेशन जज्जानें नथूस फांशीची व गोपाळास जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा दिली

अशा वेळीं बहुधा नवरा खून करतो, परंतु या वेळीं उलट झालें. गोपाळाला हा नसता उपद्व्याप कोणीं सांगितला ? मित्राला मदत करावी पण ती कोठपर्यंत ?

# समाजस्वास्थ्य




वर्ष १ ] मार्च १९२८ [ अंक ९

संपादक--र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | वेश्यांसंबंधीं कायदे. ४ ... ... ... | १ |
| २. | एक महत्त्वाचा ग्रंथ ... ... ... | ६ |
| ३. | आमचीं नाटकें ... ... ... | १६ |
| ४. | वेश्या कोठें असाव्या ? ... ... ... | १७ |
| ५. | नवीन लेखांतील निवडक विचार ... ... | १८ |
| ६. | बळजबरीचे खटले ... ... ... | १९ |
| ७. | ब्रिटिश व अमेरिकन सैन्याकरतां वेश्या ... | २२ |
| ८. | वेश्यांच्या जाहिराती ... ... ... | २३ |
| ९. | ताजी व शिळी बातमी ... ... ... | २४ |



संततिनियमनाकरितां

'मॅटोरी' वड्या वापरा.

डझनाचे नळीस दीड रुपया.

सोल एजंटः—राइट एजन्सी,

२० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई

# वेश्यांसंबंधीं कायदे-४.

## चालू व्यवस्था-हॉलंड.

हॉलंडांत वेश्यागृहांस परवानगी नाहीं, परंतु याचा परिणाम नेहमीप्रमाणेंच असा झाला आहे कीं वेश्यांस आपला धंदा इतर नांवांखालीं चालवावा लागतो. उपाहारगृहें, पानगृहें, किंवा इतर सार्वजनिक ठिकाणीं किंवा आसपास उभें राहून खुणांनीं किंवा अंगविक्षेपांनीं लोकांचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न त्यांनीं करतां कामा नये, वगैरे कायदे आहेत. परंतु वेश्यावृत्तीनें राहणाऱ्या स्त्रिया अशा कायद्यांमुळें सुधारणें शक्य नाहीं, व हे कायदे पसंत करणारे फ्लेक्स्नर साहेब ही गोष्ट कबूल करतात. 'वेश्या रस्त्यांत क्वचित् दिसतात, परंतु दारूचे दुकानांत जास्त दिसतात.' शिवाय स्नानगृहें, नर्तनगृहें वगैरे इतर शक्य तितक्या ठिकाणीं त्यांना आपला धंदा लपवावा लागतो. परंतु वरील लेखकास हा लपंडाव पसंत आहे.

## स्वित्झर्लंड.

येथें निरनिराळ्या विभागांत निरनिराळे कायदे आहेत. जिनीव्हा येथें फ्रान्सप्रमाणें परवान्याची पद्धत आहे. झ्यूरिच् येथें वेश्यांविरुद्ध कडक कायदे आहेत, व कुंटणांस जबर दंड व ५ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा आहे. इतकेंही करून वेश्यांचा नायनाट झाला आहे काय? फ्लेक्स्नर कबूल करतात कीं 'लहान रस्त्यांत चिरूटाचीं खोटीं दुकानें असतात. तेथें चिरूटांच्या जवळ जवळ रिकाम्या पेट्या व नटलेल्या स्त्रिया असतात. कोणी तेथें एखादा चिरूट घेऊन किंमतीपेक्षां मोठें नाणें दिल्यास त्याला मोड मिळत नाहीं, परंतु त्याचा मोबदला अन्य रीतीनें मिळूं शकतो. वेश्या स्वतः दुकानावर बसत नाहींत, त्या आंत असतात.' कायद्यानें कधींही वेश्या नाहींशा होणें शक्य नाहीं. त्या कायद्यांचा परिणाम इतकाच झाला आहे कीं वेश्या सार्वजनिक ठिकाणीं असत

सांगण्याचें काम त्याच्या डॉक्टरानें केलें पाहिजे. या रोगांवर पत्रव्यवहारानें
उपचार सांगण्याची मनाई आहे.

## २ रा भाग—वेश्यावृत्ति.

कुंटणगिरीसंबंधीं कायद्यामुळें वेश्यागृहांस परवानगी नाहीं. वेश्यांस
सुधारण्याकरतां जरूर पडल्यास त्यांस सरकारी संस्थांत ठेवण्यांत येतें. अठरा
वर्षांचे आंतील मुली किंवा मुलगे, या दृष्टीनें दुराचरणी दिसल्यास, त्यांस
ताळ्यावर आणण्याकरितां सरकारी अधिकाऱ्यांनीं योग्य ते उपाय योजिले
पाहिजेत.

## ३ रा भागः—शिक्षा.

यासंबंधीं अधिकार पोलिसास व न्यायाधीशांस आहे व पोलीसनें
दिलेल्या शिक्षेवर अपील नाहीं. निष्काळजीपणामुळें कोणी कोणास संसर्ग होऊं
दिल्यास, त्यास १० पासून १०००० क्रौन दंड किंवा १ पासून ३० दिवस
कैद देतां येते. परंतु कोणी मुद्दाम संसर्ग घडविल्यास, १ पासून ८ महिने कैद
देतां येते. नवराबायको किंवा याच नात्यानें राहणाऱ्या इतर स्त्रीपुरुषांचे बाब-
तींत तक्रार आल्याशिवाय याबद्दल खटला होऊं शकत नाहीं. परंतु इतरांचे बाब-
तींत पोलिसास खटला करतां येतो. पैशाचे लालचीनें हा गुन्हा केल्यास याशि-
वाय १० पासून १०००० क्रौन पर्यंत दंड करतां येतो.

## वेश्यावृत्ती संबंधीं आव्हान.

सार्वजनिक ठिकाणीं कोणाही पुरुषानें किंवा स्त्रीनें उघडपणें अशा
प्रकारचें आव्हान केल्यास, किंवा १६ वर्षांचे आंतील पुरुषास किंवा स्त्रीस
( कोठेंही ) फूस लावण्याचा प्रयत्न केल्यास, तो गुन्हा होतो. हा गुन्हा तिसऱ्या
मनुष्यानें केल्यास १ पासून ३० दिवस कैद, किंवा १० पासून १०००० क्रौन
दंड होतो, परंतु स्वतः केल्यास १५ दिवस पासून ६ महिने कैद मिळून शिवाय
वरील दंड होऊं शकतो.

## वेश्यांसंबंधीं कायदे.

## नीतीचा बिघाड.

सारांश:—या सर्वाचा इतका तथ्यांश निघतो कीं, ( १ ) केवळ वेश्यावृत्ति हा गुन्हा नाहीं. ( २ ) उघडपणें आव्हान करणें, किंवा १६ वर्षांचे आंतील मुलांस फूस लावणें, हा गुन्हा होतो. ( ३ ) बुद्धिपूर्वक बीभत्सपणानें जर तरुणांची नीति बिघडेल तरच तो गुन्हा होतो. ( ४ ) निष्काळजीपणामुळें किंवा मुद्दाम केलेला संसर्ग गुन्हा आहे. ( ५ ) रोग्यांस उपचारांची व उपचार बरोबर न झाल्यास इस्पितळाची सक्ती आहे. ( ६ ) १०००० क्रौन दंड व ३० दिवस कैद पोलीसला स्वतःचे अधिकारानें देतां येते, व त्यावर अपील नसतें.

या पद्धतींत एक मोठा दोष आहे तो हा कीं, संसर्ग झाल्यावर शिक्षा केल्यानें रोगाचा प्रसार थांबत नाहीं, वेश्यांस व वेश्यागृहांस पोलीसचे देखरेखीखालीं ठेवण्यांत हा एक मुख्य उद्देश असतो. वरील कायद्यामुळें वेश्यांस चोरूनच धंदा करणें भाग पडतें, व यानें रोगाचे प्रसारास मदत होते. परंतु हल्लीं या मुद्द्याला लोक पुरेसे महत्त्व देत नाहींत, व फ्रान्समध्येंही वेश्यांचे नोंदीसंबंधीं सर्व कायदे रद्द करण्याची खटपट लोक करीत आहेत. या नवीन विचारांचा विचार पुढील लेखांत करूं.

---


# जेलोस्यूब

यानें गुप्त रोग बरे होत नाहींत, हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोडयु यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २

# एक महत्त्वाचा ग्रंथ

डॉ. नॉरमन् हेअर् हे लंडनमध्ये संततिनियमनासंबंधीं शस्त्रक्रिया व इतर खटपटीबद्दल प्रसिद्ध झाले आहेत, व त्यांनीं नुकतेंच 'हायमेन्' नांवाचें एक क्रांतिकारक पुस्तक लिहिलें असुन त्याबद्दल बराच गवगवा झालेला आहे. 'हायमेन्' म्हणजे कुमारिकेच्या योनिमार्गाचे तोंडाशीं एक पडदा असतो तो. प्रथम समागमाचे वेळीं हा पडदा आपोआप फाटतो, यावरून 'हायमेन्' शब्दाचा 'विवाह' असा अर्थ झाला आहे, व याच अर्थानें तो येथें वापरला आहे. हा ग्रंथ जरी इंग्लंडला अनुलक्षून लिहिला आहे, तरी त्यांतील बराच भाग सर्वत्र लागू पडतो.

## ग्रंथांतून कांहीं उतारे ( भाषांतर )

माझे मित्र किंवा परिचयाचे लोक असामान्य आहेत असें मानण्याचें कारण नसल्यामुळें, त्यांवरून पाहतां निमेपेक्षां बरेच अधिक विवाह यशस्वी होत नाहींत असेंच म्हणावें लागतें. चारांत एक विवाह साधारण यशस्वी होतो, व खरोखर सुखी जोडप्यांचे प्रमाण याहूनही कमी असतें.

याचें मुख्य कारण कामवासना होय. याबाबतींत बहुतेक लोक असंतुष्ट असतात, परंतु यासंबंधीं मोकळेपणानें बोलणें शक्य नसतें. डाक्टरांस अशा गोष्टी समजण्याचा संभव अधिक असतो, परंतु तेही पारंपरिक असल्यास त्यांस याबद्दल सहानुभूति वाटत नाहीं.

नवीन गोष्टी तेवढ्या वाईट समजण्याची जनतेची प्रवृत्ति असते. एके काळीं गुलामगिरी लोकांच्या इतकी अंगवळणीं पडली होती कीं ती बंद करणें ईश्वरास आवडणार नाहीं, असें लोकांस वाटे.

हीच गोष्ट स्त्रीपुरुषसंबंधांत दिसून येते. ग्रीसमधील लहान लहान संस्थानांमध्यें परस्पर लढाईचा प्रसंग येऊं नये म्हणून लोकसंख्या शक्य त्या उपायांनीं नियमित ठेवणें भाग होतें. कुमारीशीं किंवा परस्त्रीशीं संबंध ठेवणें गुन्हा होत नसे. वारवनिता अत्यंत उच्चपदाला पोंचल्या होत्या. समसंभोग सर्वत्र उघड फैलावला होता, व त्यांत बिलकूल कमीपणा नसे. देवतांनीं मनुष्याशीं संबंध ठेवण्याकरितां पशूंचीं रूपें घेतलीं अशा ग्रीक पौराणिक गोष्टींवरून पशूंशीं संबंध ठेवणें फारसें विलक्षण वाटत नसे, असें दिसतें. बालहत्या तर नेहमींच्या गोष्टींपैकीं होती.'

हल्लींच्या नीतिकल्पना धार्मिक आहेत, व त्यांचा पगडा सर्वांच्या मनावर इतका बसला आहे कीं, नास्तिक लोक सुद्धां त्याच कल्पना जोरजोरानें पुढें मांडीत असतात....उदाहरणार्थ, जवळच्या नात्याच्या स्त्रीपुरुषांत विवाह होऊं शकत नाहीं असा कायदा आहे, व अशा स्त्रीपुरुषांचा परस्पर संभोग हा गुन्हा आहे. त्यांची संतति सुदृढ होणार नाहीं, असें एक शास्त्रीय कारण या बाबतींत लोक सांगतात, पण तें सर्वस्वी खरें नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, जवळच्या नात्याच्या माणसांत एकाच प्रकारचे गुणदोष असण्याचा संभव फार, व आईबापांचे दोघांचेही अंगीं एकच दोष असल्यास संततीमध्यें तो द्विगुणित होण्याचा संभव बराच असतो. परंतु त्याचप्रमाणें एखादा इष्ट गुण दोघांत असल्यास तोही संततीमध्यें द्विगुणित होईल. तेव्हां समदोषी प्रकृतीच्या कोणत्याही स्त्री पुरुषांपासून संतति होणें वाईट, इतकेंच यांतून सिद्ध होतें. परंतु सुदृढ प्रकृतीच्या आप्तांच्या शरीरसंबंधापासून उत्कृष्ट संतति निर्माण होणेंही शक्य आहे, तेव्हां वरील कायद्याला शास्त्रीय आधार नाहीं. शिवाय दोषी प्रकृतीच्या आप्तांमध्यें विवाह झाल्यास संततिप्रतिबंध केला म्हणजे झालें. अशा संबंधाचें नांव काढतांच दांत ओंठ चावण्याचें कारण नाहीं.'

यासंबंधीं लोकमत किती निष्कारण द्वेषमूलक असतें, हें पुढील दोन गोष्टींवरून लक्षात येईल. ४८ वर्षांचा एक विदुर आपल्या २८ वर्षांच्या विधवा मुलीशीं संबंध ठेवीत असे. ती स्वखुषीनें त्याजवळ राहून दोघेंही सुखानें

नांदत असत, व त्यांनीं संतति होऊं नये अशी व्यवस्था केली होती. एका शेजाऱ्यानें किंवा नातलगानें ही गोष्ट अधिकाऱ्यांस कळविली व त्या दोघांसही जज्जानें शक्य तितक्या कैदेची शिक्षा दिली. या प्रसंगीं जज, जूरी व वर्तमानपत्रकार या सर्वांनीं त्यांची शेलक्या शब्दांनीं संभावना केली.

एका पत्रांत याच्याच शेजारच्या रकान्यांत दुसरी एक हकीगत दिली होती. एक पुरुष व एक स्त्री जन्मतः बहिरे व मुके असून विसाव्या वर्षाचे पुढें त्यांचे हृदयांत प्रेमसंचार झाला व त्यांनीं लग्न केलें. ( येथें दोघांचे फोटो ). या दोघांचा संसार पुढें कसा सुखाचा होईल व मरतेवेळीं त्यांचे सभोंवतीं ( बहिऱ्या मुक्या ) मुलांची व नातवंडांची कशी गर्दी होईल याचें काल्पनिक चित्र रेखाटलें होतें.

धार्मिक दृष्टीनें न पाहतां सदसद्विवेकाची किंवा समाजस्वास्थ्याची कसोटी जर अशा गोष्टींस लावली तर असें निःसंशय दिसतें कीं पहिल्या भयंकर मानलेल्या गुन्ह्यामुळें समाजाचें बिलकूल नुकसान नव्हतें. व प्रथम संततिप्रतिबंधाकरतां शस्त्रक्रिया करून घेतल्याशिवाय लग्न करणाऱ्या दुसऱ्या जोडप्यामुळें मात्र समाजांत बहिऱ्या मुक्यांचा बराच सुळसुळाट होण्याचा संभव होता. धर्माचा ज्यास प्रतिबंध नाहीं अशीं पाहिजे तीं अनन्वित कृत्यें समाजास चालतात, परंतु धर्माच्या किंवा रूढीच्या आड आलेलें मात्र चालत नाहीं.

अशाच जातीची आणखी एक गोष्ट. ‘ एका हमालाच्या अडीच वर्षांच्या वडील मुलाचे दोन्ही डोळे काढावे लागले. त्याच्या खालच्या दीड वर्षाच्या मुलाचा एक डोळा गेला व दुसरा जाऊं पहात आहे. तिसरें मूल कांहीं महिन्यांच असून त्याचीही तीच स्थिति होण्याचा संभव आहे. या कुटुंबास दयाळू लोकांनीं उदार होऊन शक्य तितकी मदत करावी. म्हणजे त्यांना दरवर्षी एक आंधळें मूल उत्पन्न करण्यास बरें पडेल ! ’ यास काय म्हणावें ?

कामशास्त्रांतील प्रत्येक विषयाची हीच स्थिति आहे, व या बाबतींत सरळ विचार करण्याची संवयच नसल्यामुळें समाजाचें भयंकर नुकसान होत आहे. सद्यःस्थितींत समाजाला वेश्यांची जरूर आहे हें न ओळखतां आपण

ढोंगीपणानें आपलीच फजिती करून घेतों. वेश्यांची स्तुति करण्याचा माझा उद्देश नाहीं, परंतु वेश्यांसंबंधीं अनेक खोटीं विधानें करीत असतात तीं मात्र मला मान्य नाहींत. उदाहरणार्थ सर्व वेश्यांची थोड्याच वर्षांत दुर्गुणांमुळें व अकालीं वार्धक्यामुळें दुर्दशा होते, हें खरें नाहीं. कोणत्याही धंद्यांत अपयश आल्यासच अशी स्थिती होते, व हें वेश्यांसही लागू आहे. दारुड्या लोकांशीं वेश्यांस समागम करावा लागतो ही गोष्ट खरी; परतु गर्ती स्त्रियांसही दारुड्या नवऱ्याशीं समागम करावा लागतो, त्याची वाट काय? वेश्या लवकर मरतात ही गोष्ट खरी नाहीं. पॅरीस येथें स. १८८८ पासून १९०५ पर्यंत नोंदलेल्या वेश्यांची संख्या सरासरीनें ६००० असे. यांपैकीं दरवर्षी ४० मृत्यु होत. हजारांत ७ हें प्रमाण फार नाहीं.

याच मालेंतील दुसऱ्या एका ग्रंथांत मि. जोड यांनीं लिहिलें आहे कीं, 'सुधारणेच्या आजपर्यंतच्या इतिहासांत स्त्रियांची उपजीविका त्यांचे शरीरावरच होत असलेली दिसून येते. तिच्याजवळ एवढी एकच विकाऊ चीज असल्यामुळें तिला दोनच मार्ग मोकळे असतात. एका पुरुषाला त्याची मालकी अनियत कालपर्यंत विकणें, किंवा अनेक पुरुषांस तें कांहीं नियमित वेळ भाड्यानें देणें. पहिल्या पद्धतीला आपण विवाह ह्मणतों; दुसरीला वेश्यावृत्ति ह्मणतों.' यांपैकीं एक पद्धत दुसरीपेक्षां अधिक नीतीची आहे, असें ह्मणण्याचा आपणास काय अधिकार आहे? सुदृढ मुलें वाढविल्यास गर्ती स्त्री समाजास वेश्येपेक्षां अधिक इष्ट होईल हें खरें, परंतु जी वेडीवांकडीं, रोगट मुलें वाढवते, किंवा वाढविण्याचा भार समाजावर टाकते अशा विवाहित स्त्रीपेक्षां वेश्या वाईट कशी, हाही प्रश्नच आहे.

समाज, वेश्यांस शत्रूप्रमाणें वागवतो यामुळें त्यांचे मनावर वाईट परिणाम होतो. [ व गुप्तरोगांचा प्रसार करून त्यांनीं ही शत्रूचे हाल केल्यास नवल नाहीं —सं.] ही मनःस्थिति बदलल्याशिवाय गुप्त रोगांस आळा घालण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत.

संततिनियमासंबंधीं लोकमताची हीच स्थिति आहे, व हा वेडगळ धार्मिकपणाचा परिणाम आहे. पुष्कळ लोकांची अशी कल्पना असते कीं धार्मिक

किंवा कायद्याचीं बंधनें नाहींशीं झाल्यास एकदम जिकडे तिकडे सर्व प्रकारचा अत्याचार सुरू होईल. परंतु विवाहित लोकांच्या अनुभवावरून असें दिसत नाहीं. वयांत आल्यापासून विवाहापर्यंत जुलमानें दाबून ठेवलेल्या कामवासनेस एकदम वाव मिळाल्यामुळें नूतन वधूवर कांहीं दिवस अतिरेक करतील, परंतु दोन तीन वर्षांनीं पाहिल्यास त्यांच्या नेमस्तपणाचेंच आश्चर्य वाटतें. या बाबतींत अजीर्णापेक्षां दुष्काळच अधिक वेळां दिसतो, व अतिरेक हा क्षुधातिरेकाचाच परिणाम असतो.

बंधनें दूर झाल्यास या बाबतींत पुरुषांकडून स्त्रियांस त्रास होईल, ही समजूत निराधार आहे. प्रत्येक तज्ज्ञाला ही गोष्ट माहीत आहे कीं पुष्कळ विवाहित स्त्रियांची नवऱ्याच्या कमतरतेबद्दल तक्रार असते [ शेंकडा ९५ स्त्रिया या बाबतींत असंतुष्ट असतात असें एका ख्रिस्ती धर्मोपदेशकानें लिहिलें आहे—सं. ] अर्थात् कांहीं स्त्रियास गर्भधारणेचे भीतीनें समागम नकोसा होतो, परंतु ही गोष्ट वेगळी.

लोक कांहींही म्हणोत, कामतृप्ती हाच विवाहाचा मुख्य उद्देश असतो. भावी नवऱ्यापासून किंवा बायकोपासून हा उद्देश सिद्धीस जाणें एखाद्या शारीरिक दोषामुळें शक्य नाहीं असें अगोदर कळल्यास किती लोक जाणून बुजून अशा लग्नास तयार होतील? कोणी पैशाकरितां किंवा वेडेपणानें असें लग्न केल्यास पुढें पश्चाताप होतो. कामवासना ही क्षुधेइतकीच नैसर्गिक आहे. फरक इतकाच कीं एक उपजत उपस्थित होते व दुसरी एका विशिष्ट मुदतीनें सुरू होते. पुरुषांमध्यें वृषणाच्या व स्त्रियांमध्यें अंडाशयाच्या व्यापारावर ही वासना अवलंबून असते, व हा व्यापार मनुष्य वयांत येईपर्यंत पूर्णपणें सुरू होत नाहीं, व यासच आम्ही वयांत येणें म्हणतों. ही वासना दाबून टाकण्याचा परिणाम शरीरावर नेहमीं अनिष्टच होतो.

स्नानाचे वेळीं वगैरे आपल्या भावंडांस नग्न पाहण्याची संवय लहान मुलांस असल्यास त्यांस स्त्रीपुरुषांमधील शारीरिक फरक स्वाभाविक रीतीनें कळतो व त्यांची जिज्ञासा विनाकारण वाढत नाहीं ( हें युरोपसंबंधीं लिहिलेलें

आहे, व तेथें लहान मुलेंहीं नग्नस्थितींत कोणाच्या दृष्टीस पडत नाहींत—सं ) ज्याप्रमाणें नाकांत बोटें घालूं नये, किंवा फार गोड खाऊं नये, असें आपण लहान मुलांस सांगतों, तसेंच लहान मुलांचें लक्ष जननेंद्रियाकडे विशेष लागत असल्यास त्याची जिज्ञासा तृप्त करून त्याचें लक्ष दुसरीकडे वळवावें, परंतु तें पाप आहे किंवा भयंकर वाईट कृत्य आहे अशी त्याची कल्पना होऊं देऊं नये. नैसर्गिक समागमापेक्षां स्वसंभोगापासून होणारें सुख इतकें कमी प्रतीचें आहे, कीं कोणताही निरोगी व सुदृढ मनुष्य नाइलाज झाल्याशिवाय हा गौण मार्ग पतकरणार नाहीं.

यासंबंधीं मुलांस योग्य माहिती आरंभींच दिल्यास त्यांस कोणीं वाईट मार्गास लावणें शक्यच होणार नाहीं. एखादी अनपेक्षित गोष्ट घडल्यास अशीं मुलें लगेच आईबापांस सांगतील व ती गोष्ट अनिष्ट असल्यास त्यांस इशारा देण्याची संधि मिळेल.

मध्यम हवेच्या देशांतील स्त्रीपुरुष सोळा वर्षांचे सुमारास वयांत येतात, व अशा वेळीं त्यांचा समागम होणें इष्ट असतें. विलंब केल्यानें शारीरिक व मानसिक नुकसान होतें, व भलत्याच संवयी लागल्यामुळें मनुष्य कधीं कधीं नैसर्गिक समागमास अपात्र होतो. याकरतां प्रकृतीच्या दृष्टीनें, सोळा वर्षांचे सुमारास लग्न तरी केलें पाहिजे, किंवा विवाहाशिवाय संभोग झाला पाहिजे. पहिला मार्ग पतकरल्यास, एवढ्या लहान वयांत वधूवरांस परस्परांची निवड समंजसपणानें करतां येत नाहीं ह्मणून घटस्फोटाचा मार्ग शक्य तितका सोपा केला पाहिजे. हा मार्ग हल्लीं अमेरिकेंत लोकप्रिय होत आहे, परंतु तेथें संततिनियमनाची माहिती देणें गुन्हा आहे. लवकर लग्न केल्यास ही माहिती अधिक अवश्य आहे.

दुसऱ्या मार्गांत हल्लीं तीन विघ्नें आहेत. गर्भधारणेचा संभव, गुप्तरोग व लोकापवाद. पहिल्यास उपाय संततिनियमन, दुसऱ्यास रोगांपासून बचावाचे मार्ग, व तिसरें विघ्न हळूहळू आपोआप नाहींसें होईल. सुदृढ मुल राष्ट्राच्या

दृष्टीनें इष्ट आहेत हें लोकांच्या मनावर ठसलें म्हणजे त्या मुलांच्या :आया विवाहित होत्या कीं नाहीं याची कोणी फारशी फिकीर करणार नाहीं.

वेश्यांची संख्या कमी होत जाऊन परस्पर आवडीमुळें पुरुषांजवळ राहणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढेल, व त्यांत त्यांस कमीपणा वाटणार नाहीं, असा फरक लोकमतांत होत जाईल. यामुळें वेश्यांकडे जाण्याची जरूर न राहून गुप्त रोगांचा प्रसार कमी होईल. परंतु वेश्याही अजीबात नाहींशा होणार नाहींत; कारण प्रवासामुळें ज्या पुरुषांस कोणाशीं तशी मैत्री जोडण्यास वेळ नसतो, त्यांस वेश्यांची जरूर भासणार. तसेंच ज्यांस फेरपालट पाहिजे असें वाटेल, तेही त्यांस आश्रय देतील.

समाजाचे चुकीनें वेश्यांची स्थिति आज खालावलेली आहे, परंतु त्यांची उपयुक्तता कबूल केल्यास त्याही अधिक रम्य होऊन स्वच्छतेकडेही जास्त लक्ष देतील. स्त्रियांनीं रंगभूमीवर काम करण्यांत ज्याप्रमाणें ( यूरोपांत ) अनीति मानींत नाहींत त्याचप्रमाणें वेश्यांसही अनीतिमान समजणार नाहींत.

समागमाबद्दल स्त्रियांकडून पैसे घेणारे पुरुष हल्लीं नसतात असें नाहीं, परंतु त्यांस हल्लीं वेश्यांपेक्षांही हलकट समजतात. स्त्रीपुरुषांचे समान हक्क स्थापित झाल्यास तसें समजण्याचें कारण राहणार नाहीं.

केव्हां खावें, काय खावें, किती खावें, कसें खावें, हें लहान मुलांस शिकवावें लागतें व लोक तें शिकवतातही; परंतु कामशास्त्रांत मात्र अज्ञानासच मान आहे ! विवाहित जोडप्यांच्या असमाधानाचें मुख्य कारण नवऱ्याचें या बाबतींत गाढ अज्ञान हेंच बहुधा आढळतें, व लग्नानंतरही समागम म्हणजे पापच आहे, असें मानणाऱ्या स्त्रियाही कधीं कधीं आढळतात. यामुळें पुरुषांस तरी लग्नाचे आधीं थोडा बहुत अनुभव असणें इष्ट आहे, इकडे लोकमत वळण्याचा संभव दिसतो.

समान हक्कांच्या दृष्टीनें, पुरुषांच्या ब्रह्मचर्याचें महत्व स्त्रियांच्या पातिव्रत्या इतकें मानलें पाहिजे, असें कांहीं वेडेपीर म्हणतात. परंतु या बाबतींत

स्त्रियांसच जास्त स्वातंत्र्य मिळत जाणार. पुरुषांनीं स्त्रियांस पोसलें पाहिजे ही स्थिति बदलून दोघेही आपआपल्या पुरतें मिळवितील, किंवा ज्यास जास्त पैसे मिळतील तो दुसऱ्यास पोशील.

ज्याप्रमाणें मुलांस थोडें बहुत शिक्षण देण्याची जबाबदारी हल्लीं समाजावर आहे ( यूरोप, अमेरिकेंत सक्तीचें व फुकट प्राथमिक शिक्षण सर्वत्र आहे. स. ) तशीच त्यांचे संगोपनाची जबाबदारीही समाजावरच येईल, म्हणजे याचा वांटा करांचे रूपानें सर्वांस सोसावा लागेल.

मुलांस जन्म देण्यांत आपण त्यांवर मोठा उपकार केला असें पुष्कळ आईबापांस वाटतें व तीं मुलांस तसें सांगतात. वास्तविक पाहतां, समागमसुखाचे लालसेचा चुकून झालेला परिणाम म्हणजे मूल, हीच सर्वांची ( महात्मा गांधीसारख्या साधुसंतांची सुद्धां–सं. ) स्थिति असते, इतकेंच नाहीं तर गर्भपाताच्याही प्रयत्नांतून कधीं कधीं त्यास पार पडावें लागतें. व मुद्दाम उत्पन्न केलेलें मूल सुद्धां, आपलें नांव चालावें या स्वार्थी हेतूनें असतें. [ मुली नांव चालवीत नाहींत, व त्या कोणासही नको असतात–सं. ] कधीं कधीं जन्म देणें हा गुन्हा असतो व तो कितीही उपकार केले तरी भरून येत नाहीं. अर्थात, संगोपनाची जबाबदारी समाजानें घेतल्यावर आम्हांस फक्त सुदृढ, निरोगी मुलेंच पाहिजेत, असें म्हणण्याचा हक्क समाजास येईल. कोणताही अनुवंशिक होणारा रोग ज्यांस आहे अशांस मुळींच संतान होतां कामा नये, असा कायदा होईल; व त्यांनीं न ऐकल्यास त्यांवर जबरीनें शस्त्रक्रिया होईल. अर्थात ही शस्त्रक्रिया संततिप्रतिबंधापुरतीच असून त्यापासून कोणतेंही शारीरिक नुकसान होत नाहीं व समागमाची इच्छा व शक्ति कायम राहते. अमेरिकेंत यास सुरवात झाली आहे.

निरोगी आईबापांस सुद्धां संततिनियमनाची जरूर खालील कारणांमुळें पडते.

१. आईच्या प्रकृतीच्या दृष्टीनें दोन मुलांमधें दोन किंवा तीन वर्षांचें अंतर असलें पाहिजे, म्हणजे मूल अंगावर पिण्याचें सोडवल्यापासून निदान ९ महिने विश्रांति पाहिजे. तेथपर्यंत गर्भधारणा होतां कामा नये.

२. कमी अंतरानें मुलें झाल्यास आईच्या क्षीणतेमुळें मुलाची पोटांत नीट वाढ होत नाहीं, व जन्माच्या अगोदरच त्याचे हाल सुरू होतात.

३. मुलाचीं पहिलीं दोन वर्षें महत्त्वाचीं असतात व या वयांत आईला त्याजकडे एकसारखें लक्ष देतां आलें पाहिजे. पुष्कळ लहान मुलें असल्यास हें शक्य नसतें.

४. सांपत्तिक स्थिति हें आणखी एक कारण सध्यां आहे, परंतु समाजानें जबाबदारी घेतल्यास हें कारण राहणार नाहीं.

संततिनियमनाचे योग्य मार्ग कोणते हें सामान्य मनुष्यास हल्लीं कळत नाहीं. तो डॉक्टरास विचारतो परंतु पुष्कळ वेळां डॉक्टरासच ही माहिती नसते [ कांहीं वर्षांपूर्वीं पुणें येथें दिलेल्या व्याख्यानांत आम्ही हेंच विधान केलें होतें, व त्यामुळें त्या वेळचे अध्यक्ष डॉ. फाटक हे बरेच गरम होऊन त्यांनीं डॉक्टरांस हें अलबत माहिती असतें, असें ठोकून दिलें होतें. आतां हें विधान इंग्लंडांतील एक डॉक्टर करीत आहेत. इंग्लंडांतील डॉक्टरांपेक्षां येथील डॉक्टर या बाबतींत जास्त माहितगार नाहींत खास. सं ] हल्लीं हें मेडिकल कॉलेजांत शिकवीत नाहींत, परंतु या पुढें शिकवतील अशी बरीच आशा वाटतें.

शास्त्रीय प्रगतीबरोबर कृत्रिम म्हणजे स्त्रीपुरुष संयोगाशिवाय ( पिचकारीनें पुरुषांचें वीर्य गर्भाशयांत घालून ) गर्भधारणा रूढ होईल, असे प्रयोग इतर प्राण्यांवरच नव्हे तर मनुष्यांवरही यशस्वी झालेले आहेत. यामुळें ज्या स्त्रियांस संयोग नको परंतु मुलें पाहिजेत त्यांची सोय होईल, व याकरितां पाहिजे त्या सुदृढ मनुष्याचें वीर्य वापरतां येईल [ नवऱ्याच्या कमतरतेमुळें ज्या स्त्रीस मुलें होत नसतील, तिलाही अशा रीतीनें मुलें होऊं शकतील, व या मार्गास नवऱ्याचीही हरकत असण्याचें कारण नाहीं. सं. ]

इतकेंच नव्हे तर जिला संतान नको असेल तिचा गर्भ दुसऱ्या स्त्रीच्या पोटांत स्थापन करतां येईल, किंवा मानवी गर्भ वानरीच्या पोटांतही स्थापन करतां येईल. अशा रीतीचा एक प्रयोग हल्लीं चालू आहे.

रशियाप्रमाणें इतर देशांतही गर्भपातास परवानगी मिळेल, परंतु अर्थात त्याची फारशी जरूरच राहणार नाहीं. याच्या पुढची पायरी म्हणजे क्वचित प्रसंगीं बालहत्येसही कायद्याची परवानगी मिळेल किंवा ती कायद्यानेंच केली जाईल, व जन्मतःच पंगू मुलांची अशी व्यवस्था होईल.

आत्महत्या हा गुन्हा मानणार नाहींत, परंतु हल्लींप्रमाणें आत्महत्येच्या मुळाशीं कामवासना हें कारण न राहून, असाध्य रोग हें मुख्य कारण होईल. सज्ञान माणसांचा परस्पर संबंध कसाही असला तरी, जोंपर्यंत ते इतर लोकांचे वाटेस जात नाहींत, तोंपर्यंत त्यांस पूर्ण स्वातंत्र्य मिळेल, व यामुळें जगांतील पुष्कळ असुख कमी होईल.

या बाबतींत जें काय करणें ते ज्ञानाच्या पायावर रचलेलें असावें, धार्मिक किंवा पारंपरिक समजुतींवर असूं नये, इतकेंच माझें म्हणणें आहे.

शरीराच्या व कपड्यांच्या स्वच्छतेवरून पुष्कळ वेळां मनुष्याचा दर्जा ओळखला जातो व जावा हें रास्तच आहे. शिवाय स्वच्छतेचें सुख दुसऱ्या कशानेंही मिळत नाहीं.

× × ×

नेहमींप्रमाणें यंदांही दिवाळीच्या फटाक्यामुळें अनेक मुलें भाजून मेलीं. अजून तरी लोकांनीं या बालहत्येचा विचार करावा.

× × ×

इ. स. १८०० पासून १९१४ पर्यंत इंग्लंडची लोकसंख्या पांचपट वाढली

* * *

गुप्त रोगांसंबंधीं व्हिएना येथील आंकड्यांवरून असें दिसतें कीं १०,०५७ रोग्यांपैकीं निमेहून अधिक २१ वर्षांचे आंतील होते व शेंकडा ६७½ पंचविशीचे आंत होते.

# आमचीं नाटकें.

नाट्यकलाप्रवर्तक संगीत नाटक मंडळी हल्लीं करीत असलेलें 'शादीकी पहिली रात' हें हिंदुस्थानी नाटक गुप्त रोगांचे ( विशेषतः गर्मीचे, कारण परम्याचा उल्लेख नाटकांत नाहीं, ) वाईट परिणाम दाखविण्याकरतां लिहिलेलें आहे. शिवाय बालविवाह, बालहत्या, हिंदुमुसलमानांची एकी, खादी वगैरे इतर गोष्टीही या नाटकांत पुष्कळ आहेत, व हा दोष बऱ्याच हिंदी नाटकांत दिसून येतो. यामुळ मुख्य विषयाचें महत्त्व बरेच कमी होतें. तसें होऊं नये व मुख्य विषय प्रेक्षकांच्या डोळ्यांपुढें एकसारखा रहावा ह्मणून नाटकांतील दोन पात्रांच्या तोंडावर गर्मीचे काळे चट्टे दाखविण्याची युक्ति योजिली आहे या युक्तींत एक दोष आहे. नाटकांतील जवळ जवळ प्रत्येक पात्राचे तोंडून ६०६ या औषधाचा उल्लेख होतो, व तें टोचून घेतल्यानंतर अंगावरील चट्टे वगैरे साफ नाहींसे होतात असा सार्वत्रिक अनुभव आहे. याचा अर्थ; रोगजंतु अंगांतून पार नाहींसे होतात असें नाहीं, परंतु रोगाचीं दृश्य चिन्हें मात्र नाहींशीं होतात. नाटकांतील पात्रांच्या अंगावरील चट्टे वाढतच जातात, व एके ठिकाणीं तर औषधें टोंचून घेऊन सुद्धां रोग बरा होत नाहीं असें चुकीचें विधान आहे. नाटकांतील डॉक्टर मात्र रामबाण औषध शोधून काढतो, असें दाखविलें आहे. गर्मीवर पारा, सोमल, व बिस्मथ यांचीं रसायनें जगप्रसिद्ध आहेत, व त्यानीं रोग बरे होतात. मात्र वैदूंवर विश्वास न ठेवतां तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार करवावे लागतात. यापेक्षांही जलद रोग बरा करणारीं औषधें निघणें शक्य आहे परंतु आजपर्यंत असाध्य असलेल्या रोगावर नाटकांतील डॉक्टरानें औषध शोधून काढलें असें दाखविणें हें सत्यास धरून नाहीं.

प्रेक्षकांस घाबरवण्याकरतां रोगांसंबंधीं पाहिजे तीं विधानें करण्यापासुन कोणत्याही प्रकारचा फायदा नाहीं. हे रोग योग्य उपचारांनीं बरे होतात इतकेंच नव्हे, तर संसर्ग होऊं नये अशी व्यवस्था करणें अत्यंत सोपें आहे. परंतु हें सर्वांस अजून माहीत नाहीं, व तें प्रत्येकास समजणें इष्ट आहे.

बी. ए. पास झालेली नायिका, चेहऱ्यावर गर्मीचे चट्टे असलेल्या विधुराशीं लग्न करते, व तो रोग बरा होईपर्यंत त्याला जवळ येऊं देत नाहीं, व नवरा तें सहन करतो, या सर्व गोष्टी फारशा संभाव्य दिसत नाहींत, परंतु नाटक या दृष्टीनें टीका करण्याचा आमचा विचार नाहीं.

फ्रान्समधील एका नांवाजलेल्या नाटककारानें या विषयावर नाटक लिहिलेलें आहे, परंतु संसर्गाचा प्रतिबंध करतां येतो ही गोष्ट त्यानेंहा लक्षांत न घेतल्यामुळें त्यांतही हा एक मोठाच दोष राहिलेला आहे. हिंदी नाटककारानें या गोष्टीकडे दुर्लक्ष करणें स्वाभाविक आहे, कारण यूरोप, अमेरिकेइतकी प्रतिबंधाची माहिती अजून येथें पसरलेली नाहीं तरी पण अशा विषयावर नाटक हिंदुस्थानांत कोणीं यापूर्वी लिहिलें असेल असें वाटत नाहीं, व म्हणून या प्रयत्नाचें अभिनंदन करणें जरूर आहे.

---

# वेश्या कोठें असाव्या ?

'वेश्यांची जरूरी आहे, परंतु त्यांस मध्यवस्तींत राहूं न देतां त्यांचे करतां लांब कोठेंतरी जागा राखून ठेवावी असें मत पुण्याचे हेल्थ ऑफिसर कर्नल खंबाटा यांनीं कांहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध केलें होतें. यापैकीं शेवटचा भाग आम्हांस पसंत नाहीं. वेश्यांची जरूरी आहे, याचा अर्थच असा होतो कीं वेश्यांच्या गिऱ्हाइकांची सोय न झाल्यास हल्लींपेक्षां वाईट परिणाम होतील वेश्यांस लांब नेऊन टाकणें म्हणजे त्यांचे गिऱ्हाइकांची गैरसोय करणें आहे. तेव्हां त्यांचे गिऱ्हाइक जसें सर्व शहरभर पसरलेलें असतें, तसेच त्यांसही पसरूं दिलें पाहिजे, तरच वेश्यांचा खरा उपयोग होईल.

युरोप, अमेरिकेंत वेश्यांकरतां राखून ठेवलेले भाग पूर्वी कांहीं शहरांत असत, परंतु हल्लीं ते बहुतेक काढून टाकलेले आहेत. जपानांत असे राखलेले भाग आहेत, परंतु टोकिओमध्यें ही व्यवस्था वेश्यागृहांच्या मालकांच्याच आग्रहावरून केलेली आहे, व तिकडे जाण्याकरतां एक ट्रामवेचा फांटा मुद्दाम तेथपर्यंत नेलेला आहे. सणाचे दिवशीं तेथील शृंगारलेल्या घरांची शोभा पाहण्याकरतां जपानी लोक सहकुटुंब सहपरिवार जात असतात.

# नवीन लेखांतील निवडक विचार.

अमेरिकेंत एका मनुष्यावर खुनाचा आरोप शाबीत होऊन, जज्ज देहांत शिक्षा देणार इतक्यांत आरोपीचीं ४३ मुलें त्याला भेटावयास आलीं. तेव्हां ज्या देशभक्तानें देशाला इतकीं माणसें पुरवलीं त्यानें एखादा खून केल्यास क्षम्य आहे असें समजून जज्जानें त्यास सोडून दिला. आमचे मतें त्याला एकंदर ४२ खून माफ करण्यास हरकत नाहीं !

× × ×

'नग्न होऊन बिछान्यावर वाचीत पडलों,' अशी आपल्या रोजनिशीं-तील नोंद डॉ. रॉबिनसन् यांनीं प्रसिद्ध केली आहे. शरीराच्या प्रत्येक भागास मोकळ्या हवेची जरूर असते, व दिवसांतून कांहीं वेळ तरी नग्न राहिल्यानें शरीरास फायदाच होतो, याकरतां ज्यांना तसें करण्याची सोय असेल त्यांनीं अनुकरण करण्यासारखें आहे.

× × ×

गर्मीचे जंतु मेंदूपर्यंत पोंचल्यामुळें कांहीं लोकांस वेड लागतें. अशा वेडाच्या भरांत, एका मनुष्यानें, आपली बायको आपणास विष घालणार आहे अशा समजुतीनें, तिचा अत्यंत क्रूरपणानें खून केल्याची हकीकत एका फ्रेंच वर्तमानपत्रांत आली आहे. रोगप्रतिबंधाचे मार्ग सर्वांस माहीत झाल्यास रोग्यां-मुळें इतर लोकांवर असे प्रसंग येणार नाहींत.

× × ×

९९ वर्षांच्या जुळ्या भावांस एका डॉक्टरानें विचारलें, तुमच्या दीर्घा-युष्याचें कारण काय असावें असें तुह्मांस वाटतें ? एक ह्मणाला, मी तंबाखू ओढतों हेंच कारण असलें पाहिजे. दुसरा ह्मणाला, मी ओढीत नाहीं हेंच कारण खास.

# बळजबरीचे खटले.

पार्वती नांवाच्या एका मुलीनें मयाराम नांवाच्या मनुष्यावर बळजबरीची फिर्याद केली होती, त्यास नागपूरच्या सेशन जज्जानें निर्दोषी ठरवून सोडून दिलें. बाजारांतून घरीं जात असतां मयारामाच्या रखेलीनें तिला फुसलावून नेलें व नंतर त्यानें बळजबरी केली असें तिचें म्हणणें होतें.

आरोपीतर्फे असें सांगितलें कीं पार्वती मयारामाच्या भावाच्या घरांतील एका मुसलमानाशीं तुळसा नांवाच्या कुंटिणीमार्फत लागू झाली होती, व हें कारस्थान बाहेर पडल्यामुळें तिनें खोटी फिर्याद केली. जूरीनें एकमतानें आरोपीस निर्दोषी ठरविलें.

विवाहव्यतिरिक्त समागमानें स्त्रीची बेअब्रू होते या सार्वत्रिक समजुतीमुळें, कोणतीही स्त्री बळजबरीची खोटीच फिर्याद कोर्टांत आणून स्वतःची निष्कारण बेअब्रू करून घेईल हें सकृद्दर्शनीं संभवनीय दिसत नाहीं. अब्रूदार स्त्रिया खरोखर बळजबरी सुद्धां लपवून ठेवण्याचाच प्रयत्न करतात, हेंही खरें आहे. तथापि बळजबरीच्या बऱ्याच फिर्यादी खोट्या असतात असा अनुभव आहे. यास अनेक कारणें असूं शकतात.

आफ्रिकेंत एकदां एक विलायती स्त्री व नीग्रो पुरुष निवांत स्थळीं एका विलायती मनुष्यास एकांतांत सांपडली व त्यास पाहिल्याबरोबर तिनें आरडाओरड करण्यास सुरुवात केली, परंतु त्या मनुष्यानें हा प्रकार आधीं कांहीं वेळपासून पाहिला असल्यामुळें तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं, नाहींतर खालीं दिलेल्या हकीकतीप्रमाणें त्या नीग्रोला भयंकर शिक्षा झाली असती.

एखाद्या पुरुषाशीं असलेला बेकायदा संबंध बाहेर पडतो असें पाहिल्याबरोबर स्त्रिया शक्य असल्यास त्याच्यावर बलात्काराचा आरोप करून मोकळ्या होतात. परंतु यापेक्षांही, बलात्काराच्या प्रयत्नाचा आरोप, किंवा अमुक मनुष्य माझ्यावर डोळा ठेवतो इतकाच आरोप करतां आला तर अब्रूही वांचते !

दोन वर्षांपूर्वी केनिया कॉलनीचें मुख्य शहर नैरोबी येथें आम्ही असतां तेथें बलात्काराचा एक चमत्कारिक खटला चालला. त्यांत एका ६० वर्षांच्या

युरोपियन बाईनें एका नीग्रोवर बलात्काराची फिर्याद केली होती. रात्रीं ती निजली असतां तिच्या खोलींत शिरून त्यानें हें कृत्य केलें अशी तिची हकीकत. तिनें जागें होऊन दिवा लावण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यानें तिला दाबून धरल्यामुळें तो सफल झाला नाहीं, तरी त्या भांडणांत तिनें कांड्यांचे पेटीनें त्याचा हात ओरखाडला, ही त्याला ओळखून काढण्यास एक खूण होती. शिवाय त्याचे अंगास घाण येत नव्हती ( कांहीं जातींचे गलिच्छतेमुळें त्यांचे अंगांस घाण येते ) व त्याचे हात मऊ होते असे ती म्हणाली. पोलीसानें ओरखड्यांचे खुणेवरून एका नीग्रोस पकडला व नेहमीप्रमाणें त्याला इतर कांहीं नीग्रोबरोबर उभा केला व तिचे डोळे बांधून मऊ हातांवरून त्यास ओळखून काढण्यास सांगितलें. तिनें सर्वांच्या हातांस स्पर्श करून, 'हाच तो असावा' असें दोन तीन माणसांसंबंधीं म्हणाली. म्हणजे तिला तो मनुष्य ओळखला नाहीं. शिवाय तिच्या शारीरिक तपासणी करून जो बलात्काराला पुरावा मिळावा तो, तिनें तावडतोब स्नान केल्यामुळें, मिळणें शक्य नव्हतें. त्याच प्रमाणें कपडे व चादरही तिनें धुऊन टाकली होती. यामुळें बलात्कार झाला असें म्हणण्यासच तिच्या शब्दा शिवाय पुरावा नव्हता, मग तो अमुक मनुष्यानें केला असें सिद्ध होणें लांब राहिलें. 'बलात्कार झाला असेल, परंतु या मनुष्यावर आरोप शाबीत झाला नाहीं' असें असेसरांचे एकमत झालें. असें असूनही जज्जानें असेसरांस दोन शिव्या हांसडून आरोपीस शक्य तितकी म्हणजे १४ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा दिली. याचें मुख्य कारण म्हणजे तेथील युरोपियन प्रजा अतिशय चवताळली होती व नीग्रोविरुद्ध सशस्त्र मोहीम सरकारचे परवानगीशिवाय करण्याची बोलवा होती. यानंतर लगेच यासंबंधीं एक नवीन कायदा पास झाला व त्यांत बलात्कारास मृत्युची शिक्षा देतां यावी व कमींत कमी तीन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा असावी असें ठरलें. अर्थात् नीग्रोनें गोऱ्या बाईवर बलात्कार केल्यास मृत्यू, व आरोपी युरोपिअन असल्यास व त्यावर गुन्हा शाबीतच झाल्यास तीन वर्षें शिक्षा यावी, हें जज्जांस समजेलच, असें युरोपिअन वक्त्यांनीं या कायद्यावरील

कौन्सिलांतील भाषणांत स्पष्ट सांगितलें. याशिवाय नीग्रोस फटकेही मारावे व तें पाहण्यास इतर नीग्रोंस आमंत्रण करावें असेंही ठरलें. हा सर्व प्रकार सुधारलेले म्हणविणाऱ्या ब्रिटिश लोकांच्या एका वसाहतींत झाला. बरें नीग्रो लोकच वाईट असतात असें म्हणावें तर एकाही हिंदी स्त्रीवर नीग्रोनें बलात्कार केल्याचें कोणाचे ऐकिवांत नाहीं, व युरोपिअन स्त्रियांवर झाल्याच्या बऱ्याच गोष्टी आहेत.

क्वचित प्रसंगीं कांहीं संबंध नसतांही स्त्रिया अशा प्रकारचे आरोप करतात. या संबंधीं डॉ. रॉबिनसन् यांनीं एक गोष्ट दिली आहे. एकदां एका अविवाहित अमेरिकन मुलीनें एका सद्गृहस्थावर बलात्काराचा आरोप करून त्या कृत्याची तपशीलवार हकीकत कोर्टांत सांगितली. त्या गृहस्थानें तें नाकबूल केलें, परंतु तें खरें असल्याशिवाय इतक्या बारीकसारीक गोष्टी अविवाहित मुलीला माहीत कशा झाल्या असतील असें सर्वांस वाटलें. परंतु डॉक्टरानें तिला तपासून जेव्हां तिचें म्हणणें खोटें ठरवलें, तेव्हां तिनें ती हकीकत काल्पनिक असल्याचें कबूल केलें. तिनें नंतर असेंही सांगितलें कीं तिच्या मोठ्या बहिणीचा नुकताच विवाह झाला होता, व पुष्कळ स्त्रियांच्या संवयीप्रमाणें ती प्रथम रात्रीची हकीकत आपल्या एका जिवलग मैत्रिणीला सांगत असतां तिनें ऐकली होती, व त्यावरून तिला ही कल्पना सुचली.

सर्व लोकांचें लक्ष आपणाकडे लागावें म्हणून लहान मुलें पुष्कळ वेळां पाहिजे तसें खोटें बोलत असतात, तीच मनःस्थिति या मुलीची होती.

सारांश, बलात्काराचे खटल्यांत आरोपीनें गुन्हा केला असला पाहिजे, असें मानण्याची प्रवृत्ति चुकीची आहे.

---

× × ×

मुलांच्या वाहणाऱ्या कानाकडे दुर्लक्ष केल्यास तीं बहिरीं होण्याचा संभव असतो.

# ब्रिटिश व अमेरिकन सैन्याकरतां वेश्या

ब्रिटिश लोक व त्यांचेच वंशज अमेरिकन लोक हे आपण स्वतः नीतीचे गड्डे आहों असें जगभर पुकारीत असतात तेव्हां हें ढोंग बाहेर काढणें जरूर आहे चिनी लोकांच्या स्वतंत्रतेकरतां स्थापिलेल्या ब्रिटिश मजूर पक्षाच्या कौन्सिलानें खालील माहिती प्रसिद्ध केली आहे.

शांघाय, जून ४.

यूरोपीय वसाहतींत वेश्याव्यवसायास कायद्याची बंदी असूनही चिनी स्त्रियांनीं भरलेलीं तीन वेश्यागृहें ब्रिटिश व अमेरिकन लष्करी व आरमारी शिपायांकरतां उघडलेलीं आहेत. या गृहांवर लष्करी पहारा असतो व इतरांस तेथें जाण्यास क्वचितच मेहेरबानी खातर परवानगी मिळते. यांतील बऱ्याच स्त्रिया १५ वर्षांचे आंतील वयाच्या आहेत.

शांघाय, जून १२

चिनी स्त्रियांनीं याविरुद्ध तक्रार केली.

जून २० तारखेस पार्लमेंटमधील प्रश्नास उत्तर देतांना ( चिनी लोक तक्रार करतात ) या विधानांत कांहीं तथ्य नाहीं असें परराष्ट्रीय चिटणीसांनीं सांगितलें.

परंतु 'लॅन्सेट्' पत्राचा शांघाय येथील बातमीदार जून १८ चे अंकांत लिहितोः—येथें ब्रिटिश सैन्य आल्यापासुन इतर रोगांपेक्षां येथें गुप्त रोगांचा प्रश्न फार महत्वाचा झाला आहे. सर्व बाजूनीं वेश्यांचे थवेच्या थवे शांघाय येथें आले आहेत, त्यांपैकीं शेंकडा ६० चिनी, ३० रशियन व ५ जपानी आहेत. बहुतेक वेश्यागृहें फ्रेंच प्रदेशांत व सरहद्दीवरील चिनी प्रदेशांत आहेत. परंतु तीं ब्रिटिश सैन्यास कशीं बाधलीं ?

इंग्लंडमध्यें अत्यंत सोंवळे समजले जाणारे इंग्रज पॅरिसला चाऊन मनसोक्त चैन करतात हें सुप्रसिद्ध आहे न तीच अमेरिकनांची स्थिति आहे. असें असुनही सर्व जगाला उपदेश करण्याची त्यांची तयारी आहे. हें ढोंग किती दिवस चालणार ?

* * *

# वेश्यांच्या जाहिराती.

वेश्यांनीं गिऱ्हाइक मिळवण्याकरतां कोणताही उघड प्रयत्न करतां कामा नये असा कायदा जरी जवळ जवळ सर्व देशांत आहे, तरी तो कोणत्याही देशांत पुरा अंमलांत येत नाहीं, असें म्हणावें लागतें. हलक्या प्रतीच्या वेश्या रस्त्यांत किंवा खिडकींतून लोकांस खुणा करतात, परंतु याहून उच्च प्रतीच्या वेश्या–विशेषतः यूरोपांत–वर्तमानपत्रांत जवळ जवळ उघड जाहिराती देतात. पॅरिस येथील कांहीं पत्रांत पुढील मासल्याच्या जाहिराती सांपडतातः—

१. **भाड्यानें देणें आहेः**—उत्तम शृंगारलेल्या खोल्या. येथें गोंडस पुतळ्या माफक दरानें पहावयास मिळतील. दुपारीं दोन पासुन दहावाजेपर्यंत. पत्ताः—

२. **शिक्षणः**—एक सुंदर तरुणी चालीरीतींचे शिक्षण देण्यास तयार आहे. वेळ, सकाळीं ९ पासुन रात्री १२. प्रत्येक धड्याची फी, २० फ्रँक.

३. **सुंदर चित्रांचें प्रदर्शनः**—XXबाइ यांचे बंगल्यांत. वेळ सकाळीं १० पासुन पहाटे ४. दर माफक.

४. **नावीन्यः**—ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं XX बाई यांची जरूर भेट घ्यावी. सौंदर्याचा मोठा संग्रह. दररोज, सकाळीं ९ पासुन सायंकाळीं साडेसात.

५. एका २९ वर्षांच्या सुंदर, बांधेसूद, निमगोऱ्या, सुशिक्षित तरुणीवर वाईट प्रसंग आल्यामुळें स्वतःचें पोट भरण्याची वेळ आली आहे, व ती पैशाची मदत करणाऱ्या सुखवस्तु व सभ्य गृहस्थाशीं पत्रव्यवहार करण्यास तयार आहे. ही जाहिरात अक्षरशः खरी आहे. तेव्हां भलत्याच लोकांनीं पत्रें लिहूं नये. पत्रें परत पाठविलीं जातील. मध्यस्थांची जरूर नाहीं. पत्ताः—

६. एका दुःखी विधवेस हजार रुपयांची जरूर आहे. कृतज्ञ होईल. पत्ताः—

७. तावडतोब पांचशें रुपये देतां येतील अशा, पन्नाशी उलटलेल्या गृहस्थाशीं मैत्री करण्याची इच्छा आहे. मी सुशिक्षित असुन बरेच लोक मला सुंदर समजतात. पत्ताः—

८. मी ऑफिसांत टायपिस्टचें काम करून पोट भरतें, परंतु एकटें राहण्याचा कंटाळा आला आहे. पत्ताः—

अशा जाहिरातींस तेथील अधिकाऱ्यांची हरकत नसावी असें दिसतें. पुढील जाहिराती इंग्लंडमधील पत्रांतून घेतल्या आहेत.

१. संधिवाताची शुश्रूषा केली जाईल. वेळ १२॥ पासून ७ वाजेपर्यंत. स्त्री मदतनीस पाहिजे.

२. हात व नखें साफ केलीं जातील. [ यूरोपांत पुष्कळ स्त्रिया हा धंदा करितात. ] वेळ १२ ते ८.

३. फ्रेंच संभाषणाचे धडे,...बाई देतात. वेळ १ ते ९.

वेश्यांस उघडपणें धंदा करूं न दिल्यास त्यांस अशा प्रकारच्या पुष्कळ युक्त्या करतां येण्यासारख्या आहेत.

---

# ताजी व शिळी बातमी.

दगडू बाबाजी माळी यानें बायकोच्या आचरणाबद्दल संशय घेऊन तिचें नाक कापलें, याबद्दल शेवगांवच्या मॅजिस्ट्रेटनें त्यास १ महिना सक्त मजुरीची शिक्षा दिली होती, ती हायकोर्टानें वाढवून १ वर्षाची दिली. अशा राक्षटी अपराधास याहूनही जास्त शिक्षा पाहिजे होती.

× × ×

हात धुवून वेश्यांचे मागें लागणारे येथें एक मि. झाबवाला नांवाचे गृहस्थ आहेत. त्यांनीं पोलिस कमिशनरचे मदतीनें कांहीं वेश्यांस गिरगांवांतून घालवून दिल्यामुळें त्या परळ येथें राहूं लागल्या. जिवंत मनुष्याला कोठें तरी राहणें भाग असतें ही गोष्ट झाबवाल्यांस न पटल्यामुळें त्यांनीं त्यांना परळ येथेंही राहूं देऊं नये अशी पोलिसाकडे विनंती केली. परंतु कमिशनरनें ती फेटाळून लावली असें ऐकतों. सर्व वेश्यांनीं एकदम जीव द्यावा असा कायदा मि. झाबवाला करून घेतील तर तें जास्त समंजसपणाचें होईल.

× × ×

वेणीराम नांवाच्या एका गृहस्थांची बायको माहेरीं गेली ती परत आली नाहीं, म्हणून शोध करतात तों ती आमगांवचे जमीनदारांकडे आहे असें समजलें. ते जमीनदाराकडे जाऊन बायको परत मागूं लागले, तेव्हां ते बायकोच्या ऐवजीं पैसे देऊं लागले. तें त्यांस न पटून त्यांनीं भांडारा येथील मॅजिस्ट्रेटकडे फिर्याद केली आहे. आपल्या जातींत मुली कमी असतात व लग्नास रु. १००० खर्च आला, तेव्हां जमीनदारांनीं सुचविलेली तडजोड कबूल करतां येत नाहीं, असें वेणीरामनें सांगितलें.

* * *




# समाजस्वास्थ्य

वर्ष १] मे १९२८ [अंक ११

संपादक--र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | संततिनियमनावरील कादंबरी ( पुढें चालू ) ... | १ |
| २. | नवीन लेखांतील उतारे ... ... ... | ८ |
| ३. | वेश्यासंबंधी कायदे-६ ... ... ... | ९ |
| ४. | श्वेतप्रदर किंवा धुपणी. ... ... ... | १३ |
| ५. | मलेरिआ चा प्रतिबंध ... ... ... | १४ |
| ६. | व्हिजिलन्स असोसिएशन ( जागरूक संघ ) ... | १६ |
| ७. | हातांची जोपासना ... ... ... | १७ |
| ८. | आमचेबद्दल लोकमत ... ... ... | २० |
| ९. | पत्राचा सारांश ... ... ... ... | २१ |
| १०. | उंदीर ... ... ... ... | २३ |
| ११. | ताजी व शिळी बातमी ... ... ... | २४ |



## संततिनियमनाकरितां

## 'मॅटोरी' वड्या वापरा

## डझनाचे नळीस दीड रुपया.

**सोल एजंटः—राइट एजन्सी,**

२० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.

## जेलोटयूब

याने गुप्त रोग बरे होत नाहींत, हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोस्यु यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २

# संततिनियमनावरील कादंबरी.

———— xox ————

( पुढें चालू )

झाडांचे सावलींत नाच चालला होता. स्पिरिताचे मनांत फ्रांस्वाबरोबर नाचावयाचें होतें, परंतु तो रोझाबरोबर नाचण्यांत गर्क झाला होता. नाइला-जास्तव तिला एका अनोळखी तरुणाचें आव्हान स्वीकारावें लागलें. नाचतां नाचतां तो तिला इतकी घट्ट आंवळून धरूं लागला कीं ती कांहींतरी सबब काढून निघून जाऊं लागली. पुनः कधीं भेटशील असें त्यानें विचारतां ती उडवा-उडवी करूं लागली, इतक्यांत दुसरी एक मुलगी त्याला ओढून घेऊन गेल्यामुळें तिची सुटका झाली. कॉंस्तांतँनें तिला हांक मारली, पण तिचें लक्ष फ्रांस्वा-कडे होतें. पुढच्या नाचाला ती फ्रांस्वाबरोबर नाचूं लागली, तेव्हां बिचारा कॉंस्तांतँ रोझाबरोबर नाचूं लागला.

फ्रांस्वाः–( नाचतांना ) पुढचा नाच सुद्धां आपणच नाचूं, हां !

स्पिः–नाचूं पाहिजे तर.

फ्रांस्वाः–त्या दिवशींची आठवण आहे का ?

स्पिः–( आनंदित होऊन ) पण तूं रोझाबरोबर नाचूं नको ना !

फ्रांः–वा ! मी तिला कबूल केलें आहे.

स्पिः–हें कांहीं बरं नाहीं.

फ्रांः–तिच्या बाबतींत निदान बोलणीं तरी नाहीं खावीं लागत. ( स्पिरिता रागावून जाऊं लागली ) रागावायला काय झालं ? तूं मला आवडतेसच.

हें तो खरें बोलला. परंतु रोझाशीं त्याचा आधींपासून गुप्त संबंध असल्यामुळें हातचें सोडून पळत्याच्या मागें लागणें त्याला बरें वाटलें नाहीं.

इतक्यांत पाऊस पडूं लागल्यामुळें सर्व रोझाचे घरीं गेलीं. तिनें सर्वांस दारु दिली तेव्हां तिचे आभार मानण्याकरतां फ्रांस्वानें गमतीनें

तिच्या गालाचें चुंबन घेतलें ( हें युरोपांत फारसें विलक्षण समजत नाहींत:—सं. ); तिनें दुसरा गाल पुढें केला. हें पाहून, कॉंस्तांतँ स्पिरितास म्हणतो, 'मग आपणच कां कमी करा !' परंतु स्पिरिताच्या अंगाचा संताप झाला होता ती त्याच्याकडे मुळींच पाहीना. फ्रांस्वा व रोझाचें चुंबन आतां ओंठावर आलें व तें संपेच ना असें पाहून ती चिडून म्हणाली, 'लोकांची तरी कांही लाज बाळगा !'

फ्रांस्वाचें आपल्यावर प्रेम नाहीं; तर त्या दिवशीं त्यानें आपलें चुंबन कां घेतलें ! हा विचार तिला सोडीना. त्याचा गवगवा झाला म्हणून तो रागावला असेल, परंतु त्यानें निदान आपल्या देखत तरी रोझाचें चुंबन घ्यावयाचें नव्हतें, असें तिला वाटलें. इतक्यांत कॉंस्तांतँनें अकस्मात तिचें चुंबन घेण्याचा प्रयत्न केला, परंतु तिनें त्याला ढकलून देऊन तोंड फिरवल्यामुळें तोंडा ऐवजीं त्याला गालच सांपडला.

इकडे रोझा घरीं एकटीच असल्यामुळें ती फ्रांस्वाला घेऊन आपल्या आईच्या निजावयाचे खोलींत गेली व आंतून कडी लावून घेतली. हें पाहून संपापून स्पिरिता जी तेथून पळत सुटली ती घरीं जाईपर्यंत थांबली नाहीं.

* * *

दुसरे दिवशीं मामाकडे जाऊन ती म्हणाली:—मी आतां मॅडम् ओब्र्युक्-कडे नोकरीला राहणार.

मामा:—( रागानें ) तूं मोलकरीण होणार ! जा, कर पाहिजे तें—तुझी तुलाच किंमत नाहीं. मग मी कशाला मधें पडूं ?

स्पि:—घरीं रोज शिव्या आणि मार खाण्यापेक्षां दुसरं कांहींही बरं. शिवाय मॅडम् ओब्र्युक् एक महिन्यानें पॅरिसला जाणार आहे, तेव्हां मला घेऊन जाईल.

मा:—वा ! पॅरिसला जाण्याकरितां तूं मोलकरीण होणार !

स्पि:—तसं नव्हे, पण मला इथून गेलं पाहिजे.

शेवटीं तिनें फ्रांस्वावर आपलें प्रेम आहे, परंतु त्याचें आपणावर नाहीं व रोझाचा आपणास हेवा वाटतो असें खरें कारण कबूल केलें.

स्पि:—इथेंच राहिलें तर मी काय करीन याचा नेम नाहीं

मामा:—यावेळीं जर तुला मन ताब्यांत ठेवतां आलें, तर त्याचा तुलाच फायदा होईल.

स्पि:—तर मग सर्व इंद्रियांचीं कामें नैसर्गिक रीतीनें झालीं पाहिजेत असें तूंच म्हणतोस, त्याचा अर्थ काय ?

मामा मोठ्या पेचांत पडला.

मामा:—तें खरं आहे, परंतु मूल चांगल्या रीतीनें पोसण्याची जोंपर्यंत तुला ताकद नाहीं तोंपर्यंत असं धाडस करतां कामा नये.

स्पि:—मग संततिनियमन का कायसं म्हणतात तं काय ?

मामा:—बरं तू आतां तो विषयच काढलास. तेव्हां मी तुला त्या संबंधीं कांहीं पुस्तकें देतों, परंतु त्यांतही एक गोम आहे. प्रथम समागमाचे वेळीं पुरुषाचे संमती शिवाय हे सर्व उपाय वापरणं अशक्य आहे. तेव्हां धोका हा राहतोच. तेव्हां मूल पोसण्याची ताकद येईपर्यंत मुल न होऊं देणं बरं.

स्पि:—म्हणजे एक तर हे उपाय वापरायला पुरुषाची संमति पाहिजे, किंवा कोणी तरी पुरुष लग्ना करितां मागणी घालीपर्यंत वाट पहात बसलं पाहिजे असंच कीं नाहीं ? आणि तूंच म्हणतोस कीं कामतृप्तीशिवाय प्रकृति चांगली रहात नाहीं, आणि प्रकृति तर सुदृढ ठेवली पाहिजे, असेंही तूंच म्हणतोस !

मामा:—मूल पोसण्याची ताकद आल्यानंतर तुला वाट पाहण्याचें कारण नाहीं. ब्रह्मचर्यानें कोणताही फायदा होत नाहीं. व एखाद्या स्त्रीला लग्न केल्या-शिवाय स्वतंत्र राहूनही मुलें पाहिजे असलीं व झालीं तर त्यांत मला कांहीं वावगें दिसत नाहीं. वास्तविक पाहतां ही सर्व अडचण योनिमार्गांतील एका फाटक्या पडद्यामुळें उत्पन्न होते. ही कौमार्याची खूण असें लोक समजतात इतकेंच. त्यापासून वयांत आलेल्या मुलींना ऋतुकाली त्रास होतो, व त्याच पडद्यामुळें प्रथम समागमाचे वेळीं संततिप्रबंधाचीं साधनें वापरतां येत नाहींत. ऋतुप्रवाहास फार अडचण झाल्यास डॉक्टर तो कापून टाकतातच व नाहींतरी पुढे तो आपोआप फाटतोच. मुसलमान व ज्यू लोक आरोग्याचे दृष्टीनें सुंता

करतात, त्याचप्रमाणें ख्रिस्ती मुलींचा हा पडदा कापल्यानें प्रकृतीस फायदाच होईल व प्रथम समागमाचे वेळची ही अडचण नाहींशी होऊन स्त्रियांस पूर्ण स्वातंत्र्य मिळेल....परंतु सध्या तू कायद्याचे दृष्टीनें आईबापांचे ताब्यांत आहेस. तूं स्वतंत्र होईपर्यंत तुला पाहिजे तें करतां येत नाहीं.

स्पिरिताचे डोळे पाण्यानें भरले.

मामा:—तुझ्या प्रेमाचा बिघाड झालेला मलाही पहावत नाहीं. परंतु मूल होण्याची धास्ती आहे हें लक्षांत ठेवून वाग. मी तुझी लवकरच व्यवस्था लावतों. तोपर्यंत धीर धर. निदान मला कळविल्याशिवाय कांहीं करूं नको.

× × × ×

मॅडम् ओब्र्युक्कडे तिची चैन होती. परंतु तिची धनीण तिच्याशीं फाजील शारीरिक सलगी करण्याचा प्रयत्न करी, तें मात्र तिला खपत नसे, व इतर नोकर तिच्याबद्दल आपापसांत कुजबुजूं लागले.

फ्रांसवाचें प्रेम स्थिर नाहीं हें माहीत असतांही तिला तो कधीं भेटलसें होत असे. एके दिवशीं नाचतांना त्यानें तिला एकांतांत नेण्याचा प्रयत्न केला. परंतु तिनें न ऐकल्यामुळे तो रोझाकडे गेला. परंतु तिचा ओढा सुटेना.

तिच्या धनिणीचा एक कुत्रा होता. त्याला नेहमीं सुवासिक साबणानें धुवून अत्तर वगैरे लावून ठेवण्याची नोकरांस ताकीद असे, व तो धनिणीच्याच पलंगावर निजत असे, असें इतर नोकर म्हणत, व चेष्टाही करीत. तिला तें खरें वाटलें नाहीं, परंतु एके दिवशीं तिला तो प्रत्यक्षच धनिणीबरोबर अंथरुणांत दृष्टीस पडला.

एकदां बरेच पाहुणे आले, तेव्हां एकंदर सर्व जमलेल्या स्त्रीपुरुषांचा मनसोक्त विहार पाहून स्पिरिताला कसेंसेंच वाटलें, व त्यांपैकीं एकानें तिच्यावरही हात टाकण्याचा प्रयत्न केला, तेव्हां ती दुरूनच तेथून निसटून आपल्या खोलींत कडी लावून निजली.

यामुळें दुसरेच दिवशीं तिची नोकरी सुटून ती घरीं परत आली.

* * *

आतां तिच्या कामवासनेला शारीरिक स्वरूप आलें व काय करावें हें कळेना. मामानें दिलेलीं पुस्तकें वाचून तिचें समाधान होईना. पूर्ण वाढीस आलेल्या इंद्रियांस तत्त्वज्ञानाचा उपयोग नसतो. फ्रांस्वा तिला सांपडेल तेथें पकडण्याचा प्रयत्न करीत असे, व अशा स्थितींत तिला किती दिवस दम निघेल हें तिला समजेना. नोकरी करताना ज्या अश्लील प्रकारांमुळें तिला वीट आला, तशाच प्रकारची अश्लील स्वप्नें तिला पडूं लागलीं, व आतां तिला वीटही येईना.

तिची प्रकृति दिवसेंदिवस खराब होत चालली असें पाहून तिचे आईनें एका धर्मगुरूला बोलावून आणिला, व तो तिला उपदेश करूं लागला.

गुरुः—आपलें दुःख ईश्वराजवळ सांगावें, म्हणजे कमी होतें.

स्पिः—तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें देव असला तर त्याला सांगायची जरूरच नाहीं, आणि नसला तर .........

गुरुः—शांतं पापं ... ... तुझ्या मामानें तुला बिघडवलं आहे. ईश्वरास शरण जा म्हणजे तुला बरं वाटेल.

स्पिः—माझा ईश्वरावर भरंवसा नाहीं.

गुः—भरंवसा ठेवला पाहिजे, म्हणजे तुझी प्रकृति ताळ्यावर येईल.

स्पिः—माझ्या प्रकृतीला ईश्वर काय करणार! त्याला शरीर असतं तर कदाचित्......

शेवटीं विश्वास नसतांही तिनें त्याच्या सांगण्याप्रमाणें निजतांना प्रार्थना वगैरे केली, परंतु सकाळीं उठल्यावर तिला आपला मूर्खपणा स्पष्ट दिसूं लागला.

तिनें मामाला पत्र लिहिलें व त्यानें लिहिल्याप्रमाणें कांहीं दिवस आत्म-संयमन करण्याचा निश्चय केला या निश्चयानें तिला पुष्कळ धीर आला व तिनें धर्मगुरूला धाब्यावर बसवलें. पण आपण ठरवतों एक आणि होतें भलतेंच!

× × × *

एके दिवशीं ती कोठारांत नित्याप्रमाणें काम करीत होती इतक्यांत तिला

मागून कोणींतरी पकडलें, व ती मोठ्यानें ओरडली:—कोण आहे ? फ्रांस्वा ? ही काय चेष्टा करायची रीत झाली ?

परंतु तो मनुष्य सोडीना. ती एकदम हिसका देऊन वळून पहाते तों ज्या अनोळखी देखण्या तरुणाबरोबर ती एकदां नाचली होती तो तिला दिसला ! हा कोठून कसा तेथें आला ? तो एका कंपनीचे तर्फे तिच्या बापाची जमीन विकत घेण्याकरतां आलेला होता, परंतु हें तिला माहीत नव्हतें. त्यानें तिला अजून धरूनच ठेविलें होतें, व त्याच्या चुंबनाचा तिला प्रतीकार करतां आला नाहीं.

—भ्यायचं कांहीं कारण नाहीं ! मी म्हटलं नव्हतं आपण पुनः भेटूं म्हणून ? कीं तू मला ओळखलंच नाहींस ?

स्पि:—सोड मला !

—वा ! तुझ्याकरतां तर मी आलों इथें !

वास्तविक तो जमीन विकत घेण्याकरतां आला होता. परंतु घर रिकामें होतें, व स्पिरिताला एकटीच पाहून तो बेफाम झाला होता. शिवाय त्याचे मतें ती घरकाम करणारी नोकर असेल. तिनें पुष्कळ धडपड केली पण तो सोडीना.

—इतकी धडपड कां ? मी कांहीं तुला मारीत नाहीं ! थोडीशी गंमत करूं, आहे काय त्यांत ? भीति कसली आहे ?

परंतु स्पिरिता खरोखरच घाबरली होती. तिच्या सर्वांगाला कंप सुटला. तिचे हातपाय गळले ती मोकळी असती तरी पळून जाणें कठीण झालें असतें. आपल्याला फार वेळ प्रतीकार करवणार नाहीं, हें ती जाणून होती. ती ओरडली:—बाबा, बाबा !

—बाबा कशाला ? आईला हांक मारतात अशा वेळेला.

तो सांपडेल तेथें तिचें चुंबन घेत होता व ती धडपड करीतच होती, परंतु त्याला तें ढोंग वाटलें. तो देखणा असल्यामुळें तिची धडपड खरोखरच मनापासून असेल असें त्याला वाटलेंच नाहीं, व कांहीं वेळानें तिची धड-

पड संपली. त्याला दूर ढकलून द्यावा असें तिच्या मनांत अद्यापि होतें, परंतु शरीराचें आणि मनाचें एकमत होईनासें झालें.

—पहा मी म्हटलंच. मनांतून तर पाहिजे आहे. मग उगीच धडपड का?

असें म्हणून त्यानें तिच्या वस्त्रास हात घातला. आतां मात्र आपली धडगत नाहीं हें ती समजली. आणखी एकदां प्रयत्न करून ती ओरडली, 'सोड मला!' परंतु तो कोठें ऐकतो?

स्पि:–कुमारीवर हल्ला करणं नामर्दाचं काम आहे!

—कुमारी! कोणी म्हणेल खरंच!

तिनें उठण्याचा प्रयत्न केला, परंतु तिचें शरीर तिचें ऐकेना. तिच्या आरडाओरडीकडे लक्ष न देतां त्यानें आपलें काम उरकून घेतलें. तिला वेदना झाल्यामुळें ती मधेंच एकदम ओरडली त्यावरून ती कुमारी असली पाहिजे अशी त्याची खात्री झाल्यावर तो किंचित् घाबरलाही. नंतर कपडे सांवरून:

—रडूं नको. मी पुनः येईन. ही जमीन विकत घेण्याकरतां मी आलों होतों.

स्पि:–मी पाहीन कशी तुला मिळते ती. ती आमची जमीन आहे.

—तर मग काय, तूं नोकर नाहींस?

स्पि:–नाहीं.

—मला तसं वाटलं, पण झालं काय त्यांत? अगदीं पहिलीच वेळ असेल जशी काहीं!

स्पि:–होय.

—खोटं.

परंतु तें खोटं नव्हतें हें त्यालाही कळलें होतें. आतां तेथून पळ कसा काढावा या विचारात तो होता. त्यानें खिशांतून दोन शंभर फ्रँकच्या नोटा काढल्या (हल्लींचे भावानें अजमासें २२ रुपये. सं.) व तिला देऊं लागला.

—मी तुला कांहींतरी बक्षिस आणून देणार होतों, आतां विकत घे म्हणजे झालं. बोलूं नको कोणाजवळ. मी उद्यां परत येईन. अगदीं वचन—

इतकें बोलतो तों रिपरितानें एकदम उठून त्या नोटा त्याच्या तोंडावर फेकून जोरानें एक मुसकटांत दिली. 'हलकट कुठला!' इतकें म्हणून ती पुनः रडूं लागली. तो तिला उगी करण्याच्या विचारांत होता. पण कोणी आलें तर! असा विचार करून, तिचा भाऊ किंवा आई भेटल्यास तीं आपणास ओळखतील या भीतीनें तो पसार झाला. जातां जातां त्यानें त्या नोटाही उचलल्या. (अपूर्ण)

---

# नवीन लेखांतील उतारे.

स्त्रीपुरुषांच्या जननेंद्रियांच्या विजोडपणामुळें कधीं कधीं भयंकर परिणाम होतात, असें डॉ. फेलिक्स रेन्यो म्हणतात. यामुळें स्त्रियांस इजा झालेली पुष्कळ डॉक्टरांचे पाहण्यांत आहे. मनुष्याचे एकंदर उंचीवरून जननेंद्रियाचे आकाराची कल्पना येत नाहीं. स्त्रियांचे बाबतींत तरी, कमरेपासून वरचे उंचीशीं त्याचा संबंध असतो, असें त्यांचें म्हणणें आहे.

× × ×

शिथिल झालेले स्तन शस्त्रक्रियेनें पूर्ववत् करण्याची क्रिया फ्रेंच डॉ. मोरिस पेरेर यांनीं प्रसिद्ध केली आहे.

+ × + +

मानसिक दौर्बल्यामुळें एक सुशिक्षित व कुलीन फ्रेंच स्त्री वयांत येण्याचे सुमारास ४ वर्षे एका वेश्यागृहांत राहिली. ४७ व्या वर्षी तिला वेड्यांचे इस्पितळांत ठेवावी लागली. त्याचे पूर्वी ती कांहीं वर्षे एका मठांत जोगीण होण्याकरतां गेली होती. सारांश, कोणी नेईल तेथें ती जाई, व स्वतःचे विचारानें राहणें तिला शक्य नव्हतें.

# वेश्यांसंबंधीं कायदे-६

—— :o: ——

**इंग्लंडांतील अनुभव:**—इंग्लंडांत वेश्या कमी झाल्या आहेत असें म्हणतां येत नाहीं. कांहीं आंकड्यांवरून ब्रिटिश सैन्यांतील गुप्तरोगांचें प्रमाण कमी झालें असें कांहीं लोक म्हणतात, परंतु हें प्रमाण युरोपांतील इतर कोणत्याही देशापेक्षां जास्त आहे, व विशेषत: फ्रेंच सैन्यांतील प्रमाणापेक्षां जास्त आहे. परंतु आंकडे सोडून दिले तरी इंग्लंडांत असंख्य वेश्या आपला धंदा बिनधोक करीत आहेत, व गुप्तरोगांचा विचारही कायद्यानें केलेला नाहीं. इतकेंच नव्हे तर अशा रोग्यांस सार्वजनिक इस्पितळें घेत नाहींत. असें असतांही केवळ वेश्यांची तपासणी बंद केल्यानें रोग कमी होऊं शकतील हें कोणत्याही समंजस मनुष्यास खरें वाटणार नाहीं.

**कोलमार येथील अनुभव:**—बेकायदा पक्षाकडून कोलमारचें नांव वारंवार ऐकूं येत असतें. हें शहर युरोपांत अॅल्सास् प्रांतांत आहे. लढाईपूर्वी हा प्रांत जर्मनीचे ताब्यांत होता. येथें १८८१ सालीं एका मॅजिस्ट्रेटाचे प्रयत्नानें शहरांतून वेश्या अजीबात नाहींशा झाल्या. यावरून त्याच उपायांनीं वेश्यांचा जिकडे तिकडे नायनाट करतां येईल असें बेकायदा पक्षाचें म्हणणें आहे. ही घोडचूक आहे. एका शहरांत त्रास झाल्यामुळें वेश्या शेजारच्या दुसऱ्या शहरात जातात, परंतु त्या नाहींशा होत नाहींत, म्हणजे धंदा सोडीत नाहींत. इतकेंच नव्हे तर केवळ वेश्यागृहेंच बंद केलीं तरीही वेश्या त्याच शहरांत राहून आपले घरीं धंदा चालवूं शकतील. परंतु त्या शहरांत जर्मन कायदा चालू असल्यामुळं वेश्यावृत्ति हाच गुन्हा होता, व म्हणूनच वेश्यांस कायद्याचे भीतीनें पळून जावें लागलें. परंतु बेकायदा पक्षाचें म्हणणें तर वेश्यावृत्ति हा गुन्हा नसावा असें आहे. मग कोलमारचें उदाहरण कसें लागू पडतें ? हा प्रांत लढाईत फ्रेंचांचे ताब्यांत आल्यावरही त्यांनीं जर्मन कायदा तसाच चालू ठेवला [ न नोंदलेल्या वेश्यांनीं धंदा करणें गुन्हा आहे ] इतकें कायद्याचें पाठबळ असून

सुद्धां नोंदणीची व तपासणीची व्यवस्था म्युनिसिपालिटीनें पुनः सुरू केली आहे. यावरून काय दिसतें ?

**ब्रुसेल्स येथील अनुभवः**—हा सर्वांत अलीकडचा आहे. येथें १ जून १९२४ पासून वेश्यांची नोंद व तपासणी करण्याचें ठरलें. व त्यावेळीं गुप्त रोगांवर आपण होऊन उपचार करून घेण्याचा उपदेश रोग्यांस करण्याकरतां एक कमिटी नेमली, व पोलीसचे पद्धतीनें वेश्यांवर या दृष्टीनें विशेष नजर ठेवण्याचें कामही त्यांचेकडे दिलें. हा प्रयत्न निष्फळ झाला. पॅरिस येथील डॉ. गूजरो यांची या प्रयत्नास सहानुभूति होती, परंतु जुलै १९२५ च एका मासिकांत तेच काय लिहितात पहाः—

'ब्रूसेल्स येथी बऱ्याच वैद्यकी संस्था या प्रयत्नाचे विरुद्ध होत्या, व याचे अनिष्ट परिणाम होतील असें त्यांनी अगोदरच भाकित केलें होतें. हे परिणाम इतके अनिष्ट झाले, गुप्त रोगांचें प्रमाण इतकें वाढलें, रोगी वेश्यांनीं उपचार नाकबूल केल्यास त्यांचं मन वळवणें इतकं अशक्य झालें कीं ब्रूसेल्सच्या म्युनिसिपल कौन्सिलांत बेकायदा पक्षाचे लोक जास्त असतांही त्यांना हा प्रयत्न सोडून द्यावा लागला, व पुनः नोंदणी व सक्तीची तपासणी सुरू करावी लागली!

'ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. नोंदणीच्या विरुद्ध बेकायदा पक्षाचे लोक नेहमीं असें सांगत असतात कीं, नोंदणी आणि तपासणीचे कायदे बंद करण्याचा अवकाश कीं, देशाची स्थिति एकदम सुधारलीच पाहिजे. ब्रुसेल्स येथें हे कायदे बंद करण्याचे परिमाण इतके भयंकर झाले कीं सहा महिन्यांतच ते कायदे पुनः अंमलांत आणावे लागले !

या प्रयत्नाचे आरंभीं डॉ. गुजरो यांसही आशा व सहानुभूति वाटत होती, परंतु तेच शेवटीं असें लिहितात, हे लक्षांत घेण्यासारखें आहे.

हे कायदे बंद करण्याचा परिणाम इतकाच झाला कीं वेश्यांस पूर्ण स्वतंत्रता मिळून त्या मोठमोठ्या रहदारीच्या रस्त्यांवर खुशाल वावरू लागल्या. यावरून हें उघड होतें कीं बेकायदा पद्धतीचे परिमाण त्या पक्षाच्या लोकांच्या डोक्यांत जितके चांगले होतात त्याच्या शतांशही अनुभवास उतरत नाहींत.

## वेश्यांसंबंधीं कायदे.

रोगी वेश्यांस सक्तीनें उपचार करून बरें करणें शक्य असतां त्यांस धंदा चालू ठेवून रोगांचा प्रसार करूं देणें हा केवळ मूर्खपणाच नसून सामाजिक गुन्हा आहे. चोरून धंदा करणाऱ्या वेश्या कायद्यांत सांपडणें शक्य नाहीं या सबबीवर उघड वेश्यांसही पूर्ण स्वातंत्र्य देणें बरोबर होणार नाहीं.

याशिवाय गुप्त रोगांचे दृष्टीनें सर्व रोग्यांस ( स्त्रियांस व पुरुषांसही ) योग्य उपचार सक्तीनें व फुकट झाले पाहिजेत. रोग्यांस गुन्हेगार न समजतां त्यांस सहानुभूतीनें वागवल्यास रोगी आपण होऊन उपचार करून घेण्यास तयार होतील. डॉक्टरांनींही नीतिविषयक तत्त्वज्ञानाच्या भानगडींत न पडतां वरील गोष्ट लक्षांत ठेवल्यास रोगी वैदूकडे जाण्याऐवजीं त्यांचेकडे जातील. त्यांत समाजाचेंही हित आहे, व त्यांचाही धंद्याच्या दृष्टीनें फायदा आहे.

शेवटीं एक महत्त्वाची गोष्ट राहिली. फार थोड्या खर्चांत व थोडीशी काळजी घेतल्यास रोगी स्त्रीपासूनही रोग लागूं नये अशी तजवीज पुरुषांस सहज करतां येते हे आतां निर्विवाद सिद्ध झालेलें आहे. लष्करांत अगदीं खालच्या दर्जाच्या अशिक्षित शिपायांस सुद्धां हे मार्ग सहज वापरतात व यशस्वी होतात, तेव्हां यांत कौशल्याचें काम नाहीं हें उघड आहे. अर्थात हें डॉक्टरांचें दृष्टीनें फायद्याचें नाहीं म्हणून यांस कौशल्य लागतें असें कांहीं डाक्टर म्हणत असतात, व त्यास दुजोरा येण्याकरतां त्याला एक नीतीचें शेंपूट चिकटवीत असतात. परंतु ही केवळ धंद्याची दृष्टि झाली, समाजहिताची नव्हे. या संबंधीं सविस्तर विचार आम्हीं ' गुप्त रोगांपासून बचाव ' या पुस्तकांत केला आहे, तेव्हां येथें जास्त विस्तार करण्याचें कारण नाहीं. येथें इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं या प्रतिबंधक उपायांचें ज्ञान सर्वत्र पसरल्यास वेश्यांसबंधीं विशेष कायदे करण्याचें मुळींच प्रयोजन राहणार नाहीं, व हे बेकायदा पक्षाच्या मनासारखेंच होणार आहे. परंतु हा उपाय या पक्षास पसंत नसतो. ' आम्ही जबरदस्तीनें तुम्हांस नीतिमान बनविणार, वेश्यांच तपासणीनें रोग कमी होतात हें बरोबर नाहीं; वेश्यांकडे गेल्यास तुम्हांस रोग झालेच पाहिजेत, व म्हणून वेश्यांस सक्तीची तपासणी नको' असा मनांतील रानटी कावा

असतो, व इंग्लंडांतील वेश्यांचे ढोंगी कनवाळू त्यांस अनेक प्रकारांनीं छळूं पहात असतात.

वेश्यास चोरून धंदा करावयास लावण्याचे परिणाम खालील उदाहरणावरून समजतील:—रस्त्यांतील गुन्ह्यांचा विचार करण्याकरितां नेमलेल्या कमिटीपुढें मिसेस् नेस्बिट् नांवाच्या बाईनीं सांगितलें:—'मी तरुण नाहीं तरी सुद्धां बाँड्स्ट्रीट मधून जातांना माझ्याशीं कोणी पुरुष बोलला नाहीं असें होत नाहीं.' यांनीं लंडनमध्यें एका पुरुषास पुष्कळ स्त्रियांशीं बोलतांना पाहिलें व दोन पोलीसच्या शिपायांस त्यांनीं ते दाखवून त्या मनुष्यावर नजर ठेवण्यास सांगितलें. त्यावर 'बाई, तुम्ही आपलं काम करा, आम्ही आपलं काम करतों' असें उत्तर मिळालें. असे पुरुष पुष्कळ असतात, परंतु पोलीस तिकडे लक्षच देत नाहींत, असें त्या म्हणाल्या.

नीतीच्या कल्पना आरोग्याचे पायावर उभारल्या पाहिजेत. रोगांचा प्रसार झाला तरी हरकत नाहीं, परंतु नीति पाहिजे, असें म्हणणारे लोक समाजाचे शत्रु आहेत, व आपण म्हणूं तीच नीति व ती लोकांवर लादण्याचा आपणास हक्क आहे अशी त्यांची कल्पना असते या लोकांच्या वटवटीकडे बिलकूल लक्ष न देतां आरोग्यास अवश्य अशाच गोष्टी केल्या पाहिजेत. विशेषतः गुप्त रोगांपासुन बचावयाचे मार्ग सर्वांस जाहीर रीतीनें शिकवले पाहिजेत, व ही सामग्री प्रत्येक वेश्येनें गिऱ्हाइकांस जरूर पडल्यास योग्य किंमत देऊन विकत दिली पाहिजे, व ती वापरण्याची रीत प्रत्येक वेश्येचे खोलींत ठळक रीतीनें भिंतीवर लावण्याची सक्ती कायद्यानें केली पाहिजे, म्हणजे सक्तीचे तपासणीचीही जरूर राहणार नाहीं.

---

मार्च ६ तारखेस येथें नौरोजी रस्त्यांत गणेश कीर्तिकर नांवाचा ५ वर्षांचा मुलगा होळींत पडून बराच भाजला, व ११ तारखेला रात्रीं मरण पावला. चोरी, शिवीगाळ, मारामारी, वगैरेला शिमग्यांत परवानगीच असते, त्यांतलाच हा एक प्रकार आहे. सण पाळण्याचे हे निंद्य व धोक्याचे मार्ग कधीं बंद होणार ?

# श्वेतप्रदर किंवा धुपणी.

विवाहित किंवा अविवाहित स्त्रियांच्या किंवा मुलींच्याही योनिमार्गांतून कधीं कधीं पांढरा द्रव बाहेर येत असतो. या रोगास धुपणी म्हणतात. याचीं कारणें अनेक असूं शकतात. हा प्रवाह दुधासारखा स्वच्छ पांढरा असल्यास त्यापासून फारसा धोका नाहीं, परंतु तो पिंवळसर किंवा हिरवा असल्यास मात्र त्यावर तावडतोब उपाय केला पाहिजे.

याचा संबंध कधीं कधीं एकंदर प्रकृतीशीं असतो व कधीं जननेंद्रियाच्या अस्वच्छतेशीं असतो. शरीरास जेथें जेथें छिद्र असतें तेथें तेथें रोगजंतु प्रवेशास वाव मिळतो, म्हणून अशा सर्व ठिकाणच्या स्वच्छते बद्दल विशेष काळजी वाळगणें जरूर असतें. परंतु नाक, कान, डोळे यां प्रमाणेंच गुदद्वार व जननेंद्रिय स्वच्छ ठेवलें पाहिजे हें पुष्कळांस माहित नसतें. प्रकृतींत दोष असल्यास तो दुरुस्त करणें हें डॉक्टराचें काम आहे, परंतु शारीरिक स्वच्छतेस डॉक्टराची जरूर नसते. निरोगी मनुष्यांतही अन्ननलिकेच्या शेवटच्या भागांत अनेक प्रकारचे जंतु असतात, व त्यांपासून त्रासही होत नाहीं. परंतु तेच जंतु इतरत्र शिरल्यास त्यांपासून त्रास होतो.

ज्यांस धुपणीचा विकार आहे त्यांनीं औषधी उपायांबरोबरच खालील सामान्य नियम पाळणें जरूर आहे. १ शौचाचे वेळीं योनिद्वारसुद्धां साबणानें स्वच्छ धुवावें. २ शक्य तितका वेळ मोकळ्या हवेंत काढावा व पुरेसा व्यायाम करावा. ३. जननेंद्रियाचे आसपास हवेचा संचार होईल असे कपडे घालावे. या दृष्टीनें कासोटा घालण्याची पद्धत वाईट आहे. फार वेळ बसून रहावें लागेल अशीं कामें होतां होईल तों करूं नये. ६ अन्न शक्तिवर्धक असावें व तें नीट चावून खावें. ६. दांत तपासून घेऊन उत्तम स्थितींत टेवावे.

# मलेरिआचा प्रतिबंध.

मलेरिआचे जंतु कांहीं विशिष्ट प्रकारच्या डांसाच्या सोंडेंतून मनुष्याचे रक्तांत शिरतात, व हे डांस नसल्यास त्या जंतूंची वाढच होऊं शकत नाहीं, हें आतां निर्विवाद सिद्ध झालेलें आहे. त्याचप्रमाणें या डांसांत अंडीं घालण्याकरतां सांडलेल्या पाण्याची जरूर असते. या माहितीवरून मलेरिआपासून स्वतःचें रक्षण पुढील प्रकारानीं करतां येतें.

१ डांस प्रथम अंडीं घालतात व तीं फुटून त्यांतून किडे बाहेर पडतात व त्यांचे पुढें डांस होतात. हे किडे पाण्यांत राहतात व त्यांस हवेची व अन्नाची जरूर असते. शक्य तितक्या ठिकाणीं पाणी न सांचेल अशी व्यवस्था केली पाहिजे. हें शक्य नसेल तर पाण्यावर राकेल तेल पसरल्यास त्यांस हवा मिळणें अशक्य होऊन ते मरतात. या ऐवजीं त्रि ऑक्सियेतिलेन नांवाचें औषध वाळूशीं मिसळून पाण्यावर टाकतात. हें विषारी असल्यामुळें ते किडे मरतात. यांपैकीं कोणताही प्रयोग १० दिवसांनीं पुनः करावा लागतो. कांहीं विशेष प्रकारचे मासे सांठलेल्या पाण्यांत टाकल्यास ते सर्व किड्यांना खाऊन टाकतात. हे किड्यांचा नाश करण्याचे प्रकार झाले.

२ डांसांस बहुधा मनुष्यापेक्षां इतर प्राण्याचें रक्त जास्त आवडतें यामुळें गुरें, घोडे, ससे, डुक्कर वगैरे पाळीव जनावरें बाळगल्यास त्यांपासून अप्रत्यक्ष रीतीनें मनुष्याचें संरक्षण होतें. ज्या पाण्यांत डांस उत्पन्न होतात त्याचे व राहत्या घराचे मध्यें गोठे, तबेले वगैरे असावे. मांसाहारी लोकांस माशांचा व पाळीव जनावरांचा अशा तऱ्हेनें दुहेरी उपयोग होतो.

३ कांहीं विशिष्ट प्रकारचे डांस मनुष्यास चावतच नाहींत व इतर प्राण्यांस चावतात. ज्या ठिकाणीं माणसांस चावणारे डांस असतील तेथें अशा प्रकारच्या डांसांचे पीक तयार केल्यास पुष्कळ वेळां माणसांस चावणाऱ्या डासाचा पाडाव होऊन इतर मात्र शिल्लक राहतात. ही परस्पर लढाई ते पाण्यांत किड्यांचे

स्थितींत असतांना होते व मनुष्यास त्याचा अतिशय फायदा होतो. याकरतां निरनिराळया प्रकारच्या डांसांवर प्रयोग केले पाहिजेत.

५ वरील युक्त्या अमलांत येईपर्यंत रात्रीं मच्छरदाण्या वापरणें, व घरांच्या सर्व खिडक्यांस व दरवाज्यांस तारेच्या जाळया बसवणें हे सामान्य उपाय आहेत, व यांस डॉक्टरच्या विलापेक्षां जास्त खर्च न येतांही उपयोग जास्त होतो. खिडक्यांस पक्या जाळया बसवल्यास, व प्रत्येक दरवाज्याचे जोडीला एक जाळीचा दरवाजा बसवल्यास, व तो कधींही उघडा राहूं न देण्याची खबरदारी घेतल्यास घरात एक माशी किंवा चिलट सांपडणें मुष्किलीचें होईल इतकी व्यवस्था करतां येते हें आम्ही प्रत्यक्ष पाहिलें आहे, व यामुळें किती सुख होतें हें अनुभवण्यासारखें आहे.

कोयनेलनें मलेरिआ बरा होतो खरा, परंतु निरोगी मनुष्यानें तें घेतल्यास त्यास मलेरिआ होत नाहीं, ही कल्पना आतां चुकीची टरली आहे. यानें कोयनेलची किंमत मात्र वाढते.

---

एप्रिलचे १९ तारखेस बाळा नावाचे एका इसमानें आपली बायको भागूबाई व एक नातलग भिवा यांचा कुऱ्हाडीनें खून केला. हीं सर्व एका खोलींत रहात असत व बाळास बायकोचे वर्तनाबद्दल बरेच दिवस संशय होता. त्या रात्रीं सुमारें ४ वाजतां बाळा जागा होऊन पहातो तों बायको अंथरुणावर परत येऊन निजत होती. कोठें गेली होतीस असें विचारतां, मला पाहिजे तिकडे मी जाईन, तुला मजजवळ रहावयाचें नसल्यास तुला वाट मोकळी आहे, असें तिनें उत्तर दिलें, त्यावरून संतापून त्यानें प्रथम भिवाचे मानेवर कुऱ्हाडीचा घाव केला व नंतर बायकोलाही पांच जखमा केल्या. तो ओरडल्यामुळें लोक जमा झाले, परंतु पोलीस येईपर्यंत त्यानें दार उघडलें नाहीं. भिवा मेलाच होता. बायकोला इस्पितळांत नेलें, परंतु ती लवकरच मेली,

× × × ×

# व्हिजिलन्स् असोसिएशन ( जागरूक संघ )

वरील संस्थेची वार्षिक सभा मार्च २६ रोजीं झाली. वेश्यांस हरप्रयत्नांनीं धंदा सोडावयास लावण्याचा या संस्थेचा जाहीर उद्देश आहे. शिवाय या संस्थेचे लोक नसते उपद्व्याप कसे करीत असतात हे वाचकांस मिस् डेव्हिस् प्रकरणावरून माहीत आहेच. ज्यांस जुलमानें वेश्यांचा धंदा करावा लागतो त्यांचा बचाव करण्याचें काम स्तुत्य आहे हे कोणीही कबूल करील, व या लोकांनीं एवढेंच काम केल्यास त्यांस कोणीही नांवें ठेवणार नाहीं. वेश्यागृहें चालवणें हा गुन्हा आहे असा कायदा करून घेण्याचा या संस्थेचा आणखी एक उद्देश आहे, परंतु सरकारनें त्यांस अजूनपर्यंत दाद दिलेली नाहीं.

वेश्यागृहांचे मालकांकडून वेश्यांवर बहुधा जुलूम होतो व हा जुलूम बंद करणें इष्ट आहे. परतु जेथें कांहीं वेश्या स्वेच्छेनें एकत्र राहून धंदा करतील, अशा जागेस कायद्याचे दृष्टीनें वेश्यागृह समजूं नये असें आमचें मत आहे, कारण तेथें जुलूम होण्याचा संभव नाहीं.

गेल्या वर्षांत एकंदर ५८ वेश्या वरील संस्थेनें सोडवून आणुन त्यांनीं आपल्या गृहांत ठेवल्या. याकरतां उमरखाडी येथील तुरुंगाचा कांहीं भाग सरकारनें संस्थेस बक्षीस दिला आहे. त्यांपैकीं २२ आज मितीस संस्थेंत आहेत, व १२ पुनः वेश्यांचे धंद्यांत शिरल्या. बाकी २४ चें काय झालें ही माहिती प्रसिद्ध झालेली नाहीं, यावरून त्याही पुनः धंदा करूं लागल्या असतील असा संभव आहे. यावरून केवळ मनाविरुद्ध या धंद्यांत पडलेल्यांसच ही संस्था सोडवून आणते असें होत नाहीं. इतरांसही धाक दपटशा दाखवून हे लोक पकडून आणतात व रिपोर्टावरून पाहतां यांत पोलिस कमिशनरची मदत आहे. असें दिसतें. सोडवून आणलेल्या वेश्यांस त्यांचे गृहांत इनक्या उत्तम रीतीनें वागवतात कीं ५८ पैकीं २२ अजून तेथें शिल्लक आहेत ( पळून गेल्या नाहींत ! ) या मुद्यावर अध्यक्ष सर चुनीलाल मेहता यांनीं संस्थेच्या तर्फे काम करणाऱ्या मिस् डिकिन्सन यांची पाट थोपटली. एकंदरींत नसते उपद्व्याप करणारी ही संस्था आहे असेंच म्हणावें लागतें. जेथें जुलूम होत असेल तेथें तो बंद करणें अवश्य आहे, व हें पोलिसास करतां येतें. परंतु वेश्यास त्यांचे मनाविरुद्ध पकडून आणून या गृहांत ठेवणें हाही तितकाच जुलूम आहे व असा जुलूम करण्याचा या संस्थेस बिलकूल हक्क पोंचत नाहीं.

# हातांची जोपासना.

स्त्रियांस काय किंवा पुरुषांस काय बहुतेक सर्व कामें हातांनीं करावयाचीं असतात व हातांचा आणि बोटांचा प्रत्येक ठिकाणीं संबंध येतो. स्पर्शज्ञान सर्व त्वचेनें होतें खरें. परंतु बोटांइतकें सूक्ष्म रीतीनें होत नाहीं. उदाहरणार्थ कापडाचें सूत किती तलम आहे हें बोटांसच उत्तम समजेल. परंतु हें समजण्यास बोटांची त्वचा खडबडीत असतां कामा नये. शिवाय अस्वच्छ त्वचेवर रोगजंतूंची राहण्याची सोय चांगली होते यामुळें तेथें ते पुष्कळ असतात, व सुई वगैरे टोंचल्यास ते रक्तांत शिरतात, किंवा जेवतांना पोटांतही जातात व अनेक रोग उपस्थित करतात. यावरून स्वच्छ हातांचें महत्त्व लक्षांत येईल. शिवाय स्वच्छ हात हा शारीरिक सौंदर्याचा एक महत्त्वाचा भाग आहे हें स्त्रियांस तरी सांगण्याचें कारण पडूं नये.

प्रत्येक जेवणाचे अगोदर व इतर केव्हांही हात खराब झाले असतां ते धुतले पाहिजेत. हातास माती लावून धुतल्यानें ते स्वच्छ होतात ही प्राचीन समजूत सूक्ष्मदर्शक यंत्रानें खोटी ठरविली आहे. मातीनें सूक्ष्मजंतु मरत नाहींत, व म्हणून हात स्वच्छ होत नाहींत असें आतां म्हणावें लागतें. या करतां साबण वापरणें जरूर आहे. हा साबण उत्तम वासाचा किंवा विशेष किमतीचा असला पाहिजे असें नाहीं, परंतु जंतुनाशक असला पाहिजे व त्यानें त्वचेस इजा होतां कामा नये. जेथें एकच साबणाची वडी पुष्कळ माणसास वापरावी लागते, तेथें साबणाच्या वडी ऐवजीं पातळ साबण बाटलींत ठेवून त्याचे कांहीं थब हातावर पाडण्याची व्यवस्था करावी, म्हणजे एकाच्या त्वचेचा मळ दुसऱ्यास लागणार नाहीं. अशा साबणाची बाटली बाजारांत विकत मिळते. साबणाची वडी वापरल्यास ती प्रत्येकाची वेगळी असावी.

हात धुण्यास पाणी गरम असल्यास उत्तम, कारण गरम पाण्यानें मळ चांगला निघतो. व हात विशेष स्वच्छ ठेवणें असल्यास एक ब्रश घेऊन साबणाच्या

फॅसानें प्रत्येक हात उत्तम घांसून काढावा, नंतर धुवून या कामाकरितां राखून ठेवलेल्या टुवालास हात कोरडे पुसावे व ज्यांस परवडेल त्यांनीं थोडेसें कोलन वाटर हातांवर चोळल्यास फायदा आहे. त्वचा फार रूक्ष व खरबरीत असल्यास ती मऊ पडण्याकरितां एखादी चांगली 'क्रीम' लावावी.

**नखें**:-रोगजंतूंच्या दृष्टीनें, आपल्या शरीरांतील दोन सर्वांत गलिच्छ जागा म्हणजे तोंड व नखें होत. या दोन्ही ठिकाणीं असंख्य जंतु राहूं शकतात. नख जितकें अधिक लांब, तितका त्यांना अधिक आसरा मिळतो, व साबण न लावल्यास त्यांस चांगलेंच फावतें. घाणेरड्या नखांनीं त्वचा खाजवल्यास हे जंतु त्वचेच्या आंत जातात. अंगावर गळवें वगैरे पुष्कळ वेळां घाणेरड्या नखांमुळें होतात. नखें स्वच्छ असलीं तरीही त्यांचा उपयोग खाजवण्याकडे करूं नये, हा उत्तम मार्ग.

कांहीं लोकांस नखें लांब वाढूं देण्याची संवय असते, व यूरोपमधील कित्येक स्त्रिया लांब नखें हें श्रीमंतीचें लक्षण समजतात. कारण लांब नखें असल्यास घरकाम करण्यास अडचण होईल. नखें जितकीं जास्त लांब, तितकीं तीं स्वच्छ ठेवण्यास कठिण असल्यामुळें स्वच्छतेच्या दृष्टीनें नखें वारंवार कापून आंखूड ठेवणेंच इष्ट आहे. हात धुवून पुसल्यानंतर नखाच्या खालचा व बाजूचा मळ काढून, तीं बोटाच्या आकारावरोबर कापून बारीक कानशीनें घांसुन काढावीं व नंतर पुनः साबण लावून धुवावीं. नखें कापण्याकरतां, मळ काढण्याकरता व घांसण्याकरतां विशेष प्रकारचीं हत्यारें विकत मिळतात.

कपडे शिवणें, धुणें, इस्तरी करणें वगैरे कामें करतांना हातांस विशेष जपलें पाहिजे. थंडीनें, उष्णतेनें किंवा फार वेळ ओले राहिल्यानें हाताच्या त्वचेस इजा होते, याकरतां जरूर पडल्यास दिवसांतून दोन तीन वेळां, किंवा निदान रात्रीं निजण्यापूर्वीं 'क्रीमचा' उपयोग करावा. हात किंचित् भाजल्यास तुसता बांधून ठेवावा, जास्त भाजल्यास डॉक्टरकडे जावें. फोड आल्यास तो फुटून कातडी निघून जाऊं नये अशी खबरदारी घ्यावी.

हातास सुई टोंचल्यास प्रथम बाजूस दाबून एक दोन थेंब रक्त काढावें

व नंतर ' टिंक्चर् ऑफ् आयोडीन् ' लावावें. हें औषध नेहमीं घरांत बाळगण्यासारखें आहे. अशावेळीं कोळयाचें जाळें किंवा इतर घाणेरडे पदार्थ जखमेवर लावूं नये, व बांधण्याकरतां नेहमीं स्वच्छ कपडा—शक्य असल्यास विशेष प्रकारचा कापूस व कपडा बाजारांत मिळतो तो—वापरावा. सुई नखाखालीं टोंचल्यास प्रथम सोसवेल तितक्या गरम पाण्यांत बोट शेकून नंतर वरील औषध लावावें. हात कापला असतां आपोआप रक्त येतें त्यामुळें रोगजंतु असल्यास आपोआप बाहेर जातात व धोका कमी होतो, परंतु तरीही वरील औषध लावावें. इस्तरीसारखें जड हत्यार वापरल्यानें हातास फोड आल्यास तो सुईनें फोडून वरील कातडें तसेंच राहू द्यावें, व आंत नवी कातडी आल्यावर कापावें. केव्हांही सुईनें फोड फोडण्यापूर्वी सुईचें टोंक क्षणभर दिव्याचे ज्योतींत धरावें म्हणजे तीवरील जंतु मरतील.

ज्याचें रक्ताभिसरण योग्य रीतीनें होत नाहीं त्याचें अंग व विशेषतः हात हिंवाळयात फुटतात याकरता नेहमी, किंवा निदान हिंवाळ्याचे आधीपासून सर्वांगाची व विशेषतः हातांची त्वचा जोरानें घांसून काढण्याची संवय ठेवावी, म्हणजे रुधिराभिसरण जोरानें होईल व अंग फुटणार नाहीं.

× × ×

म्हैसुर येथील अबदुल्ला नांवाच्या मोटरहांक्यानें आपल्या धन्याच्या सिद्धम्मा नांवाच्या मुलीला फूस लावून पळवून नेल्याच्या आरोपावरून त्यावर खटला झाला आहे. मुलीच्या पत्रिकेवरून ती १५ वर्षांचे आंतच असावी असें दिसतें, परंतु पळून जाण्यापूर्वी अडीच वर्षांपासून आपला संबंध होता व तिचें वय सोळाचे वर आहे असें अबदुल्लाचें म्हणणें पडलें.

× × ×

इंग्लंडांत मोल्टन् येथें एका कुटुंबात आई, बाप, ६ मुलगे व ३ मुली एकाच खोलींत निजत असत! कार्डिफ् येथें एकाच बिछान्यावर ६ माणसें आडवीं निजत असत. त्यांतच एक नवीन मूल झाल्यामुळें त्याचीही तेथेंच सोय करावी लागली. त्यामुळें तें महिन्याचे आंतच गेलें. तरीसुद्धां संततिनियमन हें पापच आहे!

# आमचेबद्दल लोकमत.

स्वतःला 'श्रीमत्स्वामी शिवानन्द, महाराज' म्हणवून घेणारे एक गृहस्थ 'ब्रह्मचर्य हेंच जीवन' या ग्रंथाचे उत्तरार्धांत लिहितातः—

हल्लीं कित्येक पापी डॉक्टर्स, प्रोफेसर्स वगैरे ब्रह्मचर्याविरुद्ध व धर्माविरुद्ध घाणेरडे लेख लिहीत आहेत आणि हिंदु समाजांत पाश्चात्यांच्या भ्रष्टाचारांचें खूळ माजविण्याचें पाप मय प्रयत्न करीत आहेत. अशा कामी लोकांच्या मुर्दाड तोंडाकडे व रोग ग्रस्त व पापग्रस्त शरीर कुंभांकडे दृष्टि फेंकल्यास "Physician heal Thyself first" "अहो वैद्योबा! प्रथम स्वतःचीच चिकित्सा करा व दुरुस्त व्हा," असेंच म्हणावें लागतें. करितां अशी धर्मबाह्य वडवड व गडबड करणाऱ्या नराधमांच्या वाऱ्यासहि कल्याणेच्छूंनी कदापि राहूं नये कीं, मोहवश होऊन त्यांचें लेखन प्रकाशनहि कांहींच वाचूं पाहूं नये! कारण असे ब्रह्मचर्याची व धर्माची हेटाळणी करणारे माथेफिरु स्वधर्मशत्रु लोक आग विझवणारे नसून, समाजांतील स्त्रीपुरुषांच्या आयुरारोग्याचा व सुखी कुटुंबांचा धर्मबाह्य व नीतिबाह्य उपदेशरूपी दारूनें भडका उडविणारे प्रत्यक्ष नरपिशाच्चच होत! 'संततिनियमन' या सारखीं भ्रष्ट पुस्तकें व 'समाजस्वास्थ' या सारखीं समाजस्वास्थ्यविघातक मासिकें, अशाच पाश्चात्य मद्योन्मत्त लोकांचीं विषयविषप्रसारक मोहमयी दुष्ट व भ्रष्ट साधनें होत.

दाढिमत्तेच्या जोरावर गालिमय वटवट करणाऱ्या या अहंमन्य स्वामींची दया येते. गरीब बिचारे स्वामी! त्यांची पत्नी नुकतीच निवर्तल्यामुळें त्यांचें डोकें फिरलें आहे असें समजतें. अशा तात्पुरत्या ब्रह्मचर्यानेंही ज्यांची इतकी शोचनीय स्थिति होत, त्यांचें ब्रह्मचर्य दांडगेंच असलें पाहिजे! स्वामी मजकुरांनीं स्वतःचें नांव 'शिवानन्द' या ऐवजी 'शिव्यानंद' ठेवल्यास अन्वर्थक तरी होईल! शिव्यानंदांनीं केलेली निंदा ही आमचे मतें स्तुतिच आहे:-सं.]

२

पोस्ट × ×, जिल्हा सातारा,

७-४-२८

सप्रेम नमस्कार वि. वि.

## आमचेबद्दल लोकमत.

मी समाजस्वास्थ्याचा वर्गणीदार असून आजपर्यंत माझे हातीं आलेल्या ८।९ अंकांवरून समाजस्वास्थ्यानें चालविलेला हा नवीन उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे अशी माझी खात्री आहे. परमेश्वरानें समाजस्वास्थ्यास दीर्घायुषी करावें अशी प्रार्थना करतों.

पुढील वर्षापासून वर्गणी वाढवून कां होईना, पण समाजस्वास्थ्यानें जास्ती पानें व मजकूर देण्याची व्यवस्था करावी, अशी विनंति आहे.

तसेंच फक्त संततिनियमन, गुप्तरोगांपासून बचाव वगैरे विषयांचीच माहिती न देतां, इंग्लिश माहिती बरोबरच, कामसूत्र वगैरे अनेक देशी कामशास्त्रावरील ग्रंथांतील उपयुक्त व सध्यांचे परिस्थितींत योग्य अशी निवडक माहितीही थोडीथोडी देत जावी, अशी नम्र सूचना आहे.........

[ १. सध्यां हें मासिक आम्हांस उत्पन्नाची बाब नसून खर्चाची असल्यामुळें जास्त पानें घालणें तूर्त तरी अशक्य आहे. वर्गणी वाढल्यास वर्गणीदार कमी होण्याची भीति आहे. हल्लींच्या प्रत्येक वर्गणीदारानें दहा नवीन वर्गणीदार मिळवून दिल्यास याच वर्गणींत जास्त पानें देतां येतील. २. इतर सूचना विचारणीय आहेत. सं. ]

---

## साभार स्वीकार.

या अंकाच्या छपाईचा खर्च एका वाचकानें उदारबुद्धीनें दिला आहे, त्याचा आनंदानें स्वीकार करून त्यांचे येथेंच आभार मानतों. अनुकरणीय आहे.

---

# पत्रांचा सारांश.

१

सा. न. वि. वि. कांहीं स्त्रिया आत्मसंभोगाकरतां अनेक वस्तूंचा उपयोग करतात. याकरतां विशेष प्रकारची रबराचीं कृत्रिम साधनें मिळतात कीं काय ? व मिळत असल्यास त्यांस किंमत काय पडते ? इत्यादि गोष्टींचा खुलासा उत्तरीं करावा.

आपला

× × ×

## पत्रांचा सारांश.

[ ही चौकशी पुष्कळ लोक करीत असतात. रबराचीं कृत्रिम इंद्रियें युरोपांत व जपानमध्यें मिळतात, परंतु तीं उघडपणें विकण्याची परवानगी कोठेंही नाहीं. तिकडून तीं मागवण्याचा प्रयत्न कोणीं केल्यास तीं कस्टम खात्याकडून जप्त होऊन शिवाय त्याबद्दल शिक्षा होण्याचा संभव आहे. त्यांतून कोणी चोरून मागवून विकीत असल्यास आमचे ऐकिवांत नाहीं. असे पदार्थ वापरणें प्रकृतीस हितावह नाहीं व त्यापेक्षां नैसर्गिक मार्ग बरा. जरूर पडल्यास संततिनियमनाचीं साधनें वापरलीं म्हणजे झालें. ]

२

कृ. सा. न. वि. वि. आपण संततिनियमन व एकंदर स्त्रीपुरुषसंबंध या विषयाचा शास्त्रीय व बौद्धिक दृष्ट्या विचार करीत असल्यामुळें आपणास खालील माहिती विचारीत आहे.

संततिनियमनास आत्मसंयमन हा उपाय सुचविण्यांत येत असतो. पण तो आपल्या मतें नेहमीं शक्य व इष्टही नाहीं. कारण भोगेच्छा ही नैसर्गिक गोष्ट असुन ती तृप्त करणें अवश्य असुन ती अतृप्त ठेवल्यानें शरीरावर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो.

आतां नवरा बायको एकमेकांपासुन दूर असतांना एकास संभोगेच्छा झाली किंवा जवळ असुन एकास इच्छा झाली असतांना ती तृप्त करण्याजोगी दुसऱ्याची मानसिक किंवा शारीरिक स्थिति नसेल तर आपण कोणते कृत्रिम उपाय सुचवूं शकता कीं वरील परिस्थितींत इच्छा तृप्त न झाल्यानें होणारे अनिष्ट परिणाम टळतील ?

अशा वेळीं अन्य स्त्रीसंबंध अथवा अन्य पुरुषसंबंध करावा असें कदाचित आपण सांगूं शकाल. या उपायाच्या इष्टानिष्टतेचा विचार बाजूस सारला तरी विवाहविषयक मतांत इतकी क्रांति घडून येईपर्यंत तरी वरील विचार शक्य नाहीं. अर्थात ज्यांची खात्री होऊन क्रांति घडवून आणणें हेंच ज्यांनीं कर्तव्य ठरविलें त्यांचे बद्दल प्रश्नच नाहीं. पण ज्यांना वरील उपायाचें नैतिक व बौद्धिक दृष्ट्या ग्रहण करतां येत नाहीं त्यांचे करतां कृत्रिम उपायांची आवश्यकता आहे. तरी ज्यांचे योगानें शरीरावर अपाय होणार नाहीं पण अतृप्तीमुळें होणारे परिणाम टळतील असे उपाय असल्यास कळवावे. उत्तरा करतां तिकीट पाठवीत आहे. पत्र खाजगी आहे असें समजालच.

आपला

× × ×

[ वरील पत्रास उत्तर पहा निसर्गास नीतीची पर्वा नसते, आमचा नाइलाज आहे. स ]

# उंदीर.

सर्व जगभर उंदीर हा प्राणी मनुष्य समाजाचा भयंकर शत्रू झालेला आहे. उंदरांमुळे दरवर्षी कोट्यवधि रुपयांचें नुकसान होतें इतकेंच नव्हे, तर त्यांमुळ प्लेग व इतर रोग सर्वत्र पसरतात.

डेन्मार्कमध्यें या बाबतींत विशेष कायदे झाले आहेत, व उंदरांस मारण्याचे विशिष्ट मार्ग प्रत्येकास वापरावे लागतात.

मे महिन्याचे उत्तरार्धांत पॅरिस येथें यासंबंधीं एक आंतरराष्ट्रीय परिषद् भरणार आहे, व उंदरांस मारण्यासंबंधीं प्रयोग होणार आहेत.

एका उंदरिणीला दरवर्षी ६०० पासून ९०० पोरें होतात ! दुष्काळ-प्लेग व रेंची भीति वाटल्यास उंदीर पळून जातात. हा प्राणी अतिशय हुशार असून सावधगिरीनें राहतो, व त्यास मारणें अत्यंत कठिण असतें. परंतु स्वतःचें रक्षण करणें त्यापेक्षां सोपें असतें. याकरतां उंदरास कोठेंही राहतां येणार नाहीं अशा तऱ्हेनें सर्व इमारतीचें बांधकाम झालें पाहिजे. अन्न कधींही उघडें राहतां कामा नये इतकेंच नाहीं तर कचऱ्याच्या पेट्या बंद असून त्या सायंकाळींच रिकाम्या केल्या पाहिजेत.

त्यांस मारण्याकरतां विषाचा उपयोग केल्यास १५ दिवसांत तें त्यांच्या ओळखीचें होतें. त्यास सर्वांत उत्तम उपाय म्हणजे लोखंडी तारेचा पिंजरा. परंतु त्यांतही रोज वेगवेगळे खाण्याचे पदार्थ ठेवल्यास बरें. तो दररोज दोनदां साफ करून पुनः लावून ठेवला पाहिजे.

लढाईंत जेथें सैन्यामुळें अन्नाचा अवशेष इकडे तिकडे जास्त पडे, तेथें उंदरांच्या झुंडीच्या झुंडी जात. सैन्य शहरांतून दुसरीकडे निघून गेल्यास उंदीरही जात.

बोटीवर खलाशी लोक मांजरें बाळगतात. उंदरांस हा एक उत्तम उपाय आहे. बोटी बांधतांना उंदराच्या महत्त्वाच्या प्रश्नाचा नेहमीं विचार करावा लागतो.

* * *

मिस् मिलरनीं शुद्धीचे वेळीं पंचगव्य घेतलें नाहीं अशी दाट वदंता आहे. पंचगव्याची जरूर नाहीं असें श्री. शंकराचार्यांचें मत दिसतें. तसें असेल तर त्यांनीं जाहीर करणें जरूर आहे.

* * *

# ताजी व शिळी बातमी.

साताऱ्याच्या एका फकिराची बायको अनीतीच्या उद्देशानें पळवून येथें आणल्याचे आरोपावरून मलकाबाई नांवाच्या एका हमामखान्याच्या मालकिणीवर बरेच दिवस खटला चालला होता. तिला मार्च २८ रोजों हायकोर्टानें निर्दोषी ठरवुन सोडून दिली. तो हमामखाना म्हणजे प्रच्छन्न वेश्यागृहच होतें असा पोलीसनें साक्ष दिली, व त्याला दुजोरा म्हणून तेथें सांपडलेली कांहीं ( त्याचे मतें ) अश्लील चित्रें पुरावा म्हणून दाखविलीं. आरोपीतर्फे वकिलानें तीं चित्रें नग्न आहेत परंतु अश्लील नाहींत, असें प्रतिपादन केलें व जज्जास हें म्हणणें पटलें असें दिसलें.

*　　　*　　　*

इंग्लंडांत आंग्लोकॅथोलिक पंथांतील रेव्हरंड् फ्रान्सिस् बेरन् नांवाच्या एका ७० वर्षांच्या धर्मगुरूस नुकतीच १५ महिने कैदेची शिक्षा झाली. संततिनियमन हें पाप आहे असें यांच्या पंथाचें मत आहे. व हे गृहस्थ निरनिराळीं चारपांच नांवें धारण करून स्त्रियांस गर्भपाताकरतां औषधें विकण्याचा धंदा कित्येक वर्षेंपर्यंत करीत आले होते. ॲनी बोल्टन् नांवाची त्यांची साथीदार १७ व्या वर्षापासून त्याच धंद्यांत होती, तिला ६ महिन्यांची शिक्षा झाली.

*　　　*　　　*

घराच्या मागल्या दारावर ओळखीची थाप ऐकून, व नवऱ्यास झोंप लागली आहे असें वाटून एका कुंभाराची बायको दार उघडून निघून गेली. नवऱ्यानें झोंपेचें ढोंगच केलें होतें. तो हें पाहून एक कोयता घेऊन जाऊन पाहतो तों ती एका पुरुष जवळ निजलेली दिसली. त्यानें प्रथम त्या मनुष्याचे तुकडे केले व नंतर बायकोचें डोकें कापून हातांत कोयता घेऊन पोलीसपाटलास सर्व हकीकत सांगण्यास गेला ! धन्य जाहला !

*　　　*　　　*　　　*

गेल्या आगस्टचे २५ तारखेस सूर्यास्ताचे सुमारास मैनी नांवाची ३५ वर्षांची मराठ्याची बाई आपल्या बहिणीकडून आपले गांवीं परत येत असतां दोन इसमांनीं तिला मागून पकडली, व ओरडूं लागली तेव्हां तिला सुरा दाखवुन ठार मारण्याचा धाक घातला. नंतर तिला कुंपणाजवळ नेऊन दोघांनींही तिजवर बलात्कार केला व तिची चांदीची सांखळी व दोन रुपये लुबाडून घेतले. त्यांपैकीं एक इसम फरारी झाला, परंतु दुसऱ्यास ठाण्याच्या सेशन जज्जांनीं ४ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा दिली. त्यास पूर्वी एकदा शिक्षा झालीच होती.




# समाजस्वास्थ्य

वर्ष १] नवेंबर १९२७ [अंक ५

संपादक--र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १. व्हिटॅमीन अथवा जीवनतत्त्वें | ... | ... | १ |
| २. आमच्याबद्दल लोकमत | ... | ... | ५ |
| ३. शेतकी व मानवी प्रदर्शन ( गुरुकिल्ली ) | | ... | ६ |
| ४. वांझपणाचें एक कारण | ... | ... | १८ |
| ५. ग्रंथपरीक्षण ( बाहेरख्यालींचे | ... | ... | ... |
| दुष्परिणाम, लेखक , डॉ. लेले ) | ... | ... | १९ |
| ६. ताजी व शिळी बातमी | ... | ... | २३ |



**उच्च दर्जाचें व उच्च ध्येयाचें मनोरंजक पण भारदस्त व प्रगतिप्रिय असें**

## स्त्रियांचें सर्वांगसुन्दर मासिक.

# गृहलक्ष्मी

सम्पादिका—**तारा टिळक**, बी. ए.

**पिरोज आनन्दकर**, बी. ए.

[ वार्षिक वर्गणी ट. ख. सह फक्त ३॥ साडेतीन रुपये. ]

**प्रत्येक १५ व्या तारखेस प्रसिद्ध होतें.**

स्त्रियांना उपयुक्त व आवडतील अशा सर्व विषयांवर विद्वान् अधिकारी लेखिकांचे व लेखकांचे लेख " **गृहलक्ष्मी** " मध्यें असतात.

तीन रंगी मुखपृष्ठ, तीन रंगी दर्शनी चित्र व आर्टपेपरवरील अनेक फोटो प्रत्येक अंकांत असतात.

**' गृहलक्ष्मी ' कार्यालय,**

**खटाव भुवन, मुम्बई ४.**

# *व्हिटॅमेन् अथवा जीवनतत्त्वें.

आपण जें अन्न खातों त्याचे दोन प्रकारचे उपयोग असतात. कांहीं प्रकारच्या अन्नामुळें शरीराची वाढ किंवा दुरुस्ती होत असते, म्हणजे हें अन्न शरीराचा घटक बनतें, व दुसऱ्या कांहीं प्रकारांमुळें हालचाल करण्यास लागणारी शक्ति व उष्णता उत्पन्न होऊन तें खर्च होतें.

परंतु या दोन्ही प्रकारचे अन्नानेंही पोषणाचें काम पुरें होत नाहीं, आणखी कांहीं तत्त्वांची शरीरास जरूर असते असा शोध सोळा वर्षांपूर्वी लागला, तेव्हांपासून या विषयावर सुमारें १०००० पुस्तकें व लेख प्रसिद्ध झाले आहेत. या नवीन तत्त्वांस जीवनतत्त्वें ( व्हिटॅमीन् ) असें नांव दे ं.

ही तत्त्वें निरनिराळ्या प्रकारच्या अन्नांत अतिशय सुक्ष्म प्रमाणांत सांप-डतात, तरीही त्यांचें महत्त्व इतकें आहे कीं तीं नसल्यास प्रकृति बिघडते व असें फार दिवस चालल्यास मनुष्य ( किंवा इतर प्राणी ) मरतो. आजपर्यंत अशा सहा सात तत्त्वांचा शोध लागला व आणखीही लागण्याचा संभव आहे. या तत्त्वांस अ, ब, क, ड, इ, फ, प म्हणं.

या शोधास प्रथम सुरुवात बेरीबेरी नांवाच्या रोगापासून झाली. हा रोग कशामुळें होतो याचा फार दिवस उलगडा होत नव्हता, परंतु शेवटीं असें आढळून आलें कीं ज्यांचा मुख्य आहार भात आहे, व जे यंत्रानें साफ केलेले तांदूळ वापरतात त्यांसच हा रोग होतो, इतरांस होत नाहीं. यावरून निरनि-राळ्या प्रकारचे प्रयोग केल्यावर असें ठरलें कीं भाताच्या कोंड्यांत एक जीवन–तत्त्व असतें, व यंत्रानें साफ केलेल्या तांदुळांतला कोंडा साफ निघून गेल्यामुळें हें तत्त्व नाहींसें होतें व म्हणून हा रोग होतो. याचा पुरावा म्हणजे तेच तांदूळ

---

* व्हिटॅमीन् चा १९११ सालीं प्रथम शोध लावणारे कॅसिमीर फंक् यांनीं पॅरिस् येथें नुकत्याच दिलेल्या एका व्याख्यानावरून ही माहिती घेतली आहे.

यंत्रानें साफ न करतां खाल्ल्यास तोच रोग बरा होतो. अशा प्रकारच्या पुष्कळ तत्त्वांचा नंतर शोध लागला. त्याबद्दल थोडक्यांत माहिती खालीं दिली आहे.

**अ**. या तत्त्वाच्या अभावीं डोळे येतात. हें पित्ताशय, मूत्रपिंड वगैरे इंद्रियें, अंडीं, दूध, पालेभाज्या, द्विदळ धान्यें, धान्याचे मोड व टोमाटो यांत सांपडतें.

**ब**. याच्या अभावीं बेरीबेरी नांवाचा रोग होतो. ( यानें मनुष्य क्षीण होऊन झिजून मरतो ). हें कोंडा न काढलेलीं धान्यें, द्विदळ धान्यें, पालेभाज्या, बटाटे, नारिंगें व इतर ताजीं फळें, ताजे किंवा टिकवलेले टोमाटो, मांस, अंडीं, दूध ( साधें किंवा मलई काढलेलें ), व आंब यांत सांपडतें. या तत्त्वाची पिष्टमय पदार्थ पचण्यास मदत होते व हें कमी पडल्यास पीठ जसेंच्या तसेंच आंतड्यांतून बाहेर पडतें, असें प्रयोगांनीं सिद्ध झालें आहे. असें झाल्यास त्याचा शरीरास कांहीं उपयोग न झाल्यामुळें पोषण होत नाहीं. यासंबंधीं सर्वांत अलीकडच्या शोधांवरून असें दिसतें कीं, बेरीबेरीचा एक विशिष्ट जंतु असून, या जीवन तत्त्वानें त्याचे वाढीस अडथळा होता.

**क**. हें नसल्यास स्कर्व्ही नांवाचा रोग होतो ( दाढा सुजून त्यांतून रक्त येतें व एकंदर क्षीणता येते. ) हें पित्ताशय वगैरे इंद्रियें, पालेभाज्या, बटाटे, ताजीं फळें, नारिंगें, ताजे किंवा टिकवलेले टोमाटो, अंडीं व दूध यांत सांपडतें.

**ड**. यांचा मनुष्यास कांहीं उपयोग आहे कीं काय हें अजून समजलेलें नाहीं, परंतु अतिसूक्ष्म ( डोळ्यांस न दिसणारे ) जीव या तत्त्वाशिवाय जगू शकत नाहींत.

**इ**. याच्या अभावीं हाडांची वाढ होत नाहीं. तीं मऊ होऊन वांकडीं होतात. हा रोग बहुधा लहान मुलांस होतो, परंतु मोठ्या माणसांसही होऊं शकतो असें गेल्या लढाईत सिद्ध झालें आहे. हें तत्त्व अजून दोनच पदार्थांत खात्रीनें सांपडलेलें आहे. ते दोन पदार्थ म्हणजे अंडीं व कॉड् लिव्हर् ऑइल

( कॉड् माशाच्या पित्ताशयाचें तेल ). याकरितां हा रोग झाल्यास कॉड् लिव्हर् ऑइल् देतात.

फ. याचे अभावीं जननेंद्रिय व इतर अंगभूत इंद्रियांची क्रिया बंद पडते. हें फक्त ताज्या भाज्या व धान्याचे मोड यांत सांपडलेलें आहे.

प. याचे अभावीं पेलॅग्रा नांवाचा रोग होतो. मका हें जेथें मुख्य अन्न आहे तेथें हा विशेष दिसतो. याची दृश्य खूण म्हणजे त्वचेस भेगा पडतात. परंतु यानें मज्जातंतूंस बाधा होऊन शेवटीं वेडही लागतें. हें पित्ताशय वगैरे इंद्रियें, अंडीं, दूध व आंब इतक्या पदार्थांत सांपडलेलें आहे.

शेवटच्या दोन तत्त्वांबद्दल अजून खात्रीचा शोध लागलेला नाहीं, परंतु प्रयोग चालू आहेत. या सर्व जीवनतत्त्वांसंबंधीं एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं पदार्थ ताजा असतांना त्यांत जीं तत्त्वें असतील तीं तो शिळा झाल्यावर किंवा शिजवल्यावर असतीलच असा नियम नाहीं. यांतील कांहीं तत्त्वें १२० डिग्री उष्णता झाल्यास नाहींशीं होतात [ उकळत्या पाण्याची उष्णता १०० डिग्री असते ].

या सर्व तत्त्वज्ञानाचा व्यवहारांत उपयोग करावयाचा म्हणजे खालील गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे.

१. पथ्याकरतां किंवा इतर कारणामुळें ज्यांस एकाच प्रकारचें अन्न खावें लागतें ( अंगावर पिणारीं मुलें, मधुमेही वगैरे ), त्यांच्या आहारांत हीं सर्व तत्त्वें येतील अशी विशेष खबरदारी घेतली पाहिजे.

२. जेवणांत नेहमीं कांहीं ताजे, न शिजवलेले पदार्थ असावे—उदाहरणार्थ टोमाटो, फळें, पालेभाज्या ( यूरोपांत पुष्कळ प्रकारच्या हिरव्या भाज्या, तेल व शिरका घालून खाण्याची पद्धत आहे. शिरक्याऐवजीं लिंबाचा रस घातल्यास त्याहीपेक्षां बरें ). कारण शिजतांना पदार्थांतील ( वर दिलेल्या किंवा अजून न सांपडलेल्या ) जीवनतत्त्वांचा नाश होण्याचा संभव असतो.

३. बाटल्यांत किंवा डब्यांत राखून ठेवलेल्या पदार्थांत जीवनतत्त्वें असण्याचा संभव कमी ( त्याला टोमाटो हा अपवाद आहे ). याकरतां केवळ अशा पदार्थांवर उपजीविका करूं नये. गेल्या लढाईंत सैन्यांतील शिपायांस अशा पदार्थांवर रहावें लागल्यामुळें बरेच रोग उद्भवले.

४. पदार्थ शिजवतांना त्यांतील पाणी कधींही काढून टाकूं नये, कारण त्यांत महत्त्वाची तत्त्वें असतात. पदार्थ शिजतांना त्यावर दाब ठेवूं नये कारण दाबामुळें उष्णता वाढते, व अधिक उष्णतेमुळें जीवनतत्त्वांचा नाश होण्याचा संभव असतो, हवेंतील ऑक्सिजन् वायूमुळेंही यांतील कांहीं तत्त्वें नाहींशीं होतात, याकरतां पदार्थांस हवा लागणार नाहीं असें करावें.

५. निरनिराळ्या देशांत सांपडणाऱ्या निरनिराळ्या पदार्थांचा या दृष्टीनें विचार करण्यासाठीं प्रत्येक देशांत एक स्वतंत्र संस्था असावी.

वाढीच्या वयांत या गोष्टींकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे कारण एकदां वाढ खुंटली कीं ती पुढें भरून येण्याचा संभव नसतो. कांहीं लोक या कारणानें खुजट होतात यांत शंका नाहीं.

' इ ' हें तत्त्व आहारांत न मिळाल्यास हाडें मऊ होऊन वांकडीं तिकडीं होतात, व दांतांसही हाच नियम लागू आहे. याचें पुरें ज्ञान झाल्यावर दंत-वैद्यांस दांतांतील भेगा भरीत बसण्याऐवजीं ते निरोगी कसे ठेवावे हें सांगतां येईल. मूल अंगावर पीत असेल तोंपर्यंत आईच्या आहारास या बाबतींत जपलें पाहिजे. यावेळीं दांत मजबूत आले नाहींत तर त्यापासून जन्मभर त्रास होण्याचा संभव असतो. आहारांतून ' क ' आणि ' इ ' हीं तत्त्वें काढून टाक-ल्यास दांत किडतात असें प्रयोगानें सिद्ध झालें आहे.

जंतुजन्य रोग या तत्त्वांच्या अभावानें होतात असें म्हणतां येणार नाहीं, तरी त्यानें शरीराची विरोधशक्ति कमी झाल्यामुळें रोगजतूंचा फैलाव होण्यास अप्रत्यक्ष रीतीनें मदत होते.

इतर कांहीं रोग–उदाहरणार्थ मधुमेह, कॅन्सर ( दुष्टव्रण )–या तत्त्वांच्या अभावामुळें होतात असें मी १९१२ सालापासून सांगत आलों आहें ( पान १ वरील टीप पहा ). शरीरांतील सुक्ष्म गोलकांची फाजील वृद्धि झाली म्हणजे तो हा व्रण होतो. मी असें म्हणतो कीं अन्नांतील कांहीं तत्त्वामुळें ही वृद्धि वाढते व इतर कांहीं तत्त्वामुळें कमी होते. हीं कमी करणारीं द्रव्यें पुरेशीं मिळालीं नाहींत म्हणजे व्रण होतो. त्याचप्रमाणें कांहीं तत्त्व मुळें रक्तांतील साखरेचा अंश वाढतो, कांहींमुळें कमी होतो. तो फाजील वाढणें हाच मधुमेह. याला अन्न

पुरेसा पुरावा नाहीं, परंतु प्रयोग चालू आहेत. 'अनीमिआ' (रक्तक्षय) व 'स्प्रू' (अपचन, तोंडास फोड येणें, क्षीणता, वगैरे) हे रोगही याच कारणामुळें होत असावेत असें वाटतें.

आज सोळा वर्षे माझ्याप्रमाणेंच इतर पुष्कळ शास्त्रज्ञ यासंबंधीं एकसारखे प्रयोग करीत आहेत, तरी अजून म्हणण्यासारखें कांहीं हातीं लागलें नाहीं. परंतु थोड्याच वेळांत यासंबंधीं महत्त्वाचे शोध लागतील असा आम्हांस भरंवसा आहे. उत्तम शरीर बनण्यास व निरोगी राहण्यास कशा प्रकारचें अन्न खाल्लें पाहिजे हें आम्हांस नंतर सांगतां येईल.

---

### आमच्याबद्दल लोकमत.

'आपल्या समाजस्वास्थ्याचे तिन्ही अंक मिळाले. सूक्ष्म रीतीनें न पाहातां कांहीं विक्षिप्त लोक जरी आपल्या मासिकास नांवें ठेवूं पाहात असले, तथापि भावी पिढी उत्तम निपजण्यासाठीं जी माहिती आपल्या मासिकांतून आज येत आहे ती बरीच आहे. योग्य माहितीच्या अभावीं अनेक स्त्रीपुरुषां-कडून मूर्खपणाचे व्यवहार घडून लुली, पांगळी, आंधळी, मुकी अशी संतति निर्माण होत असतांनाही समाज त्यांना जें योग्य शिक्षण देण्यास धजत नाहीं त्या संबंधींची माहिती देण्याचा आपला प्रयत्न स्तुत्य आहे.' संपादक, भारतमित्र.

---

## पुढील अंकीं.

१. वेश्यांसंबंधीं कायदे (लेखांक १)

२. तिबेटांतील चालीरिति.

३. मनुष्याची उत्पत्ति.

४. एक पत्र.

# शेतकी व मानवी प्रदर्शन !

लेखक—गुरुकिल्ली.

एकदां आम्ही शेतकी प्रदर्शन पहावयास गेलों. तेथें पहिल्या विभागांत अनेक जातींच्या मातीचे नमुने ठेविले होते व प्रत्येकींत साहजिकपणें कोणतें पीक उत्पन्न करितां येईल हेंहि दाखविलें होतें. अशा प्रकारच्या जमिनींमधुन खताच्या रूपानें कोणतें द्रव्य किती प्रमाणांत घातलें असतां व्यापारी दृष्टया कसा फायदा होऊं शकेल हेंहि कोष्टकरूपानें सुलभ करून ठेविलें होतें.

प्रदर्शनाच्या दुसऱ्या विभागांत अनेक प्रकारचीं धान्यें, बियांचे नमुने म्हणून ठेविलेलीं होतीं. येथल्या सर्व जातींमधील प्रत्येक दाणा तेजस्वी वजनदार व आकारानें भरदार असा होता; अर्थात पोंचट, किडक्या अथवा अपक्व दाण्यांना येथें जागाच नव्हती. यामुळें येथील प्रत्येक दाणा जमिनी मध्यें रुजून पुढें त्याचें रोपडें होण्यासारखें होतें. असें बीं बाजारांतील सर्व-साधारण धान्याच्या मानानें महाग असतें परंतु पेरणीला थोडेंच पुरत असल्या-मुळें एकदरीनें स्वस्तांतच पडतें. नांगरलेल्या जमिनीमध्यें घालावयाचें बीं फार दाट पेरल्यास विनाकारण फुकट जातें आणि विरळ पेरल्यास पीक कमी येतें, याकरितां कोणत्या प्रकारचें बीं किती प्रमाणांत पेरावें याबद्दलचीं कोष्टकें तेथें मांडलेलीं होतीं.

प्रदर्शनाचा तिसरा यांत्रिक विभाग होता. येथील अनेक प्रकारचे नांगर, पाण्याच्या मोटा व पंप इ० बहुतेक यंत्रें विदेशी होतीं. यांपैकीं प्रत्येक यंत्रा-पासून थोड्या श्रमांत, थोड्या खर्चांत व थोड्या वेळांत जास्तींत जास्त आणि बिनचुक काम कसें घेतां येतें हे प्रत्यक्ष प्रयोगरूपानें दाखविलें होतें. वरील यंत्रांबद्दल प्रेक्षकांमध्यें द्विमत दिसून आलें तथापि हीं यंत्रें प्रेक्षणीय होतीं याबद्दल मुळींच शंका नव्हती. या यंत्रांच्या उपयुक्ततेला भाळून गेलेला असा लहानसा एक वर्ग होता परंतु सर्वसाधारण बहुजनसमाज विरुद्ध पक्षाचा होता. त्याचें म्हणणें असें पडलें कीं, प्रत्येक यंत्राला लागणारी मूळ किंमत शेतकरी वर्गाला न परवडणारी होती आणि शिवाय हा सर्व पैसा परदेशांत जाणारा होता. अशा प्रकारचें यंत्र चालविण्याला लागणारी अक्कल शेतकऱ्याच्या

स्वतःच्या डोक्यांत नसल्यामुळें एका भाडेकरी यांत्रिकाची जरूरी होती. त्यांतून असल्या यंत्रांत कोठें मोडतोड झाली म्हणजे विलायतेहून दुरुस्ती होणार तेव्हां पुढें काम चालणार ! इतकेंहि करून या राक्षसी यंत्रांना पुरेसें काम कोणाहि एका शेतकऱ्याजवळ नव्हतें आणि दहापांच जणांनीं मिळून एकत्र काम करणें आपणा हिंदी लोकांना अजून जमत नाहीं, याकरितां हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीला ही यंत्रें निरुपयोगी आहेत. अर्थात जीं कांहीं किरकोळ व स्वल्प किंमतींत मिळणारीं यंत्रें होतीं त्याबद्दल वादच नव्हता.

या पुढील चौथा विभाग शेताच्या संरक्षणाचा होता. जमीनींत पेरलेल्या धान्याशिवाय तेथें उगवणारें गवत व इतर किरकोळ वनस्पती यांनां वेळींच उपटून काढणारीं यंत्रें ( देशी व विदेशी ) आम्ही मागील विभागांत पाहिलीं होतीं. येथें मुख्यत्वेंकरून झाडाला कोड कशी लागते व ती कशी नाहींशी करावी याबद्दलचे अनेक प्रयोग दाखविलेले होते. या बाबतींत दुर्लक्ष केलें असतां सर्व श्रमाचें फळ प्राप्त होण्याच्या ऐन वेळीं कसें नुकसान पोंहचूं शकेल हेंहि स्पष्टपणें दाखविलें होतें.

अशा प्रकारची माहिती जमीन व वनस्पती याविषयीं आम्हांला मिळाली. त्यांतून आम्ही एवढाच अर्थ घेतला कीं, शेतकीच्या बाबतींत उत्तम पीक पाहिजे असेल तर प्रथमतः सुपीक जमीनीची निवड करून ती उत्तम रीतीनें नांगरली पाहिजे. नंतर त्या जमीनींत उणें असणारें द्रव्य खताच्या रूपानें घातलें म्हणजे ती जमीन बीं पेरण्याला तयार झाली. यानंतर बियांची निवड फारच काळजीपूर्वक व्हावयास पाहिजे. मग पाणी पुरवठ्याचा प्रश्न येतो. इतकें सर्व करून पीक हातीं लागेल असें मुळींच नाहीं, तर उगवलेल्या पिकाची नासधूस होऊं नये म्हणून तितकीच खबरदारी घेतली पाहिजे. यापैकीं कोणत्याही बाबतींत निष्काळजीपणा अगर हयगय चालत नाहीं. एवढे श्रम घेतल्यानंतर त्या जमीनींत उत्पन्न होणारें पीक खातरीनें आपल्या पदरांत पडतें.

यानंतरचा पांचवा विभाग जनावरांचा होता. तेथें आम्हांला अनेक गाई, म्हशी, बैल, रेडे, बकरीं, मेंढरें, कोंबड्या इ. जनावरें पहावयास मिळालीं. या जनावरांचा देखणेपणा व पुष्टता खरोखर कौतुक करण्यासारखी होती. मोठ-

मोठाल्या जनावरांच्या गळ्यांत एक एक बिल्ला अडकविलेला असुन त्यावर त्या जनावराचें वय, वजन, उपयुक्ततेचें प्रम ण व आयुष्य मर्यादा इ. माहिती दिलेली होती त्यावरून येथील प्रत्येक जनावर त्याच जातीच्या सर्व साधारण जनावरां-पेक्षां प्रत्येक बाबतींत कितीतरी सरस होतें हें स्पष्टपणें कोणाच्याहि ध्यानांत येण्यासारखें होतें. नंतर आम्ही या जनावरांविषयीं विशेष चौकशी करूं लागलों तेव्हां आम्हांला असें समजलें कीं, यापैकीं प्रत्येक जनावराच्या पैदाशीकरितां त्यांच्या आईबापांची निवड फारच कुशलतेनें व काळजीपूर्वक केलेली होती. या जनावरांना राहण्याकरितां लागणारी जागा, खाण्याकरितां लागणारी वैरण, त्यांच्या नोकरीकरितां लागणारीं माणसें व त्या सर्वांवर देखरेख करणारे तज्ज्ञ लोक, या सर्वांचा मिळून खर्च सत्कृद्दर्शनीं फारच फुगलेला दिसला तथापि त्या बाबतींत सूक्ष्म अवलोकन केल्यानंतर एकंदरीनें असलींच जनावरें मनुष्याला अधिक उपयुक्त व सुखावह होतात अशी आमची खातरी झाली.

वरील प्रमाणें शेतकी प्रदर्शन पाहून झाल्यावर आम्ही आपल्या घरीं परत जाण्याकरितां निघालों, इतक्यांत आमचे एक जुने स्नेही या प्रदर्शनांत अंमलदार असलेले आम्हाला भेटले आणि त्यांनीं जवळच असलेल्या आपल्या बंगल्यावर आम्हाला चहा पिण्याकरितां आग्रहानें नेलें.

आमचा विनोदी स्वभाव रा. धोंडोपंतांना पूर्वींपासून माहित होता आणि त्यांना आपल्या घरांतील अव्यवस्थेची जाणीवहि होती तथापि आमच्या टीकेला त्यांनीं अगोदरच उत्तर देऊन टाकिलें कीं, ' आतांशा प्रदर्शनाच्या कामामुळें घरांत पाहण्याला मुळींच फुरसत होत नाहीं. ' यावर आम्ही किंचित स्मित करून म्हणालों, ' मग त्यांत काय वाईट झालें ? आम्हांला हेंहि एक प्रदर्शनच पहावयास मिळेल !

धोंडोपंतांच्या बंगल्याच्या दरवाजाच्या अगदीं पुढेंच दोन मुलें प्रातर्विधि करण्यास बसलेलीं होती. त्यांचे अस्ताव्यस्त केंस, डोळ्यावरील चिपडें, नाकपुड्यांबाहेरील घाण, तोंडांतून गळणारी लाळ व अंगावरील मळकट कपडे इत्यादि स्वरूपावरून हीं मुलें नुकतींच ( सकाळचे १०।११ ) निजून उठलेलीं असावींत असें आम्हीं ताडलें. त्यांचें बसल्या ठिकाणाहून पायांनीं पुढें सरकणें व एकीक

हातांतील लाडू तोंडानें मटामटा खाणें असा एकंदर प्रकार पाहून आम्हाला हसूं कोसळलें व आम्हीं विचारलें, ' हे कोण जयविजय वाटतें ? रांगोळी तरी फारच नामी घातलेली दिसते ! ' यावर घरांत जातां जातां धोंडोपंतांनीं उत्तर दिलें, ' डॉक्टर साहेब, चालूं द्या तुमची टीका. आमच्या प्रमाणें तुम्हालाहि चांगलीं खंडीभर पोरें झालीं असतीं म्हणजे मग तुमची स्वच्छता, टापटीप व सुटसुटीतपणा सर्व कांहीं पाहिलें असतें ! पण देव विसरला, आणि आमच्याच मागें लागला ! '

आम्ही घरांत शिरलों व आमचा विनोद एकदम मावळला. माजघरांत एका अस्ताव्यस्त पडलेल्या जुन्या फाटक्या सुतड्यावर तीन मुलें कण्हत पडलेलीं होतीं; पैकीं पहिल्याचे हात पाय अगदींच वाळून गेलेले असुन त्याचें पोट मात्र फुगलेलें होतें. हें मूल एकसारखें कर्कश आवाजांत ओरडत होतें. दुसऱ्याला जबरदस्त खोकला झालेला असल्यामुळें तें ठसके देत होतें आणि तिसऱ्याच्या सर्वांगावर सुज आलेली होती. भोंवतालच्या दुर्गंधीवरून या मुलांना जुलाबहि होत असावेत असें आम्ही सहज ओळखिलें. या तीन मुलांच्या शेजारींच दुसरीं दोन मुलें उघडीं नागडीं झोंपीं गेलेलीं असून त्यांच्या उठण्याची वेळ अजून झालेली नव्हती. या मुलांच्या बाजूला अर्धवट गोळा केलेली अशी एक मोठी थोरली मळकट गादी होती. ती किंचित बाजूला सारून धोंडोपंतांनीं आम्हांला सुतड्यावर बसावयास सांगितलें. आमच्या आसपास पसरलेल्या मुलांच्या कपड्यावरून आणि त्यांच्या पाट्या, पुस्तकें व खेळणीं यांवरून ही एकच खोली म्हणजे घरांतील सर्व माणसांची बसण्याची, निजण्याची, मुलांची खेळण्याची व पाहुण्यांच्या आदरातिथ्याची जागा होती असें आम्हाला दिसून आलें. बाकी हा बंगला बराच मोठा असून त्यामध्यें अनेक खोल्या होत्या व त्या रिकाम्या होत्या.

प्रथमतः तेथें विवळत पडलेल्या मुलांसंबंधीं हकीकत सांगून नंतर धोंडोपंतांनीं आपल्या दुसऱ्या बायकोला नुकत्या संपलेल्या बाळंतपणापासून क्षयाची भावना कशी झाली इ० वृत्तांत मोठ्या दुःखित अंतःकरणानें वर्णन केला. य

वेळीं त्यांचा मोठा मुलगा कांहीं औषधें घेऊन बाहेरून आला आणि त्यानें आपल्या खिशांमधून लहान मोठ्या अनेक बाटल्या, गोळयांच्या डब्या व पुड्या बाहेर काढून वडिलांपुढें मांडल्या व प्रत्येकाविषयींचा तेथील डाक्तरानें शिकविलेला पाठा म्हणून दाखविला. नंतर तो मुलगा स्वयंपाकघरांतील मुलांचीं भांडणें सोडविण्याकरितां आंत गेला आणि त्यानें आपल्या दोनहि कडेवर दोन मुलांना आणून त्यांना वडिलांच्या मांडीवर बसविलें. यांपैकीं एक रडत होता व दुसरा विनाकारण एकसारखा हंसत होता. रडणाऱ्या मुलाच्या हातापायांवरून वारें गेलेलें असल्यामुळ ते लुले पडले होते व हंसरा मुलगा तर शुद्ध वेडाच होता.

धोंडोपंत नंतर पुढें बोलूं लागले, 'गेल्या चार महिन्यांपासून घरांतील सर्व काम आमच्या या मोठ्या मुलाला व गंगुला करावें लागत आहे. तिच्यानें (बायकोच्यानें) तान्ह्या मुलाला वेळेवर दूध पाजणें सुद्धां होत नाहीं. हीं (मांडीवरल) दोन मुलें तर कधींच बरीं होणार नाहींत यामुळें (हंसणाऱ्या मुलाकडे पाहून) मुलानें हंसावें आणि आपण रडावें अशा प्रकारें दिवस कंठीत आहें. हीं मुलें जन्माला येतांक्षणींच पूर्वींच्या तीन मुलांप्रमाणें मेलीं असतीं तर काय वावगें होतें? अथवा हीं मुलींच जन्माला आलीं नसतीं तर कोठें बिघडलें असतें? परंतु देव तसें करणार नाहीं! आमच्या वडिलांनीं आम्हांकरितां कांहीं एक ठेविलें नव्हतें परंतु मी यांच्या करितां पोटापुरें राखून ठेविलें आहे. असें असून सुद्धां सुखाचा घास मिळत नाहीं अशी स्थिति आहे. त्यांतून गंगीचें लग्न यंदा केलेंच पाहिजे कारण तिला तेरा सरून नुकतेंच चौदावें वर्ष सुरू झालें आहे, पुढें वर्षभर तिला लग्न लाभत नाहीं वगैरे वगैरे.

या वेळीं दिसण्यांत आठ वर्षे वयाच्या गंगूनें लालभडक चहाचे दोन पेले आणून आम्हापुढें ठेविले. आम्ही चहा प्यालों परंतु आमच्या डोक्यांत अनेक विचारांचें काहूर माजलें होतें. आमच्या भाषणाचा उपयोग होणार नाहीं हें ओळखून धोंडोपंतांना जाण्याची सूचना देण्याकरितां आम्ही आपल्या घड्याळाकडे पाहिलें.

यावर धोंडोपंत केविलवाण्या मुद्रेनें पुनः म्हणाले, 'डाक्टर, तुमचा व

आमचा फार दिवसांचा लोभ, तुम्ही कांहीं उपाय सांगाल म्हणून ही कर्मकहाणी तुम्हाला सांगितली, परंतु तुम्ही कांहींच न बोलतां जातां याचा अर्थ काय? या प्रश्नाला उत्तर देणें आम्हांला भागच पडलें व आम्ही म्हणालों:—

धोंडोपंत, मी तुम्हांला विशेष कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं; त्यांतून तुम्ही शेतकी खात्यांत मुरलेले आहांत. जमिनींतून उत्तम पीक पाहिजे असेल तर त्याकरितां अगोदर तिची नांगरणी व खतपाणी आणि नंतर बियांची निवड करावी लागते. याशिवाय पिकाची नासाडी होऊं नये म्हणून खबरदारी घ्यावी लागते, तेव्हां तें पीक आपल्या पदरांत पडतें. असे प्रयोग तुम्ही स्वतः करून दाखवितां व ते लोकांना शिकवितां. त्याचप्रमाणें उत्तम जनावरांची पैदास पाहिजे असेल तर त्याकरितांहि योग्य जमिनीची (मादी) व बीयाची (नर) निवड करावी लागते. यानंतर उत्पन्न झालेल्या जनावराला रोग लागूं नये म्हणून त्याला पोटभर व पौष्टिक अन्न द्यावें लागतें, त्याला मोकळ्या व स्वच्छ जागेंत ठेऊन त्याला सोसेल इतकेंच काम त्याचेकडून घ्यावें लागतें, आणि ही सर्व देखरेख करण्याला योग्य माणसांची जरूरी लागते. इतके परिश्रम करून सुद्धां अशा जनावरांची पैदास फार थोडी होत असते असें तुम्ही सप्रयोग सांगतां व लोकांना शिकवितां परंतु मनुष्याला सुद्धां हेच नियम लागू आहेत असें तुम्हांला कधींच वाटलें नाहीं! मोठें आश्चर्य आहे.

**तुमच्या घरांत आरोग्याला लागणारी सामान्य स्वच्छता सुद्धां मला दिसून येत नाहीं.** हा एवढा मोठा बंगला रिकामा असून तुम्ही सर्व माणसें कोंबडीच्या खुराड्याप्रमाणें एकाच खोलींत राहतां आणि अन्ना-प्रमाणें औषधांचे खुराक खाऊन रोग बरे करूं पाहतां! तुमच्या लग्नाच्या वेळे-पासुन तुमची स्वतःची व विशेषेंकरून तुमच्या बायकोची प्रकृति कितीतरी अशक्त व किरकोळ रोगांनीं भरलेली होती. अशा स्त्रीपुरुषांपासुन बळकट व निरोगी मुलें उत्पन्न होणें शक्य आहे काय? त्यांतून तुम्हांला जीं मुलें प्राप्त झालीं त्यांच्या नांवानें केवळ ब्यांकेंत रुपये ठेवून दिले म्हणजे त्यांच्या पोटांत पौष्टिक अन्न कसें जाईल व थंडी वाऱ्यापासून त्यांचा बचाव कसा होईल! मुलांच्या आरोग्याकरितां पुष्कळ प्रमाणांत पैसे खर्च केले तर ते लवकर संपून जातील

अशी भीती तुम्हाला वाटते; आणि एवढ्याच करितां तुमच्या तीन पोरांनीं तुमच्या हातून योग्य रीतीनें आपलें पालन पोषण होण्याची आशा सोडून व आपण स्वतः अत्यंत रोगट अवस्थेंत दुःखानें जगण्याचा दुरभिमान सोडून मोठ्या उदार अंतःकरणानें आपल्या भावी प्राप्तीचा सर्व वाटा उरलेल्या भावंडांना दिला व स्वर्गाची वाट धरली असें तुम्हांला वाटत नाहीं काय ? खरोखर, हा त्यांचा स्वार्थत्याग आहे.

धोंडोपंत, **आपलीं मुलें म्हणजे परसांतील भाजी नव्हे**; तिच्यांत सुद्धां गवत वाढू नये म्हणून वेळींच आपण तें काढून टाकितों. मुलांना फक्त अन्न व वस्त्र पुरविण्यापुरतीच काळजी पालकांनीं घेतली तर तीं न मरतां जगतील इतकेंच. परतु त्यांच्या स्वभावांत दुर्गुण शिरणार नाहींत व सद्गुणांची जाणीव होईल याबद्दलहि पालकांनीं खबरदारी घेतली पाहिजे. नाहींतर एक मुलगा सद्गुणी निघाला व दुसरा दुर्गुणी झाला म्हणून पालकानें पहिल्याबद्दल जसा अभिमान बाळगूं नये त्याचप्रमाणें दुसऱ्याबद्दल खेदहि करूं नये !

धोंडोपंत, हीं इतकीं मुलें सारा दिवसभर काय करतात व कोणामध्यें वागतात याबद्दलची चौकशी करण्याला तुम्हाला फुरसत तरी आहे काय ? कोणतेंहि मूल एकाच दिवसांत दुर्गुणी बनत नसतें; त्याच्या दुर्गुणाची पूर्ण वाढ होण्याला व ते पुढें फळाला येण्याला कित्येक वर्षांचा अवधी लागत असतो. तोंपर्यंत त्याचे पालक मुलाच्या दुर्गुणांविषयीं अज्ञानी, झोंपलेले अथवा बेफिकीर राहणार आणि पोरानें आपले गुण उधळल्यावर त्याचें, आपलें, किंबहुना उभयपक्षीं डोकीं फोडून घेणार ! कां, गम्मत आहे कीं नाहीं. ?

धोंडोपंत, ! **आपल्या मुलांना निरोगी कसें ठेवावें** व शहाणे कसें करावें हें जर तुम्हाला समजत नसेल अथवा परवडत नसेल तर रोगट अथवा दुर्गुणी संततीमुळें उद्भवणाऱ्या संकटांपासून आपला बचाव तरी करून घ्या.

**मी तुम्हाला आपला स्वतःचा अनुभव सांगतों.** मला घरोघर जीं मुलें पहावयास सांपडतात त्यांमध्यें निरोगी व सद्गुणी फारच थोडीं असून दुर्गुणांचा भरणा रेलचेल आहे. याकरितां प्रत्येक घरांतुन संतति कमी करण्याचा अंमल सुरू झाल्यास रोगट व दुर्गुणी पोरांची अप्रयोजक वाढ एकदम बंद पडेल

आणि जीं थोडीं बहुत निरोगी व बळकट मुलें शिल्लक राहतील त्यांत त्यांच्या शरीरस्वास्थ्यामुळें व त्यांच्याकडे पालकांना विशेष लक्ष पुरविण्याला अवधि मिळाल्यामुळें तीं पुढें सद्गुणीच निपजतील, ही गोष्ट पटते पण उमगत नाहीं!

संततिनियंत्रणासंबंधीं जे उपाय मी तुम्हांला सांगणार आहें. त्यांमुळें तुमच्या **वंशाची वृद्धि खुंटेल** अशी भीती वाटत असल्यास, रोगट व दुर्गुणी संततिपासून वंशवृद्धि होईल अथवा ती व्हावी असें आम्हांला तरी वाटत नाहीं. तुम्ही आपलें मत सांगा पाहूं? इतकेंच नव्हे तर आडमापी वाढणाऱ्या संततीला **सरसकट आळा घातला तर** तान्ह्या मुलांची मृत्युसंख्या फारच कमी होऊन उरलेल्या निरोगी मुलांचें आयुष्य किती तरी अधिक वाढेल. याशिवाय अशा उपायांनीं एकंदर देशाची लोकसंख्या बिलकुल कमी न होतां ती एकसारखी वाढतच जाते हें तुम्हाला माहीत आहे काय?

धोंडोपंत, **संततिनियंत्रणाचा उपाय म्हणजे** तुम्ही **नेहमींच ब्रह्मचर्य** पाळावें असें मी तरी सांगणार नाहीं. याचें कारण ही गोष्ट तुमच्या हातून होणार नाहीं. त्यांतून तुम्ही पराकाष्ठेचा प्रयत्न करून सिद्धि मिळविली असें ही एकवेळ घेऊन चाललें तरी तेवढ्याकरितां तुम्हांला कष्ट किती होतील याची कल्पना आहे काय?

'**पोरें नकोत तर ब्रह्मचर्य पाळा**' असें सांगणें जितकें सोपें आहे, तितकेंच तें कृतीनें उतरविणें अवघड आहे. एवढी प्रचंड शक्ति कांहीं लोकांत दिसून येते परंतु असलीं माणसें फारच थोडीं. त्यांचें खासगी चरित्र थोडें बारकाईनें पहावें म्हणजे आपणांला कोणी शुद्ध खोटें बोलणारींच सांपडतील, तर कोणी षंढ असतील, कोणी दुबळे असतील तर कोणी म्हातारे असतील (त्यांचें पूर्व चरित्र अवश्य पहावें). आमच्या मतें दहा पांच लाख माणसांत एखादा भगवान मुनिवर्य पतंजली योगी सांपडेल! परंतु त्याची योग्यता आपणांला नाहीं. आपण सर्व साधारण मनुष्यें आहोंत, मुनीचा मार्ग आपणांला आक्रमितां येणार नाहीं.

**पोरें होऊं नयेत ह्मणून** तुम्ही आपलें घर सोडून खुशाल बाहेरख्याली करीत फिरत रहा असें हि मी सांगत नाहीं, कारण तें अनेक दृष्ट्या चुकीचें आहे.

**मी सांगणार ते उपाय विशेष खटपटीचे अथवा खर्चाचेहि नाहींत**; त्यांतून अशीं रोगट संतति जगविण्याची निरर्थक खटपट व त्याक-

रितां लागणारा खर्च तुम्हांला परवडतो परंतु त्यांच्या प्रतिबंधाकरितां लागणारी खटपट व पैका तुम्हांला महाग वाटतो ! कदाचित् या दोनहि पक्षांना सांभाळण्याकरितां लागणारा खटाटोप व खर्च सारखाच येतो असेंहि घेऊन चाललें तरी दुःखद संततीच्या सांन्निध्यामुळें दुःखच प्राप्त होणारें आहे, त्याचे ऐवजीं तिच्या अभावीं दुःखाचा अभाव तरी हातीं येईल; आणि हें सुख नव्हे काय ?

खऱ्या संततिसुखाची कल्पना आपणांला याहूनहि वरच्या दर्जाला नेतां येते, आणि ती म्हणजे, सुंदर, सशक्त, सद्गुणी व आनंदी असच मूल असलें पाहिजे. परंतु हीं मुलें पावसासारखीं आभाळांतून खालीं अथवा वनस्पतीसारखीं जमिनींतून वरतीं येत नाहींत. अशा मुलांच्या उत्पत्तीकरितां आईच्या निवडक जमिनीची नांगरणी करावी लागते नंतर त्यांत पित्याचें निवडक बीं पेरून त्याची नासधूस होणार नाहीं याकरितां त्या दोघां आईबापांनीं त्याचा सांभाळ करावा लागतो. त्याच वेळीं त्यांस इतर दुष्ट व दुराचारी माणसांचीं संगती लागणार नाहीं याबद्दलहि विशेष खबरदारी घ्यावी लागते; इतकें करूनहि अशीं मुलें फारच थोडीं निपजतात, म्हणजे एका हाताच्या पांच बोटांवर तर राहोच परंतु एकच जरी प्राप्त झालें तरी त्याची योग्यता आपणांला घरोघर दिसून येणाऱ्या कुत्र्या मांजरांच्या पोरांपेक्षां किती पटीनें अधिक होईल याबद्दलचें गणित तुमच्या फुरसतीनें परंतु बिनचुक सोडवून त्याचें उत्तर आम्हांला अवश्य सांगा. कारण तें सोडविण्याला आम्हांला सवड नाहीं व तुमच्या सारख्या खोगिरभरती भरताडी प्रजोत्पाकांनीं हें गूढ सोडविणें यांतच विशेष रहस्य आहे.

आमचें हें पौराणिक पाल्हाळ, गद्यकीर्तन, संगीत व्याख्यान अथवा आधुनिक लेक्चर चालू असतांना धोंडोपंतांचे डोळ्यांतून एकसारखे अश्रु येतच होते. परंतु त्यांची एकंदर चर्या कावरीबावरी होऊन गेलेली आमच्या ध्यानांत आली. तरीपण आम्ही पुढें जसें बोलूं लागलों तेव्हां त्यांच्या चेहेऱ्यावर अगोदर विस्मय नंतर भीती मागाहून लज्जा व शेवटीं खात्री पटलेली दिसून आली.

आम्ही पुढे म्हणालों, ' हें पहा, धोंडोपंत, परवांच एक **दीड शहाणे गृहस्थ** आम्हांला भेटले. त्यांचें नांव गजाननपंत. देव्हाऱ्यांतील गणपती अथवा नाटकांतील सोंग ही दोन्हीं पाहण्याला सुंदर दिसतात. परंतु बोंथट नाकाचा माणूस, त्याचे सुपाचे कान, जाड व लांब ओंठ, शिवाय मोठें पोट हीं

दिसण्याला जितकी विद्रूप. तितकींच त्याच्या मेंदूतील अकलहि दर्शवितात. त्यानें आम्हांला ठासून सांगितलें ' स्त्रियांचा जन्म पोरांकरितां आहे व तो त्यांनीं बजावलाच पाहिजे. जर त्यांत हयगय होईल तर आम्ही त्यांना भाग पाडूं. हें त्यांचें भाषण ऐकून आम्हीं आपला पहिला तडाखा त्यांच्या मस्तकावर केला व त्यामुळें त्यांच्या एका डोक्याचीं दोन डोकीं झालीं परतु आंत तिळमात्रसुद्धां मेंदुच राहिला नव्हता. आम्ही त्यांना म्हणालों, ' स्त्रियांच्या जन्माची व्याख्या तुम्हाला करितां येते परंतु पुरुषांच्या जन्माची येत नाहीं असें दिसतें. ती मी तरी सांगतों, सकाळ संध्याकाळ अन्न खाऊन सारखा × × विधी करीत सुटणें एवढेंच पुरुषांचें कार्य आहे. आम्हांस वाटतें या सोनखताच्या गिरण्यांनी गांवांत घाण होऊं देण्याऐवजीं त्यांची स्थापना गांवा बाहेर शेतांतच केलेली बरी. ' यानंतरचा दुसरा तडाखा आम्ही गजाननाच्या दोंदील पोटावर केला व आम्ही म्हणालों ' हें पहा, गणोबा, तुमच्या या पोटावर तेवढाच मोठा एक धोंडा बांधून नऊ महिने पर्यंत या सर्व गावांतून तुमची धिंड काढतों आणि नंतर त्या गोळ्याचें विसर्जन करितांना तुमच्या पोटांत पटकीच्या कळा उत्पन्न करून प्रसूतीनंतर थोडी विश्रांती मिळते न मिळते इतक्यांतच भेसूर तंबुरी तुमच्या गळ्यांत अडकवून तुम्हांला चातुर्मास्य सप्ताह करावयाला लावतों. नंतर पुन्हां पहिल्या धोंड्यापासून सुरुवात करूं अशा रीतीनें बारा वर्षे पर्यंतची तपश्चर्या वाढत्या प्रमाणांत फळाला आली म्हणजे तिचा उपभोग घेण्याला नरकामध्यें ऐस पैस जागा आहे. हा तोडगा बारा वेळ नाहीं तरी एक वेळ करून पाहण्या सारखा आहे. मनुष्याचा खून झाला म्हणजे आरोपीला फांशी होते आणि प्रयत्न करून तो सिद्धीला गेला नाहीं तर काळें पाणी खास प्यावें लागतें. परंतु असल्या नष्ट नवऱ्यांशीं गांठ पडली म्हणजे नवरदेव न्यायाधीश व बायको आरोपी असा प्रकार होऊन तिला बिचारीला धड फांशी नाहीं अथवा काळेंपाणीहि नाहीं. परंतु मरेपर्यंत गळ्याचा फांस सुटत नाहीं. त्यामुळें धड जीव जात नाहीं व रहात नाहीं. हा प्रकार डोळे उघडून पाहाणारा, डोळे झांकून न्याय देणारा व त्याची स्वतःच अंमल बजावणी करणारा जिव्हाळ्याचा नवर देव !

वरील फटक्यानें पुरुषवर्गाचें समाधान होईल परंतु आम्ही आपल्या स्त्रीवर्गालाहि सहानुभूति दर्शविली पाहिजे.

रा. गजाननरावांची धर्मपत्नी श्री. सरस्वतीबाई या होत्या. उभयतांच्य

जोडांत विजोड मुळींच नव्हता परंतु तो विरोधरुपानें होता इतकेंच. श्री. सरस्वतीबाई सारखी समाधानी, कामसू, प्रेमळ व धार्मिक पत्नी म्हणजे खरोखरच लाखांत एक होती. परंतु ब्रह्मदेवानें तिच्या जन्माची शोभा व्हावी म्हणूनच तिला या लाखेंत डांबून टाकिलें. श्री. सरस्वतीबाईंना अगदीं लहानपणापासून देवादिकांचीं गाणीं फारच आवडत असत व विवाहानंतर त्यांच्या जिवाला दुःखानें स्पर्श केला नाहीं, याचें खरें कारण म्हणजे सासर व नवरा हे मुळींच नसून त्यांची ईश्वरावरील श्रद्धा हीच होय. पुस्तकें, इष्ट मैत्रिणी, देव आणि देवळें हेंच कायतें सुख, भोंवतीं पसरलेल्या पोराबाळांत राहून देवाचीं गाणीं गुणगुणत बारा वर्षांनीं या साध्वीनें आपली इहलोकची यात्रा संपविली.

**आज कालचा सामान्य स्त्रीवर्ग** या स्वरूपाचा नाहीं. सद्गुणी नवऱ्याला सुद्धां माथीं दुर्गुणाचें खापर फोडून, उठतां बसतां लाथाडून व वेळीं अवेळीं चार चौघांत त्याची वरात काढणाऱ्या कांहीं स्त्रिया दृष्टीस पडतात. उरलेल्यांपैकीं बऱ्याच जणींना नवऱ्याचें जन्माचें लोढणें आवडत नाहीं. तथापि कांहीं थोडया स्त्रियांनीं आपलें मन घट्ट करून यावरहि ताण करून हिंदू मुसलमान, खिस्ती, फारशी, धेड कोणी कां असेना, लाज लज्जा सर्व कांहीं सोडून व डोळे मिटून पुरुष असला म्हणजे त्याला नवरा करून मिठी मारली, हा कळस नव्हे काय ? रहस्यभेदाला डोळे मिटावे लागतात, कारण उघडया डोळ्यांनीं तो दिसत नाहीं ! त्यांत सुद्धां बायकांचे डोळे मिटतात व पुरुषांचे उघडे असतात.

वरील रसाळ गुऱ्हाळ थोडेसें लांबलें खरें. तथापि आजकालच्या विवाहपद्धतीविषयीं केव्हां तरी बोलतांना आम्ही याचे उलटहि प्रतिपादन करूं; करितां येथेंच सोडवणूक करून घेतलेली बरी.

हें पहा, धोंडोपंत, मी तुम्हांला जे उपाय सांगणार आहें तें अगदीं सोपे असून तुम्हांला आपल्या स्वतःच्या घरांतल्या घरांत करितां येण्यासारखे आहेत. असे चपापू नका. तुमच्या मनांतील भीती मला समजली आहे. हे उपाय सर्वत्र समजले तर **तरुण कुमारिका व विधवा बेताल होतील** हीच तुमची शंका आहे ना ? त्याचें उत्तर असें कीं, कुमारिकांना लहानपणीं बेताल होतां येत नाहीं व प्रौढ विधवांना त्याची जरूरी रहात नाहीं. सर्व विवाहित स्त्रिया व एकंदर पुरुष वर्ग यांना बेताल होतांच येत नाहीं. बेताल स्त्रियांचा ताल धरणारे कांहीं

पुरुष आमच्या ऐकण्यांत आहेत परंतु पाहण्यांत एकहि नाहीं ! असें आहे तर एक वेळ बेताल झाल्यानंतर पुन्हां तालावर येण्याकरितां अफूचा गोळा खाऊन विहिरीच्या तळीं दडून राहणाऱ्या स्त्रियांना थोड्या बेतालपणेंच कां होईना परंतु समाजांत उजळ माथ्यानें फिरूं तरी द्या. नाहीं तर त्यांच्या ओटींत नवऱ्याचा नारळ घालून त्यांचा कायमचा बंदोबस्तच करून टाका म्हणजे झालें !

आतां, मी सांगणार ते उपाय थोडेसे **धर्माला सोडून**, कांहींसे **नीतीच्या विरुद्ध** व **नैसर्गिक सुखाच्या उलट** असे आहेत हें खरें. तथापि आपले रोजचे एकंदर व्यवहार पाहूं गेलें असतां यःकश्चित सोयीकरितां आपण धर्माला तोडून, नीतीला मोडून व अनेक प्रकारच्या युक्त्या प्रयुक्त्यांनीं दुसऱ्याला टोपी घालून स्वार्थ साधतों. तें सर्व आपणाला चालतें परंतु याच वेळीं धर्मानें इतकी उचल कां खावी, नीतीनें बळवान व्हावें व निसर्गाला भरती यावी हें आम्हांला समजावून सांगा. शिवाय या कृत्रिम उपायांनीं नैसर्गिक हालअपेष्टांचे सोहाळे वांचतील हें ही लक्षांत घेतलें पाहिजे. धोंडोपंतः—परंतु हे उपाय कोणते याबद्दल तुम्ही कांहींच बोलत नाहीं. डॉक्टरः—याबद्दल 'राइट् एजन्सी, २० भटवाडी रस्ता,' गिरगांव, मुंबई, या पत्त्यावर पत्रव्यवहार करा.

आतां एकच व अगदीं कानांतील तेवढी गोष्ट सांगूं म्हणजे हा विषय संपला. हे उपाय अंमलांत आणतांना तुम्हाला **लाज** वाटूं लागली तर उघड्यावर, चार चौघांत त्यांचा अवलंब न करितां आपल्या घराच्या खोलींत एकांतांत असतांना वेळ साधून घ्या म्हणजे झालें."

वरील प्रमाणें वर्तमानकाळांत अज्ञेय रागांत, साडेतीन सप्तकांतील व चलाचल, तीव्र कोमल ह्यासुद्धां सर्व पट्टींतील गद्यगायनांत रंगून गेल्यामुळें त्यांतील फारसा अर्थ न समजतांहि ( कारण त्यांत तो नव्हता व थोडासा समजला हेंच आमचें भाग्य ! ) कांहीं वेळ धोंडोपंतांचें मनरंजन झालें यांतच आम्हांला धन्यता वाटते.

जातां जातां किंचित स्मित करून व गंगूकडे पाहून आम्ही तिला म्हणालों, 'मग काय गंगू, पुढच्या महिन्यांत लाडू जिलबी झोडायला आम्हांला बोलावणार ना ? उंचीनें ठेंगणा, तोंडानें कुरूप, नाकानें नकटा व अकलेनें पूज्य असा नवरा दहा रुपयांपेक्षां कांहीं अधिक महाग पडत नाहीं. शिवाय पुढच्या वर्षी

प्रदर्शनाला येऊं तेव्हां नुसत्या चहानेंच न भागवितां मुलाच्या बार्शाच्या घुगऱ्याहि चावून जाऊं, बरं का ! '

यावर धोंडोपंत कांहीं बोललेच नाहींत तथापि त्यांच्या किंचित हास्यावरून त्यांच्या मनांत कांहीं तरी घोळत असावें असें दिसलें. विचारी गंगू मात्र लाजली व स्वयंपाक घरांत गेली.

---

# वांझपणाचें एक कारण.

समागमाचेवेळीं योनिमार्गांत रेतस्राव होऊन त्यांतील असंख्य रेतजंतु प्रथम गर्भाशयांत जातात, व तेथें स्त्रीच्या रजोगोलाची गांठ न पडल्यास गर्भाशयापासून अंडाशयाकडे जाणाऱ्या दोन नळयांत शिरतात. इकडे रजोगोल अंडाशयांतून निघून याच नळयांचे मार्गानें गर्भाशयाकडे येत असतो. त्यास ज्या ठिकाणीं एखादा रेतजंतु भेटेल तेथें त्याचा एकजीव होतो, व याचेंच नांव गर्भधारणा. हें मीलन नळींत झाल्यास हा गर्भ तेथून गर्भाशयांत उतरून तेथें त्याची वाढ होते. अर्थातच हा सर्व प्रकार होण्यास रजोगोलास नळींतून जाण्यास मार्ग मोकळा पाहिजे. कधीं कधीं हा मार्ग परम्यामुळें किंवा इतर कांहीं विकारामुळें अजीबात बंद होतो व कधीं आकुंचित झाल्यामुळें पुरेशी वाट मिळत नाहीं, व अशा स्थितींत गर्भधारणा होऊं शकत नाहीं. कधीं कधीं गर्भाशयाचे द्वारें या नळयांत यंत्रानें हवा फुंकून हा मार्ग मोकळा करतां येतो, व कधीं कधीं याकरतां शस्त्रक्रिया करावी लागते, परंतु त्याचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. हवेचा प्रयोग केल्यावर गर्भधारणा झाल्याचीं चार उदाहरणें या डॉक्टरानें दिलीं आहेत.

---


# जेलोटयूब

यानें **गुप्त रोग बरे होत नाहींत**, हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून, काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोडयुशो यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळां वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २

**राइट एजन्सी, २० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.**

# ग्रंथपरीक्षण

## बाहेरख्यालीचे दुष्परिणाम.

लेखक–डॉ. के. भा. लेले, एम्. सी. पी. एस्, किंमत ४ आणे.

सामान्य वाचकांस गर्मी, परमा वगैरे रोगांसंबंधीं माहिती मुळींच नसते म्हटलें तरी चालेल. परमा थोडा जास्त जहाल झाला म्हणजे गर्मी होते, अशा प्रकारचीं विधानें लोक ठोकून देत असतात, व हें अज्ञान दूर करण्याकरितां हें ३२ पानांचें पुस्तक डॉ. लेले यांनीं लिहिलेलें आहे. या दृष्टीनें दिलेली माहिती अत्यंत उपयोगी आहे, व रोग झाल्यास स्वतः डॉक्टर बनून जहिराती देणाऱ्या वैद्यांकडे जाण्यापेक्षां पदवीधर डॉक्टरांवरच विश्वास ठेवणें बरें, हा त्यांचा उपदेश घेण्यासारखा आहे. ते स्वतः डॉक्टर असल्यामुळे असें म्हणतात असें कोणास वाटेल, परंतु आम्ही डॉक्टर नसतांही तसेंच म्हणतों. सर्व डॉक्टरांस या रोगांसंबंधीं पुरेसें ज्ञान असतें असें नाहीं, व सर्वच डॉक्टर प्रामाणिक असतात असेंही नाहीं, तथापि एकंदरींत वैद्यांपेक्षां डॉक्टरांकडे जाण्यांत धोका कमी, हें खरें.

या रोगांस लेखकानें बाहेरख्यालीचे रोग हें नांव दिलें आहे, तें आम्हांस कबूल नाहीं, कारण बाहेरख्याली न करणाऱ्या लोकांसही हे होतात हें निर्विवाद आहे. येथील गुप्तरोगनिवारणसंघानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं त्यांचेकडे उपचाराकरतां येणाऱ्या स्त्रियांपैकीं निम्मेहून अधिकांस हे रोग नवऱ्यांपासून लागलेले असतात. क्वचित् प्रसंगीं नवऱ्यांसही हे रोग बायकांकडून लागतात. इंग्रजींत या रोगांस रतिसंबंधीं रोग म्हणतात. हें नांव अधिक बरोबर आहे कारण शेंकडा ९० रोग्यांस संभोगाचे वेळीं संसर्ग झालेला असतो. परंतु इतर प्रकारांनींही संसर्ग होऊं शकतो, म्हणून तेंही नांव बरोबर नाहीं. गुप्त रोग हें नांव आम्हांस अधिक पसंत आहे.

या पुस्तकांतील विचारसरणी आम्हांस जरा चमत्कारिक वाटते. तिसऱ्या पानावर लेखक म्हणतातः— ' बाहेरख्यालीच्या बाबतींत स्त्रियांपेक्षां पुरुषांकडेच अधिक दोष येतो; कारण पुरुषांच्या गिऱ्हाइकीकरतां स्त्रियांनीं दुकानें मांडलेलीं आहेत तशीं स्त्रियांकरतां तीं पुरुषांना काढावीं लागलीं नाहींत यांतच पुरुषांचा विषयलंपट हलकेपणा व्यक्त होतो. ' पुरुषांनीं कानें काढलीं नाहींत याचें मुख्य कारण शारीरिक आहे. स्त्रिया एका रात्रींत

पंचवीस किंवा अधिक पुरुषांशीं समागम करूं शकतात, परंतु असा प्रकार पुरुषांस अशक्य आहे, हा त्यांचा दोष नाहीं. शिवाय पुरुष ज्याप्रमाणें अंगवस्त्रें ठेवतात, तसे स्त्रियांनीं ठेवलेले पुरुषही आमच्या पाहण्यांत आहेत. स्त्रियांस वासनाच कमी असते असें लेखकाचें म्हणणें असेल तर हाही पुरुषांचा दोष म्हणतां येणार नाहीं, व स्त्रिया जास्त मनोनिग्रही असतात असें म्हणणें असेल, तर तो मनोनिग्रह नैसर्गिक नसून त्यांस स्वातंत्र्य नसल्यामुळें तो त्यांच्यावर लादलेला आहे, तेव्हां नीतिदृष्ट्या तो कवडीमोल आहे.

पान २०:—बाहेरख्याली करणारांस आत्मघातक्यांची उपमा दिली आहे व आत्मघातक्यांप्रमाणेंच हे रोग झालेल्यांस तुरुंगांत टाकलें पाहिजे असें लेखकाचें म्हणणें आहे. आमचे मतें आत्मघातक्यांस शिक्षा करणें हीही चूकच आहे व बाहेरख्याली कारणारांस तुरुंगांत टाकण्याचे परिणाम अत्यंत भयंकर होतील. आधींच हे रोग लपवून ठेवण्याची लोकांची प्रवृत्ति असते व रोगांचा प्रसार होण्याचें हें एक मुख्य कारण आहे. तुरुंगाऐवजीं इस्पितळांत ठेवून त्यांची काळजी घेतली पाहिजे, तरच उपयोग होईल

पान २१:—वेश्यांची सक्तीनें तपासणी केल्यास हे रोग जास्तच फैलावतील असें लेखकास वाटतें, परंतु रोगी वेश्यांस त्या बऱ्या होईपर्यंत इस्पितळांत ठेवल्यास असें होण्याचें कारण नाहीं, व जेथें अशी तपासणी आहे तेथील अनुभवही असा नाहीं. मात्र इस्पितळांत त्यांस कैद्यांसारखें न वागवतां रोग्यांसारखें वागवलें पाहिजे.

पान २५:—विधवा ( म्हणजे बिनवारशी माल—सं. ) चटकन ओळखतां येऊं नये म्हणून त्यांनींही कुंकूं लावावें अशी लेखकाची सूचना आहे. रंग लावून अंग सुशोभित करण्याची चाल रानटी अवस्थेंतील अवशेष आहे व नवऱ्याच्या अस्तित्वाचा व कुंकवाचा पारंपरिक कल्पनेंतही कांहीं संबंध आहे असें दिसत नाहीं, कारण कुमारिकाही कुंकूं लावतात. पोषाखाच्या बाबतींत व अलंकारांचे बाबतींतही आपलें शरीर पाहिजे त्या रीतीनें सुशोभित करण्यास प्रत्येकास मुभा असली पाहिजे व त्यांत कोणत्याही प्रकारची सक्ती असतां कामा नये. विधवा ओळखूं येऊं नये अशी इच्छा असल्यास कुंकूं सर्वांनींच सोडून देणें हाही एक उपाय आहे.

पान २६:—लेखकाचें मतें शृंगाररसप्रधान नाटकें व सिनेमा, व चहा, चिवडा, चिरूट व दारू यांचीं दुकानें बाहेरख्यालीला पोषक आहेत. यांपैकीं चिरूट व दारूशिवाय इतर गोष्टी आमचे मतें उपयोगी आहेत, व बाहेरख्यालीला पोषक अशा सर्व गोष्टी बंद करणें शक्य नाहीं व इष्टही नाहीं.

'खिस्ती धर्मांत एकपत्नीव्रताचा अनुवाद केलेला दिसतो,' असा लेखकाचा गैरसमज आहे. बायबलांत त्याचें नांवही नाहीं.

पान २८-२९:—'योग्य कारणाशिवाय कोणत्याही तरुण व सुंदर स्त्रीशीं संभाषण करणें अगर तिच्याकडे नुसतें पाहणें ही बाहेरख्यालीची पहिली पायरी होय......ज्याला आत्मोन्नति करून घ्यावयाची असेल त्यानें पहिल्या पायरीवर पाऊल पडतांच आपल्या मनाला बेडी ठोकली पाहिजे.' याप्रमाणें कृति करावयाची म्हटल्यास शक्यच नाहीं म्हटलें तरी चालेल. अशा मनुष्यानें समाजांत न राहतां अरण्यांत राहिलें पाहिजे.

पुस्तकाच्या शेवटीं लेखकानें 'ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः' हा पतञ्जलीचा उतारा देऊन त्याचें समर्थन केलें आहे. वीर्य शरीरांत राहिलें असतां तें रक्ताशीं मिसळून त्यामुळें शक्ति वाढते या प्राचीन कल्पनेला कोणताही शास्त्रीय आधार नाहीं. वीर्य एकदां बनलें म्हणजे तें बाहेर पडलेंच पाहिजे, न पडल्यास तें सांचल्यामुळें प्रकृति बिघडते, हें लक्षांत ठेवलें म्हणजे ब्रह्मचर्याचें माहात्म्य एकदम बरेंच कमी होतें, इतकेंच नव्हे तर प्रकृति सुदृढ राहण्याला ज्याप्रमाणें मिताहार तसाच मितसंभोगही अवश्य आहे असें सिद्ध होतें. अर्थात मित कशास म्हणावयाचें हें व्यक्तीच्या प्रकृतीवर व वयोमानावर अवलंबून राहील.

पान ३०:—येथें बाहेरख्यालीसंबंधीं सामान्य सिद्धांत दिले आहेत, त्यापैकीं दोन आम्हांस विशेष महत्वाचे वाटतात, ते असे:—

६. बाहेरख्यालीविषयीं प्रत्येक मनुष्यानें असें लक्षांत ठेवावें कीं, आपल्याला पैशानें वश होणारे स्त्रीपुरुष आपणापूर्वीच दुसऱ्या कोणीं विकत घेतलेले असतील; तर मग त्यांच्या शारीरिक आरोग्याबद्दल खात्री नाहीं.

७. बाहेरख्यालीविषयीं प्रत्येकानें हेंही लक्षांत ठेवावें कीं आपल्या तारुण्याला व सौंदर्याला भाळणारे स्त्रीपुरुष या पूर्वीसुद्धां हल्लींप्रमाणेंच दुसऱ्यावर फिदा झालेले असतील; तर मग त्यांच्या शारीरिक आरोग्याबद्दल मुळींच खातरी नाहीं.

ह्या दोन्ही गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत; परंतु यांपैकीं विशेषतः दुसरी गोष्ट पार विसरून जाण्याइतका अहंकार पुष्कळांत असतो.

पान २९—गुप्त रोगांचा प्रतिबंध करतां येतो, म्हणजे स्त्रीपुरुषांपैकीं एकास रोग असतांही तो समागमाचे वेळीं दुसऱ्यास लागूं नये अशी तजवीज रासायनिक रीत्या करतां येते ही गोष्ट लेखकानें नुसती सुचवून ज्यांस अधिक माहिती पाहिजे असेल, त्यांनीं १ रुपया पाठवून 'विषयांधाच्या कानांत' हें स्वतंत्र पत्रक मागवावें असें लिहिलें आहे.

या बाबतींत आमचा तीव्र मतभेद आहे. लेखकाचे मतें 'अशाप्रकारच्या प्रतिबंधक उपायाचें ज्ञान झाल्यानंतर सर्वसाधारण मनुष्याची प्रवृत्ति विषाची परीक्षा पाहण्याकडे साहजिकच होणार' हें कांहीं अंशीं खरें आहे, परंतु रोगांचे भीतीनें जो मनुष्य नीतीनें राहतो त्याची नीति फार दिवस टिकत नाहीं. शिवाय नैसर्गिक मार्गाचे अभावीं स्वसंभोगादि वाईट संवयी लागतात, त्यांस आम्ही नीति म्हणत नाहीं, त्यापेक्षां नैसर्गिक मार्गच बरा. पत्रकाची किंमत १ रुपया ठेविली तर अत्यंत गरीब लोकांस ही माहिती मिळणार नाहीं. पांचशें रुपये ठेविली तर त्याहूनही कमी लोकांस मिळेल, परंतु यांत फायदा कोणता? ज्यांस एक रुपया खर्च करतां येत नसेल अशा दोन चार लोकांनीं वर्गणी केल्यास तें पत्रक घेतां येईल!

प्रतिबंधाचे मार्ग सर्वांस माहित झाले पाहिजेत असें आमचें मत आहे. विवाहव्यतिरिक्त संभोग म्हणजे अनीति आहे असें धरून चाललें तरी रोगांच्या प्रसारापेक्षां अनीतीचा प्रसार आम्हांस पतकरतो. याकरतां उपायांची सविस्तर माहिती आमच्या 'गुप्त रोगांपासून बचाव' या १२ आण्यांचे पुस्तकांत दिली आहे, व इतकाही खर्च ज्यांस करावयाचा नसेल त्यांस ही माहिती आम्ही फुकट देतों.

\+ \+ \+ \+

ऑगस्ट १३ तारखेस मुंबई बुडणार हें ज्योतिष्यांचें भाकीत नेहमीं प्रमाणें खोटें ठरलें. ज्योतिष्यांवर विश्वास ठेवणाऱ्या वेडगळ लोकांनीं त्या भीतीनें विमे उतरल्यामुळें विमा कंपन्यांची मात्र चैन झाली. विमा कंपन्यांनीं कांहीं ज्योतिषी नोकरीस ठेवल्यास बराच फायदा होण्याचा संभव आहे!

# ताजी व शिळी बातमी.

अमदाबाद येथील मेडीकल् स्कूल मधील नगीनलाल त्रिवेदिया नांवाचा एक गुजराथी ब्राह्मण विद्यार्थी व तेमीना नांवाचा एक पारशी नर्स यांचें बडोदा येथें नुकतेंच लग्न झालें, असें 'टाइम्स ऑफ इंडिया' वरून समजतें. बडोद्याचा जलप्रलय या धर्मबाह्य लग्नाचा तर परिणाम नसेल ना! लग्नाचे आधींपासून त्यांचें प्रेम होतें व एक मुलही झालें होतें. ही बाई हिंदु होऊन तिनें सरलादेवी हें नांव धारण केलें व लग्न हिंदु पद्धतीनें झालें. नगीनलालची एक आधींची बायको होतीच, ती रागावून बापाकडे रहावयास गेली. ज्ञातीचे पंच जमून विचार करणार होते.

\+ \+ \+ \+

अमुक मुलाचा बाप कोण? असा प्रश्न एखादे वेळीं उपस्थित होतो व त्याचें खात्रीलायक उत्तर आईस सुद्धां देतां येईल असा नियम नसतो, व देतां आलें तरीहो अशा वेळीं ती खोटें बोलण्याचा बराच संभव असतो. हा प्रश्न सोडविण्याचो शास्त्रीय पद्धत जरी अजून निघाली नाहीं, तरी अमुक मनुष्य बाप आहे कीं नाहीं हें त्याचें व मुलाचें रक्त तपासुन हल्लीं सांगतां येतें.

\+ \+ \+ \+

लंडन येथील हाईड् पार्क नांवाच्या सार्वजनिक बागेंत दोन प्रहरी उघडें निजल्याबद्दल व्हिन्सेंट् नांवाच्या एका शाळा मास्तरावर नुकताच खटला झाला. [या बागेंत अंधार पडल्यावर हवे ते प्रकार चालतात व पोलीस तिकडे काना-डोळा करतात अशी प्रसिद्धी आहे.] त्याच्या अंगावर फक्त एक गुडघ्यापर्यंत विजार होती. अशा तऱ्हेनें उघडें शरीर लोकांस दाखवणें गैरशिस्त आहे व यानें लोकांच्या मनाला धक्का बसण्याचा संभव आहे असें मॅजिस्ट्रेटचे मत पडलें. यावर आरोपी म्हणाला:— 'परवां येथें दोन पहिलवानांची कुस्ती झाली, त्यांचाही पोषाख असाच होता व तेथें ३०००० लोक हजर होते, तें कसें चाललें? मी हा खटला शेवटपर्यंत नेईन, मला फांशीं जावें लागलें तरी हरकत नाहीं.' त्याला वेड लागलें आहे की काय, हे पाहण्याकरितां डॉक्टराकडे पाठवला.

× × × ×

जुलैचे ६ तारखेस देवीदास माधवराव नांवाचा मद्रासी कारकून संध्याकाळीं गुत्त्यांत दोन ग्लास झोंकून बाहेर पडतो तों त्यास अहमद सुलेमान नांवाच्या एक मुसलमानानें गांठून एक सुंदर छोकरी पाहिजे असल्यास आणून देतों असें सांगितलें व त्याकरतां आगाऊ दहा रुपये मागितले. मद्राशानें ते दिले व बॅलार्ड पिअर जवळील एका अपुऱ्या इमारतींत वाट पहात बसला. बराच वेळ झाला तरी त्याचा पत्ता नाहीं असें पाहून तो कंटाळून तेथून जाऊं लागला असतां जिन्यांत त्याला दुसरा एक मनुष्य भेटून आणखी थोडी वाट पाहण्यास आग्रह करूं लागला. तेव्हां त्याला भीति वाटून तो ओरडला. तरी कोणीही त्याच्या मदतीस गेलें नाहीं व त्या मनुष्यानें त्याचा कोट हिसकावून घेतला व त्यास धरून ठेवलें त्याच्या कोटाचे खिशांत रु. ६० होते. शेवटीं तो कसा तरी निसटून पोलीसचौकीवर गेला व तक्रार केली.

हा खटला आगस्ट १५ तारखेस चालून पहिल्या आरोपीस एक दिवस साधी कैद व रु. ८० दंड व दुसऱ्या आरोपीस एक दिवस कैद व रु. ३० दंड अशी शिक्षा झाली.

\+ + + +

मिस् रिचिंग्सच्या खटल्यांत ज्या मॅजिस्ट्रेटनें नुसतें पत्र लिहिल्याबद्दल एक महिना कैद व रु. ५०० दंड केला, त्याच मॅजिस्ट्रेटनें हा निकाल दिला हें पाहून कोणासही आश्चर्य वाटेल. कोणासही फसवून लुबाडणें किंवा मारामारी करून लुटणें यापेक्षां पत्र लिहिणें हा अतिशय भयंकर गुन्हा आहे असें दिसतें! चोरांना एक दिवस कैद—म्हणजे कोर्ट उठेपर्यंत तेथें बसून राहणें—व पत्र लिहिणारास एक महिना कैद हा खासा न्याय!

यावरून न्याय हा कायद्यांवर फारसा अवलंबून नसून मॅजिस्ट्रेटांच्या मतावर अधिक असतो हें उघड आहे.

\+ + + +

शिकंदराबाद येथील एका हायकोर्ट वकिलानें आपल्या बायकोस उर्दू व संस्कृत शिकविण्याःकरितां एक मुसलमान व एक ब्राह्मण असे शिक्षक ठेवले. ते दोघेही तिच्याशीं प्रेमाच्या गोष्टी बोलूं लागले व शेवटीं ती ब्राह्मण शिक्षकाबरोबर दागदागिने घेऊन पळून गेली. त्या दोघांमधील पत्रें पोलिसास सांपडलीं आहेत असें समजतें.




# समाजस्वास्थ्य

वर्ष १] ऑक्टोबर १९२७ [अंक ४

संपादक--र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १. वेश्या व गुप्तरोग ( उत्तरार्ध ) | ... | ... | १ |
| २. आफ्रिकेंतील कांहीं लोक | ... | ... | ७ |
| ३. आमचीं नाटकें | ... | ... | ९ |
| ४. मुंबईंतील वेश्या | ... | ... | ११ |
| ५. श्री. ऋषींची भुताटकी | ... | ... | १४ |
| ६. आमच्याबद्दल लोकमत | ... | ... | १८ |
| ७. मुलें कोणाला व्हावींत ? | ... | ... | १९ |
| ८. मुलें कोणाला होऊं नये ! | ... | ... | १९ |
| ९. ताजी व शिळी बातमी | ... | ... | २१ |



**उच्चदर्जाचें व उच्च ध्येयाचें मनोरंजक पण भारदस्त व प्रगतिप्रिय असें**

**स्त्रियांचें सर्वांगसुन्दर मासिक.**

# गृहलक्ष्मी

सम्पादिका— **तारा टिळक**, बी. ए.

**फिरोज आनन्दकर**, बी. ए.

[ वार्षिक वर्गणी ट. ख. सह फक्त ३॥ साडेतीन रुपये. ]

**प्रत्येक १५ व्या तारखेस प्रसिद्ध होतें.**

स्त्रियांना उपयुक्त व आवडतील अशा सर्व विषयांवर विद्वान् अधिकारी लेखिकांचे व लेखकांचे लेख " **गृहलक्ष्मी** " मध्यें असतात.

तीन रंगी मुखपृष्ठ, तीन रंगी दर्शनी चित्र व आर्टपेपरवरील अनेक फोटो प्रत्येक अंकांत असतात.

**' गृहलक्ष्मी ' कार्यालय,**

**खटाव भुवन, मुम्बई ४.**

# वेश्या व गुप्तरोग.

(डॉ. लुई केरा यांचें पॅरिस येथील व्याख्यान मागील अंकावरून समाप्त.)

'वेश्यांसंबंधीं कायद्यांच्या अमलबजावणींत कशी अव्यवस्था होते हें आतांपर्यंत पाहिलें. या करतां नेमलेले बहुतेक डॉक्टर जरी आपापलें काम योग्य रीतीनें पार पाडतात, तरी आरोग्याचे बाबतींत अधिकाऱ्यांच्या अज्ञानामुळें त्यांच्या कामाचा फारसा उपयोग होत नाहीं. यांत सुधारणा करण्यास प्रथम पुरुषांस व स्त्रियांस एकच कायदा लागू केला पाहिजे. एखाद्या स्त्रीनें रस्त्यांत पुरुषांस मोह घालण्याचा प्रयत्न केल्यास तिला पोलीस पकडून नेतात. परंतु पुष्कळ पुरुष रस्त्यांत, दुकानांत, पोस्ट ऑफिसांत, फार काय देवळांत सुद्धां तरुण स्त्रियांसच नव्हे तर कित्येक वेळां कोंवळ्या मुलींसही भुरळ पाडण्याचा प्रयत्न करतात व तो पुष्कळ वेळां सफलही होतो, त्याची वाट काय! अशा प्रकारचा पद्धतशीर प्रयत्न विशेषतः टायपिस्ट (यंत्रानें लिहिणाऱ्या) व दुकानांत काम करणाऱ्या तरुण स्त्रियांवर चालतो. मोठ्या दुकानांच्या दाराशीं दररोज तरुण, मध्यम वयाचे किंवा म्हातारे पुरुष या उद्देशानें टपून राहिलेले दृष्टीस पडतात. हे लोक जरी दिसण्यांत सभ्य दिसले तरी गरीब तरुण मुलींच्या मागें लागून कधीं कामुक शब्दांनीं, कधीं लांब लांब गप्पांनीं, कधीं सोनेरी भूलथापांनीं त्यांस भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करीत असतात, व त्या गरीब असल्यामुळें तो पुष्कळ वेळां साधतोही. या पुरुषांना पोलीस कांहीं करीत नाहीं व त्याच जातीचा प्रयत्न स्त्रीनें केल्यास तिला मात्र पकडून नेतात.

'शिवाय हे पुरुष पुष्कळ वेळां रोगी असतात, व पुष्कळांस गर्मी किंवा परमा किंवा दोन्ही रोग असतात. स्त्रीला मात्र जुलमानें तपासून ती रोगी असल्यास कैदेंत [इस्पितळांत] टाकतात; परंतु या रोग पसरणाऱ्या पुरुषांस कोणी कांहीं करीत नाहीं. हें सर्व बदलून पोलीसानें पुरुषांस व स्त्रियांस

एकच कायदा लावून कोणीही अशा प्रकारचा प्रयत्न रस्यांत करतांना दिसल्यास त्यास पकडून नेलें पाहिजे, व या कामीं स्त्रीपुरुषांत भेद करतां कामा नये.

'याकरतां निराळे लोक नेमण्याचें कारण नाहीं. रस्त्यांतल्या पोलीसच्या शिपायांवरच हें काम सोंपवावें. कोणाही स्त्रीची किंवा पुरुषाची या बाबतींत अयोग्य वागणूक दिसल्यास त्यांनीं त्यास पकडून न्यावें व त्याचा पत्ता व नांव उतरून घ्यावें. तपासून घेण्याची त्यांची खुषी असल्यास त्यांस तपासावें, नाहींतर पहिल्या व दुसऱ्या वेळीं त्यांस बजावून सोडून द्यावें, परंतु तिसऱ्या वेळीं मात्र त्यांची खुषी न पाहतां त्यांस तपासावें, व रोग सांपडल्यास इस्पितळांत पाठवावें.

'रोगी पुरुषांनीं किंवा स्त्रियांनीं उपचार करून घेण्याचें कबूल केल्यास त्यांस सोडून द्यावें, परंतु यासंबंधानें त्यांनीं पुरावा दाखवला पाहिजे. उपचार करून लौकर बरें व्हावें व आपणापासून कोणासही संसर्ग होऊं नये अशीच पुष्कळ रोग्यांची साहजिक इच्छा असते हें खरें, तरीही मुळींच किंवा पुरेसे उपचार न करणारे निष्काळजी रोगीही पुष्कळ असतात. त्यांचे रोग बरे होत नाहींत व त्यांपासून इतरांस नेहमीं धोका असतो. इतकेंच नाहीं तर 'हा रोग मला स्त्रीपासून लागला, तेव्हां शक्य तितक्या स्त्रियांस रोग देऊन मी त्याचा सूड घेणार!' असें प्रतिपादणारा एक विद्यार्थी मला भेटला होता. सरकारी इस्पितळावर मी असतांना माझ्या ताब्यांतले सात आठ गर्मीचे स्त्री व पुरुष रोगी एका सणाचे दिवशीं बाहेर जाऊं लागले. त्यांच्या जाण्यानें त्यांना व इतर लोकांना किती धोका आहे वगैरे गोष्टी मीं त्यांना पुष्कळ समजावून सांगितल्या पण त्याचें ते खरें, व मला त्यांना थांबवण्याचा अधिकार नव्हता. ते बाहेर जाऊन रोगजंतु शक्य तितक्या ठिकाणीं पेरून कांहीं दिवसांनीं परत आले. या बाबतींत कायदा बदलला पाहिजे. लष्करी इस्पितळाप्रमाणें डॉक्टरला वाटेल तेव्हांच रोग्यांस जाऊं दिलें पाहिजे.

'गुप्त रोगांचे बाबतींत स्वीडन् देशांतील कायदे मला फार आवडले, ते असे:—

३. ' गुप्त रोगांचा (परमा, गर्मी वगैरेचा) प्रसार होऊं नये म्हणून प्रत्येक रोग्यानें डॉक्टराचें औषध घेऊन तो सांगेल त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे.

८. कोणालाही यांतील रोग आहे असें डॉक्टरास समजल्याबरोबर त्यानें रोग्यास सांगितलें पाहिजे, व संसर्गाचें भय किती आहे यासंबंधीं त्यांस इशारत दिली पाहिजे, त्यास औषध दिलें पाहिजे, व इतरांस संसर्ग होऊं नये म्हणून कसें वागलें पाहिजे हें लिहून दिलें पाहिजे. त्यांत रोग बरा होईपर्यंत लग्न न करण्यासंबंधीं व रोगाचा प्रसार होईल असें कोणतेंही कृत्य न करण्यासंबंधीं काय कायदे व शिक्षा आहेत हें लिहिलें पाहिजे.

११. गुप्त रोग ज्या डॉक्टराच्या प्रथम नजरेस येईल त्यानें रोग्यास संसर्ग कसा व कोणापासून झाला ही माहिती मिळविण्याचा शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे.

'शिवाय रोगी उपचार व औषध सांगितल्याप्रमाणें घेतो असें डाक्टराकडून सर्टिफिकीट घेऊन रोग्यानें आरोग्याच्या अधिकाऱ्यास दाखविलें पाहिजे. इस्पितळाशिवाय रोग्यास बरोबर उपचार होणार नाहीं असें वाटल्यास त्यास इस्पितळांत जावें लागतें. कायद्याप्रमाणें न वागणाऱ्या रोग्यांस जबर शिक्षा ठेविली आहे.

' फ्रान्समध्यें १९२३ सालीं रोगप्रतिबंधक कमिशननें कायद्याचा एक मसुदा पसंत केला आहे, तो असाः—घरीं, इस्पितळांत किंवा दवाखान्यांत कोणाही डॉक्टरास गर्मी, परमा वगैरेचा कोणीही रोगी दिसल्यास त्यानें त्यास औषधाबरोबरच संसर्गाबद्दल इशारत दिली पाहिजे, मग त्यावेळीं त्याची स्थिती संसर्गजनक असो वा नसो.

' संसर्गजनक स्थितींत कोणत्याही रोग्यानें कोणाशीं शरीरसंबंध केल्यास त्याला १ पासून ५ दिवस तुरुंगांत जावें लागेल.

' एका मनुष्यानें दुसऱ्यास समागमाकरतां फुसलावण्याचा उघडपणें प्रयत्न केल्यास त्यास तपासलें जाईल व तो रोगी ठरल्यास योग्य उपचाराची त्यावर सक्ती होईल. हे उपचार जज्जानें ठरवल्यास दवाखान्यांत किंवा डॉक्टरांच्या सरकारी यादींपैकीं रोग्यानें निवडलेल्या डॉक्टराकडून होतील.

'रोग्यानें हें कबूल न केल्यास त्याला जबरीनें एकाद्या खाजगी इस्पितळांत ठेवलें जाईल व संसर्गाचा संभव नाहींसा होईपर्यंत त्याची सुटका होणार नाहीं, व सुटल्यानंतरही पुरा बरा होईपर्यंत त्यास औषध घ्यावें लागेल. तसें न केल्यास त्यास पुरा बरा होईपर्यंत इस्पितळांत ठेवलें जाईल.

'या व्यवस्थेस रोग्यानें कोणत्याही रीतीनें अडथळा केल्यास त्यास ६ दिवसांपासून तीन महिनेपर्यंत तुरुंगाची शिक्षा होईल.'

'हा कायदा योग्य आहे व तो पास झाला पाहिजे. याशिवाय कुंटणकी करून स्त्रियांस वेश्यावृत्तीस प्रवृत्त करणाऱ्या लोकांस कडक शिक्षा केली पाहिजे. हल्लीं हे लोक आपल्या हाताखालील वेश्या बरोबर काम करतात कीं नाहीं यावर देखरेख करण्याकरतां ७ पासून १२ वर्षांचीं मुलें ठेवतात व हीं मुलें पुढें अर्थातच बिघडतात.

'शिवाय हा धंदा करणाऱ्या लोकांस बहुधा गर्मी, परमा वगैरे असतात, इतकेंच नाहीं तर हेच लोक चोऱ्या, दरवडे, खून वगैरे इतर धंदे करीत असतात. या लोकांसंबंधीं वरील कायद्यांत असा उल्लेख आहे:—

जो कोणी २१ वर्षांचे आंतील स्त्रीस किंवा पुरुषास वाईट मार्गास लावील किंवा त्याहून अधिक वयाचे मनुष्यास त्याच्या खुषीनेंही इतर लोकांच्या तृप्तीसाठीं मिळवून देईल किंवा वेश्यावृत्ति करण्यास लावील, किंवा कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींनीं उघडपणें किंवा व्यंग्योक्तीनें, आपण वेश्यावृत्ति किंवा कुंटणपणा करतों असें दुसऱ्यास कळवील, त्यास ५० पासून ५००० फ्रँक दंड व ६ महिनेपासून ३ वर्षेपर्यंत तुरुंगाची शिक्षा होईल.

'हा कायदा माझ्या दृष्टीनें फारच सौम्य होईल. बेल्जिअम् मध्यें कुंटणपणा करणारांस ७ वर्षें अंधारकोठडींत ठेवतात, व याचा परिणाम असा झाला आहे कीं तेथील सर्व भडवे आतां पॅरिसमध्यें आले आहेत असें तेथील एक अधिकारी म्हणतो.

'कोणींही कोणाचें नकळत सुद्धां नुकसान केल्यास त्यानें तें भरून दिलें पाहिजे हें तत्त्व कोणास कोणी चुकून इजा केल्यास जर लागू होतें, तर एकापासून दुसऱ्यास गर्मीचा संसर्ग झाल्यास तेंच तत्त्व कां लावूं नये? परंतु या

बाबतींत हें तत्त्व लावण्यास लोक आढेवेढे घेतात. ब्रुसेल्स् येथें १९०२ मधील परिषदेंत यावर रणें पडलीं.

'परंतु यावर बराच वाद होऊन आतां बरेच लोक असें कबूल करतात कीं या बाबतींत कायदा केला पाहिजे व अशा प्रकारचा एक कायद्याचा मसुदा रोगप्रतिबंधाच्या कमिशननें १९२४ सालीं पसंत केला तो असाः—

'कोणींही आपणांस गर्मी किंवा परमा आहे असें माहीत असून जाणून बुजून दुसऱ्यास संसर्ग केल्यास त्यास १०० पासून २०० फ्रँक् दंड व २ पासून ५ वर्षे तुरुंगाची शिक्षा होईल.

'आपणांस रोग आहे असें माहीत असून किंवा अशी शंका येण्याचें कारण असुन, मुद्दाम नव्हे परंतु हलगर्जीपणामुळें, दुसऱ्यास संसर्ग केल्यास १६ पासुन ५०० फ्रँक दंड किंवा ६ दिवस पासुन ६ महिने तुरुंग किंवा दोन्ही शिक्षा होतील.

'याबद्दल कोर्टांत झालेल्या वादविवादाची व निकालाची हकीकत कोणीं छापल्यास त्यास १०० पासून ५००० फ्रँक दंड ठेवला आहे.'

'वरील विवेचनावरून आपल्या लक्षांत आलेंच असेल कीं वेश्यावृत्ती-संबंधीं कायदे करून आरोग्याचे दृष्टीनें कांहीं उपयोग होत नाहीं. ही व्यवस्था बदलली पाहिजे व वर सुचविलेले नवीन कायदे हल्लींच्या कायद्यापेक्षां पुष्कळ प्रागतिक आहेत.

'या बाबतींत लोकांस शिक्षण देणें, नीतिभ्रष्टते विरुद्ध लढणें, गर्मी-विरुद्ध लढण्याकरतां डॉक्टरांस शिक्षण देणें, शक्य तितक्या प्रयत्नानें गर्मी व व परम्याचे रोगी शोधून काढून त्यांचे अंगांतील जंतु मारण्याचे उपाय करणें, रोग्यांस संसर्गप्रतिबंधाचे नियम पाळण्यास लावणें, यासंबंधाची त्यांची जबा-बदारी भयंकर शिक्षेच्या भीतीनें तरी त्यांस ओळखण्यास लावणें, वेश्यावृत्तीचा व इतरांस भ्रष्ट करण्याच्या प्रयत्नांचा प्रतीकार करणें, कित्येक स्त्रियांनीं चाल-वलेल्या तरुण मुलींच्या संरक्षणाच्या प्रयत्नास उत्तेजन देणें, या दिशांनीं प्रयत्न झाले पाहिजेत. हल्लींचा सरकारी दवाखाना व तुरुंगवजा इस्पितळ, व हल्लींची पोलीसची कुचकामाची देखरेख बंद केली पाहिजे. रोग्यांस प्रेमानें वागवलें

पाहिजे, उपचार करून बरें होण्यांत व संसर्ग न पसरण्यांतच त्यांचें व इतरांचेंही हित आहे हें त्यांस समजावून सांगितलें पाहिजे, परंतु उपदेशानें जे ऐकणार नाहींत त्यांची मात्र दया करतां कामा नये. हल्लीं गर्मीच्या जंतूविरुद्ध लढण्याची आपली जय्यत तयारी आहे. या तयारीचा योग्य उपयोग केल्यास व संसर्गाबद्दल खबरदारी घेतल्यास थोड्याच वर्षांत हा भयंकर रोग जगांतून नाहींसा करतां येईल यांत मला बिलकूल शंका वाटत नाहीं. पोलीसची देखरेख काढून टाकून सर्वांस पूर्ण स्वातंत्र्य द्यावें हें मत मला मान्य नाहीं. स्त्रीपुरुषांस निरोगी करून त्यांची नीतिमत्ता वाढवली पाहिजे.

पुरुषांस व स्त्रियांस समतेनें वागवलें पाहिजे असें माझें म्हणणें मीं सांगितलेंच. शिवाय मी डॉक्टर आहें इतकेंच नाहीं तर गर्मीचा मीं विशेष अभ्यास केला आहे, व हा रोग नाहींसा करणें शक्य आहे हें माहीत असून सुद्धां व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचित्र कल्पनांना फाजील महत्त्व देऊन या कार्यास उशीर लावावा हें मला कबूल नाहीं. जेथें समाजास धोका उत्पन्न झाला तेथें व्यक्तिस्वातंत्र्य संपलें.'

---

## साभार पोंच.

डॉ. के. भा. लेले यांनीं लिहिलेलें 'बाहेरख्यालीचे दुष्परिणाम' नांवाचें लहानसें पुस्तक अभिप्रायाकरतां आलें आहे. विषय महत्त्वाचा असल्यामुळें याचें सविस्तर परीक्षण पुढील अंकीं करूं.

---

१८५५ सालीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील लोकांचें सरासरी आयुष्यमान ४० वर्षें होतें. रोगांवरील आधुनिक शास्त्रीय उपायांमुळें हें मान हल्लीं ५८ वर्षें झालें आहे.

× × × ×

अमेरिकेंत दर चौरस मैलास ३६ लोक आहेत; इटालींत ३५७ आहेत. इटालीची लोकसंख्या ४,२१,१५,६०६ आहे. लढाईची तयारी म्हणून ही संख्या दीडपट करणार, असें म्युसोलीनी उघडपणें सांगत आहे. परंतु सध्यांच लोकांस अन्न मिळत नाहीं, मग पुढें काय खाणार ?

# आफ्रिकेंतील कांहीं लोक.

प्रोफेसर एतिएन् रिशे यांनीं पश्चिम आफ्रिकेंतील कॅमेरून प्रांतांतील आपल्या शेवटच्या प्रवासाची हकीकत नुकतीच प्रसिद्ध केली आहे. त्यांतील कांहीं भाग येथें देतो.

कॅमेरून व कांगो प्रांतांत नरमांसभक्षक लोक अजून पुष्कळ आहेत व याची यूरोपांतील लोकांस कल्पनाही नसते. लारूसच्या कोशाच्या ५० वर्षांपूर्वीच्या आवृत्तींत नरमांसभक्षक लोक आतां जगांत कोठेंही नाहींत असें विधान ठोकून दिलें आहे, परंतु यूरोपमधील लोकांनीं हा प्रदेश व्यापून ३० वर्षे झालीं तरीही अशा रानटी लोकांच्या ज्ञाती येथें पुष्कळ आहेत. लढाईंत इतर लोकांस पकडून नेण्यांत त्यांचा हाच उद्देश असतो. याविरुद्ध कायदे आहेत परंतु या व गुलामगिरीविरुद्ध कायद्यांस कोणी विचारीत नाहीं. स्त्रियांस पळवून नेऊन विकण्याचा जिकडे तिकडे सपाटा चालतो.

कॅमेरूनमध्यें वेश्यावृत्तीचा विचारच करण्याचें कारण पडत नाहीं, कारण समागम म्हणजे पाप आहे ही धार्मिक कल्पना त्यांस शिवलेली नाहीं. कोणत्याही दोन स्त्रीपुरुषांचा समागम होण्यास एकच अडचण असूं शकते, ती ही कीं स्त्री विवाहित असल्यास तिचा नवरा कदाचित् रुकार देणार नाहीं. असें क्वचितच होतें व या बाबतींत स्त्रीनें त्याचें न ऐकिलें तरी तिला बहुधा फारच थोडी शिक्षा होते. या बाबतींत सर्वांस जवळ जवळ पूर्ण स्वतंत्रता असते इतकेंच नव्हे तर पाहुण्याकडे आपली बायको किंवा मुलगी पाठवण्याचा प्रघात आहे, व पाहुण्यानें कबूल न केल्यास यजमानाचा बुस्सा होतो.

'बव्या' जातीच्या लोकांचें प्रो. रिशे यांनीं वर्णन दिलें आहे. हे देखणे, सशक्त व बांधेसूद असून यांचा आहार बहुतांशीं वनस्पतींचा असतो, परंतु यांस टोळ वगैरे भाजून खाण्यास आवडतात! तंबाखू ओढण्याचे कामांत ते यूरोपीय लोकांइतकेच मूर्ख आहेत.

'कादेइ' प्रांतांत झोंपेच्या रोगानें प्रलय केला आहे. हा रोग अतिशय सांसर्गिक असल्यामुळें लोक यास फार भितात. कोणासही हा रोग झाल्यास ते त्यास शक्य तितका दूर अरण्यांत नेऊन सोडतात, व त्यांस जरी नरमांस फार आवडतें, तरी या रोगानें मेलेल्या मनुष्याचें मांस ते कधीं खात नाहींत.

ज्या मनुष्यास खाण्याचें ठरेल त्यावर पांच जण हल्ला करून त्याला खालीं पाडून त्याचे हात, पाय व डोकें धरून ठेवतात, व नंतर त्याला कापून शिजवून खातात. नरमांस खाण्याचा हक्क स्त्रियांस नसतो.

नंतर उघड्यावर नाच करतात. येथें परक्या मनुष्यास जाऊं देत नाहींत कारण हे नाच अत्यंत कामोद्दीपक असतात व ते संपल्यावर कामशांति व्हावयाची असते.

'काँ सांबा' लोकांत पैसे किंवा इतर मोबदला देऊन बायको विकत घेण्याची पद्धत आहे. ही किंमत घेणाऱ्याच्या ऐपतीप्रमाणें कमजास्त होते. स्त्री गरोदर होतांच भावी मूल गुलाम म्हणून विकून नवरा झालेला खर्च शक्य तितका वसूल करतो. परंतु मुलगा झाल्यास तो आईबापांजवळच राहतो व घेणाराची फजिती होते. परंतु मुलगी झाल्यास मात्र तो तिला गुलाम म्हणून घेऊन जातो, ती पुढें त्याची बायको किंवा सून होते. बायका पुष्कळ करतां येतात परंतु खर्चाच्या अडचणीमुळें पुष्कळ लोक एकाच बायकोवर भागवतात.

स्वच्छतेच्या दृष्टीनें हे लोक कधीं कधीं यूरोपीय लोकांपेक्षांही वरचढ असतात. ते दररोज स्नान करतात व एखाद्यानें न केलें तर त्याची चेष्टा करतात.

सुधारलेल्या राष्ट्रांसारखाच तिकडेही राजे, सरदार वगैरेंचा सुळसुळाट आहे. तेथल्या एका शिद्दी राजाला ६०० बायका आहेत. ज्या स्त्रियांस कोणत्याही कारणामुळें नवरा मिळणार नाहीं त्यांस राहण्याकरतां त्याच्या राजवाड्याजवळच एक जागा बांधलेली आहे. व थोडेसे पैसे दिल्यास तेथें वाटसरूंची सोय होते.

राजाची प्रजेवर सर्व प्रकाराची सत्ता असते. तो कोणाचीही मालमत्ता घेऊं शकतो व कोणासही ठार मारूं शकतो. अर्थात या सर्व गोष्टी तो वरिष्ठ फ्रेंच सरकारास कळूं देत नाहीं.

यूरोपीय सुधारणेनें त्यांचा मोठासा फायदा झाला आहे असें म्हणतां येत नाहीं. आम्ही मेहनतीचीं कामें त्यांचेवर लादतों व तें त्यांनीं कबूल करावें म्हणून त्यांच्या गरजा वाढवतों. उदाहरणार्थ थोडीशी दारू मिळावी म्हणून ते पाहिजे तितके कष्ट करतात, व त्या दारूनें त्यांचा सत्यानास होतो. भलभलत्या संवयी आणि समजुती सोडून दिल्यास मनुष्य सुखी होईल, पण हे समजेल तेव्हां खरें !

# आमचीं नाटकें.

इंग्लंडांतील ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचा नाटक समाज आजपर्यंत जरूर पडेल तेव्हां स्त्रीपार्ट करण्याकरतां धंदेवाल्या नटी भाड्यानें आणीत असे, परंतु ही पूर्वापार पद्धत आतां बंद करण्याचें ठरवून त्यांनीं नुकतीच 'स्त्रीपार्ट करण्यास तयार असलेली कॉलेजांतील विद्यार्थिनी पाहिजे' अशी जाहिरात दिली आहे. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीसारखें परंपरेचें माहेरघर सुद्धां ही सुधारणा करण्यास तयार झालें, पण आमच्या नाटक कंपन्या अजून गाढनिद्रेत आहेत. बऱ्याच नाटक कंपन्यांचे मालक स्त्रीपार्ट करणारे नट आहेत हें याचें एक मुख्य कारण आहे. खरोखरीच्या स्त्रिया पार्ट करूं लागल्यावर या लुगडें नेसून बांगड्या भरलेल्या पुरुषांचें महत्त्व काय राहणार ?

ग्रीसमध्यें स्त्रियांचीं कामें करणाऱ्या पुरुषांस वयांत येण्यापूर्वीं खच्ची करीत असत, यामुळें त्यांस दाढी मिशा येत नसत व त्यांचा आवाजही फुटत नसे. हल्लीं तीही व्यवस्था नसल्यामुळें लुगडें नेसलेल्या नटावरही स्त्रीत्वाचा आरोप करणें बरेंच कठिण होतें.

अजूनही यूरोपांत कधीं कधीं पुरुष स्त्रीपार्ट करतात, परंतु तें केवळ जेव्हां एकदा स्त्रीपार्ट हास्यास्पद करावयाचा असेल तेव्हां. त्याचप्रमाणें जेव्हां नायकाचें वय कमी दाखवयाचें असेल तेव्हां तें काम स्त्रियांनीं करण्यांची पद्धत आहे.

हिंदुस्थानांत या प्रकाराला विशेष उद्देश वगैरे कांहीं लागत नाहीं. पुरुष आणि स्त्रिया यांमध्यें जणूं काय हाडवैर असल्यामुळें मिश्र नाटक मंडळी होऊं शकत नाहीं. बहुतेक मंडळ्या केवळ पुरुषांच्या, तर एकादी मंडळी केवळ स्त्रियांची. पुरुषांची मंडळी असल्यास नायिकेचें काम अमुकराव तमुक करतील, व स्त्रियांची असल्यास पुरुषांचीं सर्व कामें स्त्रियाच करतील अशी ठळक अक्षरांनीं जाहिरात लावावयाची. नाहीं म्हणायला एकदां येथें एक मिश्र कंपनी आली होती व पुरुषांचीं बरींच कामें पुरुष व स्त्रियांचीं स्त्रिया करीत असत. परंतु कंपनीला पुरेशा स्त्रिया न मिळाल्यामुळेंच ही व्यवस्था झाली होती असें दिसतें, कारण त्या कंपनीसही नायकाचें काम—बाई करतात ही घमेंड होतीच !

पुरुषांनीं पुरुषांचीं व स्त्रियांनीं स्त्रियांचीं कामें केल्यास कोणताही खेळ अधिक उठावदार दिसेल. नाट्यकला पुरुषांइतकीच स्त्रियांसही शिकतां येईल, व इतर देशांत हें सिद्ध झालें आहे इतकेंच नव्हे तर कलकत्ता येथील कंपन्यांत स्त्रिया कामें करतात, व येथेंही सिनेमांत करतात. मग नाटकांनींच काय केलें आहे? या सुधारणेच्या अभावीं मराठी कंपन्यांचं एकही नाटक आमचे मतें खरोखर पाहण्यासारखें होत नाहीं. ज्यांनीं स्त्रियांचीं कामेंच कधीं पाहिलीं नाहींत त्यांस कदाचित हीं नाटकें पसंत पडत असतील, परंतु इतरांस पडत नाहींत.

उच्च दर्जाच्या स्त्रिया नाटकाचा धंदा करूं लागेपर्यंत वाट पहावयाची असेल, तर ही गोष्ट जवळ जवळ अशक्य आहे. ज्या स्त्रिया आज गायन, वादन, नर्तन करून पोट भरतात त्या नाटकाचे धंद्यांत शिरण्यास सहज तयार होतील, व यांत त्यांसही कमीपणा नाहीं. व नाटक कंपन्यांसही नाहीं. पैशाच्या दृष्टीनेंही यांत नुकसान होण्याचा संभव नाहीं. फक्त कोणींतरी सुरवात केली पाहिजे.

केवळ वेश्यांसही हा एक नवीन धंदा होईल, व अशा रीतीने त्यांचा दर्जा वाढेल. त्यांची कंपन्यांस भीति वाटत असेल तर त्यांची राहण्यची वेगळी सोय केली म्हणजे झालें. वेश्यांसंबंधीं लांब लांब गप्पा मारणाऱ्या लोकांनीं ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

वेश्यांसही आपल्या धंद्यांत प्रावीण्य मिळवण्यांत नाट्यकलेची जरूर असते, कारण थोडें बहुत प्रेम किंवा निदान तात्पुरती आवड जर हावभावांनीं दाखवतां आली नाहीं तर गिऱ्हाईक नाखुष होणार, व गिऱ्हाईक खुष असेल तरच कोणताही धंदा जांगला चालणार. ही नाट्यकला शिक्षणानें वाढवून तिचा नाटकांत उपयोग करण्यास कोणतीही हरकत दिसत नाहीं.

---

स्त्रियांकरतां वेगळीं कॉलेजें असावीं कीं नाहीं याबद्दल २३ जुलै रोजीं येथील सेंट झेवियर कॉलेजांत भरलेल्या स्त्रियांच्या सभेंत वाद होऊन, तीं नसावींत असें बहुमतानें ठरलें.

# मुंबईतील वेश्या.

या विषयावर डॉ. जरवान् मिस्त्री यांनीं ' टाइम्स ऑफ् इंडिया ' च्या ऑगस्ट १९ च्या अंकांत एक लेख लिहिला आहे. यांत बरींच महत्वाचीं खरीं-खोटीं विधानें केलीं असल्यामुळें त्याचा येथें विचार करणें जरूर आहे.

लोकांस शिक्षण दिलें पाहिजे, कामशास्त्राबद्दल शास्त्रीय माहिती सर्व विद्यार्थ्यांस पद्धतशीर रीतीनें दिली पाहिजे, कुंटणगिरी करणारे लोक वेश्यांवर पुष्कळ वेळां जुलूम करतात व मुलींना फसवून वेश्यांच्या धंद्यांत घालतात तेव्हां हे मध्यस्थ लोक नाहींसे झाले पाहिजेत हें आम्हांस मान्य आहे. परंतु धार्मिक शिक्षणानें लोक नीतिमान होतात किंवा धार्मिक लोक इतरांपेक्षां अधिक नीतिमान असतात हे साफ खोटें आहे. संध्या करण्यानें, प्रायश्चित घेण्यानें किंवा अशाच इतर प्रकारांनीं पापाचें क्षालन करण्याची युक्ति प्रत्येक धर्मांत असते व यामुळें धार्मिक लोकांतच अधिक अनीति सांपडते. पापी मनुष्य नरकांत जातो असा पूर्ण विश्वास ठेवणाऱ्या अविवाहित ख्रिस्ती धर्मोपदेशकांस सुद्धां गर्मी होते असा डॉ. रॉबिनसनयांचा अनुभव आहे, व इतर धर्मांचीही स्थिति तीच आहे.

पुरुषांस प्रकृतीस अपाय झाल्याशिवाय ब्रह्मचर्यानें राहतां येत नाहीं अशी एक खोटी समजूत प्रचलित आहे, असें एक विधान डॉक्टरीण बाईनीं सहज जातां जातां केलें आहे. डॉ. जरवान् मिस्त्री या पुरूष नाहींत व त्या अविवाहित असल्यामुळें त्यांस पुरुषांसंबंधीं प्रत्यक्ष अनुभव नाहीं. डॉक्टर या दृष्टीनें पुरुष रोगी त्यांजकडे अशा तक्रारी घेऊन जाईल हेंही संभवनीय नाहीं. त्या धार्मिक असल्यामुळें ब्रह्मचर्याविषयीं पारंपरिक कल्पनाच त्यांच्या डोक्यांत आहेत असें दिसतें.

ब्रह्मचारी राहूनही ज्या पुरुषांस त्या विषयाची आठवणच होत नाहीं, किंवा इच्छा झाली तरी ती सहज दाबून टाकतां येते, म्हणजे ज्यांची वासनाच तितकी जागृत नाहीं, त्यांच्या प्रकृतीस कदाचित ब्रह्मचर्यापासुन अपाय होणार नाहीं, परंतु इतरांस होतो असेंच तज्ज्ञांचें मत आहे. या बाबतींत इतकेंच सांगि-

तलें पाहिजे कीं जे पारंपरिक पूर्वग्रहांमुळें शास्त्रीय दृष्टीनें विचारच करूं शकत नाहींत असे डॉक्टर मात्र डॉ. मिस्त्री यांच्यारखें मत देतात, व बाकीचे म्हणजे धर्मानें किंवा परंपरेनें ज्यांस पछाडलें नाहीं असे तज्ज्ञ त्यांचे विरुद्ध आहेत. शास्त्रीय दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे यांचेंच मत मान्य करणें भाग आहे.

कोणावरही निष्कारण जुलूम होतां कामा नये हें सामान्य तत्त्व वेश्यांसही लागू केलें पाहिजे व ज्यांस जुलमानें वेश्यावृत्तींत रहावें लागत असेल त्यांस ती सोडण्यास सवड दिली पाहिजे हें खरें आहे. परंतु त्यांच्याकरतां नुसतें आश्रयस्थान काढून कसें भागणार ? त्यांच्या पोटाची सोय जन्मभर कशी होणार ? चोरून धंदा करणाऱ्या वेश्या आहेत हें विधान खरें आहे, परंतु यावर उपाय सुचवलेला दिसत नाहीं.

वेश्यागृहें ट्रॅमवेच्या रस्त्यावर आहेत व जाणाऱ्या येणाऱ्यांचें लक्ष वेधण्याकरतां वेश्या शरीर उघडें टाकून बीभत्स हावभाव करतात, असें डॉक्टरीणबाईचें म्हणणें आहे. आम्ही अशा ट्रॅमवेच्या रस्त्यानें पुष्कळ वेळां गेलों आहों, परंतु बीभत्स हावभाव आम्हांस केव्हांही दिसले नाहींत व यूरोपीय सभ्य स्त्रियांच्या नाचाच्या पोषाखानें जितकें शरीर उघडें दिसतें त्यापेक्षां जास्त उघडें शरीरही दिसलें नाहीं. खिडकींत सभ्य बायका सुद्धां उभ्या राहतात, मग वेश्यांनींच काय घोडें मारलें आहे ?

अशा मोठ्या रस्त्यांत ही गृहें राहूं न देतां त्यांस अप्रसिद्ध रस्त्यांत जागा द्यावी असें त्या म्हणतात, तशी द्यावी पाहिजे तर. वेश्यांच्या आश्रयदात्यांचीही त्यांत थोडी बहुत सोयच होईल, व ट्रॅमवेनें जाणारे लोक पाहतील अशी धास्ती राहणार नाहीं !

सर्व जगभर कोणत्याही राजधानीच्या शहरीं व विशेषतः मुंबईसारख्या बंदरांत वेश्यांचा सुळसुळाट नेहमीं जास्त असतो, कारण तेथें त्यांचा खप फार. त्याचप्रमाणें मुंबईतही तो आहे. या बाबतींत पहिली सुधारणा म्हणजे त्यांपैकीं पुष्कळांस कोंदट, घाणेरड्या जागेंत रहावें लागतें व त्याचें फाजील भाडें द्यावें लागतें, हीं घरें पाडलीं पाहिजेत, व फाजील भाडें घेणाऱ्या घरवाल्यांस शिक्षा

झाली पाहिजे. स्वच्छता म्हणजे काय हें खालच्या प्रतीच्या वेश्यांस शिकवलें पाहिजे, कारण अस्वच्छता ही सर्वांत मोठी अनीति आहे.

गुप्त रोगांचा प्रसार वेश्यांमुळें होतो हें खरें आहे, परंतु या बाबतींत उघड वेश्यांपेक्षां चोरट्या वेश्या अधिक भयंकर असतात, असा सर्वत्र अनुभव आहे. त्यांसंबंधीं जोंपर्यंत कांहीं करतां येत नाहीं तोंपर्यंत गुप्त रोगांच्या सबबी-वर वेश्यांस नांवें ठेवणें फोल आहे. गुप्तरोगांचा प्रसार व्हावयास नको असेल, तर त्याचा मार्ग वेश्या नाहींशा करणें हा नव्हे. गुप्त रोगांचा प्रतिबंध करतां येतो, म्हणजे रोग्यांशीं समागमानें सुद्धां इतरांस संसर्ग होऊं नये अशी व्यवस्था करतां येते, इतकेंच नाहीं तर ती सहज करतां येते. हा प्रतिबंधाचा मार्ग सर्वांस शिकवला पाहिजे व विशेषतः वेश्यांस शिकवला पाहिजे. याकरतां जरूर अस-लेलीं औषधें प्रत्येक वेश्येकडे व वेश्यागृहांत विक्रीस ठेवलीं पाहिजेत, व तीं कशीं वापरावयाचीं हें ठळक अक्षरांनीं छापून तेथें भिंतीवर लावलें पाहिजे, म्हणजे गुप्त रोगांचा कांहीं वर्षांत नायनाट होईल. नीतिविषयक व्याख्यानें व लेख लोक शेंकडों वर्षे देत आले आहेत परंतु गुप्त रोगांच्या प्रसारावर त्याचा परिणाम झालेला नाहीं. आम्ही सांगतों या उपायांनीं फ्रान्समध्यें गुप्त रोगांचें प्रमाण गेल्या थोड्या वर्षांत अतिशय कमी झालें आहे. हें काम वटवटीनें होणार नाहीं, कृतीनें होणार आहे.

---


# जेलोटयूब

यानें गुप्त रोग बरे होत नाहींत, हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्या-करतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून, काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फेंच डॉक्टर गोडयुशो यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळां वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २

राइट एजन्सी, २० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.

# श्री. ऋषींची भुताटकी

वेडगळ समजुती सर्वच जुन्या असतात असें नाहीं. चमत्काराकडे पुष्कळ लोकांची प्रवृत्ति असते व त्यामुळें नवीन वेडगळ समजुती नेहमीं निपजत असतात. हिंदुस्थानांत जणूं काय अशा समजुती पुरेशा नाहींत म्हणून ही आधुनिक भुताटकी श्रीयुत ऋषींनीं मुद्दाम विलायतेंतून मागवली आहे. या विलायती मालाची थोडीशी तपासणी करणें जरूर आहे.

एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवावयाचा कीं नाहीं हें त्या गोष्टीच्या संभाव्यतेवर असतें. आपल्या कितीही विश्वासाच्या मनुष्यानें एखादी गोष्ट सांगितली तरी ती अगदींच असंभाव्य वाटल्यास आपण त्यावर विश्वास ठेवणार नाहीं. उदाहरणार्थ राणीच्या पुतळयानें व्याख्यान दिलें असें जर कोणी सांगूं लागला तर तो नेहमीं खरें बोलणारा असला तरी आपण तें खरें मानणार नाहीं. तो चेष्टा करीत नाहीं असें नक्की वाटल्यास त्याचें डोकें फिरलें आहे असें आपण समजूं.

नास्तिकांचा ईश्वरावर विश्वास बसत नाहीं याचें कारण त्यांस ईश्वराचें अस्तित्व असंभाव्य वाटतें हेंच होय. अर्थात् ईश्वर निर्गुण व निराकार कल्पिल्यामुळे त्या व्यक्तीचें अस्तित्व कोणासही समजणेंच शक्य नाहीं, तेव्हां त्यासंबंधानें पाहिजे त्याला पाहिजे तीं विधानें करण्याची मुभा आहे. परंतु भुतेंखेतें, आत्मे वगैरेंची गोष्ट तशी नाहीं. त्यांना अमुक रूप असतें, तीं तमुक करतात असें म्हटलें म्हणजे त्यास पुरावा असेल तरच त्याचें अस्तित्व मानणें रास्त होईल, कारण या गोष्टी सकृद्दर्शनीं असंभाव्य दिसतात. परंतु गूढताप्रिय मनुष्यास विचार करण्याची जरूर भासत नाहीं इतकेंच नव्हे तर विचार केला असतां या आपल्या आवडत्या कल्पनांस रजा द्यावी लागेल अशी त्यांस भीति वाटते. धर्मावर लोकांचा जो काय विश्वास असेल तो एका कल्पनेच्या आधारावर आहे. ती ही कीं, ईश्वराच्या अस्तित्वासंबंधीं शंका काढणें किंवा वाद करणें हेंच पाप आहे. सुदैवानें भुताटकीची गोष्ट तशी नाहीं. भुतांच्या अस्तित्वासंबंधीं धार्मिक लोकांस सुद्धां शंका घेतां येईल.

हे भुताटकीवाले लोक भुतांऐवजीं 'मृतांचे आत्मे' वगैरे परिभाषा

वापरीत असतात. परंतु आत्म्याला आकार नसतो व तो दिसत नाहीं अशी कल्पना असल्यामुळें आम्ही भुतें हाच शब्द वापरतों. हीं भुतें सर्वांशीं बोलूं शकत नाहींत, त्यांस मध्यस्थ लागत असतात, त्या मध्यस्थांचें द्वारें हीं कांहीं निरोप पाठवीत असतात व कधीं कधीं तर मध्यस्थांचे अंगचे गूढ शक्तीमुळें त्यांस दृश्य स्वरूप प्राप्त होतें, असें भुतांचे अनुयायी म्हणतात.

आजपर्यंत ज्या ज्या लोकांनीं यूरोप व अमेरिकेंत भुतांचे निरोप मनुष्यांस कळविले ते सर्व लुचे होते व ते लोकांस फसवीत होते हें कोर्टांत सिद्ध झालेलें आहे. तरी सुद्धां याच लुच्या लोकांवर विश्वास ठेवणारे लोक आहेत, इतकेंच नाहीं तर मोठे मोठे विद्वान लोक या लफंग्यांच्या नादीं लागलेले आहेत. कांहीं लोकांची मनःप्रवृतीच अशी असते कीं त्यांस कांहीं तरी अद्भुत शक्तीवर विश्वास ठेवल्याशिवाय बरें वाटत नाहीं. आधुनिक शास्त्रवेत्तेसुद्धां कधीं कधीं धर्मांध असतात याचें कारण हेंच आहे. अशा लोकांची एक लांबलचक यादी रा. ऋषि यांनीं प्रसिद्ध केली आहे, व हे लोक सुद्धां ज्या अर्थी भुतांवर विश्वास ठेवतात त्या अर्थी तीं खरींच असलीं पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे. विश्वास ठेवणाऱ्या इंग्लंडमधील शास्त्रज्ञांपैकीं प्रमुख सर ऑलिव्हर लॉज् हे होत. यांनीं शास्त्रीय शोध लावलेले आहेत, परंतु शास्त्रीय विचारसरणी या बाबतींत लावतां कामा नये असें त्यांस वाटत असल्यामुळें त्यांस कोणीही सहज फसवतो. उदाहरणार्थ, शक्य तितक्या लोकांसबंधीं शक्य तितकी खाजगी माहिती मिळवण्याचा या मध्यस्थ लोकांचा धंदाच असतो. सर ऑलिव्हर लॉज् हे आपणास ओळखूं नये म्हणून एकदां अशा एका मध्यस्थाकडे आगाऊ न कळवतां गेले, व त्यानें त्यांस कांहीं खाजगी गोष्टी बिनचूक सांगितल्या व त्यावरून त्याच्या अंगीं कांहीं अलौकिक शक्ति आहे अशी सरसाहेबांची खात्री झाली ! वास्तविक स्थिति अशी आहे कीं त्यांच्यासारख्या प्रसिद्ध मनुष्यास कोणीही ओळखतो व ते नेहमींच्याच वेषांत असल्यामुळें त्यांत कांहींच कठिण नव्हतें.

एखादा मनुष्य लफंगा आहे असें सिद्ध झाल्यावरही हे लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात, कारण मनुष्य लफंगा असला तरी नेहमींच खोटें बोलतो असें

नाहीं ! जेव्हां लुच्चेगिरी बाहेर पडेल तेव्हां तो खोटा, नाहींतर तो खरा! खरी गोष्ट अशी आहे कीं चोराचीं पावलें चोरालाच ओळखतात व अशा लोकांचीं बिंगें बाहेर काढणें असेल तर जादूचे प्रयोग दाखवण्याचा ज्यांचा धंदा आहे अशाच लोकांस तें काम साधेल, व अशा लोकांनीं हें काम केलेंही आहे. इंग्लंडमधील प्रसिद्ध जादूगार मॅस्केलीन यांनीं असें जाहीर केलें होतें कीं कोणाही मध्यस्थानें अलौकिक शक्तीनें दाखवलेला कोणताही प्रयोग मी आठ दिवसांचे आंत करून दाखवीन, व न करतां आल्यास हजार पौंड बक्षीस देईन. हें बक्षीस ते मरेपर्यंत कोणासही मिळालें नाहीं. इतर देशांतही अशींच बक्षिसें लावलीं होतीं, व तेथें ही हीच स्थिती झाली. यावर भुतांनीं पछाडलेले अनुयायी असें उत्तर देतात कीं जादूगार ज्या गोष्टी फसवणुकीनें करूं शकतात, त्याच मध्यस्थ अलौकिक शक्तीनें करीत नसतील कशावरून ? थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, आम्ही विश्वास ठेवणार, तुम्ही कांहींही म्हणा.

यांत आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची म्हणजे या मध्यस्थांस कोणतीही गोष्ट भर उजेडांत करतां येत नाहीं. यांस अंधार लागतो, व त्यांचा खेळ चालू असतां कोणी उजेड करतां कामा नये अशी त्यांची अट असते; अर्थात धंदेवाल्या जादूगारांइतके हे कुशल नसतात. जादूगार जे चमत्कार उजेडांत दाखवतात तेच हे अंधारांत दाखवतात. असा एक चमत्कार म्हणजे, एका हातातावर चेंडू घेऊन, दुसरा हात त्याचेवर कांहीं अंतरावर धरून, खालच्या हातापासून वरच्यापर्यंत तो चेंडू कांहीं आधाराशिवाय चढतो असें भासवणें. असा एक चमत्कार चालला असतां एका संशयी मनुष्यानें विजेचा दिवा लावला. त्या प्रकाशांत त्या दोन हातांच्या मध्यें कांहीं दोऱ्या वगैरे दिसल्या व मध्यस्थाची पूर्ण फजीति झाली. तरीही तेथें ऋषींच्या जातीचे एक गृहस्थ होते, ते म्हणाले कीं त्या दोऱ्या सुद्धां अद्भुत शक्तीमुळेंच उत्पन्न झाल्या ! विश्वासाला औषध नाहीं.

या भुतांचें अस्तित्व शास्त्रीय पद्धतीनें सिद्ध झालें आहे असें एकाही शास्त्रज्ञानें—सर ऑलिव्हर लॅाज यांनींसुद्धां—म्हटलेलें नाहीं. आम्हांस भुतें आहेत असें वाटतें असें म्हणणाऱ्या कांहींचीं नांवें रा. ऋषींनीं दिलीं आहेत. त्याच्या

उलट मताच्या शास्त्रज्ञांची यादी त्याच्या सहस्रपट लांब होईल, व ऋषींनीं दिलेलीं नांवें सर्वांत मोठीं आहेत असेंही नाहीं.

फ्लॅमॅरिऑं नांवाच्या एका फ्रेंच शास्त्रज्ञाचा भुतांवर विश्वास असे, त्यांनीं खालील हकीकत स्वतः दिली आहेः—' शनीला आठ उपग्रह आहेत असें मला भुतें नेहमीं सांगत असत. नंतर आणखी उपग्रहांचा शोध लागला, तेव्हां माझी खात्री झाली कीं भुतें सांगत असें मला वाटत असे, परंतु तें माझें स्वतःचेंच ज्ञान होतें.' परंतु इतक्यानेंही त्यांची विश्वास ठेवण्याची खोड गेली नाहीं. फ्रेंच प्रोफेसर रिशे यांचें नांव श्री. ऋषि पुढे करतात परंतु त्यांनीं ' ३० वर्षांच्या अनुभवावरून मला यांत कांहीं तथ्य दिसत नाहीं ' असें जाहीर केलें आहे !

मध्यस्थांनीं आणलेल्या निरोपांची मजल त्यांच्या स्वतःच्या अकलेपलीकडे जात नाहीं व त्यांनीं आजपर्यंत कोणताही नवीन शोध लावलेला नाहीं. व्हिक्टर ह्यूगो नामक प्रसिद्ध फ्रेंच लेखकाच्या घरीं भुताटकीच्या बैठकी होत असत, तेथें एकदां अंद्रोक्लीजाच्या सिंहाचें भूत ( भुतानें स्वतः सांगितलेलें नाव ) येऊन कविता सांगूं लागलें. या कविता त्या लेखकाच्या कवितांशीं तंतोतंत जुळतात ! तेथें शेक्सपिअर, मोलिअर, येशु ख्रिस्त वगैरे निरनिराळ्या प्रसिद्ध पुरुषांचीं भुतें येऊन तीं सर्व व्हिक्टर ह्यूगोच्याच भाषेंत बोलत !

वाचकांस शेवटीं एक इशारा दिला पाहिजे. भुतांकडून निरोप आणणारे मध्यस्थ व त्यांच्यावर विश्वास ठेवणारे त्यांचे अनुयायी या दोघांसही पुष्कळ वेळां मज्जातंतूंचे विकार होतात. मध्यस्थ नेहमींच लुच्चेगिरी करतात असें नाहीं, कधीं कधीं त्यांसच भ्रम होऊन ते बरळूं लागतात व तें त्यांचें बरळणें हेच भुतांचे विचार असें त्यांच्या अनुयायांस वाटतें. भुतें अंगांत येतात हा विश्वास जुना आहे, परंतु पाहिजे त्या खऱ्या किंवा काल्पनिक मनुष्याचें किंवा जनावराचें भूत अंगांत आणतां येतें ही कल्पना नवीन आहे. परंतु या गोष्टींवर विश्वास ठेवणारे केवळ वेडगळ असतात इतकेंच नव्हे तर रोगी असतात, व त्यांस पुष्कळ वेळां वेडही लागतें. भ्रमिष्ट मध्यस्थांनीं भुतांस घाबरून लिहिलेलीं पत्रें एका फ्रेंच पुस्तकांत प्रसिद्ध केलीं आहेत. मध्यस्थ पुष्कळ वेळां स्त्रिया असतात, कारण अंगांत येणें वगैरे प्रकार स्त्रियांसच फार होतात. केवळ जिज्ञासेनें अशा बैठकींस जाऊं लागून नंतर त्यांवर विश्वास बसून पुढें वेड लागल्याचीं उदाहरणें आहेत. अशा अनुयायांपैकींच एकानें लिहिलें आहे कीं या नादीं

लागणारे लोक भुतांच्या तावडींत सांपडतात व हीं भुतें पुष्कळ वेळां द्वाड असल्यामुळे तीं आपणास मारतील, वेड लावतील किंवा इतर रोग उत्पन्न करतील हें विसरतां कामा नये. लँब्रोझो नांवाचा एक विद्वान मनुष्य अशा एका बैठकीनंतर आपल्या मित्रांस म्हणालाः—मला आतां येथून जाऊं द्या. मला विश्रांति घेतली पाहिजे, नाहींतर मला वेड लागेल. कित्येक प्रसिद्ध मध्यस्थांस व त्यांच्या अनुयायांस वेड लागून ते मेलेले आहेत ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

रा. ऋषींच्या भुताटकीच्या बैठकींस जाण्याची ज्यांस जिज्ञासा होईल, त्यांनीं ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

---

# आमच्याबद्दल लोकमत.

१

रियासतकार श्री. गो. स. सरदेसाई लिहितातः-समाजस्वास्थ्याचा दुसरा अंक बाहेर आलेला पाहिला. पहिल्या अंकापेक्षां यांत पुष्कळच चांगली सुधारणा झाली आहे हें पाहून मला समाधान वाटतें. श्री. कर्वे यांनीं स्वीकारलेला हा विषय राष्ट्रीय दृष्ट्या बिलकूल हेटाळणी करण्याजोगा नाहीं. कोणताही विकार गुप्त ठेवल्यानें तो बरा होऊं शकणार नाहीं. तत्संबंधीं शास्त्रीय माहिती घेऊन तदनुसार समाजसुधारणेचे इलाज केले तरच हल्लींच्या पाश्चात्य धर्तीच्या प्रखर जीवनकलहांत आपला निभाव लागेल असें माझें निश्चित मत आहे.

११-९-२७. **गो. स. सरदेसाई.**

२

आपला प्रयत्न फार अभिनंदनीय व स्तुत्य आहे. आपणास त्यांत यश यावें अशी इच्छा आहे. मजकूर आणि आकार वाढविल्यास वर्गणी अधिक देण्यास लोक तयार होतील असें वाटतें. आपला अनुभव काय असेल तो खरा.

सातारा, १५-९-२७ **एक वाचक.**

३

येथील 'बॉम्बे क्रॉनिकल' पत्रानें आमच्यावर थोडीशी टीका केली आहे. कांहीं लोक संततिनियमनाचे विरुद्ध आहेत त्यांची खात्री केल्याशिवाय आम्हीं त्यासंबंधीं माहिती वगैरे देऊं नये असें त्यांचें मत आहे. आम्हांस तसें वाटत नाहीं.

# मुलें कोणाला व्हावीत ?

लेखक:–' **गुरुकिल्ली** '

१. ज्या स्त्रियांचें शरीर निरोगी असून त्याची वाढ पूर्ण झालेली आहे अशाच स्त्रियांना मुलें व्हावींत. ही वयोमर्यादा निदान वीस वर्षांची तरी असावी.

२. ज्या स्त्रियांना मुलांचें संगोपन कसें करावें हें माहीत आहे व तें करण्याची हौसही आहे त्यांनाच मुलें व्हावींत. बालसंगोपन हा एक शास्त्रीय विषय असून त्याचा अभ्यासच करावा लागतो.

३. ज्या स्त्रियांना मुलांना बाळगण्याची ऐपत असेल तेवढ्यांनाच मुलें व्हावींत नाहीं तर गरीबीमुळें कोंबडीच्या खुराड्यांत राहिल्याप्रमाणें दाटीनें राहून जी बाई आपल्या तोंडच्या भाकरीचा अर्धा तुकडा आपल्या मुलाला चारते तिची व तिच्या मुलांची शरीरसंपत्ती कितीशा योग्यतेची असणार ! केवळ मायेनें अन्नाची पुष्टता भरून येत नाहीं.

---

# मुलें कोणाला होऊं नयेत ?

लेखक:—' **गुरुकिल्ली** '

१. ज्या स्त्रियांच्या शरीराची वाढ निदान वीस वर्षांची तरी झालेली नाहीं अशांना मुलें होऊं नयेत. याचें कारण अगदीं कोंवळ्या वयांत स्त्रियांना होणारीं मुलें अत्यंत अशक्त अशीं असतात व पुढें तीं रोगट बनतात. दुसरें असें कीं, लहान वयांत मुलींची प्रवृत्ति खेळण्याकडे विशेष असते व त्यामुळें मुलाचें संगोपन करण्याची जबाबदारी त्यांना झेंपत नाहीं. त्याचप्रमाणें ज्या स्त्रिया मुळांत अशक्त आहेत त्यांना आपले रोजचे व्यवहार कसे तरी भागवावे लागतात. अशा स्त्रियांना नऊ महिनेपर्यंत मुलाचें ओझें आंगावर बाळगण्याचे कष्ट देऊन, बाळंतपणाच्या यातना सहन करविल्यानंतर, मुलाच्या संगोपनाची शिक्षा त्यांच्यावर लादली म्हणजे त्यांना लवकरच क्षय होऊन त्यांच्या रोगट शरीरांत राहण्याला कंटाळलेला त्यांचा जीव तेथून निघून जातो. अशीं अनेक उदाहरणें आमच्या पाहण्यांत आहेत. याशिवाय, स्त्रियांना काळिजाचे, फुप्पुसाचे, हातापायांना सुज आणणारे मूत्रपिंडाचे असे कठीण विकार झालेले असतील अथवा ज्या स्त्रियांच्या कंबरेचा भाग लहान असेल अशांना मुलें होऊं

नयेत. नाहींतर त्यांना बाळंतपणाचे वेळीं व नंतर अनेक प्रकारच्या यातना भोगून मरणाशिवाय गत्यंतर रहात नाहीं.

२. बालसंगोपन हा विषय प्रत्येक स्त्रीनें आपल्याला मूल होण्याचे अगोदर शिकून ठेवावा. तान्ह्या मुलाला प्रत्येक वेळीं व एका सबंध दिवसांत दूध किती लागतें, त्याला झोंप किती असावी, तें रडूं लागलें तर त्याचीं कारणें काय असावींत इ० विषयींची पूर्ण माहिती असावी. असल्या ज्ञानाच्या अभावीं मुलांना कांहीं तरी विकार होतो आणि मग तीं मृत्युमुखीं पडतात. दूध अधिक पाजल्यामुळें पोट फुगून मेलेलीं मुलें आमच्या पाहण्यांत आहेत.

३. 'सांपत्तिक गरीबी' याचा अर्थ पुरेसें अन्न वस्त्र न मिळणें असा आहे. अशा गरीब स्त्रियांनीं मुलांची हाव धरूं नये. कारण त्यामुळें दोघांची उपासमार होते. अशा परिस्थितींत वाढणारें शरीर निरोगी व सशक्त असणें शक्य नाहीं. यामुळें वरचेवर उद्भवणाऱ्या रोगांच्या सांथींत अशा नालायक माणसांची संख्या कमी करण्याकरितां त्यांची मृत्युमुखी योजना केली जाते.

४. ज्या स्त्रियांना स्वभावतः विद्याभ्यासाची गोडी असून त्यांत त्यांची गतीहि आहे परंतु मुलांबाळांकडे पहावयास फुरसत होत नाहीं अथवा त्यांची मनापासुन आवड नाहीं अशा स्त्रियांच्या मागें पोरांचा लकडा लावून देणें म्हणजे केवळ अन्याय होईल; शिवाय त्या मुलांना व स्त्रियांना सुख लागणार नाहीं तें वेगळेंच.

**एक वाचक**–अहो लेखक, अगदीं तुमच्या सांगण्याप्रमाणें आम्हांला मुलें व्हावींत आणि होऊं नयेत असें वाटतें परंतु ती गोष्ट आपल्या हातची का आहे ? कां स्त्री पुरुषांचे विवाहच बंद करावेत असें तुमचें मत आहे ?

**उत्तर**–विवाह आणि संतति, वंशवृद्धीचें खूळ, इ० विषयावर आपण पुढें एक वेळ चर्चा करूं. तुम्हांला मुलें पाहिजे असतील तर योग्य डाक्तराची सल्ला घ्या, आणि मुलें व्हावयास नको असतील तर खालील पत्त्यावर चौकशी करा.

**राइट एजन्सी**, २० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.

---

# ताजी व शिळी बातमी.

गेल्या एप्रिल महिन्यांत पॅरिस् शहरीं एका जत्रेंत एक १५ वर्षांचा राक्षसी मुलगा प्रदर्शनास ठेवला होता. याचें वजन ३७४ पौंड होतें, कमरेचा घेर ६५ इंच, दंडाचा २३, मांडीचा ३६ व पोटरीचा २२ इंच होता; व दोन खांद्यांतील अंतर तीन फूट होतें !

तेथील वर्तमानपत्रांनीं त्याचे फोटो प्रसिद्ध करून रकाने खरडले, परंतु एकाच्याही डोक्यांत असें लिहिण्याचें आलें नाहीं कीं हें आरोग्याचें लक्षण नव्हे.

× × × ×

यूरोपांत लिथ्युअनिया येथील सरकारनें ' सोळाव्या शतकांतील विल्यम् शेक्सपिअर नांवाच्या एका नाटककाराच्या कविता कोणीं वाचूं नये, असा फर्मान काढला आहे. त्याचबरोबर ऑस्कार् वाइल्ड् व रवींद्रनाथ टागोर यांसही बहिष्कार घातला आहे. याचें कारण देतांना या ग्रंथकारांच्या लेखांमुळें अनीति वाढण्याचा संभव आहे असं विधान केलें आहे. आतां आमच्या लेखांस कोणीं असेंच दूषण दिल्यास आम्हांस फारसें वाईट वाटणार नाहीं !

× × × ×

स्पेन देशांत बार्सिलोना यथील एका डॉक्टरानें मोतीबिंदु बरा करण्याची एक नवीन पद्धत काढली आहे. याकरतां नेहमीं शस्त्रक्रीयेनें डोळ्यांतील जो भाग काढून टाकतात तो काढण्याची यांची रीत नवीन आहे. वाताकर्षक यंत्राच्या पद्धतीवर त्यांनीं एक यंत्र तयार केलें आहे, व त्यानें डोळयांतील हा भाग शोषणानें बाहेर काढतां येतो. यामुळें डोळ्यांतील इतर भागांस धक्का लागण्याचा संभव रहात नाहीं व दृष्टी साफ बरी होते. या डॉक्टराकडून ज्यांचा मोतीबिंदु साफ बरा झाला नाहीं अशा रोग्यांचें प्रमाण हजारांत तीन असें पडतें.

× × × ×

सातारा जिल्ह्यांतील धोंडी कुशाबा ठोमरे नांवाच्या एका धनगरानें गेल्या मार्च २३ तारखेस आपल्या बायकोचा खून केला. त्याच्या कबुलीवरून असें दिसतें कीं त्यानें आदल्या दिवशीं बायकोला जत्रेला जाऊं न दिल्यामुळें ती त्याजवर रागावली होती. तेवीस तारखेस रात्रीं तो एका लग्नाहून परत आला

तेव्हां ती मेंढरांच्या कळपाजवळ जमीनीवर निजली होती. तो जवळ गेला तेव्हां ती रागावलेली असल्यामुळें तिनें त्याचें न ऐकतां त्याला लाथ मारली. त्यावरून संतापून त्यानें तिचा खून केला.

तिनें लाथ मारली असें धरून चाललें तरी खून करण्याइतकें संतापण्यास हें कारण पुरेसें नाहीं असें वाटून सेशन जज्जानें त्यास फांशीची शिक्षा दिली. त्यावर हायकोर्टाकडे अपील केलें होतें पण तें काढून टाकलें.

\+ + + +

येसा यल्लप्पा चव्हाण नांवाची एक १८ वर्षांची मुलगी पुण्यास आपल्या एका नातेवाइकाच्या शोधांत असतां सायंकाळीं तिला सोनू अडवा नांवाची एक कुंटीण भेटली व तिनें तिला धर्मशाळा कोठें आहे असें विचारलें. कुंटीणीनें तिला आपल्या वेश्यागृहांत नेऊन तेथें ठेवून घेतलें. तेथें तिच्या मर्जीविरुद्ध कांहीं पुरुष तिच्याकडे पाठवले, व नंतर तिला एका खोलींत ढकलून दिलें. तेथें एक मराठा बसलेला पाहून तिनें आरडा ओरड केली, तें शेजारच्या एका पारशी बाईनें ऐकिलें, व नंतर पोलिसनें तिला सोडवलें.

हायकोर्टांत त्या कुंटिणीवर बळजबरीस मदत केल्याचा आरोप शाबीत होऊन तिला ४ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली.

\+ + + +

सुमारें ४ वर्षांपूर्वी रामा नारायण नांवाच्या एका मनुष्यानें कलावती नांवाच्या एका सात आठ वर्षांच्या मुलीशीं लग्न केलें. गेल्या दिवाळींत ती इंगोली येथें आपल्या आईस भेटावयास गेली, तेव्हां आपणास नवऱ्याकडून अतिशय त्रास होतो असें सांगितल्यावरून आईनें तिला ठेवून घेतली. परंतु नवरा फिरून त्रास देणार नाहीं असें सासऱ्यानें आश्वासन दिल्यावरून तिला कांहीं दिवसांनीं परत पाठविली.

पुनः नवरा त्रास देऊं लागल्यावरून तिनें अन्न सोडलें. हें पाहून गेल्या एप्रिलच्या २९ तारखेस त्याच्या बापानें व कांहीं मित्रांनीं त्याला खूप झाडला. त्यावरून संतापून त्यानें एक फावडें घेऊन बायकोच्या डोक्यांत घातलें, व त्याच रात्रीं ती मेली. सोलापूर येथील सेशन जज्जानें त्याला १० वर्षें सक्त मजुरीची शिक्षा दिली.

\+ + + +

पूर्व खानदेशांत जळगांव येथील विजयसिंग अमरसिंग नांवाच्या एका ३० वर्षे वयाच्या रजपुताची तानीबाई नांवाची एक रखेली होती. गेल्या जानेवारीच्या २५ तारखेस तिचें घराच्या मालकिणीशीं भांडण होऊन तानीबाई तिला शिव्या देऊं लागली. विजयसिंगानें तिला ताकीद केली असतांही ती शिव्या देत राहिली हें पाहून त्यानें तलवारीनें तिची मान कापली. पूर्व खानदेशच्या सेशन जज्जानें त्यास जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा दिली.

× × × ×

स्त्रीनें पतीला देव मानलें पाहिजे या अत्यंत हिंदु कल्पनेचे वरील खून परिणाम होत. ही कल्पना पुरुषांनीं स्त्रियांवर लादली आहे, परंतु ती हिंदु स्त्रियांस स्वतःचीच आहे असें वाटतें. नवरा कितीही वाईट असला तरी त्याचें पादतीर्थ घेतलें पाहिजे ही कल्पना समाजांत इतके दिवस खिळली आहे कीं पुरुष त्यामुळें स्वतःलाच आपल्या बायकांचे देव समजूं लागतात व त्यामुळें असे प्रकार घडतात, परंतु कोर्ट त्यांना देव समजत नाहीं हें त्यांचें दुर्दैव आहे. स्त्रिया म्हणजे एक नीच जातीचा प्राणी आहे व त्याचें काम आज्ञेप्रमाणें वागणें, ही कल्पना जाऊन स्त्रियांस मित्रत्वाच्या नात्यानें वागवलें पाहिजे ही कल्पना जेव्हां रूढ होईल, तेव्हां असे राक्षसी प्रकार बंद होतील.

युरोपांत ख्रिस्ती पद्धतीनें लग्न झाल्यास लग्नाचे वेळीं स्त्रीकडून नवऱ्याची आज्ञा पाळण्याबद्दल कबुली जबाब घेत असत, परंतु हल्लीं तो भाग त्यांतून काढून टाकला आहे. एक दुसऱ्याचा नोकर नसतांही ज्याप्रमाणें दोन मित्र एके ठिकाणीं राहूं शकतात, त्याचप्रमाणें नवराबायकोस कां राहतां येऊं नये ? राहतां येण्यास एकाच गोष्टीची जरूर आहे. ती ही कीं, ज्या दिवशीं दोघांचें पटत नाहीं असें वाटेल त्या दिवशीं दोघांसही आपापल्या वाटेनें जातां आलें पाहिजे. परंतु असें होण्याचे अगोदर स्त्रियांस आपल्या पायांवर उभें राहतां आलें पाहिजे. म्हणजे लग्न हा स्त्रियांचा पोट भरण्याचा धंदा असतां कामा नये. खुषी असेल तर लग्न करावें नाहीं तर अविवाहित रहावें असे दोन्ही मार्ग मोकळे असले पाहिजेत. परंतु इतकी ताकद आज किती स्त्रियांचे अंगांत आहे ?

\+ \+ \+ \+

रावजी धनजी मोची नांवाचा एक मनुष्य कांहीं दिवसांपूर्वी धुळ्याहून आपल्या तारा नांवाच्या अज्ञान बायकोला घेऊन मुंबईस येऊन माधवबागचे धर्मशाळेंत राहिला. तेंथ त्याला लक्ष्मी नांवाची एक कुंटीण भेटली व तिनें त्यांस कामाठीपुरा १४व्या गल्लींत आपले घरीं रहावयास नेलें. तिच्या सांगण्यावरून तारा वेश्येचा धंदा करूं लागून रोज दोन तीन रुपये मिळत त्यांपैकीं कांहीं लक्ष्मीस देऊन राहिलेल्या पैशात आपलें व आपल्या नवऱ्याचें पोट भरीत असे. नवऱ्याला हा मार्ग बरा वाटून त्यानें एका महिन्यानें आपली दुसरी अज्ञान बायको जानकी हिलाही आणून त्याच धंद्यांत घातली.

त्यांचा घरवाला हाजी कासम यानें त्या बायकांचें लहान वय पाहून नवऱ्यास व लक्ष्मीस हे कृत्य बरें नाहीं असें सांगितलें. तें त्यांनीं ऐकिलें नाहीं व पोलिसानें त्यांस पकडलें, व मॅजिस्ट्रेटानें नवऱ्यास दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली. त्यावर केलेलें अपील हायकोर्टानें काढून टाकलें.

अज्ञान बायका विकण्याचा अधिकार त्यांच्या नवऱ्यांस नसतो असें दिसतें.

---

# पुढील अंकीं.

१. व्हिटॅमिन् किंवा जीवनतत्त्वें.

२. शेतकी व मानवी प्रदर्शन. ( लेखक–गुरुकिल्ली )

३. ग्रंथ परीक्षण:—बाहेरख्यालीचे दुष्परिणाम. ( गुरुकिल्ली )

# समाजस्वास्थ्य




वर्ष १ ] सप्टेंबर १९२७ [ अंक ३

संपादक--र. धों. कर्वे.

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| १. वेश्या व गुप्तरोग ... ... ... | १ |
| २. संततिनियमनाची एक दशा ... ... | ८ |
| ३. सॉव्हिएट् राज्यांतील विवाहाचा कायदा. ... | १० |
| ४. बोबडे बोल. ... ... ... ... | १३ |
| ५. या मासिकाबद्दल लोकमत. ... ... | १४ |
| ६. नवीन लेखांतील निवडक विचार. ... ... | १६ |
| ७. धार्मिक वेड. ... ... ... ... | १८ |
| ८. ताजी व शिळी बातमी. ... ... ... | १९ |



**उच्चदर्जाचें व उच्च ध्येयाचें मनोरंजक पण भारदस्त व प्रगतिप्रिय असें**

**स्त्रियांचें सर्वांगसुन्दर मासिक.**

# गृहलक्ष्मी

सम्पादिका— **तारा टिळक**, बी. ए.

**फिरोज आनन्दकर**, बी. ए.

[ वार्षिक वर्गणी ट. ख. सह फक्त ३॥ साडेतीन रुपये. ]

**प्रत्येक १५ व्या तारखेस प्रसिद्ध होतें.**

स्त्रियांना उपयुक्त व आवडतील अशा सर्व विषयांवर विद्वान् अधिकारी लेखिकांचे व लेखकांचे लेख " **गृहलक्ष्मी** " मध्यें असतात.

तीन रंगी मुखपृष्ठ, तीन रंगी दर्शनी चित्र व आर्टपेपरवरील अनेक फोटो प्रत्येक अंकांत असतात.

**' गृहलक्ष्मी ' कार्यालय,**

**खटाव भुवन, मुम्बई ४.**

# वेश्या व गुप्तरोग.

पॅरिस येथील उच्च सामाजिक शिक्षणसंस्थेंत वरील विषयावर डॉ. लुई केरा यांचे २४ मार्च १९२७ रोजीं व्याख्यान झालें. त्याचा सारांश पुढें दिला आहे. यासंबंधानें आमचें मत सविस्तर देणें आहे, तेव्हां तें वाचकांस समजेलच. डॉ. केरा म्हणाले:—

'गुप्त रोगांच्या प्रतिबंधाचे दृष्टीनें वेश्यांच्या धंद्यासंबंधीं कायदे करावे कीं नाहीं व केल्यास ते कसे असावे, हा हल्लींच्या बिकट प्रश्नांपैकीं एक आहे.

'या विषयाची मला फार दिवसांची माहिती आहे, माझें यासंबंधीं पुष्कळ वाचन व प्रत्यक्ष अवलोकनही आहे तरीही, हा विषय मी जरूर तसा आपणांपुढें मांडूं शकेन कीं नाहीं याची मला शंका आहे. याचा निःपक्षपातानें विचार केला पाहिजे, कारण कोणत्याही चालू पद्धतीला दोष देणें सोपें असतें, परंतु त्यांत सुधारणा करणें सोपें नसतें.

'कोलंबसाबरोबर अमेरिकेंत गेलेल्या लोकांनीं जेव्हां १४९३ सालीं गर्मीचा रोग आपल्याबरोबर परत आणला,* तेव्हां तो तावडतोब सर्वत्र पसरला व विशेषतः १४९३–९५ चे लढाईमुळें तो पसरण्यास मदत झाली.

'हल्लीं गर्मी कितीही भयंकर वाटो, त्या वेळच्या रोगाची कल्पनाही त्यावरून येणार नाहीं. त्या वेळीं त्यावर कोणताही उपचार माहीत नव्हता, व रोग्यांच्या सर्व शरीरावर भयंकर व्रण पडून, डोळे, नाक, व कधीं कधीं हाडेंसुद्धां या रोगानें खाल्ल्यामुळें रोग्यांची सर्वांस भीति वाटून त्यांजवळ कोणी बोलत नसे व त्यांजकडे पहावतही नसे. प्लेगच्या रोग्यांप्रमाणें ते रस्त्यांत किंवा शेतांत मरून पडत असत. परंतु लोक इतके भिऊन दूर रहात असतांही रोग पसरतच गेला.

---

*याबद्दल मतभेद आहे. कित्येक तज्ज्ञांचे मतें हा रोग प्राचीन काळीं चीन देशांत होता असा पुरावा सांपडतो [ संपादक ].

'शेवटीं १४९६ मध्यें या रोगासंबंधीं पॅरिस शहरांत पहिला कायदा झाला. तो असाः— "कोणींही रोग्यानें रोग बरा झाल्याशिवाय घराबाहेर पडतां कामा नये. विदेशी रोग्यांनीं २४ तासांचे आंत निघून गेलें पाहिजे, नाहींतर फांशीची शिक्षा होईल. गरीब रोग्यांकरतां गांवाबाहेर जागा ठेवली आहे तेथें त्यांनीं राहिलें पाहिजे.' रोग संसर्गजन्य आहे यापलीकडे कांहींच माहीत नसल्यामुळें इतकेंही करून तो थांबेना. तेव्हां १४९८ मध्यें "कायदा मोडणारांस नदींत फेंकून दिलें जाईल" असा हुकूम सुटला. तरीही रोग्यांची संख्या इतकी वाढली कीं बाहेर नेमलेली जागा भरून गेली. अशा रोग्यांकरतां एक इस्पितळ नेमून दिलें व तेथें दोनशें वर्षेपर्यंत त्यांची सोय होत असे. ही सोय म्हणजे आरंभीं कांहीं फटके मारून नंतर कांहीं दिवसांनीं पुनः फटके मारून त्यांस हांकून देणें, इतकीच असे. उपचाराचें नांव नसे.

'त्यानंतरचे सर्व कायदे हे रोग पसरणाऱ्या पुरुषांचें नांव न काढतां केवळ वेश्यांस मात्र अनुलक्षून केले आहेत. हल्लीं येथें (पॅरिसमध्यें) अंमलांत असलेले कायदे अशाच प्रकारचे आहेत.

'रस्त्यांत स्त्रियांचे वागणुकीवर लक्ष ठेवण्याकरतां पोलीसचे साधा पोषाख केलेले लोक ठेवलेले असतात. येथें इतकें सांगणें जरूर आहे कीं फ्रान्समध्यें वेश्यावृत्ति हा गुन्हा नाहीं. आपल्या शरीराचा हवा तसा उपयोग किंवा दुरुपयोग करण्याचा प्रत्येकाला हक्क असतो व त्या हक्कांतच वेश्यावृत्तीचा समावेश होतो. यास एकच अपवाद म्हणजे १८ वर्षांचे आंतील लोक. परंतु अव्यस्थित वागणुकीमुळें जर शहरांतील शिस्त बिघडूं लागली, किंवा संसर्गजन्य रोगांचा प्रसार होऊं लागला, तर मात्र त्या कायद्याखालीं येतात, व त्यांवर देखरेख ठेवणें भाग पडतें. ही पद्धत येथें कशी काय अंमलांत येते तें पाहूं.

'एखादी स्त्री बऱ्याच वेळां रस्त्यांत पुरुषांस गांठून त्यांस मोह घालण्याचा प्रयत्न करते असें दिसून आल्यामुळें ती वेश्येचा धंदा करते असें नक्की वाटल्यास वर सांगितलेले पोलीसचे लोक त्यांस पकडून एका सरकारी दवाखान्यांत पाठवतात. तेथील अधिकाऱ्यानें तिला प्रश्न विचारून त्याची

खात्री झाल्यास तेथील डॉक्टर तिला तपासतो, व तपासणीची नोंद ठेवतो. ती निरोगी असल्यास तिला सोडून देतात.

'तिला एखादा गरमी, परमा वगैरे संसर्गजन्य रोग असल्यास उपचाराकरतां इस्पितळांत पाठवतात. तिच्यापासून संसर्ग होण्याचा संभव नाहीं असें झाल्यावर तिला सोडून देतात.

'अशा स्त्रीचें वय १८ वर्षें किंवा कमी असल्यास तिला आईबापांकडे पाठवतात, किंवा आईबाप नसल्यास बालगुन्हेगारांकरतां वेगळी शाळा असते तेथें पाठवतात, व वयांत येईपर्यंत [ २१ वर्षापर्यंत ] तेथें ठेवतात.

'अशा तऱ्हेनें एखाद्या स्त्रीला बऱ्याच वेळां पकडून नेल्यास ती नेहमीं वेश्यावृत्तीनेंच राहते असें ठरून तिच्या नांवाची नोंद करून तिला एक तिकीट देतात. [ हें तिकीट असल्यास विशेष गैरशिस्त वागणूक झाल्याशिवाय पोलीस पकडून नेत नाहीं.—सं ]

'हीं तिकिटें दोन प्रकारचीं असतात. गर्मी झालेल्या वेश्यांस तांबडें तिकीट मिळतें व त्यांस दर आठवड्यास तपासणीकरतां दवाखान्यांत जावें लागतें.

'गर्मी न झालेल्या स्त्रियांस पांढरें तिकीट देतात व त्यांस दर १५ दिवसांनीं तपासणीकरतां जावें लागतें. पन्नास वर्षांपेक्षां अधिक वयाच्या वेश्यांस महिन्यांतून एकदांच तपासणी असते. इतक्या वयांत सुद्धां धंदा चालू ठेवणाऱ्या वेश्या पुष्कळ असतात. चवदाव्या वर्षीं धंदा सुरू करून ७५ वर्षांच्या वयांतही तो सतत चालू ठेवणाऱ्या वेश्येचें उदाहरण मला दवाखान्यांत समजलें.

'पॅरिसमध्यें नोंद केलेल्या वेश्या ७००० आहेत. त्या नेमलेल्या दिवशीं तपासणीस जातात कीं नाहीं हें त्यांच्या तिकिटांवरून समजतें. त्यावर त्यांचें नांव, जन्माची तारीख व ठिकाण व तपासणीकरतां नेमलेल्या तारखा असतात. ज्या तारखेस तपासणी झाली त्या तारखेसमोर छाप मारलेला असतो. वेश्येचा फोटो लावण्याकरतां तिकिटावर जागा राखून ठेवलेली असते व तो लावला पाहिजे असा नियम असे परंतु अलीकडे तो नियम रद्द झाला आहे. ही मोठी चूक आहे, कारण आता अमूक स्त्रीचेंच हें तिकीट आहे हें समजण्यास मार्ग नाहीं.

'गर्मी असलेल्या वेश्यांस सुद्धां धंदा चालू ठेवण्याचा हक्क राहतो हें ऐकून तुम्हांस आश्चर्य वाटेल. [ गर्मी तपासणीचे वेळीं न समजल्यास असें होईल परंतु त्यास 'हक्क राहतो' म्हणणें चूक आहे.–सं. ] या वेश्यांची आठ दिवसांनीं तपासणी होते हें खरें, परंतु ती अर्थातच विशेष काळजीपूर्वक न झाल्यामुळें बारीक सारीक व्रण लक्षांत येत नाहींत, परंतु त्यांनीं संसर्ग होऊं शकतो. वास्तवीक रोग्याचें रक्त तपासलें पाहिजे, परंतु तें क्वचितच होतें. अशा तपासणीनंतर वेश्यांकडे जाण्यांत धोका नाहीं असें समजणें किती चुकीचें आहे, हें यावरून तुमच्या लक्षांत येईल. तांबड्या तिकिटाच्या वेश्यांकडून संसर्ग होऊन इस्पितळांत आलेल्या कांहीं लोकांचीं उदाहरणें मी प्रसिद्ध केलीं आहेत.

'ऋतुमानाप्रमाणें [ पॅरिस येथें हिंवाळयांत ३ वाजतां व उन्हाळयांत ९ वाजतां सूर्यास्त होतो.—सं. ] या वेश्यांस संध्याकाळीं ७ किंवा ९ वाजण्याचे आधीं व मध्यरात्रीनंतर, रस्त्यांत गिऱ्हाईक गांठण्याची सक्त मनाई आहे. विशेषत: आगगाडीचीं स्टेशनें, शाळा, देवळें, मोठे रस्ते, चौक किंवा सार्वजनिक बगीचे यांच्या आसपास हिंडण्याची त्यांस परवानगी नाहीं.

'वर सांगितल्याप्रमाणें रस्त्यांत पोलिसानें पकडलेल्या किंवा तिकीट घेऊन तपासणीस येणाऱ्या वेश्यांखेरीज आणखी नोंदलेल्या वेश्यागृहांतील वेश्यांची तपासणी डॉक्टरांस करावी लागते. हीं वेश्यागृहें पॅरिस शहरांत व आसपासच्या गांवांत मिळून सुमारें ३० आहेत. या प्रत्येक गृहांत एक डॉक्टर दर आठवड्यास जाऊन तेथील वेश्यांस तपासतो, व कोणास रोग आहे असें दिसल्यास तिला दवाखान्यांत पाठवतो व तेथून तिची इस्पितळांत रवानगी होते.

'या गृहांत पांढऱ्या व तांबड्या तिकिटाच्या किंवा बिनतिकिटाच्या वेश्या असतात. बिनतिकिटाच्या वेश्यांस तेथें जाण्यापूर्वीं निरोगी असल्याबद्दल डॉक्टरचें सर्टिफिकीट् लागतें, व वय निदान २१ वर्षें असावें लागतें.

'याशिवाय पॅरिसमध्यें सुमारें २५० संकेतगृहें आहेत [ येथें वेश्या रहात नाहींत, फक्त धंद्यापुरत्या येतात.–सं. ] येथेंही आठवड्यांतून एकदां तपासणी होते व रोग्यांस इस्पितळांत पाठवलें पाहिजे असा नियम आहे, व प्रथम येणाऱ्या स्त्रीस डॉक्टरचें सर्टिफिकीट आणावें लागतें.

'याशिवाय येथें एक सरकारी दवाखाना आहे तेथें इस्पितळांतून सोडलेल्या वेश्यांस व इतर कोणत्याही स्त्रीपुरुषांस फुकट उपचार केला जातो.

'इतकी सरकारी व्यवस्था आहे खरी, परंतु तिच्या अंमलबजावणींत पुष्कळ दोष आहेत. पोलिसानें प्रथम पकडलेल्या स्त्रीस गर्मी असली तरी तिची वेश्या म्हणून नोंद होत नाहीं. दुसऱ्या किंवा तिसऱ्या वेळीं पकडल्यास तिची नोंद होते. यामुळें गर्मी असलेल्या कांहीं स्त्रियांस धंदा करण्याची मोकळीक मिळते. [ हें सर्वैथैव खरें नाहीं. प्रथम तपासणीचे वेळींही तिला इस्पितळांत पाठवून संसर्गाचा संभव नाहींसा झाल्यावर तिला सोडतात असें व्याख्यात्यांनींच वर सांगितलें आहे—सं.], व यामुळें समाजास मोठा धोका आहे.

'तपासणीचे वेळीं ज्यांचे शरीरावर गर्मीचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं त्यांस गर्मी नाहीं असें समजून पांढरें तिकीट देतात, ही मोठी चूक आहे. अशा स्त्रियांच्या अंगांत सुद्धां गर्मीचे जंतु असूं शकतील व ते कधीं तरी शरीरावर व्रण उत्पन्न करतील व संसर्ग होऊं शकेल. याकरतां पांढऱ्या तिकिटाच्या स्त्रियांची अतिशय काळजीपूर्वक तपासणी केली पाहिजे इतकेंच नव्हे तर वारंवार त्यांचें रक्त घेऊन तपासलें पाहिजे. म्हणजे त्यांत पुष्कळ वेळां गर्मीचे जंतु सांपडतील यांत मला शंका नाहीं. या स्त्रियांस निरोगी समजून उपचार न करणें अतिशय धोक्याचें आहे.

'अंमलबजावणींत आणखी एक दोष. वास्तवीक पाहतां कोणत्याही वेश्यागृहांत किंवा संकेतगृहांत रोगी वेश्या सांपडल्यास तिला इस्पितळांत पाठविली पाहिजे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं अशा गृहांतील वेश्या आजारी असल्यास तपासणी चुकवतात. असें होतां कामा नये.

'शिवाय तपासणारे डॉक्टर या विषयांत तज्ज्ञ असले पाहिजेत व याकरितां सर्वांत लायक डॉक्टरांचीच नेमणूक अशा जागीं झाली पाहिजे. हल्लीं असलेले बहुतेक सर्व डॉक्टर लायक आहेत व ते नेकीनें काम करतात हें खरें तथापि सुमारें दहा डॉक्टरांची नेमणूक केवळ वशिल्यानें झालेली आहे. वशिल्यानें लायकी उत्पन्न होत नाहीं व विशेषतः अशा जागेवर नालायक लोकांस नेमणें म्हणजे रोगांचा प्रसार करणें आहे.

वशिल्याच्या पद्धतीमुळें आणखी एक दोष उत्पन्न झाला आहे तो असाः–मीं वर सांगितलेंच कीं संकेतगृहांत जाणाऱ्या स्त्रियास दर आठवडयास तपासणी असते. परंतु ज्यांची तपासणी वशिल्यामुळें कधींच होत नाहीं अशीं दोन तीन संकेतगृहें पॅरिस शहरांत आहेत. डॉक्टर नेमलेल्या वेळीं तेथें जातात, आपली फी घेतात, परंतु तेथील वेश्यांस तपासण्याची त्यांस परवानगी नसते. अशा ठिकाणीं बदली म्हणून एक नवीन, तरुण व इमानी डॉक्टर जाऊन त्यानें तपासण्याचा हट्ट धरला असतां तेथील मालकिणीनें त्यांस साफ मनाई केली. त्यानें वरील अधिकाऱ्यांस हा प्रकार कळवला, परंतु जास्त हट्ट धरूं नको व तक्रारीचा कांहीं उपयोग होणार नाहीं असें त्यास खाजगी उत्तर मिळालें.

'अशी स्थिति आहे तेथें नियमांचा उपयोग काय, व लोकसत्ताक राज्यांत अधिकाऱ्यांचा इतका उन्मत्तपणा लोक सहन कसे करतात ?

'आतां वैद्यक दृष्टीनें विचार करावयाचा असल्यास यासंबंधीं डॉ. बिझार यांनीं १९२२ सालीं काय लिहिलें आहे तें पहा. ते म्हणतातः–सरकारी दवाखान्यांत एका वर्षांत सुमारें १,००,००० तपासण्या होतात. त्या मानानें तपासणीस लागणाऱ्या सामानाची तरी तयारी असावयाची होती ! ती कोणास दाखवण्यास लाज वाटेल अशी आहे. खोल्या लहान आहेत. तपासणीच्या खोलींत दोन पलंग आहेत, परंतु दोन डॉक्टर एकदम तपासूं शकतील इतकी जागा नाहीं. चादरींच्या कमतरतेमुळें ५०० स्त्रियांची तपासणी एकाच चादरीवर होते. शस्त्रें साफ करण्याकरतां उकळण्याची सुद्धां व्यवस्था नीट नाहीं.'

'डॉ. बिझार यांनीं अशी तक्रार केल्यामुळें आतां पुष्कळ सुधारणा झाली आहे. स्पेक्युलम् [ योनिमार्ग तपासण्याकरतां हें यंत्र आंत घातल्यानें तो उघडून धरतां येतो.—सं. ] ची संख्या १८ होती ती आतां ३०० झाली आहे व इतर व्यवस्थाही पुष्कळ सुधारली आहे. मोठ्या खोल्या बांधण्याचें काम सुरू आहे. परंतु तेथें पाण्याची तोटी कां नाहीं असें मी विचारलें असतां ही चूक विस्मरणामुळें राहिली, परंतु ती दुरुस्त होईल असें आश्वासन मिळालें !

'संकेत गृहांसंबंधीं डॉ. बिझार यांनीं लिहिलें आहे कीं ज्या धंद्यांत आरोग्याचा संबंध विशेष येतो, त्याकरतां नवीन संकेतगृह उघडतांना तें आरो-

ग्याच्या दृष्टीनें योग्य आहे कीं नाहीं हें पाहण्याकरतां एकाद्या डॉक्टराचा सल्ला घ्यावा हीं कल्पना अजून अधिकाऱ्यांस सुचली नाहीं. जणूं काय आरोग्याचा व डॉक्टरांचा कांहीं संबंधच नाहीं !

' या गृहांत आणखी एक भयंकर गोष्ट दिसून येते ती अशी कीं येथें वेश्यांस मारण्याकरतां चाबूक ठेवलेले असतात. [ स्त्रियांस चाबूक मारून किंवा इतर रीतींनीं त्यांचे हाल केल्यानें कांहीं पुरुषांस समागमसुख मिळतें व इतर कोणत्याही रीतीनें मिळत नाहीं. असे पुरुष चाबूक मारून घेण्याकरतां वेश्यांस पैसे देऊन आपली हौस पूर्ण करून घेतात. अशाच प्रवृत्तीच्या कांहीं स्त्रियाही असतात.—सं.] चाबूक मारून घेण्याबद्दल ५० फ्रँक [ हल्लींच्या भावानें सुमारें ५॥ रु. ] घेऊन नंतर १५ दिवस अंथरूण धरावें लागलेली वेश्या मीं पाहिली आहे, असें डॉ. बिझार म्हणतात. व हा रानटीपणा पोलिसाच्या परवानगीनें चालतो !

' पोलीसचे लोक पुष्कळ वेळां वेश्यांशीं संकेत करून बडेजाव मिळवतात. अमुक वेश्येला १५ दिवस पर्यंत पोलिसानें कोणताही त्रास देऊं नये व नंतर तिनें नेमलेल्या ठिकाणीं हजर राहून पोलिसनें तिला पकडावें, म्हणजे त्या पोलिस अंमलदाराची कर्तबगारी दिसते. अर्थातच ती हजर न झाल्यास तो अंमलदार तिच्यावर सूड उगवतो. ( अपूर्ण )

---

# पुढील अंकीं

वेश्या व गुप्तरोग ( उत्तरार्ध ).
आफ्रिकेंतील कांहीं लोक.
आमचीं नाटकें.
मुंबईतील वेश्या.
श्री. कर्पीची भुताटकी.
मुलें कोणास व्हावीं ? } लेखक ' गुरुकिल्ली '.
मुलें कोणास होऊं नये ?

# संततिनियमनाची एक दिशा.

पुरुषांवर किंवा स्त्रियांवरही शस्त्रक्रिया करून त्यांची संगमाची इच्छा किंवा शक्ति कमी न होतां फक्त प्रजोत्पादनशक्ति नाहींशी करतां येते हें पुष्कळांस माहीत असेल [ नसल्यास आमचें 'संततिनियमन' पहा. ]. ज्यांस सुदृढ व निरोगी मुलें होणें शक्य नाहीं अशा स्त्रीपुरुषांनीं अशी शस्त्रक्रिया करून घेण्यास आपण होऊन तयार व्हावें हें समाजाच्या दृष्टीनें अर्थातच इष्ट आहे, व अशा रीतीनें कोणी तयार झाल्यास खर्चाशिवाय ही शस्त्रक्रिया करण्याची व्यवस्था समाजानें केली पाहिजे. परंतु समाजहिताची जाणीव फारच थोड्या लोकांस असते, व त्यांतून ज्यांस पुरें किंवा अर्धवट वेड लागलें आहे, अशा रोग्यांस अशा प्रकारची जाणीव असणें फारसें संभवत नाहीं, व अशा लोकांची संतति मात्र सुदृढ होण्याचा मुळींच संभव नसतो म्हटलें तरी चालेल. अशा स्थितींत या लोकांवर थोडासा जुलूम करण्याचा हक्क समाजास पोंचतो याबद्दल कोणासही फारशी शंका येणार नाहीं.

[ याशिवाय आणखीही कांहीं लोक शस्त्रक्रियेस पात्र होतील. अनावर कामवासनेमुळें किंवा निव्वळ आडदांडपणामुळें जे पुरुष स्त्रियांवर बलात्कारादि अत्याचार करतात त्यांवर थोडीशी निराळ्या प्रकारची शस्त्रक्रिया करून त्यांची समागमाची इच्छा व शक्तिही नाहींशी केल्यास त्यांपासून भीति राहणार नाहीं. ]

अमेरिकेंतील कॅलिफोर्निआ संस्थानांत अशा प्रकारचे प्रयोग केले आहेत. तेथें सहा वेड्यांचीं इस्पितळें आहेत. व ज्यांस स्वतःची काळजी घेतां येत नाहीं व ज्याची काळजी घेण्यास कोणी नाहीं अशा मानसिक दुबळ्यांस आश्रय देणारी एक संस्था आहे. हीं सर्व सरकारी आहेत, व या संस्थांत सुमारें ४००० वेड्यांवर व १००० दुबळ्यांवर अशी शस्त्रक्रिया गेल्या १८ वर्षांत केली आहे.

इस्पितळावरील वरिष्ठ डॉक्टरांस योग्य दिसल्यास, रोग्याच्या फायद्या-करतां त्याच्या मर्जीविरुद्ध देखील ही शस्त्रक्रिया करावी असा तेथें कायदा आहे.

वर सांगितलेली शस्त्रक्रिया एकंदर प्रकृतीलाही फायदेशीर असते, व

कॅलिफोर्निआ येथील यासंबंधीं कायदा प्रथम या दृष्टीनेंच केला होता. परंतु नंतर कांहीं वर्षांनीं त्याच कायद्यांत संततिनियमनाचा ही समावेश झाला, व आणखी कांहीं वर्षांनीं या हेतूलाच अधिक महत्त्व दिलें. यासंबंधीं कांहीं आंकडे विचार करण्यासारखे आहेत.

वेड्यांच्या इस्पितळांत ज्या स्त्रियांवर शस्त्रक्रिया केली, त्यांपैकीं शेकडा २४ अविवाहित, ६४ विवाहित, ३ विधवा व ९ काडी मोडलेल्या होत्या. यांत विवाहित स्त्रियांची संख्या इतकी जास्त आहे याचें कारण असें:—कांहीं स्त्रियांस बाळंतपणानंतर कांहीं दिवस वेड लागतें, व अशा स्त्रिया प्रत्येक बाळंतपणानंतर कांहीं महिने इस्पितळांत राहून नंतर परत जावयाच्या असें वारंवार होऊं लागलें. अशा स्त्रियांचीं बाळंतपणेंच बंद करणें बरें, म्हणून शस्त्रक्रियेकरतां त्यांची निवड झाली. शिवाय कांहीं आनुवंशिक रोगामुळें आपणास सुदृढ मुलें होणार नाहींत अशा समजुतीमुळें, किंवा फार मुलें झाल्यामुळें किंवा इतर कांहीं कारणानें कांहीं स्त्रियांस केवळ गर्भधारणेच्या भीतीनेंच वेड लागतें. अशा स्त्रियांवर हा प्रयोग करून त्यांची भीती नाहींशी केल्यावरोबर त्या साफ बऱ्या होतात असा अनुभव आला. या दोन कारणांमुळें विवाहित स्त्रियांची संख्या इतकी वाढली.

संस्थानांत वरील कायदा १९०९ सालीं पास झाला, परंतु दुबळ्या लोकांच्या संस्थेंत १९११ पर्यंत कोणावरही हा प्रयोग केला नाहीं, नंतर हळहळू सुरवात झाली, व हल्लीं कोणीही संस्था सोडून जाऊं लागल्यास त्यावर हा प्रयोग करतात. गर्भधारणेच्या भीतीनें कांहीं वेडगळ मुलींचे आईबाप त्या वयांत येण्याचे पूर्वी त्यांस शस्त्रक्रियेकरतां या संस्थेंत पाठवतात, व नंतर त्यांस परत घरीं नेतात.

अशा प्रकारच्या वेडगळ लोकांस संततिनियमनाचे इतर मार्ग शिकवणेंही कठिण, व ते त्यांचा उपयोग करतील अशी आशाही बाळगणें शक्य नाहीं. त्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांच्यावर शस्त्रक्रिया केल्यानें व्यक्तिस्वातंत्र्यास थोडासा बाध येतो खरा, परंतु त्यांचे यत्किंचितही नुकसान होत नाहीं. त्यांची संगमशक्ति कायम राहाते व त्यांची प्रजोत्पादनशक्ति मात्र नष्ट होते. अशा प्रकारची व्यवस्था सर्व जगभर होणें इष्ट आहे. पुढील पिढींचें आरोग्य यांतच आहे व हें प्रत्येक समाजाचें कर्तव्य आहे.

# सॉव्हिएट राज्यांतील विवाहाचा कायदा.

आपल्या सामाजिक रीति चांगल्या व दुसऱ्याच्या वाईट असें समजणें जरी स्वाभाविक व सार्वत्रिक असलें तरी विचारी माणसांस शोभत नाहीं. हल्लीं यूरोप व अमेरिकेंत एके वेळीं एका मनुष्यास एकापेक्षां अधिक पति किंवा पत्नी असतां कामा नये असा कायदा आहे. हीं राष्ट्रें आज प्रमुख असल्यामुळें हीच पद्धत सर्वांत श्रेष्ठ आहे असें ते कोणत्याही पुराव्याशिवाय म्हणत असतात, व ख्रिस्ती धर्माचे पुरस्कर्ते याचें श्रेय निष्कारण स्वतःकडेच घेतात, परंतु बायबलचा व या पद्धतीचा बिलकूल संबंध नाहीं. यासंबंधीं कांहीं लोक असें एक विधान करीत असतात कीं बायकांची व पुरुषांची संख्या जवळ जवळ सारखी असल्यामुळें हीच पद्धत नैसर्गिक आहे. वास्तवीक पाहतां या दोन गोष्टींचा अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नाहीं. शिवाय यूरोपांत स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां जास्त असल्यामुळें या पद्धतीनें पुष्कळ स्त्रियांस मनाविरुद्ध अविवाहित रहावें लागतें, व लग्नाची बायको एकच असली तरी एकपत्नीव्रतानें राहणारे लोक यूरोपांत फारसे सांपडणार नाहींत हें यूरोपीय लेखकही कबूल करतात.

कांहीं असो, विवाहासंबंधीं कायदे कोणत्याही देशांत समाधानकारक नाहींत. इतर कोणत्याही प्रकारचा करार ज्या दोन माणसांनीं केला असेल त्यांच्या खुषीनें मोडतां येतो. मग हाच करार कां मोडतां येऊं नये? आमचे मतें हा करार दोघांच्या खुषीनें मोडतां यावा इतकेंच नाहीं तर दोहोंपैकीं एकाच्या खुषीनेंही मोडतां आला पाहिजे, व करार करतांनाच त्यांत अशी अट घालण्यांत शहाणपणा आहे. नवरा बायकोस एकमेकांपासुन किंवा त्यांपैकीं एकास दुसऱ्यापासून जर त्रास होऊं लागला, तर त्या दोघांस एकत्र रहावयास लावणें म्हणजे जुलूम आहे व अशा तऱ्हेनें जुलूम करण्याचा अधिकार समाजास बिलकूल पोंचत नाहीं.

ज्या देशांत लग्न मोडण्याची वहिवाट आहे तेथेंही केवळ दोघांच्या खुषीनें तें मोडण्याची परवानगी नसते. त्यांपैकीं एक व्यभिचारी आहे अशी दुसऱ्यानें फिर्याद करणें जरूर असतें व तें कोर्टांत सिद्ध झालें तरच कोर्ट लग्न

मोडून दोघांसही पुनः विवाह करण्याची परवानगी देतें. यामुळें एखाद्या समंजस जोडप्यास जर असें वाटलें कीं आपलें पटत नाहीं, तेव्हां यापुढें एकत्र राहण्यांत हांशील नाहीं, व त्यांस कायदेशीर काडी मोडून घेणें असेल तर त्यांपैकीं एकानें दुसऱ्यावर व्यभिचाराबद्दल फिर्याद करावी लागते. अशा प्रसंगीं व्यभिचाराचें पाप नवरा आपल्या माथीं घेतो, व कोर्टाकरतां साक्षी पुरावा तयार करतो. याच्या उलट अमेरिकेंतील कांहीं संस्थानांत क्षुल्लक कारणावरूनही लग्न मोडूं देतात, व वास्तवीक हेंच बरोबर आहे. खरें कारण कितीही महत्त्वाचें असलें तरी तें कोर्टांत सांगण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.

शिवाय सर्व जगभर कायद्याच्या दृष्टीनें स्त्री म्हणजे नवऱ्याच्या जंगम इस्टेटीपैकींच एक भाग समजण्याची वहिवाट आहे. स्त्रियांस स्वतः पुरते पैसे मिळवण्याची ताकत क्वचितच असते व म्हणूनच विवाह हा स्त्रियांचा धंदा होऊन बसला आहे व त्यांना स्वातंत्र्याची किंमतच कळत नाहींशी झाली आहे.

विवाहासंबंधीं सर्व कायदे बदलण्याची जरूर आहे परंतु ते सरसकट बदलून अधिक न्याय्य करण्याचा प्रयत्न फक्त सॉव्हिएट्* राज्यांत झाला आहे. त्यांच्या नव्या कायद्यांत एकंदर २६२ कलमें आहेत त्यांतील कांहीं येथें देतों.

१३३. जेथें अपत्य झालें तेथें कुटुंब स्थापन झालें, अपत्य औरस आहे कीं नाही हें कायदा पहात नाहीं.

औरस व अनौरस मुलांस सारखेच हक्क आहेत.

१४०. एखादी अविवाहित स्त्री गरोदर असेल तर, ती बाळंत होण्याच्या निदान तीन महिने अगोदर सरकारी रजिस्टर खात्यांत तिला गरोदर होण्याची वळ, व भावी मुलाच्या बापाचें नांव व पत्ता नोंदतां येईल.

विवाहित स्त्री गरोदर असून होणाऱ्या मुलाचा बाप तिचा नवरा नसल्यास तिलाही वरील प्रमाणेंच नोंद करतां येईल.

१४३. त्या दोघांच्या त्यावेळच्या राहणीवरून तोच त्या मुलाचा बाप आहे असें कोर्टास वाटल्यास कोर्ट तसा निकाल देऊन गर्भारपण, बाळंतपण व मुलाचें संगोपन, या सर्वांस लागणाऱ्या खर्चाचा कांहीं भाग त्यानें द्यावा असें फर्मावतें.

---

* हल्लींचें रशियांतील राज्य.

१४४. गरोदर होण्याचे सुमारास त्या स्त्रीशीं आणखी कोणाचा संबंध होता असें कोर्टास दिसून आल्यास त्या सर्व लोकांस वरीलप्रमाणें खर्चाचा हिस्सा द्यावा लागतो.

१४८. मूल १४ वर्षांचें होईपर्यंत, त्याचा धर्म कोणता हें आईबापांस एकमतानें ठरवतां येईल. परंतु दोघांचें एकमत न झाल्यास त्याला कोणताही धर्म नाहीं, असें समजण्यांत येईल.

१६०. आईबापांच्या मालमत्तेवर मुलांचा हक्क नाहीं, व मुलांच्या मालमत्तेवर आईबापांचा नाहीं. ( कोणीही मेल्यास त्याची मालमत्ता सरकारजप्त होते ).

१०४. दंपत्यापैकीं एकानें वसतिस्थान बदलल्यास दुसऱ्यानें तेथें गेलेंच पाहिजे असें नाहीं.

१०५. विवाहामुळें मालमत्ता सामायिक होत नाहीं.

८६. घटस्फोटानें विवाह मोडतां येतो.

८७. दोघांच्या खुषीनें किंवा एकाच्या इच्छेनेंहि घटस्फोट करतां येईल.

या कायद्याच्या प्रस्तावनेंत खालील मुद्यांवर जोर दिला आहे.

‘ अविवाहित प्रेमसंबंधापेक्षां विवाहांत कोणताहि अधिक फायदा नाहीं. विवाह करणें व मोडणें तितकेंच सोपें आहे. विवाहांत पुरुष व स्त्री ( कायद्याच्या दृष्टीनें ) सारखीं आहेत. प्रजोत्पत्ति हा विवाहाचा उद्देश नव्हे. औरस, अनौरस या शब्दांस आतां कांहीं अर्थ राहिला नाहीं. कायद्याच्या या उदार दृष्टीमुळें विवाहाची संस्थाच हळहळू नाहींशी होईल. ’

हीं कलमें वाचून कांही लोक बेशुद्ध होऊन पडतील हें आम्ही जाणून आहों. परंतु सर्व पूर्वग्रह बाजूला ठेवून या गोष्टीचा विचार केला पाहिजे. जबरीनें दोन माणसांस एकत्र रहावयास लावतां येईल, परंतु मनावर कोणाची जबरदस्ती चालत नाहीं व जेथें मन नाहीं, तेथें शरीराची काय किंमत आहे ? व अशा ठिकाणीं विवाहित स्त्रीपुरुष जरी कृतीनें शुद्ध असलीं, तरी त्यांस कधींही सुख होणार नाहीं. जगांत सुखें पुष्कळ आहे. मनुष्याला तें मिळवण्याची अक्कल मात्र पाहिजे.

---

# बोबडे बाल.

———:o:———

लहान मुलांस प्रत्येक गोष्ट नवीन शिकावयाची असते यामुळें त्यांच्या प्रत्येक गोष्टींत चुका होत असतात. त्यांची बोबडी भाषा ऐकून आईबापांस व इतर लोकांसही कौतुक वाटून तेही मुलांशीं बोलतांना बोबडेंच बोलूं लागतात. यामुळें मुलांस बोबडेच उच्चार बरोबर वाटूं लागतात व ते सुधारण्याचा तीं प्रयत्नच करीत नाहींत. यामुळें त्यांस बोलावयास शिकण्यास वेळ लागतो इतकेंच नाहीं तर कधीं कधीं लहानपणच्या या संवयी कायम होऊन कित्येक मोठ्या माणसांसही ' र ' सारखे कठिण उच्चार करतां येत नाहींत, व मोठेपणीं या गोष्टीचें कौतुक न वाटतां ती लज्जास्पद होते. लहान मुलें सर्व गोष्टी अनुकरणानें शिकतात, व त्यांच्या कानावर कधींही चुकीचे उच्चार पडणार नाहींत अशी आसपासच्या लोकांनीं खबरदारी घेतली पाहिजे. एखादा चुकीचा उच्चार एकदां तोंडांत बसल्यावर तो बदलणें कठिण असतें.

बोबडे बोल ऐकण्यांत पुष्कळ लोकांस जी मौज वाटते, त्यापेक्षां लहान मुलांस चुका दुरुस्त करण्यास शिकविण्यांत अधिक मौज आहे असा आमचा अनुभव आहे. एका मुलाच्या तोंडांत ' आजोबा ' ऐवजीं ' आबोजा ' हा उच्चार खिळून गेला होता. त्याला प्रत्येक अक्षर निरनिराळें म्हणावयास सांगितल्यास तो ' आ-जो-बा ' असें म्हणून शेवटीं सबंध शब्द ' आजोबा ' म्हणण्याऐवजीं पुनः ' आबोजा ' म्हणत असे. परंतु असें दहा पंधरा वेळां केल्यावर आपली चुकी लक्षांत येऊन त्यानें बरोबर उच्चार केला, व नंतर इतर माणसांनीं त्याला ' आबोजा ' म्हणावयास कितीही वेळां सांगितलें तरी त्याचे तोंडांतून पुनः चुकीचा उच्चार निघाला नाहीं. लहान मुलांस शिकण्याची उत्कट इच्छा असते, शिकवणारा मात्र पाहिजे.

---

महात्मा गांधीं म्हणतात की विवाहित स्त्रीपुरुषांनीं सुद्धां संततीच्या हेतूनेंच समागम करावा, एरवीं करूं नये. श्रीकृष्ण भगवान म्हणतात ' मा कर्मफलहेतुर्भूः, मा ते संगोऽस्त्वकर्मणि ' म्हणजे फलाची अपेक्षा केल्याशिवाय कर्म कर. आतां महात्मा गांधी खरे, कीं भगवद्गीता खरी !

# या मासिकाबद्दल लोकमत.

१

**सोलापूर समाचार** ( ९-८-२७ ):—' हें मासिक सुप्रसिद्ध सुप्रजाजननशास्त्राचे लेखक प्रो. कर्वे यांचे संपादकत्वाखालीं निघत आहे. अश्लीलपणाच्या मर्यादेवर जाऊन पोहोंचणाऱ्या अशा बातम्या व माहिती या मासिकांत दिसत असल्यामुळें वर्गणीदारांची उणीव मुळींच भासणार नाहीं. असल्या पाणचट मासिकांचा कांहीं तरी उपयोग समाजाला होईल असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. '

इतका सभ्यतेचा आव आणल्यानंतर तेच ' समाचार ' कर्ते खालील ' पाणचट ' बातमी त्याच अंकांत छापतात !

' **नवरा बायकोचा खटला**. अमेरिकेंत एक विचित्र घटस्फोटाचा खटला आला होता. एक तरुणी आपल्या नवऱ्यास तिचा मुका म्हणून घेऊं देईना. नवऱ्यास अत्यंत राग आला व त्यानें कोर्टात दावा मांडून काडीमोड मागितली. जज्जसाहेबांनीं नवऱ्यास काडीमोड देतांना असे उद्गार काढले कीं एका वर्षांत फक्त ७ च मुके देणें ही गोष्ट काडीमोड करण्यास पुरेशी आहे. पाश्चात्यांचें विवाहबंधन मुक्यांच्या संख्येवर येऊन ठेपलें. असें म्हणण्यास आतां हरकत नाहीं. '

२

श्रीयुत श्री. कृ. कोल्हटकर लिहितातः—

' या महिन्याच्या आरंभीं आपणांकडून ' समाजस्वास्थ्य ' मासिकाचा पहिला अंक आला तो मिळाला. फार उपकार झाले. विषय व भाषा चित्ताकर्षक असल्यामुळें मासिक बरेंच लोकप्रिय व्हावें असें वाटतें. '

× × × ×

कै. गो. कृ. गोखले यांनीं स्थापन केलेल्या सर्व्हंट्‌ ऑफ्‌ इंडिया सोसायटीच्या ' मुंबई वैभव ' छापखान्यानें हें मासिक छापून देण्याचें [ फुकट नव्हे!] कबूल केलें होतें, परंतु छापखान्याचे चालक रा. देवळे यांनीं हस्तलिखित प्रत

पाहिल्यावर त्यांस आमचीं मतें फार क्रांतिकारक वाटल्यामुळें त्यांनीं तें छापण्याचें नाकारलें, त्यामुळें छपाई व्हावी तशी झाली नाहीं व अंक निघण्यास उशीर लागला. या सोसायटीचे सभासद स्वतःस उदारमतवादी समजतात !

× × × ×

या मासिकाची जाहिरात नेहमींच्या दरानें छापण्यास 'मासिक मनोरंजन'च्या एडिटरांकडे पाठविली असतां जाहिरातीनें सुद्धां आपणास विटाळ होईल असें वाटून त्यांनीं ती घेतली नाहीं ! 'मासिक मनोरंजन' छापखान्यानें मागें आमचें 'संततिनियमन' छापण्याचें नाकारलें होतें.

* * * *

बेळगांवच्या 'परीक्षक' पत्रानें आमच्यावर अग्रलेख लिहून आम्हांस सत्यशोधकांच्या पंक्तीस बसवून इतरही शिव्या दिल्या आहेत. संपादक रा. कानविंदे यांस जें जें पसंत नसेल ती अनीति व ती सरकारनें बंद केली पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. यांच्या चाणाक्षपणाचें एक उदाहरण सांगण्यासारखें आहे. इंग्लंडांतील जन्ममान गेल्या ५० वर्षांत दर हजारीं ३६ पासून १८ पर्यंत उतरलें असें आम्हीं लिहिलें होतें, त्यावरून तिकडे अविवाहित व विधवा स्त्रियांना मुलें होण्याचें आतां बरेंच कमी झालेलें आहे असा हे गृहस्थ तर्क काढतात व तो आमच्या माथीं मारतात ! शिवाय जातिभेदही कायम टिकावा अशी त्यांची इच्छा आहे, यावरून हे किती मागसलेले आहेत याची कल्पना येईल.

* * *

इतर पत्रकार जर इतके मागसलेले नसते तर आम्हांस हें मासिक सुरू करण्याची जरूरच भासली नसती.

---

भुताटकीचे प्रोफेसर ऋषि यांनीं लोकमान्यांकडून स्वतःलाच सर्टिफिकेट घेतलें याबद्दल त्यांचा कोणीं हेवा करण्याचें कारण नाहीं. कोणालाही कोणत्याही मेलेल्या मनुष्याकडून कशाही प्रकारचें सर्टिफिकेट ते मिळवून देतील अशी आमची खात्री आहे.

# नवीन लेखांतील निवडक विचार.

—:०:—

दक्षिण अमेरिकेंत आर्जेंटीना नांवाचें एक लोकसत्ताक राज्य आहे तेथील वेश्यावृत्तीचें वर्णन एका नवीन फ्रेंच पुस्तकांत दिलें आहे. तेथें फ्रेंच वेश्या पुष्कळ गेल्या आहेत. त्यांना अतिशय पैसे मिळतात व कुंटणकी करणारांस त्याही-पेक्षां जास्त मिळून ते दोन तीन वर्षांत लक्षाधीश होतात. तेथें पोलीस आहे परंतु त्यांचा उद्योग अशा लोकांकडून शक्य तितके पैसे उकळण्याचा असतो. जगांत दारिद्र्य व जुलूम जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत हे प्रकार नुसत्या कायद्यांनीं बंद होणार नाहींत असें ग्रंथकाराचें मत आहे.

× × × ×

मिस् कॅथरीन् मेयो नांवाच्या एका अमेरिकन् बाईनें ' मदर् इंडिया ' ( हिंदमाता ) नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. याचे आधीं याच बाईंनीं फिलिपाइन बेटांतील लोकांची नालस्ती करून तीं अमेरिकन लोकांच्या ताब्यांत राहिलीं तरच त्यांची धडगत आहे असें सिद्ध करण्याकरतां एक पुस्तक लिहिलें होतें. अर्थात् अमेरिकेंत त्या पुस्तकाचा पुष्कळ खप झाल्यामुळें त्या चढून जाऊन त्यांनीं वरील पुस्तक हिंदुस्थानची नालस्ती करण्याकरतां लिहिलें आहे.

हिंदुस्थानची सामाजिक स्थिति फार भयंकर आहे, चालीरीति घाणे-रड्या व नीतिविरुद्ध आहेत, स्त्रियांस शिक्षण मुळींच नाहीं व त्या पडद्यांत राहतात, वगैरे गोष्टी लिहून, ब्रिटिश सरकार आहे म्हणून कांहीं तरी आशा आहे,नाहीं तर हिंदुस्थानचे हाल कुत्रा खाणार नाहीं, तेव्हां त्यांनीं सतत हिंदुस्था-नावर राज्य करून आमच्यावर असेच उपकार करीत रहावें हेंच इष्ट आहे असा निर्णय काढला आहे. याबद्दल ब्रिटिश सरकारकडून मिस मेयो यांस बक्षिस मिळालें पाहिजे.

या पुस्तकांत हिंदी लेखकांचे बरेच उतारे दिलेले आहेत व त्यांत सत्याचा बराच अंश आहे हें निर्विवाद आहे, परंतु तें सत्य अशा तऱ्हेनें मांडलें आहे कीं कोणत्याही परकी वाचकाचा हिंदुस्थानाबद्दल गैरसमज व्हावा. वाईट गोष्टी तेवढ्याच निवडून काढून त्यांची अशाच प्रकारची मांडणी केल्यास

अशाच प्रकारचें पुस्तक कोणत्याहि देशाबद्दल लिहितां येईल, व स्वतःची प्रौढी मिरवण्याकरतां इतर देशांची नालस्ती करण्याची जरूर अमेरिकन लेखकांस भासते हें आश्चर्य आहे. हिंदी लोकांस अमेरिकेंत नागरिकत्वाचे हक्क देणें योग्य नाहीं असें सिद्ध करण्याचा तर मिस् मेयो यांचा हेतु नसेल ना ?

कांहीं असो, 'निंदकाचें घर असावें शेजारीं' या दृष्टीनें या पुस्तकांत पुष्कळ गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत, परंतु याच गोष्टी आमच्या समाज-सुधारकांनीं वारंवार सांगितलेल्या आहेत व मिस् मेयो यांस मधें तोंड घालण्याची मुळीच जरूर नव्हती.

* * *

येथील 'गृहलक्ष्मी' मासिकाच्या ऑगस्टच्या अंकात 'कटुसत्यवादिनी' नामधारी लेखिकेचा एक लेख आला आहे, व त्यामुळें स्त्रीस्वातंत्र्याच्या द्वेष्टयांस, 'पहा, स्त्रियासुद्धां आम्हांस स्वातंत्र्य नको म्हणतात!' असें म्हणण्यास सवड दिली आहे. ही तिच्या म्हणण्याप्रमाणें खरोखरच पुण्याची जी. ए. आहे, कीं वत्सला वहिनींचीच एकादी नातलग आहे हें समजत नाहीं. ती खरी धरल्यास तिची मनःस्थिति शोचनीय आहे. अमेरिकेंत रणें पडून ज्यावेळीं गुलामांस मुक्त करण्याचें ठरलें त्यावेळीं पुष्कळ गुलाम मुक्त होण्यास कबूल नव्हते. नेहमीं दुसऱ्याच्या कलाप्रमाणें वागण्याची ज्यांस संवय झाली त्यांस स्वतंत्र्य जड वाटावें यांत कांहीं नवल नाहीं. या 'कटुसत्यवादिनी' म्हणवून घेणाऱ्या 'जी. ए.'स **नवीन अबलांची** एक जात होत आहे अशी भीति वाटते, परंतु यांच्या लेखावरून आम्हांस अबलांची एक नवीनच जात दिसूं लागली आहे.

'आम्हांस आय. सी. एस्. नवरे पाहिजेत असें आमचें म्हणणें नाहीं, तुमचें शिक्षण व पैसाही बेताबातीच असला तरी चालेल, आमच्या शिक्षणामुळें आमचा वरचष्मा होईल अशी तुम्हांस भीति वाटत असेल तर आम्ही अगदीं शपथ घेऊन सांगतों कीं आमच्यावर शिक्षणाचा काडीइतका परिणाम झालेला नाहीं. तुमच्याइतकेंच आम्हांला ज्ञान आहे असें आम्ही कध्धीं कध्धीं म्हणणार नाहीं; घरांत स्वयंपाक, केरपोतेरें, सांगाल तें काम करूं, अगदीं ताटाखालचीं मांजरें होऊन राहूं; थकलां असलांत तर–किंवा नसलांत तरीसुद्धां–तुमचे पाय

चेपूं, आम्ही थकलों तरी तुम्हांला चेपायला सांगणार नाहीं; संसारांत एके ठिकाणीं नांदावयचें ह्मणजे कुणीं तरी एकानें–नव्हे आह्मींच–पड खाल्ली पाहिजे हें आह्माला अगदीं कबूल आहे, इतकेंच नाहीं पण तुम्ही जे जे कांहीं म्हणाल तें आम्हांला सर्वस्वी कबूल आहे, पण आमचा स्वीकार करा; कराच गडे एकदां मनाचा धडा ! करायचाना पण ? असं कायतें ? तुम्ही नाहींच म्हणाल तर आमचा पूर्वापार चालत आलेला लग्नाचा धंदा कसा बरें चालेल ? आणि सुप्रजा बाजूला राहिली, पण नुसती प्रजा तरी कशी निर्माण होणार ? लोक म्हणाले तरी आम्ही कांहीं तितक्या वाईट नाहीं. पहाच एकदां लग्न करून.'

असें नरम आलेल्या त्राटिकेप्रमाणें केविलवाण्या स्वरांत रडगाणें गाणाऱ्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या अबलांचा एक नवीन वर्ग आम्हांस दिसूं लागला आहे.

या बाबतींत त्यांनीं इतक्यांत अधीर होण्याचें कारण नाहीं. ज्यांना विशेष सुशिक्षित नवरे नको असतील त्यांची पैसे मिळवण्याची तयारी असल्यास घरकाम करण्यास तयार असलेले आचारी, पाणक्ये त्यांच्यांशीं लग्न करण्यास एका पायावर तयार होतील अशी एका मित्रांकडून आम्हांस सूचना आली आहे.

* * * *

## धार्मिक वेड.

यूरोपांतील एक काउंट ( सरदार ) व त्यांची पत्नी यांस १९२४ च्या डिसेंबर मध्यें धार्मिक वेड लागून काउंट साहेब स्वतः एका पुरुषांच्या मठांत व त्यांची पत्नी स्त्रियांच्या मठांत जाऊन राहिली.

कॅथोलिक धर्मगुरु पोप यांस घटस्फोट पसंत नाहीं, परंतु अशा रीतीनें नवराबायको वेगळीं झाल्यास त्यांना आनंद आहे, कारण दोघांची सर्व इस्टेट अशा रीतीनें त्या दोन मठांस मिळाली. पैशाचा लोभ धर्मगुरूंसही सुटत नाहीं, व सर्व धर्मांची हीच स्थिति आहे.

* * * *

मनुष्याच्या डोक्यावर साधारणतः १,२०,००० केंस असतात.

# ताजी व शिळी बातमी.

हिंदुस्थानांत संततिनियमनाची जरूरी असल्यामुळें अमेरिकेंतील पुरस्कर्त्यां-पैकीं प्रमुख मिसेस सँगर यांस येथील कांहीं युनिव्हर्सिट्यांनीं येत्या हिंवाळ्यांत येथें व्याख्यानें देण्याकरतां बोलावलें आहे असें त्यांच्या मासिकावरून समजतें.

\+ + + +

जपानी लोकसंख्या अतोनात वाढून अन्न पुरेनासें झाल्यामुळें संतति-नियमनाची माहिती देण्याची व्यवस्था जपानी सरकार करणार आहे. अशी व्यवस्था इंग्लंडमध्येंही नाहीं; मग हिंदुस्थानांत होण्याची गोष्टच बोलावयास नको.

\+ + + +

इंग्लंडमधील खेड्यापाड्यांतील लोकांस संततिनियमनाची माहिती देण्या-करतां परिचारिकांची एक टोळी सर्व देशभर दौऱ्यावर पाठविण्याची व्यवस्था डॉ. मॅरी स्टोपस् करीत आहेत असें समजतें.

\+ + + +

खान–पाणंदीकर विवाहासंबंधीं नागपूर येथें भरलेल्या एका सभेंत एका शास्त्रीबुवांनीं भाषण करून तरुण स्त्रियांनीं ‘ टेनिस ’ खेळणें ही अनीति आहे असें सांगितलें. गरीब बिचारे शास्त्रीबुवा ! त्यांचे मेंदूस नागरपूरची हवा मानवत नाहीं असें दिसतें.

× + + +

वरील विवाहास ‘ व्यभिचार ’ म्हणतां येईल अशा रीतीनें या शब्दाचा अर्थ बदलण्याकरतां एक कमिटी नेमिली गेली अशी वंदता आहे !

\+ + + +

असे विवाह करणारांस चोप द्यावा असेंही नागपूरचे एक विद्वान बोलले. हिंदुधर्मात जर अशाप्रकारचा जुलूम होऊं लागेल, तर इतर धर्म बरे म्हणण्याची वेळ येऊन हिंदु लोक भराभर धर्मांतर करूं लागतील. हिंदु महासभेची जर हीच इच्छा असेल तर आमचे कांहीं म्हणणें नाहीं, परंतु एरवीं त्यांनीं अशीं रानटी भाषणें बंद केलीं पाहिजेत.

\+ + + +

मिश्रविवाहांत मुलीच्या जातीला कमीपणा येतो व म्हणून वरील विवाहामुळे हिंदूंना कमीपणा आला असें कांहींचें म्हणणं पडतें. तो भरून काढण्याकरतां कांहीं हिंदु पुरुषांनीं मुसलमान स्त्रियांशीं लग्न करून हिंदूंस जास्तीपणा आणावा अशी आमची सुचना आहे.

\+ \+ \+ \+

या विवाहामुळें निदान एक मोठा फायदा झाला आहे तो असा कीं कोणत्याहि दोन हिंदु जातींत विवाह होण्यास फारशी हरकत नाहीं असें बरेच लोक कबूल करूं लागले आहेत. हें काय थोडें झालें?

× × × ×

इंडोचायना या फ्रेंच वसाहतींतील टॉनकिन् शहरांतील यूरोपीय लोकांस गुप्त रोगांच्या प्रतिबंधाचे मार्ग माहीत झाल्यापासुन त्यांच्यांत गुप्त रोगांचें प्रमाण पुष्कळ कमी झालें आहे. १९१५ सालीं या रोगांकरतां शेंकडा १७ लोक इस्तिळांत जात असत, तें प्रमाण आतां हजारांत सात असें झालें आहे. तेथील रहिवाशांस मात्र हें ज्ञान नसल्यामुळें त्यांच्यावर कांहीं परिणाम झालेला नाहीं. तेथें गुप्त वेश्या फार असल्यामुळें वेश्यांची तपासणी करण्याचा विशेष उपयोग होणार नाहीं, व प्रतिबंधाचे उपाय सर्वांस शिकवणें हाच एक उपाय आहे, असें तेथील एक डॉक्टर लिहितात.

× × × ×

मिस् ॲलिस् रिचिंग्ज् नामक एका विलायती स्त्रीनें ' टाइम्स् ऑफ् इंडिया ' मध्यें नोकरीकरतां जाहिरात दिली होती. त्यावरून येथील एका पारसी गृहस्थानें ' टी. मेलिन् ' अशी खोटीच सही करून तिला एक पत्र लिहिलें. त्यांत ' तुला नोकरी मिळेपर्यंत मी तुला पैशाची मदत करीन. तूं येथें ये म्हणजे, आपण रात्रीं गाडींतून फिरावयास जाऊं व चैन करूं ' अशा अर्थाचा मजकूर होता. मिस् ॲलिस या त्यावेळीं अलिबाग येथील पोलिस सुपरिंटेंडंटकडे नोकरीस होत्या व तें पत्र त्यांनीं त्यांस दाखविलें. अशा रीतीनें विलायती स्त्रीचा उपमर्द झाल्याबद्दल ते खूप संतापले व मुंबईच्या पोलिसास त्यांनीं पत्र लिहिलें.

पत्र लिहिणारास पकडण्याकरतां येथील पोलिसानें एक युक्ति योजिली. मिस् रिचिंग्ज् येथें नसल्यामुळें मिस् कॅथरीन डेविस् नांवाच्या येथल्या एका बाईस मिस् रिचिंग्ज्च्या नांवान एक पत्र लिहावयास सांगितलें व त्यांत मी रात्रीं फिरावयास जाण्यास तयार आहें असा मजकूर लिहिला. या पत्रास उत्तर आलें नाहीं तेव्हां त्यांनीं आश्चर्य प्रदर्शित करून पुनः तशाच मजकुराचें दुसरें एक पत्र लिहिलें. याला ' टी. मेलिन् ' यांचें उत्तर येऊन संकेतस्थानीं पोलिसचे लोक अगोदर लपवून ठेऊन मिस डेविस् या ठरलेला पोषाख करून गेल्या, व ' टी. मेलिन्' सही करणारा पारशी गृहस्थ तेथें आल्यावर ' पोलिसानें त्यास पकडून त्यावर खटला केला. हा खटला आगस्ट १० रोजीं येथील चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. दस्तूर यांजपुढें चालून त्या पारशास एक महिना साधी कैद व ५०० रु. दंडाची शिक्षा झाली. हे गृहस्थ चूक कबूल करून क्षमा मागण्यास व मिस् रिचिंग्ज् सांगतील ती रक्कम दान करण्यास तयार झाले असतांही त्या कबुल झाल्या नाहींत. ' त्यानें माझ्यासारख्या विलायती ( इंग्लिश ) स्त्रीचा उपमर्द केला आहे तेव्हां यास जास्त शिक्षा झाली पाहिजे ' असें त्या म्हणत बसल्या. यावरून त्यांची केवळ सुड घेण्याची बुद्धि स्पष्ट होते.

× × × ×

वास्तवीक पाहतां मिस् रिचिंग्ज् यांचें कोणत्याही प्रकारचें नुकसान झालें नव्हतें. त्यांच्याच म्हणण्यावरून तें पत्र लिहिणारा मनुष्य सच्चा मदतगार नाहीं हें त्यांस कळून चुकलें होतें. हें प्रकरण इतक्या विकोपास नेण्यापेक्षां कोणत्याही समंजस बाईनें त्या पत्राकडे दुर्लक्षच केलें असतें. परंतु हिंदुस्थानांतील विलायती स्त्रियांचे अंगीं समंजसपणा असावा कसा ? ही त्यांची चूक नाहीं. विलायती पुरुषांस व स्त्रियांसही हिंदुस्थानांत जें फाजील महत्त्व मिळतें त्यामुळें त्यांस ' ग ' ची बाधा झाल्यास नवल नाहीं. विलायतेंत अशा पत्रावरून कोणास कधींही शिक्षा होत नाहीं; व येथेंही पारशाच्या ठिकाणीं विलायती पुरुष असता तर या बाईनीं शिक्षेचा हट्ट खास धरला नसता असें त्यांच्या साक्षीवरून दिसतें.

पोलिसानें इतका उपद्व्याप केला हें ठीकच आहे [ खोट्या सह्या कर-

ण्याची पोलिसला परवानगीच असते ], एरवीं पोलिस कुचकामाचें आहे अशी ओरड व्हावयाची. परंतु मिस डेविस् या पोलिसांत नाहींत, त्या येथील जागरूक संस्थेतर्फे काम करीत असतात. त्यांस अशा तऱ्हेनें पोलिसास मदत करण्याचें कांहीं एक कारण नव्हतें. पहिल्या पत्राचें उत्तर आलें नाहीं हें पाहून तरी त्यांनीं यांतून अंग काढावयास पाहिजे होतें. पण नाहीं, दुसऱ्याचा सूड तिसऱ्यावर उगविण्याची हौस असल्यामुळें यांनीं आणखी एक पत्र लिहून पारशास फसवलें. आमच्या मतें यांची ही कृति अत्यंत निंद्य आहे.

आरोपीची कृति आम्हांस पसंत नाहीं, परंतु अशा तऱ्हेनें त्यानें पत्र-व्यवहार बंद केला असतांही सूड घेण्याकरतां त्याचा पिच्छा पुरवणें हें आम्हांस त्याहीपेक्षां कमी पसंत आहे, व या सर्व खटल्यांत मिस रिचिंग्ज् यांचाही अत्यंत दुष्टपणा दिसून येतो. आरोपीच्या पत्राचा हेतु वाईट होता परंतु त्यांत फसवण्याचा प्रयत्न नव्हता, व त्यानें त्या फसल्याही नाहींत. विलायती स्त्रिया ‘ या देशांत ’ कोणाबरोबर रात्रीं फिरावयास जात नाहींत या त्यांच्याच विधानावरून ‘ इतर देशांत जातात ’ हें स्पष्ट होतें, व या देशांत जात नाहींत हेंही खरें नाहीं. तेव्हां हें केवळ पत्रांत लिहिल्यामुळें सापासारखा दांत धरण्याचें कांहीं कारण नव्हतं, व तो मनुष्य क्षमा मागण्यास तयार झाल्यावर तरी त्यांनीं तें कबूल करावयास पाहिजे होतें. यांत आरोपीपेक्षां मिस रिचिंग्ज् यांचाच दुष्टपणा दिसून येतो.

× × × ×

मिस् डेविस् या ‘ लीग ऑफ मरसी ’ ( दयासंघ ) च्या सभासद आहेत. यांची दयेची कल्पना कांहीं अजब दिसते. या एकादेवेळीं निर्दय झाल्यास सर्व जगास आग लावतील कीं काय अशी भीति वाटते.

\+ \+ \+ \+

जागरूक संस्थेच्या ( व्हिजिलन्स असोसिएशन ) लोकांचीं डोकींच कांहीं चमत्कारिक असतात. वरील बाईनीं एकदां वेश्यांवर व्याख्यान दिलें होतें. वेश्यांकडे जाणें म्हणजे अनीति आहे असें लोकांस समजावून सांगितल्यास लोक जाईनासे होतील व वेश्या आपोआप नाहींशा होतील ही कल्पना त्यांनीं

त्यावेळीं लोकांपुढें मांडली होती. हा शोध लावण्यापूर्वी लोक त्याला नीति समजत असावेत असें दिसतें !

× × × ×

त्याच संस्थेचे एक सेक्रेटरी एकदां आमचेजवळ बोलतांना म्हणाले:–'एक विलायती शिपाई व एक वेश्या अमुक नंबरच्या गाडींतून जातांना पाहिलीं, अशा प्रकारच्या बिनसहीच्या तक्रारीं आमचेकडे पुष्कळ येतात, परंतु पुरावा नसल्यामुळें कांहीं करतां येत नाहीं. याकरतां आम्हीं माणसें नेमणार आहों व त्यांच्याकडून अशी माहिती मिळाल्यास गाडीवाल्यावर आम्ही फिर्याद करूं ! गाडीवाल्यांबद्दल असा एकादा कायदा असल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं.

× × × ×

डॉ. राबिनसन् यांनीं न्यू यॉर्क येथील जागरूक संस्थेसंबंधी एक मजेदार गोष्ट दिली आहे. एक गृहस्थ आपल्या बायकोबरोबर हिंडत असतां एका दुकानांत शिरला, व ती बाहेर उभी राहिली. इतक्यांत ओळखीचा एक गृहस्थ तेथें आला, तेव्हां तिनें स्मित केलें व तो जवळ येऊन तिच्याशीं कांहीं वेळ बोलून निघून गेला. जागरूक संस्थेच्या एका मनुष्यानें हें पाहिलें, व ही बाई रस्त्यांत एकटीच उभी राहून स्मित करून पुरुषांस जवळ बोलावून त्यांच्याशीं गुप्तसंकेत करते, अशी त्याची कल्पना होऊन तो तिला पोलिसच्या ताब्यांत देण्याकरतां हात धरून पकडून नेऊं लागला. नवऱ्यानें हा सर्व प्रकार दुकानांतून पाहिला व त्यानें बाहेर येऊन त्या उपव्यापी जागरूक गृहस्थास एक ठोंसा मारून खालीं पाडलें व त्याचा चांगला समाचार घेतला ! दुसऱ्याच्या कारभारांत तोंड घालणारांची अशी खोड मोडली पाहिजे.

\+ \+ \+ \+

मिस रिचिगूज् म्हणतात कीं विलायती स्त्रियारात्रीं पुरुषाबरोबर फिरावयास जात नाहींत. त्यांच्या नीतिमत्तेचें उदाहरण म्हणून 'टाइम्स ऑफ इंडिया' मधील खालील जाहिरात 'इंडिअन् नॅशनल् हेरल्ड'न दिली आहे.

'विलायती स्त्रीस स्वतःच्या मोठ्या शय्यागृहांत व्यापारी गृहस्थ भागीदार पाहिजे. विलायती पद्धतीचें स्नानगृह व पडवी आहे. जेवण वगैरे सर्व सोय होईल. कोट, मुंबई, नं. १००३ टाइम्स ऑफ् इंडिया.'

याशिवाय चंपी करणाऱ्या विलायती बायकांच्या जाहिराती असतात त्या वेगळ्याच.

× × × ×

कोणतेंही नवीन नाटक रंगभूमीवर येण्यापूर्वी येथें पोलीस कमिशनरची परवानगी लागते. विलायतेंत हें काम एका स्वतंत्र अधिकाऱ्याकडे सोंपविलेलें असतें, व त्यानें अमुक नाटक नैतिक व राजकीय दृष्टीनें योग्य आहे कीं नाहीं हें ठरवावयाचें असतें. नुकतेंच ' फॅनॅटिक्स् ' नांवाचें एक नवीन नाटक झालें त्यांत एका विवाहित स्त्रीस चार आशक आहेत असें दाखविलें होतें. इतके आशक बरे नाहींत असं अधिकाऱ्यास वाटून त्यानें नाटककारास त्यांपैकीं एक कमी करावयास लावलें, व नंतर तें नाटक करण्यास परवानगी दिली, असें एका फ्रेंच पत्रावरून समजतें !

+ + + +

आगष्ट १३ तारखेस सकाळीं मदनपुऱ्यांतील एका चाळींतील अशरफ नांवाच्या एका मुसलमानानें आपली १६ वर्षांची बायको शेजारच्या चाळींतील इस्माइल नांवाच्या मनुष्यास वश आहे अशा संशयावरून तिचा गळा कापून खून केला व इस्माइल याचा खून करण्यास जात होता, इतक्यांत ओरड झाल्यामुळें तो आपण होऊन पोलीसचे स्वाधीन झाला.

---


## सप्टेंबर २० ला विक्रीस तयार

# गुप्त रोगांपासून बचाव.

लेखक :-प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए.

**आकृतींसह संपूर्ण माहिती. किंमत १२ आणे, व्ही. पी नें १५ आ.**

**शिवाय संततिनियमनाचीं व गुप्तरोगापासून बचावाचीं सर्व साधनें** आमचेकडे मिळतील.

**राइट एजन्सी**, २० भटवाडी रस्ता,
गिरगांव, मुंबई.